युसुफ मेहरअली

नव्या क्षितिजांचा शोध

राष्ट्रीय चरित्रमाला

युसुफ मेहरअली

नव्या क्षितिजांचा शोध

मधु दंडवते

अनुवाद
कुमुद करकरे

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि. मुंबई ह्यांनी हे पुस्तक 1986 साली मूळ इंग्रजीत प्रकाशित केले.

ISBN 81-237-3656-8

2001 (शके 1923)

YUSUF MEHERALLY : QUEST FOR NEW HORIZONS *(Marathi)*

रु. 45.00

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए 5, ग्रीन पार्क,
नवी दिल्ली 110016 यांनी प्रकाशित केले.

जयप्रकाश नारायण

ह्यांना

ज्यांच्या दृष्टीने

"युसुफ मेहरअलींचे समर्पित जीवन

एक अशी अभिव्यक्ती होती,

जिचे स्थान गांधीजींच्या नंतर

सर्वप्रथम होते."

अनुक्रमणिका

प्रस्तावना

माझे परम मित्र युसुफ मेहरअली त्यांच्या जीवनचरित्राशी ह्या प्रस्तावनेद्वारा मी सहभागी होऊ शकलो याबद्दल मला अतिशय आनंद होत आहे.

खरे तर, मेहरअलींचे चरित्र वीस वर्षांपूर्वीच प्रसिद्ध व्हावयास हवे होते. गेल्या दोन दशकांत सामाजिक व राजकीय परिस्थितीचा संदर्भ झपाट्याने बदललेला आहे; याचा परिणाम म्हणून सध्याच्या तरुण पिढीला हे चरित्र त्यांच्या स्वतःच्या सामाजिक परिस्थितीच्या चौकटीतील दृष्टिकोनातून समजावून घेणे कठीण आहे. मेहरअलींनी ज्या पार्श्वभूमीवर आपली ध्येये सिद्ध करण्याचा प्रयत्न केला; आणि ज्या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आज बदलत्या परिस्थितीतही आमची धडपड चालू आहे, त्या पार्श्वभूमीचा थोडक्यात मागोवा घेणे हे आजही उपयुक्त ठरणार आहे. ती मूल्ये म्हणजे मानवाचे स्वातंत्र्य आणि शोषण व अन्याय यांच्यापासून सदैव मुक्त असलेल्या नवसमाजाची उभारणी. 1927 ते 1947 हा वीस वर्षांचा कालखंड किंवा दोन महायुद्धांमधील काळ मेहरअलींच्या आयुष्यातला कार्यमग्नतेचा कालखंड म्हणावा लागेल.

पहिल्या जागतिक महायुद्धाची अखेर ही राष्ट्राराष्ट्रांतील संबंधांमध्ये दूरगामी उलथापालथ घडवून गेली. पहिली गोष्ट अशी, की या युद्धातील विजयी राष्ट्रांच्या नैतिकतेला आव्हान देणारे सोव्हिएत रशिया हे राष्ट्र उदयाला आले; आणि त्यामुळे पाश्चिमात्य राष्ट्रांतील अंतर्गत परस्परविरोध स्पष्ट झाले. दुसरी घटना म्हणजे अमेरिका ही जागतिक महासत्ता म्हणून या युद्धोत्तर जगात समजली जाऊ लागली. आणखी एक महायुद्ध टाळण्याच्या दृष्टीने एक पाऊल म्हणून राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली; आणि त्या व्यासपीठावरून वर्चस्व गाजवणाऱ्या राष्ट्रांच्या ध्येयधोरणांच्या वैधतेची चर्चा होऊ लागली. विशेषतः लहान राष्ट्रांमध्ये, स्वयंनिर्णय आणि कायद्याचे राज्य यांच्याशी सुसंगत संबंध राखण्याचे आवाहन करणारी काही बडी राष्ट्रे आपल्या साम्राज्यातील, आधिपत्याखालील राष्ट्रांना वागवताना बेमुर्वतपणे स्वतःच स्वघोषित आचारसंहितेचा भंग कसा करतात, यांचा धडधडीत पुरावा याच

राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावर मिळत गेला आणि आवाहनामागील त्यांचे खरे स्वरूप उघडकीस आले. साम्राज्यवादावरील लेनिनच्या पुस्तकाने विसाव्या शतकातील वसाहतवादाचा आर्थिक पाया उघड करून दाखविला आहे. आशिया आणि आफ्रिका खंडातील जनतेमध्ये उत्पादनासाठी लागणारी कौशल्ये व साहसी वृत्ती यांचा अभाव असल्यामुळे अविकसित राहिलेल्या प्रदेशांतील संपन्न नैसर्गिक साधन-सामग्रीवर एकाधिकारी प्रभुत्व मिळवणे, ही वसाहतवादामागील मूळ प्रेरणा आहे, असे त्याने म्हटले आहे.

सरंजामशाहीच्या अंतापासून पायरी-पायरीने भांडवलशाहीचा विकास कसा होत गेला, त्याचे स्पष्ट आरेखन लेनिनने आपल्या पुस्तकात केले आहे. मक्तेदारीवर आधारित भांडवलशाही हा साम्राज्यवादाचा अंतिम टप्पा कसा आहे; आणि त्यामधून जागतिक संघर्षाचा वणवा कसा पेटणार आहे, याचे नेमके विवेचन लेनिनने केले आहे. ब्रिटिश, फ्रेंच आणि डच साम्राज्यवाद्यांच्या वसाहतीतील स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या सर्व बुद्धिमंतांना लेनिनने केलेले चालू इतिहासाचे आर्थिक विश्लेषण डोळ्यांत अंजन घालणारे आहे. भूतकाळाकडे स्वप्नाळू आणि रोमांचकारी दृष्टिकोनातून पाहणाऱ्या आमच्यापुढे त्याने अर्धऔद्योगिक समाजातील सामाजिक शक्तींच्या परस्परसंबंधांचे वास्तव चित्र ठेवले. भारताचा भूतकालीन वारसा व परंपरा यांच्याबद्दल प्रेम बाळगणाऱ्या पिढीतील मेहरअली होते; पण साम्राज्यवादी वर्चस्वाने पुढे ठेवलेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी नवभारताची उभारणी करण्याचा संदेश भारतीय युवकांना देताना त्यांनी पुनरुत्थानाची भाषा कधी काढली नाही.

या दोन दशकांतील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे राष्ट्रीय भावनेची– 'राष्ट्र' या जाणिवेची झपाट्याने झालेली वाटचाल. पहिल्या महायुद्धानंतर मेसोपोटेमियाच्या रणांगणावर ज्यांनी आपले कौशल्य आणि शौर्य सिद्ध केले अशा अनेक हिंदी तरुणांना भारतीय माणूस युद्धकौशल्यात अगर शांतताप्रस्थापनेत कोणत्याही गोऱ्या व्यक्तीपेक्षा कमी नाही, हे माहीत झाले होते. डॉ. जगदीशचंद्र बोस, सी.व्ही.रामन आणि मेघनाद साहा यांना जीवशास्त्रीय व भौतिक शास्त्रसंशोधनात जगात मान्यता मिळाली होती. भारताजवळ नुसताच तेजस्वी भूतकाळ नाही, तर त्याची मानवी साधनसामग्री, ही भारताच्याच काय पण तिसऱ्या जगाच्याही पुनरुत्थानासाठी मार्गदर्शक होईल, अशा बुद्धिमंतांची खाण आहे हेही त्यांना कळून चुकले होते. सुप्त शक्तीचे झालेले हे दर्शन आत्मविश्वास आणि श्रद्धा यांचा एक अविभाज्य भाग होता. परकीय दडपण झुगारून देण्यासाठी उत्सुक झालेल्या आणि धडपडणाऱ्या जनतेला गांधीजींनी सत्याग्रहाचे हत्यार देऊन सार्वजनिक कृतीचा एक नवीन धडा दिला. गांधीजींची विशेष कर्तबगारी ही, की त्यांनी या देशात एक नैतिक

उमंग निर्माण केली आणि आपण शंभर टक्के नैतिक उद्दिष्टांसाठी लढत आहोत आणि आपला शत्रू शंभर टक्के नैतिकदृष्ट्या चुकीच्या भूमिकेवर आहे याबद्दलचा विश्वास जनतेमध्ये रुजवला. गांधीजींनी या देशातील राज्यकर्त्यांनाही बचावाच्या भूमिकेत आणले. 1931 साली प्रथमच थोडे कुरकुरत का होईना, पण व्हॉइसरॉयने भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे इंडियन नॅशनल कॉंग्रेस हे एक प्रभावी व्यासपीठ आहे हे मान्य केले. मेहरअलींनी लाला लजपतराय यांच्यासारख्या नेत्यांबरोबर सायमन कमिशन समोर झालेल्या देशव्यापी निदर्शनांत भाग घेऊन पुढील मिठाच्या सत्याग्रहासाठी योग्य नांगरणी करून ठेवली. मिठाच्या सत्याग्रहाला मिळालेल्या हजारो, लाखोंच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने भारतामध्ये ब्रिटिश राजवटीचे नैतिक अधिष्ठान मुळापासून हालल्याची जाणीव निर्माण झाली.

युसुफ मेहरअली ज्या कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीचे आघाडीचे संस्थापक होते, त्या पार्टीने राजकीय लढ्याशी संबंधित असणाऱ्या जनतेला स्वच्छ मार्गदर्शन केले. कॉंग्रेसमधील लहान-थोर नेते व कार्यकर्ते यांच्या डोळ्यांसमोर नव्या जगाचा जो नकाशा उलगडत होता त्याचा, गांधीजींच्या दृष्टीसमोर जे प्रारूप होते त्याच्याशी कोणत्याही प्रकारचा संघर्ष तर नव्हताच पण नवीन सामाजिक क्षितिजांचे दर्शन त्यातून होत होते. सोव्हिएत रशियाने 1924 साली भारतामध्ये कम्युनिस्ट पक्षाच्या निर्मितीला प्रोत्साहन दिले आणि त्या पक्षाद्वारे कामगारवर्गाला जागृत आणि संघटित करण्याचा प्रयत्न चालवला. पण तिसऱ्या इंटरनॅशनलच्या चुकीच्या आदेशानुसार वाटचाल करताना कम्युनिस्ट पक्षाने इंडियन नॅशनल कॉंग्रेस ही भारतीय भांडवलदारांच्या वर्चस्वाखालील संघटना आहे असे शिक्कामोर्तब केले. त्याचा खरपूस समाचार कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीने घेतला. हिंदी कम्युनिस्टांची समाजवादी तत्त्वज्ञानावरील मक्तेदारी कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीने मोडून काढली आणि प्रत्येक सच्च्या समाजवाद्याने भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे बिनीचे सैनिक असले पाहिजे, अशी जणू व्याख्याच करून टाकली. त्याचबरोबर साम्राज्यवादविरोधी लढ्याचे कॉंग्रेस हेच व्यापक असे संघटन आहे हेही निःसंदिग्धपणे जाहीर केले. आपल्या पक्षाला कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टी असे नाव त्यांनी याच दृष्टिकोनातून दिले.

1938 मध्ये मुख्य राष्ट्रीय प्रवाहापासून अलग पडलेल्या कम्युनिस्ट पक्षाला आपले धोरण बदलून कॉंग्रेसमध्ये सामील व्हावे लागले. तरीसुद्धा दुसऱ्या महायुद्धाला 'लोकयुद्ध' असे नाव देऊन ते पुन्हा त्यांच्या अलगाववादी धोरणाकडे वळले आणि नवभारताची उभारणी करणाऱ्या शक्तींपासून दूर गेले. कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीचा युद्धप्रयत्नांशी सहकार करण्यास कडवा विरोध होता आणि हिटलरपेक्षा पाश्चिमात्य राष्ट्रे अधिक नीतिमान आहेत, या युक्तिवादाचे त्यांनी स्पष्ट खंडन केले होते. 1945

साली अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या आघाडीने जपानवर अघोरी ॲटमबॉंब टाकून लक्षावधी निरपराधी जपानी नागरिक, स्त्रिया व मुले यांचा संहार केला, या घटनेतूनच काँग्रेस समाजवादी नेत्यांचे हे मूल्यमापन किती अचूक होते हे दिसले. भारताने त्यानंतर अलिप्ततेचे स्वीकारलेले धोरण हे या घटनांच्या भक्कम पायावर उभे होते, याचीही प्रचिती नंतर मिळाली. अशा सर्व परिस्थितीत या देशातल्या तरुणांच्या अंतःकरणाला ज्यांनी हात घातला, ते सर्व तरुण नेते सत्याग्रहाच्या चळवळीतून वर आलेले होते. या सगळ्या तरुणांमध्ये युसुफ मेहरअली 'एकमेवावद्वितीयम्' असे होते. मुंबई महापालिकेचे महापौर म्हणून ते भरघोस मताधिक्याने निवडून आले, ही गोष्टच त्यांच्या व्यक्तिगत लोकप्रियतेची द्योतक आहे. मेहरअलींना व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा नव्हती. सर्व भारतभर त्यांना सर्व थरांतील जनतेकडून जो आदर व सन्मान प्राप्त होत होता तेच त्यांना त्यांच्या कामाचे पारितोषिक होते. सोशलिस्ट पार्टीला तर मेहरअलींचे लाभलेले योगदान अपरिमितच आहे. कम्युनिस्टांनी युनायटेड फ्रंटच्या नावाखाली काँग्रेस सोशलिस्ट पार्टीत घुसून ती तोडण्याचे राजकारण चालविले. पण मेहरअलींनी त्यांचा डाव ओळखून त्यांना वेळीच शह दिला; आणि पक्षाचे अधिक नुकसान टाळले. जेव्हा जेव्हा काँग्रेस सोशलिस्ट पार्टीत अंतर्गत मतभेद उफाळून पक्षाचे ऐक्य धोक्यात आल्यासारखे होई, तेव्हा त्या सर्व कसोटीच्या प्रसंगांत मेहरअली आणि आचार्य नरेंद्र देव हे पक्षाचे दोन पालक पुढे होऊन पक्षातील अंतर्गत कलह कुशलतेने मिटवीत असत. त्यांच्या निधनानंतर निर्माण झालेली ही पोकळी भरून निघाली नाही; आणि व्यक्तिपूजेपायी पक्षाचे तुकडे पडले.

मेहरअलींनी पक्षासमोर असा एक कार्यक्रम ठेवण्याचा प्रयत्न केला, की ज्यामुळे पक्ष म्हणजे सक्रिय कार्यकर्त्यांचा एक बांधीव गट (केडर) बनला असता. नवसमाज रचनेच्या उभारणीतील हे कार्यकर्ते म्हणजे पक्क्या विटा होत्या. त्यांनी देशभर अभ्यासमंडळांचे जाळे पसरविले. आणि समाजवादी विचाराचा आणि कृतिकार्यक्रमाचा एक अभ्यासक्रम तयार केला. सर्व जनआंदोलने चालविताना अशा प्रकारच्या गाभ्याच्या कार्यकर्त्यांचे गट आवश्यक असतात. दुर्दैवाने काही वर्षांनी हा कार्यक्रम मागे पडला आणि कामगार क्षेत्रातील पक्ष कार्यकर्त्यांच्या आपापसांतील कलहामुळे पक्षाला फार मोठी क्षती पोहोचली.

'चले जाव' चळवळीतील पक्षाच्या भूमिकेचे श्रेय मुख्यतः युसुफ मेहरअलींकडेच जाते. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापूर्वीच दोन इच्छाशक्तींचा निर्णायक संघर्ष अटळ आहे, असे त्यांची दूरदृष्टी त्यांना सांगत होती. वैयक्तिक सत्याग्रहाने प्रतिकाराची ज्वाला जागृत ठेवलीच होती; तरीही मोठ्या संघर्षाचा वणवा भडकणारच

असे दिसत होते. अशा आंदोलनात एकदा मोठमोठे नेते पकडले गेले की आंदोलनात पोकळी निर्माण होण्याचा संभव होता. युसुफ मेहरअलींनी हे नेतृत्व छोट्याछोट्या प्रशिक्षित गटांकडे सोपविण्यासाठी एक सुस्पष्ट कार्यक्रम आखला. देशातील अनेक राज्यांतून भूमिगत कार्यकर्त्यांचे गट शिरुभाऊ लिमये, छोटूभाई पुराणी इत्यादींच्या मदतीने त्यांनी संघटित केले. त्यांना भूमिगत अवस्थेत जनआंदोलन संघटित करण्याचे आणि ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांना खीळ घालण्यासाठी, त्यांची दळणवळण यंत्रणा उलथून पाडण्यासाठी या कार्यकर्त्यांच्या छोट्या गटांना खास प्रशिक्षण देण्यात आले. 1942च्या लढ्यात सर्व प्रमुख नेत्यांना अटक झाल्यानंतर या कृतिपथकांनी चळवळीचा जोर बराच काळ टिकवून धरला.

पण चळवळीच्या अंगाने या व्यक्तीच्या एकाच पैलूचे दर्शन आपल्याला होते. युसुफची आणखी एक बाजू म्हणजे त्याचे लोभसवाणे व्यक्तिमत्त्व. युसुफ मेहरअली एक थोर मानवतावादी होते. कोणतीही संकुचित धार्मिक बंधने त्यांना सर्वस्वी अमान्य होती. भारताच्या प्राचीन संस्कृतीवरील प्रेमावर त्यांचे पोषण झाले होते. हॅवेल, कुमारस्वामी आणि बॅशम यांच्याकडून त्यांनी 'इंडॉलॉजी' (भारत-विद्या)चे धडे घेतले होते. मानवी अस्तित्वाचा अर्थ शोधण्याचा माणसाचा प्रत्येक प्रयत्न त्याला समाजात एक विशेष दर्जा प्राप्त करून देत असतो. युसुफ मेहरअली वनप्रेमी, निसर्गप्रेमी होते. त्यांनी भरपूर प्रवास केला होता. भारताच्या लहान, विनम्र खेड्यांत त्यांना भारताचे वैभव आढळले होते आणि औद्योगिक शहरांतील आणि गावांमधून नियोजनाच्या अभावामुळे वाढलेल्या दारिद्र्यात देशाची लज्जास्पद अवस्था आढळून आली होती. हिमालयाच्या विशाल पर्वतराजींसमोर मेहरअली कित्येकदा मोहित होऊन उभे राहिले होते आणि मानवस्पर्शाने अलांच्छित अशा चिरतरुण बर्फाच्छादित हिमशिखरांशी माथ्यावरील स्वच्छ निरभ्र आकाशाने केलेली हितगुजेही त्यांनी ऐकली होती. आज ज्या पर्यावरण रक्षणाचा गाजावाजा चालू आहे त्या पर्यावरणाचे मेहरअली हे मुळातच कट्टे पुरस्कर्ते होते.

मेहरअली हे लोकनायक होते. कोणतेही स्थान अगर पद त्यांना सामान्य माणसापासून अलग करू शकले नाही. स्वतःला त्रस्त करणाऱ्या समस्यांत इतरांनाही सहभागी करून घेणाऱ्या आणि पृथ्वीवरील सर्व मानवजातींच्या कल्याणाला वाहून घेणाऱ्या अशा माझ्या प्रियतम आणि निःस्वार्थी सहकाऱ्याच्या स्मृतीला मी माझी हार्दिक श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

3 जून 1996 **अच्युत पटवर्धन**

मद्रास

कृतज्ञता

युसुफ मेहरअलींची ही जीवनकथा लिहीत असताना माझ्या मनाला एकप्रकारे अपराधित्वाची टोचणी लागलेली आहे. त्यामागचे कारण असे आहे की युसुफ मेहरअलींच्या निधनाला छत्तीस वर्षे झाली, तरी त्यांच्या बहुरंगी आणि प्रेरक व्यक्तिमत्त्वाचा परिचय नवीन पिढीला करून देण्याचा प्रयत्न झाला नाही. तरीही उशीरा का होईना, नव्या क्षितिजांच्या सदैव शोधात असणाऱ्या युसुफची ही अनभिज्ञ कहाणी समोर येत आहे.

या कहाणीची जुळवाजुळव जरी माझी असली, तरी त्यातील अनमोल दुवे माझे मान्यवर सहकारी आणि प्रिय मित्र व्ही. एन्. ओके आणि प्रभुभाई संघवी यांनी मोठ्या साक्षेपाने जमा केलेले आहेत. जवाहरलाल नेहरू स्मारक वस्तुसंग्रहालय व ग्रंथालय, आणि महाराष्ट्र राज्य पुरातत्त्वसंग्रहालय यांच्यामधून आणि शक्य त्या प्रत्येक संदर्भालयातून त्यांनी परिश्रमपूर्वक युसुफ मेहरअलींच्या विलोभनीय जीवनकहाणीचे संदर्भ आणि माहिती जमा केली. भारतात आणि जगभर पसरलेल्या युसुफ मेहरअलींच्या अनेक समकालीनांकडून त्यांनी त्यांच्यासंबंधीच्या आठवणी ध्वनिमुद्रित केल्या आणि त्या नीटपणे लिहून काढण्याचे कामही करून घेतले. युसुफ मेहरअलींच्या जीवनातील विविधता व सौंदर्य यांचा साक्षात्कार घडविणारा दुर्लभ पत्रव्यवहाराचा ठेवाही त्यांनी हस्तगत करून दिला. या अमूल्य साधनसामग्रीला मी फक्त माझ्या लेखणीच्या धाग्याने गुंफून टाकले एवढेच.

युसुफ मेहरअलींच्या जीवनातील तेजस्वी स्मृतींचे क्षण डोळ्यांसमोर उभे करण्याची या जीवनचरित्राची किमया असलीच, तर ती त्यांच्याविषयीच्या माहितीचे सुवर्णकण जमा करून देणाऱ्यांच्या अथक परिश्रमांची सफलता आहे.

माझे सहकारी टी. आर. रामकृष्णन यांनी हस्तलिखिताचे टंकलेखन परिश्रमपूर्वक पार पाडले आणि विख्यात पत्रकार एस. विश्वम् यांनी काळजीपूर्वक ते वाचून वेळोवेळी त्यात योग्य त्या सूचना केल्या.

युसुफचे जिवलग मित्र आणि साथी अच्युत पटवर्धन यांनी या जीवनचरित्राला प्रस्तावना लिहून मेहरअलींची घडण ज्या चैतन्यपूर्ण कालखंडात झाली, त्याला एक सुरेख पार्श्वभूमी पुरविली आहे.

या सर्वांचा मी अत्यंत कृतज्ञ आहे. या सर्वांच्या साहाय्याने युसुफ मेहरअलींच्या जीवनपरिचयाचा हा सामूहिक प्रयोग सफल होत आहे.

ज्या काळात मानवी मूल्यांचा झपाट्याने ऱ्हास होत चालला आहे, त्या काळात युसुफ मेहरअलींच्या मूल्याधिष्ठित जीवनाची ही कहाणी नवीन पिढीला, सार्वजनिक विस्मृतीत गेलेल्या मूल्यांच्या पुनर्प्रस्थापनेची निकड जाणवून देईल, अशी आशा वाटते. लहानशा प्रमाणात जरी ही जाणीव निर्माण झाली, तरी या चरित्रलेखनाचा उद्देश साध्य झाला असे म्हणता येईल. युसुफ मेहरअलींच्या उदात्त आणि तेजस्वी जीवनाला यापेक्षा उचित अशी श्रद्धांजली दुसरी कोणती असू शकेल?

3 जुलै 1986 मधु दंडवते
नवी दिल्ली

एक

मृत्यूने केलेला विश्वासघात

संभव आहे, मृत्यू ही जीवनाला तुमची अखेरची देणगी असेल, पण ते विश्वासघाताचे कृत्य असू नये.

– दाग हॅमरशोल्ड

2 जुलै 1950. सूर्योदयाच्या आधी भल्या पहाटेलाच युसुफ मेहरअलींची प्राणज्योत 'जसावाला नर्सिंग होम'मध्ये मालवली. युसुफचे निकटचे सहकारी आणि मित्र जयप्रकाश नारायण त्यांच्या अंत्यशय्येजवळ बसून अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी युसुफची अखेर पाहात होते. चैतन्य आणि गतिशीलतेने मुसमुसलेल्या संवेदनशील जीवनाची वयाच्या सत्तेचाळीसाव्या वर्षी अकालीच अखेर झाली. ही शोकवार्ता वणव्यासारखी सगळीकडे पसरली. दुःख संवेदनेने ओथंबलेले हार्दिक संदेश देशभरातून येऊ लागले. दाटून आलेल्या भावनावेगाने जयप्रकाशजी म्हणाले :

> "युसुफ मेहरअलींच्या समर्पित जीवनाचे प्रकटीकरण ही गांधीजींच्या जीवनाविष्कारानंतरची सर्वांत मोठी अभिव्यक्ती असेल, हे मला सदैव जाणवत राहील."

युसुफच्या स्मृतीला श्रद्धांजली वाहताना राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले :

> "स्नेहशील अंतःकरणाचा मित्र आणि देशासाठी जीवन समर्पित केलेले युसुफ मेहरअली यांच्या अकाली निधनामुळे सार्वजनिक जीवनाचे फार नुकसान झाले आहे."

मेहरअलींच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंनी म्हटले :

> "युसुफ मेहरअलींच्या मुंबईमधील निधनाची वार्ता दुःखद अंतःकरणाने ऐकली. जरी प्रदीर्घ आजाराने त्यांना ग्रासले होते, तरी त्यांच्या मुद्रेवर कायम

स्मित असे. ज्यांना ते ओळखत होते, त्या सर्वांचे ते लाडके मित्र होते. स्वातंत्र्याच्या लढ्यातील ते केवळ एक शूर आणि बिनीचे सैनिकच होते असे नाही, तर त्यांच्या निखळ सचोटीमुळे ते अत्यंत आदरणीयही झाले होते. असा उदार हृदयी आणि प्रेमळ मित्र गमावल्यामुळे आपण दरिद्री बनलो आहोत."

आचार्य नरेंद्र देव म्हणाले :

"जोम आणि गतिशीलता यांचे प्रतीक असलेले मेहरअली हे भारतीय राजकारणातील एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते."

आपली श्रद्धांजली आचार्य कृपलानींनी खालील शब्दांत व्यक्त केली.

"युसुफ मेहरअली हे अंतर्बाह्य भारतीय होते. नवभारताची उभारणी करणाऱ्या सर्व तत्त्वांचा त्यांच्या ठायी अपूर्व संगम होता."

डॉ. राम मनोहर लोहियांनी त्यांना खालील शब्दांत श्रद्धांजली वाहिली.

"मेहरअलींनी आपल्या जीवनातून हे दाखवून दिले की जीवनातले आदर्श आणि मानवाच्या कल्याणाची कळकळ या गोष्टी राजकीय पक्ष आणि विविध धर्म यांच्यामधील दऱ्या पार करण्यासाठी पूल म्हणून कार्य करतात."

अशोक मेहतांनी युसुफना "समाजवादी चळवळीची सदसद्‌विवेकबुद्धी" असे म्हटले आहे. ते पुढे म्हणाले, "की रोगाने त्यांचे शरीर जर्जर केले पण त्यांच्या चैतन्यशील मनावर त्याने एकही ओरखडा उमटवला नाही."

युसुफ मेहरअलींना आदरपूर्वक श्रद्धांजली वाहताना कमलादेवी चट्टोपाध्याय म्हणाल्या :

"युसुफ मेहरअली हे एकमेवाद्वितीय पुरुष होते. त्यांच्या निधनाने त्यांच्या भोवतालच्या वर्तुळात निर्माण झालेली पोकळी भरून येणे कधीही शक्य नाही. त्यांच्यामधील उबदार माणूसपण, आणि सहकाऱ्यांबद्दल त्यांना असणारी वैयक्तिक आपुलकी आणि काळजी यांमुळे एक मोठा माणूस अशी त्यांची ओळख राहिली. साहस व त्याग यांचे दर्शन घडवणारे कार्य अनेक जण करतात. पण लहानांतील लहान व्यक्तीबद्दल तुम्ही केलेला थोडासा विचार आणि दया या गोष्टी तुमच्या चारित्र्याचा पट अधिक व्यापक आणि तेजस्वी बनवतात. निर्भय तरीही मृदू, धाडसी तरीही समंजस, कोणत्याही साहसाच्या

> सदैव तयारीत, तरीही प्रेमळ आणि लोभसवाणे असे मेहरअली हे एक असाधारण व्यक्तिमत्त्व होते. सर्व राजकीय पक्ष आणि धर्मपंथ यांच्यात त्यांचे निकटचे मित्र आणि निष्ठावान सहकारी होते. त्यांचे आवडते घोषवाक्य 'साहसपूर्ण जगा' हे होते आणि त्यांचे जीवन जणू काही त्याची प्रतिकृती होती."

'दी बॉम्बे क्रॉनिकल' या वृत्तपत्राने आपल्या संपादकीय स्तंभातून युसुफ मेहरअलींना श्रद्धांजली अर्पण करताना लिहिले :

> "असत्याने ओतप्रोत भरलेल्या या जगात, जिथे लपलेल्या सत्याचा शोध घ्यावा लागतो, तेथे साधेपणा आणि पारदर्शक तळमळ यांचे प्रतीक असलेल्या व्यक्तीचे निघून जाणे हे शब्दांनी वर्णन करण्यापलीकडचे नुकसान आहे."

मुंबई विधानसभेचे युसुफ मेहरअली सदस्य होते. त्यांना विधिमंडळ सदस्यांनी आदरपूर्वक श्रद्धांजली वाहिली.

मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री श्री. बी. जी. खेर यांनी 'आपल्या कार्यमग्नतेतच मृत्यूच्या प्रवासाला निघालेले' या शब्दांत युसुफ मेहरअलींचे वर्णन केले. विधानसभेतील युसुफ मेहरअलींचे समाजवादी साथी पीटर अल्वारिस म्हणाले :

> "फक्त स्वतःला सोडून अन्य माणसांच्या हितसंबंधांची काळजी वाहणारे मेहरअली हे आग आणि मध यांचे मिश्रण होते."

या ग्रंथातील पुढील पानांमधून उलगडत जाणाऱ्या युसुफ मेहरअलींच्या जीवनाचा पट त्यांना विविध व्यक्तींनी वाहिलेल्या वरील श्रद्धांजलीची सत्यता पटविणारा आहे.

स्वातंत्र्यलढ्याची पवित्र पार्श्वभूमी लाभलेल्या मुंबईच्या जीना हॉलमध्ये युसुफ मेहरअलींचा अंत झाल्यावर त्यांचे शव ठेवण्यात आले होते. समाजवादी लाल झेंड्याच्या पार्श्वभूमीवर तिरंगी ध्वजात गुंडाळलेल्या त्यांच्या शवाचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी हजारो नागरिक जमले होते. त्यांच्या प्रिय तरुण नेत्याला मृत्यूने विश्वासघात करून ओढून नेले होते. एका उमलत्या कळीचे फुलात पूर्ण रूपांतर होण्याआधीच मृत्यूने ते खुडून टाकले होते. हे कृत्य खरोखरच विश्वासघाताचे होते.

संध्याकाळी बरोबर चार वाजता युसुफ मेहरअलींच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. स्वातंत्र्यलढ्यातील मोरारजी देसाई, जिवराज मेहता, गणपतीशंकर देसाई, नगिनदास टी. मास्टर, एन.एम.चोकसी, मिनू मसानी, अबिदअली जाफरभाय यांच्यासारख्या थोर नेत्यांबरोबरच युसुफचे समाजवादी साथी जयप्रकाश नारायण,

डॉ. राममनोहर लोहिया, अशोक मेहता, एम. हॅरिस, अच्युत पटवर्धन, एन्.जी.गोरे, एस्.एम्.जोशी हे सर्व; हजारो औद्योगिक कामगार, गुमास्ते, तरुण, बुद्धिवादी आणि मध्यम वर्गातील अनेक कर्मचारी युसुफ मेहरअलींच्या अंत्ययात्रेत सामील झाले होते. या सर्व घटनेत आणखी दुःखदायक गोष्ट अशी होती, की युसुफ मेहरअलींसारख्या निर्भय राजकारणी आणि तळमळीच्या समाजसुधारकाची अंत्ययात्रा कबरस्तानकडे जात असताना त्यांच्याच धर्मबांधवांकडून तिच्यावर बहिष्कार टाकण्यात आल्यामुळे कबरस्तान ओसाड पडले होते; त्यांच्या अनुपस्थितीमुळे तेथील रस्ते रिकामे होते. त्यांच्यापैकी काहींनी तर अंत्ययात्रा रस्त्यावरून पुढे सरकत असताना रागाने दारे, खिडक्या लावून घेतल्या. युसुफचे सुधारणावादी आणि क्रांतिकारक विचार त्यांना संतापजनक वाटत होते.

मुंबईच्या डोंगरी कबरस्तानात युसुफ मेहरअलींचा आजाराने जर्जर झालेला देह संगमरवरी कबरीखाली कायमचा विसावला. पण त्यांच्या सहकाऱ्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांच्या अंतःकरणावर, इच्छाशक्तीवर मात्र त्या आजाराचे व्रण उठले नाहीत. त्यांच्या उदात्त, चैतन्यशील जीवनाची प्रभा अनेकांना मूल्याधिष्ठित समर्पित जीवन जगण्याची प्रेरणा देत राहिली. युसुफ मेहरअलींनी मागे ठेवलेला महान वारसा तो हाच!

●

दोन

व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण

त्या प्रभातकाळी हयात असणे भाग्यदायी होते पण तरुण असणे हा तर स्वर्गीय आनंदच होता.

— वर्डस्वर्थ

युगप्रवर्तक इतिहास थोर व्यक्तींची निर्मिती करीत असतो आणि त्या व्यक्तीही आपल्या अदम्य इच्छाशक्तीच्या जोरावर इतिहासाच्या प्रवाहाला, त्यामधील घटनांना वळण देऊन, एक जोरदार धक्का आणि नवी दिशा देतात. युसुफ मेहरअलींच्या आयुष्यात, माणूस आणि त्याच्या सभोवतालचे राजकीय वातावरण यांच्या परस्परप्रक्रियेची एक वेगळीच झलक उमटलेली दिसते. युसुफ मेहरअलींचा जन्म 23 सप्टेंबर 1903 या दिवशी झाला आणि ते तारुण्यात पदार्पण करीत असतानाच त्या काळात आकार घेत असलेल्या अनेक राजकीय घडामोडींनी त्यांची पुढची साथसंगत केली.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकांनी टिळकांच्या जमान्याचे गांधीयुगात परिवर्तन होताना पाहिले. सखोल रुजलेल्या मानवतेच्या मूल्यांवर आधारित धर्मनिरपेक्षतेचा उगम, बंगालच्या अन्याय्य फाळणीमुळे उसळलेला क्षोभ, पहिल्या महायुद्धाचा उद्रेक, 1917 ची रशियामधील कम्युनिस्ट क्रांती, जालियनवाला बागेमधील अमानुष हत्याकांड, त्याचे देशभर उठलेले पडसाद, भगतसिंग आणि त्यांचे साथीदार या क्रांतिकारकांना झालेली फाशी आणि त्या निमित्ताने ब्रिटिशांविरोधी सर्वत्र उसळलेली तिरस्काराची आणि कटुतेची भावना, काँग्रेसमधील जहाल आणि मवाळ यांच्यामधील रुंद होत जाणारी मतभेदांची दरी, आणि महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली 1920 साली सुरू झालेली देशभरातील पहिली असहकार चळवळ ह्या या काळातील विविध राजकीय घटना होत्या.

या सर्व राजकीय घटनांच्या दाट छायेमध्ये युसुफ मेहरअली वाढले. त्यांनी त्यांच्या राजकीय जीवनाचा पाया घातला आणि पुढील जीवनाची जडण-घडण केली.

तथापि, मेहरअलींच्या कौटुंबिक वातावरणाचा मात्र त्यांच्या या राजकीय संगोपनाशी अगर जागृतीशी सुतराम संबंध नव्हता. त्यांच्या कुमारवयात त्यांच्यावर परिणाम करणाऱ्या राजकीय शक्ती या सर्वस्वी त्यांच्या कौटुंबिक वर्तुळाच्या बाहेरच्या होत्या.

युसुफ मेहरअलींच्या शालेय जीवनातील आवडी-निवडीही त्यांच्या स्वभावातील मूळ श्रद्धा-सिद्धांतांवर आधारित अशाच होत्या. मुंबईतील ग्रँट रोडच्या ट्यूटोरियल हायस्कूलमध्ये त्यांचे दुसऱ्या इयत्तेपर्यंतचे शिक्षण झाले आणि नंतर ते बोरीबंदर येथील न्यू हायस्कूलमध्ये (जे नंतर भरडा हायस्कूल म्हणून प्रसिद्धीस आले) दाखल झाले. शाळेमध्ये त्यांचे नाव युसुफ मर्चंट म्हणून नोंदविले गेले. तथापि शाळेच्या दिवसांतसुद्धा त्यांना त्यांचे मर्चंट हे आडनाव आवडत नसे; कारण ते नाव एका व्यापारी जमातीशी संबंधित असे होते. त्यानंतर त्यांचे सर्व सहकारी व मित्र त्यांना युसुफ मेहरअली म्हणून संबोधू लागले. शाळेमध्ये युसुफचे मिनू मसानी आणि सोली बाटलीवाला हे दोघे परममित्र होते, जे पुढे युसुफ मेहरअलींबरोबर राजकीय नेते म्हणून उदयाला आले. युसुफ मेहरअलींना आपल्या मित्रांबद्दल निरतिशय प्रेम आणि आत्मीयता होती. याचे एक उदाहरण द्यायचे झाले, तर सोली बाटलीवालांच्या मैत्रीपोटी त्यांनी मुंबईत एक वर्ष सेंट झेवियर कॉलेजमध्येही प्रवेश घेतला होता. मात्र पुढच्याच वर्षी दोघांनीही एल्फिन्स्टन कॉलेजमधील अभ्यासबाह्य कार्यक्रमांच्या उपलब्ध संधींचा व उपक्रमांचा विचार करून त्या कॉलेजात प्रवेश मिळविला.

कॉलेज आयुष्यातील पूर्वार्धात युसुफ मेहरअली कॉलेजच्या अनेक उपक्रमांत सहभागी होत असताना त्यांच्यातील अनेक गुणांचे आणि प्रवृत्तींचे दर्शन होत होते. त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्या याच वृत्ती-प्रवृत्तींना परिणामकारक अभिव्यक्ती लाभली.

एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये मॅक्डूगल डिबेटिंग सोसायटी या नावाचा एक वाद-विवाद मंच होता. युसुफ मेहरअली आणि त्यांचे कॉलेजमधील इतर मित्र यांच्यामधील सुप्त गुणांच्या आणि प्रतिभेच्या आविष्काराला या सोसायटीने चांगलाच हातभार लावला. इंडियन नॅशनल काँग्रेसच्या ऐतिहासिक अधिवेशनाचा एक देखावा अपूर्व कल्पकतेने या मंचाने सादर केला होता. 'मौलाना' मेहरअली, 'देशबंधु' देसाई, 'लोकमान्य' खंडाळावाला, 'महात्मा' भावे आणि मसानी यांनी काँग्रेसच्या या 'ऐतिहासिक' अधिवेशनात भाग घेतला होता. त्या वादविवादात उत्स्फूर्त वक्तृत्वाचा फुलोरा होता. त्याचप्रमाणे ब्रिटिशांविरुद्ध जळजळीत टीका होती. नाट्याचा उत्कर्षबिंदू होता 'मौलाना' मेहरअलींच्या अटकेचा. आगामी घटनांच्या नांदीची जणू काही ती रंगीत तालीमच होती.

याच वादसभेने आयोजित केलेल्या दुसऱ्या एका चर्चेत स्वतःच्या मताविरुद्ध युसुफ मेहरअलींनी मुद्दे मांडले होते. "टाटा आणि जगदीशचंद्र बोस यांनी गांधी आणि टागोर यांच्यापेक्षा या देशासाठी अधिक कार्य केलेले आहे" असा त्यांनी ठराव मांडला होता. या मनोरंजक चर्चेचे बक्षीस अखेर युसुफ मेहरअलींनाच मिळाले.

युसुफ मेहरअली आणि त्यांचे सहकारी मित्र यांनी कॉलेजमध्ये शिकताना विद्यापीठ सुधारणांच्या प्रश्नांची व्याप्ती ज्या पद्धतीने लक्षात घेतली, तिचे खरोखरच आश्चर्य वाटावे. मुंबईतील एल्फिन्स्टन कॉलेज सामाजिक अभ्यास मंडळ समितीने (सोशल स्टडी सर्कल कमिटी) विद्यार्थ्यांची 'विद्यापीठ सुधार समिती' नेमली, तिचे प्रमुख युसुफ मेहरअली होते. जे.पी.सी.डी. आन्द्राद, कुमारी एस.व्ही.देसाई, एस.एम.बाटलीवाला, बी.जे.इस्रायल, हे इतर सदस्य होते. समितीचे कार्यवाह एच.एम.सिरवई हे होते.

युसुफ मेहरअलींच्या मार्गदर्शनानुसार समितीने कॉलेज विद्यार्थ्यांची विद्यापीठ सुधारणांविषयक मते अजमावण्यासाठी त्यांच्याकडून निवेदने घेतली. काही साक्षीदारांना बोलावून त्यांचीही तपासणी केली आणि या सामग्रीतून समितीने विद्यापीठ सुधारणेसंबंधी तपशीलवार शिफारशी सादर केल्या. समितीच्या या अहवालात अनेक गोष्टींचा व्यापक विचार केला होता. त्यात शिक्षणाची उद्दिष्टे, प्रचलित शिक्षणपद्धतीवरील टीका, अध्यापनाच्या पद्धती, शारीरिक शिक्षणाचे स्थान, मुला-मुलींचे सहशिक्षण, विद्यापीठीय वसतिगृहांचे प्रश्न, आंतरमहाविद्यालयीन योजना, पदव्युत्तर अभ्यासक्रम, परीक्षापद्धती, ग्रामीण व शहरी शिक्षणाची भूमिका, विद्यापीठ अभ्यासक्रमाची रचना इत्यादी विषयांचा या शिफारशींत समावेश होता.

या अहवालात विषयांचा अभ्यास आणि संशोधन यांच्या सखोलतेचे जे दर्शन झाले, त्यात युसुफ मेहरअली व त्यांचे सहकारी यांच्या बौद्धिक संपदेचा जणू कस लागला होता. विशेष म्हणजे शिक्षणाच्या विद्यापीठीय अवस्थेत हे सर्व घडले होते. युसुफ मेहरअली किंवा एच.एम.सिरवई यांच्यासारखी कॉलेजमध्ये असताना विद्यापीठ सुधार समितीवर काम करणारी मंडळी पुढे सार्वजनिक जीवनात उच्च स्थानावर पोहोचली, यात नवल करण्यासारखे काहीच नाही.

सार्वजनिक जीवनाकडे विशेष ओढा असणाऱ्या युसुफ मेहरअलींनी आपल्या गतिशील चैतन्याचा प्रत्यय तर निर्विवाद आणून दिलाच; शिवाय त्यांच्या स्वभावात एक अदम्य खोडकरपणाही होता. तरुण आणि विद्यार्थी यांनी चालविलेल्या सर्व प्रकारच्या चळवळींत आणि आंदोलनात सक्रिय भाग घेणारे युसुफ मेहरअली त्यांच्या (एल्फिन्स्टन) कॉलेजच्या प्राचार्यांचे- प्रिं. हॅमिल यांचे अतिशय आवडते विद्यार्थी

होते. असेच एकदा प्रि. हॅमिल यांच्या नावाचा आधार घेऊन युसुफ मेहरअलींनी खोडकरपणा करून एक मजेदार नाट्यप्रसंग निर्माण केला होता.

युसुफ मेहरअली आणि त्यांचे मित्र उपेंद्र देसाई आणि डॉ. जोशी पुण्याला एक शेतकीविषयक प्रदर्शन पाहायला गेले होते. खिशात पैसे अपुरेच असल्यामुळे स्वस्त दरात राहण्याची सोय पाहणे आवश्यक होते. युसुफ मेहरअली पूना इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य प्रिं. फ्लीटवुड स्मिथ यांना जाऊन भेटले आणि म्हणाले,

'आम्ही प्रिं. हॅमिलचे आवडते विद्यार्थी व मित्र आहोत. त्यांनी आम्हांला सुचविलेले आहे, की कॉलेजच्या वसतिगृहात राहण्याची सोय होण्यासाठी आम्ही आपल्याला भेटावे.' पण इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्यांनी युसुफ मेहरअलींचीच उलट तपासणी चालू केली. त्यांनी विचारले,

'तुम्ही प्रिं. हॅमिलना शेवटचे कधी भेटला होता?'

या प्रश्नाने युसुफ मेहरअली गोंधळून गेले पण त्या चमत्कारिक परिस्थितीत त्यांना फार वेळ राहावे लागले नाही. कारण प्रिं. स्मिथच्या बंगल्यातील एका खोलीत स्वतः हॅमिलच त्यावेळी होते आणि बाहेरील संभाषण ऐकत होते. त्यांना बाहेर आलेले पाहून मेहरअली विस्मयचकित झाले. प्रिं. हॅमिलनी मेहरअलींची चौकशी केली; आणि ते प्रकरण तिथेच संपले; कारण लगेच इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्राचार्यांनी युसुफ आणि त्यांचे मित्र यांची वसतिगृहात राहण्याची सोय करून दिली. असे हुषार आणि खोडकर तरुण जेव्हा सार्वजनिक जीवनात शिरतात तेव्हा ते यशस्वी झाल्याखेरीज राहत नाहीत. युसुफ मेहरअलींचे तेच झाले.

स्वतःच निर्माण केलेल्या संस्था-संघटनांना मजेदार नावे ठेवण्याची युसुफ मेहरअलींना हौस असे. ते आणि त्यांचे मित्र या सर्वांनी मिळून एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये एक क्लब स्थापन केला व त्यास नाव दिले 'रासपुतिन क्लब.' रासपुतिन हा एक कुप्रसिद्ध असा रशियन राजकारणी. क्लबतर्फे खेळांचे आयोजन करण्याबरोबरच मुलींचे 'कोर्टिंग' करणाऱ्या मुलांचे 'कोर्ट मार्शल'ही होई. अर्थातच हे सर्व खेळकरपणे होई आणि त्यातून युसुफच्या कॉलेजजीवनातील सहजताही प्रकट होई.

कॉलेजजीवनापासून युसुफना काव्याची आवड निर्माण झाली होती. काव्य हा एक महान सौंदर्यानुभव आहे अशी त्यांची धारणा होती आणि मानवी भावनांचे सौंदर्य संवेदनशीलतेने जाणून घेणाऱ्यालाच काव्याचा आस्वाद घेता येईल, असा त्यांना विश्वास होता. 'एल्फिन्स्टोनियन' या कॉलेजच्या नियतकालिकात प्रसिद्ध होणाऱ्या कवितांनी युसुफ हेलावून जात असत. याच मासिकात 'हफीझ-दि

नाइटिंगेल ऑफ सिराझ' हा त्यांचा प्रसिद्ध झालेला अतिशय सुरेख लेख त्यांच्या काव्यास्वादाच्या क्षमतेची लेखी पावतीच आहे.

हफीझ– ज्याला पर्शियाचा नाइटिंगेल असे म्हटले जाते तो आपल्या भाषाशैलीवरील प्रभुत्वाबद्दल आणि तरल व मधुर कल्पनाशक्तीबद्दल जगभर श्रेष्ठ गीतकार म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या मन धुंद करून टाकणाऱ्या काव्याचा प्रगल्भपणे आस्वाद घेणारा युसुफचा लेख 'एल्फिन्स्टोनियन'मध्ये प्रसिद्ध झाला होता. त्या साहित्यिक मूल्यमापनाचे सार त्यांनीच काव्यमय शब्दांत सांगितले आहे.

> असीम कीर्तीचा मुकुट त्यांच्या
> माथ्यावर चिरकाल राहील
> कितीतरी नृपतींचे सिंहासनावरून पतन झाले
> पण जनमानसातले यांचे सिंहासन अढळ आहे

युसुफ मेहरअलींच्या विविध रंगी जीवनात भरपूर नाट्यमयता होती. कॉलेज जीवनात या गुणांचे पोषण होऊन ते विकसित झाले.

एलफिन्स्टन कॉलेजमध्ये शिकत असताना प्रो. चार्ल्स जे. सिसन त्यांना इंग्रजी शिकवीत. शेक्सपिअरच्या कलाकृतींमध्ये प्रोफेसरसाहेबांना विशेष रस होता आणि तो विषय ते अपारंपरिक पद्धतीने शिकवीत. विद्यार्थ्यांना साहित्यावर व्याख्यान देण्याऐवजी काही विद्यार्थ्यांना वर्गाच्या वेगवेगळ्या कोपऱ्यांत उभे करून शेक्सपिअरच्या नाटकातील निरनिराळ्या संवादांचे वाचन विद्यार्थ्यांकडून साभिनय करून घेत. शेक्सपियरच्या नाटकातील त्या अनेक भूमिकांपैकी एक भूमिका मेहरअलींची असे. काही वेळा त्यांच्या नाटकांतील परिच्छेद प्रोफेसरसाहेब संभाषणाच्या शैलीत वाचून दाखवीत आणि विद्यार्थ्यांना त्यांतले सौंदर्य उमजून येई. शेक्सपिअरचे साहित्य शिकवण्याची ही थेट पद्धत विद्यार्थ्यांच्या मनावर खोल ठसा उमटवीत असे. नाटकाचे काही अंग मेहरअलींच्या जीवनात भिनले असेल तर त्याचे श्रेय प्रो. चार्ल्स सिसन यांच्या शिकवण्याच्या पद्धतीला जाते. त्यांनी मेहरअलींच्या विविधांगी व्यक्तिमत्त्वाला या कलेचाही एक पैलू पाडला.

युसुफ मेहरअली प्रत्यक्ष कृतीसाठी आसुसलेले होते. कॉलेजमध्ये होणाऱ्या वांझोट्या वादविवादांनी त्यांचे समाधान होत नव्हते. त्यांची चैतन्यशीलता, उफाळून येणारे देशप्रेम, समाजसेवेची कळकळ आणि युवक व विद्यार्थी यांच्या समस्यांची चिंता या सर्वांचा परिणाम म्हणून ते 'बॉम्बे स्टूडंट्स् ब्रदरहुड' या संस्थेकडे ओढले गेले व त्या कार्यात रमून गेले.

त्या वेळी युसुफ मेहरअलींचे अंतरंग अंतर्बाह्य ढवळून टाकणारा एक प्रसंग त्यांच्या जीवनात आला. 20 मे 1928 या दिवशी मुंबईच्या ऑपेरा हाऊसमध्ये 'बाँबे स्टूडंटस् ब्रदरहुड'ने आयोजित केलेल्या सभेत त्यांनी सुभाषचंद्र बोसांचे स्फूर्तिदायक व्याख्यान ऐकले. सभेचे अध्यक्ष होते पंडित जवाहरलाल नेहरू. त्या महत्त्वपूर्ण सभेत नव्या श्रद्धा आणि विचारपद्धती यांचा अवलंब करून, त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन नवीन संस्कृती निर्माण करण्याचे आवाहन सुभाषचंद्रांनी केले. जगातील कोणतीही शक्ती– आणि ब्रिटिश तर नाहीच– हिंदुस्थानात उसळणाऱ्या राष्ट्रवादाच्या लाटेला आता थोपवू शकणार नाही, असेही त्यांनी टाळ्यांच्या प्रचंड गजरात ठामपणे सांगितले. स्वतंत्र भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अंतरात अदम्य श्रद्धा जागृत करण्याचे आवाहन त्यांनी तरुणांना केले. याच सभेत पंडित नेहरूंनी तरुणांना 'कृती आणि बंडखोरी'चा खणखणीत संदेश दिला.

युसुफ मेहरअलींच्या मनावर या सभेचा गहिरा परिणाम झाला. आणि तनमनाने त्यांनी युवक चळवळीत स्वतःला झोकून देण्याचे ठरवले. त्यासाठी त्या काळची परिणामकारक संस्था होती 'यूथ लीग.'

'यूथ लीग'चे सेक्रेटरी म्हणून युसुफ मेहरअलींना 'जागतिक शांती युवक संघटने'च्या (वर्ल्ड पीस युथ काँग्रेस) परिषदेसाठी हजर राहण्यासाठी हॉलंडला जावयाचे होते. त्या परिषदेत हिंदुस्थानची स्वातंत्र्यकांक्षा जगासमोर उघड करण्यासाठी आवश्यक ते सर्व साहित्य त्यांनी जमवले होते. पण तिथे जाऊन पोहोचण्यासाठी आवश्यक द्रव्यसाहाय्य त्यांच्याजवळ नव्हते. तरीही युसुफचे सहकारी डगमगले नाहीत. 'बॉम्बे स्टुडंटस् ब्रदरहुड'ने मेहरअलींना या निमित्ताने एक थैली प्रदान केली. एवढ्यासाठीच की आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आपला आवाज उठवण्याची संधी केवळ पैशाच्या अभावी युसुफने गमावू नये.

परकीय वर्चस्वापासून देशाला मुक्त करावे, असे देशभक्तीचे वारे अंगात संचारले असले तरी युवक आणि विद्यार्थी यांच्यासमोरील बिकट समस्यांचा विसर युसुफ मेहरअलींना पडला नव्हता. 13 जून 1928 या दिवशी त्यांनी 'यूथ लीग'च्या व्यासपीठावर विद्यार्थी प्रतिनिधींची सभा बोलावून त्यात कॉलेज फी-मधील संभाव्य वाढीबाबत निषेध नोंदविला. त्या सभेला के.एफ.नरीमन, एम.एच.वकील, ए.आर.भट, आणि जोकिम अल्वा उपस्थित होते. 3 ऑगस्ट रोजी बोलाविलेल्या आणखी एका सभेत बंगलोर येथे विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या अंदाधुंद गोळीबाराचा स्पष्ट निषेध करण्यात आला. कामगारवर्गाबद्दल युसुफना वाटणारी सघन आपुलकी तर त्यांच्या विद्यार्थी दशेपासूनच प्रत्ययाला येत होती.

17 ऑगस्ट 1928 या दिवशी 'यूथ लीग' आणि 'बॉंबे स्टूडंटस् ब्रदरहुड' या दोन संघटनांनी एकत्र येऊन एका सार्वत्रिक सभेचे आयोजन केले. त्यामध्ये संपावर असलेल्या गिरणी कामगारांना पाठिंबा देण्यात आला. ज्येष्ठ कामगारनेते एन्.एम्.जोशी आणि बी.जी.खेर यांची या सभेत भाषणे झाली. युसुफ मेहरअली या सभेचे सूत्रधार होते. अशा या लहानशा घटनांमधून, सार्वजनिक जीवनातील या जडण-घडणीच्या काळातही, युवकशक्ती आणि कामगारवर्गाची ताकद यांचे योग्य सम्मीलन झाल्याशिवाय परिवर्तनाचे वारे अधिक जोरदारपणे वाहणार नाहीत, याची खूणगाठ मेहरअलींनी बांधली होती, याचा प्रत्यय येतो.

एलफिन्स्टन कॉलेजमधून 8 ऑगस्ट 1925 या दिवशी इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन मेहरअलींनी बी.ए.ची पदवी मिळविली. त्यानंतर मुंबईच्या सरकारी विधि-महाविद्यालयात (गव्हर्मेंट लॉ कॉलेज) त्यांनी एलएल.बी. ही वकिलीची पदवीही मिळविली, तो दिवस 26 जानेवारी 1929 हा होता. एक अनपेक्षित आणि आनंददायी योग असा की 8 ऑगस्ट व 26 जानेवारी हे दोनही दिवस राष्ट्रीय महत्त्वाचे ठरले. 8 ऑगस्ट 1942 या दिवशी 'चले जाव' ठराव काँग्रेस अधिवेशनासमोर संमत झाला आणि २६ जानेवारी ह्या दिवशी भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढ्याची शपथ घेण्यात आली. तोच दिवस पुढे प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा होऊ लागला.

26 जानेवारी 1929 या दिवशी मुंबई विश्वविद्यालयाने युसुफ मेहरअलींना 'एलएल.बी.' ही कायद्याची पदवी प्रदान केली खरी; पण त्याच वर्षी 10 ऑगस्ट या दिवशी वकील म्हणून व्यवसाय करण्यासाठी लागणारी सनद देण्यास मुंबई हायकोर्टाच्या न्यायमूर्तींनी त्यांना स्पष्ट नकार दिला. नकाराचे कारण त्यांची लढाऊ राजकीय चळवळीस असलेली बांधिलकी हे देण्यात आले. खरे तर, हायकोर्टाने युसुफ मेहरअलींना त्या तरुण वयात, 'स्वातंत्र्य लढ्यामधील सहभागासाठी युवकांत असंतोषाची मशाल पेटविणारे,' असे म्हणून एक प्रकारे त्यांच्या कर्तृत्वास मान्यताच दिली होती. विश्वविद्यालयातून बाहेर पडून राजकारणात प्रवेश ही मेहरअलींच्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना होती.

विद्यार्थीदशेत प्रयत्नपूर्वक उभारलेली राजकीय पार्श्वभूमी आणि युवक चळवळीतील सहभागातून तिचा झालेला विकास यांच्यामुळे मेहरअली हे स्वातंत्र्य लढ्यातील आणि नंतर समाजवादी चळवळीतील एक असाधारण व्यक्तिमत्त्व म्हणून उदयाला आले.

तीन

“सायमन, चले जाव”

“जनतेची झोप उडविणाऱ्यांच्या विरोधात बोलणाऱ्या सद्‌गृहस्थांशी मी सहमत नाही. जिथे गैरप्रकार होतात तिथे गोंगाट झाला तर तो मला आवडतो. मध्यरात्री वाजलेली अग्निशामक बंबाची घंटा लोकांची झोप उडवते खरी; पण तिच्यामुळे तुम्ही तुमच्या बिछान्यात जळून राख होण्यापासून वाचता.”

– एडमंड बर्क

1928 साली कायद्याचे पदवीधर होऊन विश्वविद्यालयीन आयुष्याचा शेवट झाल्यावर युसुफ मेहरअली सक्रिय राजकारणाच्या उंबरठ्यावर उभे होते तेव्हा एक मोठे आव्हान त्यांची वाट पाहात होते. ते होते सायमन कमिशन विरोधी संभाव्य आंदोलन. हिंदुस्थान सरकारच्या 1919 साली झालेल्या कायद्यानुसार एक वैधानिक आयोग नेमण्याची तरतूद होती. या आयोगाने ब्रिटिश सरकारची कार्यपद्धती, शिक्षणाचा विस्तार, त्याचप्रमाणे ब्रिटिश इंडियामधील प्रातिनिधिक संस्थांचा विकास आणि तत्संबंधी इतर गोष्टी यांचा तपशीलवार विचार करून एक अहवाल सादर करायचा होता. त्यावरून हिंदुस्थानात जबाबदार शासन पद्धतीचे तत्त्व लागू करणे योग्य होईल काय; असेल तर त्याची मर्यादा कोणती; किंवा जे शासन अस्तित्वात आहे, त्याच्यात काही सुधारणा हव्यात काय; किंवा मर्यादा घालायला हव्यात काय, या सर्व गोष्टींचा विचार करण्यात येणार होता. त्याचबरोबर स्थानिक विधिमंडळाचे दुसरे सभागृह उघडणे आवश्यक आहे किंवा नाही, हेही ठरवले जाणार होते.

सर जॉन सायमन अध्यक्ष असलेल्या सात सदस्यांच्या या वैधानिक आयोगाची 8 नोव्हेंबर 1927 या दिवशी अधिकृत घोषणा झाली. आयोगाचे सर्व सदस्य ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होते. त्यात एकाही हिंदी माणसाची निवड केलेली नव्हती. सायमन कमिशनच्या नियुक्तीची घोषणा भारतीय जनतेने कडवटपणाने ऐकली

आणि पुन्हा एकदा दुःख आणि शरम यांनी ग्रासलेल्या जनतेला, आता आपल्या नशिबी ही नवीन पीडा भोगायची आहे याची जाणीव झाली.

तणाव आणि संताप यांच्या या वातावरणात डिसेंबर 1927 मध्ये इंडियन नॅशनल काँग्रेसने सायमन कमिशनवर बहिष्कार टाकावा, असा ठराव मंजूर केला. मुस्लिम लीग, ऑल इंडिया लिबरल फेडरेशन, हिंदू महासभा आणि इतर अनेक संघटना, ज्या भारताच्या राजकीय जीवनाचे प्रतिनिधित्व करत होत्या, त्या सर्वांनी सायमन कमिशनवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करणारे ठराव संमत केले.

3 फेब्रुवारी 1928 या दिवशी सकाळी ब्रिटिश पार्लमेंट सदस्यांचे सायमन कमिशन मुंबईच्या मोल बंदरात बोटीवरून उतरले. पहाटे तीन वाजल्यापासूनच युसुफ मेहरअलींच्या नेतृत्वाखाली 'यूथ लीग'चे स्वयंसेवक मोर्चे काढून सायमन कमिशनविरुद्ध घोषणा देत फिरत होते.

मोल स्टेशनवर कमिशन सदस्य उतरल्याक्षणीच विजेच्या चपळाईने युसुफ मेहरअलींनी यूथ लीगच्या स्वयंसेवकांना रेड गेटमधून आत नेऊन 'सायमन, परत जा' (सायमन, गो बॅक) अशा घोषणा देत त्यांचे 'स्वागत' केले. खवळलेल्या पोलिसांनी निदर्शकांवर लाठीमार केला तरी युसुफ मेहरअली हटले नाहीत. त्यांच्यावर लाठी चालवणारे सार्जंट कार्टर यांच्याविरुद्ध युसुफ मेहरअली व त्यांचे सहकारी यांनी खटला दाखल केला. कोर्टामध्ये खटला नऊ महिने रेंगाळला पण अखेर तरुण स्वयंसेवकांवर विनाकारण लाठीमार केल्याच्या आरोपावरून प्रान्त न्यायाधीश (प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट) श्री.पंडित यांनी कार्टरला 100 रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. युसुफ व त्यांचे सहकारी यांचा हा मोठाच विजय होता. पण हा विजय न्यायमूर्ती पंडितांना मात्र महागात पडला. कारण त्यांची नेमणूक कायम करण्यास वरिष्ठांनी नकार दिला. वकिलीचा व्यवसाय करण्यासाठी सनद नाकारली गेली, हे बक्षीस युसुफ मेहरअलींना या प्रसंगातून मिळाले.

'मोल स्टेशन' येथील निदर्शनानंतर सायमन कमिशनच्या सदस्यांना मागच्या दाराने पोलीस संरक्षणात बाहेर काढून दुसरीकडे नेण्यात आले.

या प्रसंगानंतर न दबता युसुफ मेहरअली व त्यांचे सहकारी यांनी 'बॉम्बे यूथ लीग सायमन बायकॉट कमिटी'तर्फे एक रंगीत पोस्टर छापून वाटले. त्या पोस्टरचा मजकूर असा होता :

ब्रिटिश सिंहाचा उंदीर झाला!

सायमन कमिशनने मुंबईच्या मागील दाराने पळ काढला.

कुठे आहे ती ब्रिटिशांची पोलादी बांधणी?

त्यांचे सर्वतोमुखी झालेले धैर्य आहे कुठे?
त्यांना हिंमत नाही समोरासमोर लढण्याची
सायमन कमिशनचे स्वागत करणारे आहेत कोण?
खुषमस्करे, लाचार बूट चाटे आणि असे काही
ज्यांचे अस्तित्वही नाही कुठे!

युसुफ मेहरअली आणि त्यांच्या साथींनी सायमन कमिशनविरुद्ध मोल स्टेशन येथे तुफानी निदर्शने करून त्यांचे 'स्वागत' केल्यानंतर मुंबईत ग्रँट रोड येथे पुन्हा एकदा सायमन कमिशनपुढे निदर्शने झाली. जेव्हा त्या ठिकाणी पोलिसांना युसुफ मेहरअली दिसले, तेव्हा त्यांनी युसुफ मेहरअलींना शिक्षा म्हणून पकडून पिंपात कोंबून ते पिंप ग्रँट रोड पुलाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत गडगडत ढकलून दिले परंतु युसुफ मेहरअलींनी याही आपत्तीला तोंड दिले. त्यामुळे प्रोत्साहित झालेल्या युवकांनी पोलिसांच्या जुलूम-जबरदस्तीला न जुमानता सायमन कमिशनपुढे निदर्शने चालूच ठेवली.

युसुफ मेहरअलींना हे नक्कीच माहीत होते की मुंबईतील या 'कडक स्वागता'नंतर सायमन कमिशन देशात इतरत्र फिरताना सावध राहून लोकसंपर्क टाळणार. या देशात सायमन कमिशन विरोधी वातावरण तापले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी जनतेचा सायमन कमिशनला असलेला प्रतिकार वाढून कृतीत परिवर्तित व्हावयास हवा, अशी त्यांची धारणा होती. प्रतिकाराच्या कल्पनेला 'कोमट' प्रतिसाद देणाऱ्या मंडळींवर ते टीका करीत असत.

19 सप्टेंबर 1928 या दिवशी मुंबईच्या जीना हॉलमध्ये 'बॉंबे यूथ लीग' या संघटनेने एक सभा आयोजित केली होती. या सभेत सायमन कमिशन विरोधी मोहीम कशी तीव्र करता येईल, याबद्दल विचारविनिमय झाला.

सायमन कमिशन विरुद्ध जनतेमध्ये उठाव असला तरी नेतृत्व अगदी थंड होते. ब्रिटिशांच्या विरुद्ध देशभर पसरलेल्या या कटुतेचा फायदा घेऊन एक देशव्यापी लढा उभा राहिला पाहिजे, असे मेहरअलींना वाटत होते. म्हणूनच नेतृत्वाच्या थंड प्रतिसादाने अस्वस्थ होऊन ते प्रखर टीका करीत.

सायमन कमिशन देशामध्ये जसजसे फिरत जाईल तसतसा लोकांचा असंतोष वाढीला लागून आंदोलन तीव्र होत जाईल ही युसुफ मेहरअलींची अटकळ खरी ठरली. लाहोर येथे लाला लजपतराय यांच्या स्फूर्तिदायक नेतृत्वाखाली जे काही घडले त्यामुळे मेहरअलींचे राजकीय भाकित खरे ठरल्याचे सिद्ध झाले.

मुंबईनंतर सायमन कमिशनविरोधी लढ्यात लाहोर हे प्रखर प्रतिकाराचे रणक्षेत्र बनले. पंजाबचे सिंह म्हणून ओळखले जाणारे लाला लजपतराय यांनी

सरकारने चालविलेल्या अन्यायाविरुद्ध केंद्रीय विधिमंडळात गर्जना केली. भारतीय जनतेच्या न्याय्य आकांक्षा डावलून सायमन कमिशनची निर्मिती केल्याबद्दल त्यांनी ब्रिटिश सरकारचे वाभाडे काढले.

सायमन कमिशन लाहोरला भेट देणार हे जाहीर झाल्यानंतर पंडित मदत मोहन मालवीय यांनी लाला लजपतराय यांना अशी आग्रहाची विनंती केली की कमिशनविरुद्ध केल्या जाणाऱ्या निदर्शनांचे नेतृत्व लालाजींनी करावे आणि जनतेचा क्रोध आणि तिरस्कार यांना वाट करून द्यावी. युसुफ मेहरअलींनीसुद्धा लालाजींना तशीच विनंती करणारी तार केली.

जेव्हा सायमन कमिशन लाहोर रेल्वे स्टेशनवर उतरले, तेव्हा पोलिसांनी निदर्शकांना तोंड देण्यासाठी युद्धपातळीवर तयारी केली होती. स्टेशनपासून 200 यार्ड अंतरावर काटेरी तारांचे एक भक्कम कुंपण उभारण्यात आले होते. लाला लजपतराय, पं. मदन मोहन मालवीय, डॉ. गोपीचंद भार्गव व मौलाना झफरअली यांच्या नेतृत्वाखालील सायमन कमिशनविरोधी निदर्शक घोषणा देत त्या कुंपणाजवळ आले, तेव्हा पोलिसांनी धडाक्याने लाठीमार सुरू केला. अतिउत्साही पोलीस अधिकारी स्कॉट यांनी लाला लजपतराय यांच्या छातीवर केलेल्या जोरदार लाठीच्या आघाताने लालाजींच्या हृदयास दुखापत झाली. डॉक्टरांचा सल्ला न मानता लालाजींनी त्या दिवशी संध्याकाळी लाहोरमधील एका विराट सभेत भाषण केले. पोलिसांनी सायमन कमिशनविरोधी निदर्शकांवर केलेल्या अत्याचारांचा निषेध करण्यासाठी ही सभा भरली होती. आपल्या तेजस्वी आणि ऐतिहासिक भाषणात लालजींनी गर्जना केली, "आमच्यावर घातलेला लाठीचा प्रत्येक घाव म्हणजे ब्रिटिश साम्राज्याच्या शवपेटीला ठोकला जाणारा एक खिळा आहे."

पंजाबच्या त्या सिंहाचे ते उद्‌गार द्रष्टेपणाचे निदर्शक होते. त्यानंतर अवघ्या 19 वर्षांतच ब्रिटिश साम्राज्याच्या भवितव्यावर शिक्कामोर्तब झाले; आणि परकीय बंधनातून भारत मुक्त झाला.

या सभेमध्ये पडलेला ताण लाला लजपतराय यांना सहन झाला नाही; त्यांची प्रकृती आणखी बिघडली. सकाळी खाल्लेल्या लाठ्यांच्या घावांच्या जखमा तीव्र होत्या. अखेर लालाजींचे निधन झाले; आणि सारा देश शोकसागरात बुडून गेला. लालाजींच्या निधनाचा धक्का जबर होता. 17 नोव्हेंबर 1928 या दिवशी रावी नदीच्या काठावर त्यांच्या शवाचे दहन करण्यात आले. पुढे त्याच ठिकाणी भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी लढ्याचा निर्धार करणारा ठराव काँग्रेस अधिवेशनात संमत करण्यात आला, हा योगायोग लक्षात घेतला पाहिजे.

लाला लजपतराय यांचे हौतात्म्य मेहरअलींना हालवून गेले. लालाजींच्या मृत्यूचा बदला ब्रिटिश साम्राज्यवादविरोधी लढाऊ राष्ट्रवादी शक्ती बळकट करूनच घेता येईल, असे त्यांनी मुंबईतील युवकांना जाहीरपणे बजावले. लाला लजपतराय यांच्या योजनापूर्वक थंडपणे केलेल्या या खुनाबद्दल युवकांना चेतवण्याकरता मेहरअलींनी आकाशपाताळ एक केले.

देशाच्या विविध भागांत सायमन कमिशनविरोधी निदर्शने झाली. पण 'सायमन, परत जा,' ही घोषणा प्रथम देणाऱ्या मुंबईच्या तरुणांचे खरेखुरे प्रतिनिधी युसुफ मेहरअलीच ठरले.

प्रत्येक आंतरराष्ट्रीय घटनेचा वापर भारताच्या राष्ट्रीय उद्दिष्टांसाठी करून घेण्याची कल्पकता मेहरअलींकडे होती. इजिप्तच्या स्वातंत्र्याच्या घोषणेचा दहावा वर्धापन दिन साजरा होणार होता. या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मेहरअली व त्यांचे साथी यांनी सायमन कमिशन विरोधी मोहीम राबविण्यासाठी, या मोहिमेला पूरक ठरेल असे पोस्टर तयार केले. त्यातला मजकूर असा –

इजिप्तने जे केले ते भारतही करू शकेल.

इजिप्तमध्ये झिडकारलेले मिल्नर कमिशन प्लेगच्या रोगाप्रमाणे दूर ठेवले गेले.

जेव्हा त्या कमिशनच्या काही सदस्यांनी कोर्टात प्रवेश केला तेव्हा न्यायमूर्तीच आपला तिरस्कार व्यक्त करण्यासाठी कोर्टाबाहेर पडले.

जेव्हा ते उपहारगृहात गेले, तेव्हा तेथील वेटरने त्यांना सेवा नाकारली.

जेव्हा त्यांना टॅक्सीची गरज होती तेव्हा त्यांना नेण्यास टॅक्सीचालकाने नकार दिला.

गेले तेथे तेथे 'जनतेचा असंतोष' या भावनेने त्यांचा पाठपुरावा केला. गोंधळलेले, अपमानित, मनसुबे चारी चीत झालेले असे ते मागच्या पावलांनी आपल्या देशाकडे चालते झाले!

मुंबईच्या युवकांनो, ही असाधारण जागृती कोणामुळे झाली?
केवळ शूर इजिप्शियन तरुणांमुळेच, अर्थात्!
म्हणूनच....
मुंबईच्या युवकांनो, उठा व कंबर कसा
आणि सायमनवाद्यांची चांगली खोड मोडा.

ब्रिटिशांच्या भारतावरील अधिसत्तेच्या काळात महात्मा गांधींनी जागरूकपणे स्वातंत्र्यलढ्याचा सर्वसामान्य जनतेच्या, विशेषतः शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रश्नांशी संबंध जोडून या लढ्याची धार तीव्र करण्याचा प्रयत्न चालवला होता. 1917 मध्ये बिहारमध्ये चंपारण्यात, 1918 मध्ये गुजरातेतील खेडा जिल्ह्यात आणि 1928 मध्ये पुन्हा गुजरातेत बार्डोलीमध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी त्यांनी अहिंसक प्रतिकाराचे अमोघ शस्त्र जनतेच्या हाती दिले.

बार्डोलीच्या शेतकऱ्यांच्या सत्याग्रहाला महात्मा गांधींची प्रेरणा आणि सरदार पटेलांचे नेतृत्व मिळाले होते. 88,000 शेतकऱ्यांनी अकारण वाढवलेल्या जमिनीवरील कराच्या विरोधी आपल्या गाऱ्हाण्यांचे निराकारण करण्यासाठी सुसंघटित व योजनापूर्वक केलेला सत्याग्रह हा अहिंसक प्रतिकाराचा एक मोठाच धडा होता. गांधीजींच्या कर-बंदीच्या तत्त्वज्ञानाने या लढ्यात खरोखरीच एक दैदिप्यमान स्थान मिळवले. ब्रिटिशांनी सत्याग्रह्यांविरुद्ध पूर्ण त्वेषाने आपले दमनचक्र चालविले. शेतकरी सत्याग्रह्यांच्या जमिनींही जप्त करण्यात आल्या; पण शेतकरी एक इंचभरही मागे हटले नाहीत. आणि अखेर त्यांनी आपल्या मागण्या पदरात पाडून घेतल्या. त्यानंतर काही वर्षांनी त्यांच्या जमिनींही त्यांना परत मिळाल्या.

बार्डोलीवीरांच्या या सत्याग्रहाने युसुफ मेहरअली फारच प्रभावित झाले. या शेतकऱ्यांच्या लढ्याला जनतेचा पाठिंबा मिळावा म्हणून 'मुंबई इलाखा यूथ लीग'तर्फे त्यांनी अथक प्रयत्न केले.

'बॉम्बे प्रेसिडेन्सी यूथ लीग' 1928 च्या युसुफ मेहरअलींनी संकलित केलेल्या पहिल्या अहवालात बार्डोली सत्याग्रह आणि यूथ लीगचा त्यासंबंधित प्रतिसाद यांच्याबद्दल लिहिलेला एक परिच्छेद अतिशय बोलका आहे.

बार्डोली लढ्याचे पुढचे पाऊल

> "आमच्या कार्याची पुढची पायरी बार्डोलीचा लढा ही होती. एखाद्या वज्रपातासारखा अवचितपणे हा लढा सुरू झाला. त्याने इतर सर्व प्रश्न जणू झाकोळून टाकले आणि या देशातील सर्व राजकीय अवकाश त्याने व्यापून गेले. युवकांच्या अनेक गटांनी तेथील प्रश्न प्रत्यक्ष समजावून घेण्याकरिता त्या रणक्षेत्राला भेट दिली आणि बार्डोलीच्या त्या लढाऊ शेतकऱ्यांकडून प्रेरणा मिळविली. तात्काळ या इलाख्यातील सर्व युवकांनी हा बार्डोली प्रश्न हाती घेतला; आणि उत्साहाचे व चैतन्याचे वाहणारे वारे त्या प्रश्नाबद्दल जनतेमध्ये जागृती करू लागले. त्यामुळे शासनयंत्रणा सजग होऊ लागली, हे वास्तव कधीही विसरता येणार नाही. यात बराचसा पुढाकार आणि कार्य यूथ लीगचे

होते. मुंबईतील युवकांनी 4 जुलै 1928 या दिवशी साजरा केलेला 'बार्डोली दिन' कोण विसरू शकेल?"

एम्पायर सिनेमापासून तुफान पावसात निघालेल्या या मोर्चामध्ये आणि त्या आधीच्या 'तापलेल्या' सभेतून हजारो तरुणांनी सरदार वल्लभभाई पटेलांचे केलेले स्वागत ही त्यांच्या मनात एक आनंददायी आणि प्रेमळ स्मृती बनून राहिली.

बार्डोली सत्याग्रहाचा प्रचार आणि 'बॉम्बे यूथ लीग'च्या सहायक समितीतर्फे बार्डोली लढ्याच्या संदर्भात वेळोवेळी प्रांजळपणे केलेली निवेदने यांमुळे बार्डोलीचा संदेश सर्वत्र पसरण्यास मोठीच मदत झाली. सरदार पटेलांचे फोटो असलेली बटणे, बार्डोलीचे झेंडे, बार्डोली वह्या इत्यादी गोष्टींनी या मदत मोहिमेला चांगलाच हातभार लावला.

युसुफ मेहरअली आणि त्यांचे तरुण साथी यांनी बार्डोली सत्याग्रहात बजावलेल्या या कामगिरीचे वर्णन वाचले की युसुफ मेहरअलींनी या संबंधात युवकांमध्ये जी जागृती निर्माण केली होती आणि त्यांच्या मनात लढाऊ शेतकऱ्यांबरोबरचे एक दृढ संघटन किंवा ऐक्य यांची जाणीव निर्माण केली होती, ते किती महत्त्वाचे कार्य होते, याची कल्पना येते.

12 व 13 डिसेंबर 1928 या तारखांना मुंबई इलाखा यूथ लीगचे दुसरे अधिवेशन पुणे येथे भरले होते. या अधिवेशनाचे मुख्य आकर्षण युसुफ मेहरअली हेच होते. अधिवेशनासमोर असणारे दोन विषय होते; यूथ लीगची घटना स्वीकृत करणे आणि संपूर्ण स्वातंत्र्य हेच राष्ट्राचे ताबडतोबीचे उद्दिष्ट असावे, असा युसुफ मेहरअलींनी अतिशय गांभीर्याने मांडलेला ठराव मंजूर करणे.

यूथ लीगच्या घटनेच्या आलेखनाला युसुफ मेहरअलींचा मोठाच हातभार होता. युसुफ मेहरअली ज्या पिढीचे प्रतिनिधित्व करीत होते त्या युवकांच्या मानसिक आणि भावनिक अवस्थेची चुणूक दर्शविणारी संस्थेची ही घटना खालीलप्रमाणे होती.

यूथ लीगची घटना

ध्येय व उद्दिष्ट : मुंबई इलाख्यातील युवकांच्या ऐक्यासाठी समान ध्येये व एकच समान संघटना यांच्याद्वारे स्वयंसेवा आणि त्याग यांचा त्यांच्यामध्ये प्रादुर्भाव करणे आणि त्यांना मातृभूमीच्या सेवेसाठी, हिंदुस्थानच्या संपूर्ण स्वातंत्र्याची प्राप्ती करून घेण्याच्या निर्धाराने सिद्ध करणे, या उद्दिष्टांसाठी ही संघटना...

1. कोणत्याही स्वरूपातील व आकारातील जातीयवादी प्रवृत्तींशी लढा देईल; आणि आपल्या सदस्यांमध्ये व्यापक, सहिष्णू आणि विश्वबंधुत्वाचा दृष्टिकोन जोपासला जाईल, अशी काळजी घेईल.

2. कालबाह्य झालेल्या जुनाट सामाजिक आणि धार्मिक प्रथा-परंपरा नष्ट करण्याच्या दृष्टीने कार्य करील.
3. शक्य तिथे शारीरिक शिक्षण आणि सैनिक प्रशिक्षणाची सोय शाळा-कॉलेजातून सुरू करण्यात यावी, अशी मागणी संघटना करीत आहे. त्याचबरोबर व्यायामशाळा व आखाडे यांसाठीची चळवळ वाढावी म्हणून संघटना प्रयत्न करील.
4. 'स्वदेशी'चा पुरस्कार करील.
5. युवकांमधील वाढत्या बेरोजगारीच्या उपद्रवामागील कारणपरंपरा शोधून जिथे शक्य होईल तिथे त्यांना सल्ले, योग्य ते मार्गदर्शन व मदत करील.
6. मुंबई प्रांतात मोफत, सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची मागणी करीत आहे. शिवाय माध्यमिक, उच्च आणि व्यवसाय शिक्षण त्याला जोडून देण्यात यावे, अशीही मागणी करीत आहे.
7. या इलाख्यातील युवकांमध्ये सामाजिक प्रश्नांचा अभ्यास, स्वतंत्र विचार, शिस्तबद्ध स्वातंत्र्य आणि जबाबदारीची सामाजिक जाणीव या गुणांचा विकास व्हावा या दृष्टीने प्रयत्न करील.
8. आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा विचार करण्यास प्रोत्साहन देईल.
9. प्रांतातील युवकांना रस वाटेल असे इतर उपक्रम हाती घेईल.

'यूथ लीग'च्या सदर अधिवेशनाने संमत केलेल्या वरील घटनेच्या आशयाशी सुसंगत असा पुढील ठराव स्वतः मेहरअलींनी मांडला.

> "हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्य हेच आता देशासमोरील ताबडतोबीचे उद्दिष्ट असले पाहिजे असे विचारपूर्वक बनविलेले मत ही परिषद जाहीर करीत आहे."

या ठरावाला पाठिंबा मिळविण्यासाठी युसुफ मेहरअलींनी अथक परिश्रम केले होते. भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य हे देशापुढील तातडीचे उद्दिष्ट समजले गेले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता.

'संपूर्ण स्वातंत्र्याच्या उद्दिष्टांचा' हा ठराव मांडण्यामागे काँग्रेसच्या नेत्यांवर संपूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा दबाव आणून काँग्रेसने ते आपले नवीन उद्दिष्ट ठरवावे असा मेहरअलींचा हेतू होता. लवकरच रावी नदीच्या तीरावर लाहोर येथील अधिवेशनात इंडियन नॅशनल काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्य हेच उद्दिष्ट असल्याबद्दलचा ठराव संमत केला; तेव्हा 'यूथ लीग'च्या कार्यकर्त्यांना आनंद आणि अभिमानाचे भरते आले. काँग्रेसमधील काही मध्यममार्गी मंडळी 'यूथ लीग'चा हा ठराव म्हणजे पोरखेळ आहे, असे मानू लागली होती. तथापि पालकसंस्था काँग्रेसने 'संपूर्ण

स्वराज्य हेच उद्दिष्ट' हा ठराव संमत करून 'यूथ लीग'च्या टीकाकारांना चोख उत्तरच दिले. याबद्दल टीकाकारांना टोला देताना युसुफ मेहरअली म्हणाले...

'बालक माणसाचे जनक आहे.'

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याचे पडसाद विधिमंडळांतही उठले. केंद्रीय विधिमंडळाचे सभापती असतानाही विठ्ठलभाई पटेल यांनी एक देशभक्त आणि लोकशाहीवादी या आपल्या भूमिकेकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. जनतेच्या स्वातंत्र्यावर निर्बंध आणणाऱ्या पब्लिक सेफ्टी (सार्वजनिक सुरक्षा) बिलाबद्दल लोकांच्या मनात सार्वत्रिक असंतोष होता. या अमानुष कायद्याविरोधी जनजागृती व्हावी आणि केंद्रीय विधिमंडळातील सदस्यांची सदसद्विवेकबुद्धी जागी व्हावी या दृष्टीने भगतसिंग आणि त्यांचे सहकारी यांनी त्या सभागृहात एका नकली बॉंबचा स्फोटही घडवून आणला होता. जेव्हा हे सार्वजनिक सुरक्षेविषयीचे विधेयक चर्चेसाठी केंद्रीय विधिमंडळासमोर ठेवण्यात आले, तेव्हा सभापती विठ्ठलभाई पटेल यांनी असाधारण धैर्य दाखवून ते विधेयक चर्चेस घेण्यास नकार दिला. मीरत कटातील क्रांतिकारकांना त्यांच्या देशप्रेमी कृत्यांबद्दल शिक्षा देणाऱ्या खटल्याचे कामकाज चालू असताना केंद्रीय विधिमंडळात होणाऱ्या या बिलावरील चर्चेचा परिणाम न्यायालयाच्या कार्यवाहीवर होऊ नये, हा या नकारामागील विठ्ठलभाईंचा उद्देश होता.

केंद्रीय विधिमंडळाच्या सभापतींनी घेतलेल्या या रोखठोक आणि साहसपूर्ण निर्णयाने युसुफ मेहरअली प्रभावित झाले. 'यूथ लीग'च्या झेंड्याखाली माटुंग्याला नप्पू हॉलमध्ये विठ्ठलभाई पटेलांच्या धाडमी निर्णयाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी त्यांनी एका सभेचे आयोजन केले. त्या सभेत भाषण करताना आपल्या उपहासपूर्ण शैलीत युसुफ मेहरअली म्हणाले, "सार्वजनिक सुरक्षा विधेयक लागू करण्याचा व्हाइसरायचा हा खटाटोप केंद्रीय विधिमंडळात झालेल्या बॉंब स्फोटापेक्षाही अधिक विध्वंसक आणि हानिकारक आहे."

सत्याविष्काराची ही पद्धत अधिकच ज्वलंत होती.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली चाललेल्या या आंदोलनात स्वदेशी चळवळीला फार महत्त्व आले होते. परदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशीला प्रोत्साहन या मोहिमेसाठी एक तपशीलवार योजना तयार करून ती 'यूथ लीग'च्या स्वयंसेवकांसमोर ठेवताना युसुफ मेहरअलींनी चकित करणारे कल्पनाचातुर्य दाखविले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली 'यूथ लीग'ने स्वदेशी मालाची माहिती देणारी एक संग्रहिणी (डिरेक्टरी) तयार करून त्यात मालाचे प्रकार आणि त्यांची किंमत यांची यादीच दिली होती. त्याचप्रमाणे स्वदेशीला उत्तेजन द्या; परदेशी

मालावर बहिष्कार टाका, असा संदेश देणारी गीते गाणारी पथकेही मुंबईच्या सर्व भागांत 'यूथ लीग'ने सतत फिरती ठेवली.

'यूथ लीग'च्या सैनिकांना त्यानंतर 'बायकॉट ब्रिगेडियर्स' (बहिष्कार सैनिक) असे म्हटले जाऊ लागले. हे युवक आपल्याबरोबर स्वदेशी संग्रहिणी घेऊन फिरत व स्वदेशी मालाची लोकांना माहिती देत. त्यांनी परदेशातून आयात होणाऱ्या काही मालाला पर्यायी अशा वस्तूंच्या नमुन्यांच्या किंमतीसह एक संग्रहालय आराखडाही बनवला होता. 'स्वदेशी बाजार' या आकर्षक संग्रहालयाचे प्रदर्शन युसुफ मेहरअली आणि त्यांचे सहकारी यांनी 6 ते 11 एप्रिल 1929 या दिवसांत भरवले होते. याशिवाय 'यूथ लीग'चे स्वयंसेवक 'फिरता बाजार'ही चालवीत. अशा तऱ्हेने युसुफ मेहरअलींची कीर्ती फक्त 'बंडखोर व्यक्तिमत्त्व' अशीच पसरली असे नव्हे, तर कल्पक विधायक कार्यकर्ता म्हणूनही मुंबईत त्यांचे नाव झाले. स्वदेशी मालाचा प्रसार करण्यासाठी काढलेल्या मिरवणुकांत दिल्या जाणाऱ्या घोषणांचा विधायक आशय आणि राजकीय बंदिवानांच्या मदतीसाठी त्यांनी केलेले आवाहन यांच्यातून त्यांच्या समर्पण वृत्तीचे दर्शन होई. "परदेशी मालावर बहिष्कार घाला– स्वदेशीला उत्तेजन द्या." "मीरत खटल्यातील क्रांतिकारकांसाठी मदत द्या" अशा प्रकारच्या आवाहनांचे कापडी फलक स्वयंसेवकांच्या हाती असत. युसुफ मेहरअलींच्या जीवनात दुसऱ्यासाठी दिलासा आणि क्रांतिप्रवणता यांचा एक सुरेख मिलाफ झाला होता.

सतत जागरूकता आणि पुढाकार यांच्यामुळे जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचा असा कोणताही राजकीय मुद्दा युसुफ मेहरअलींच्या नजरेतून सुटत नसे. ब्रिटिशांच्या तुरुंगात टाकलेल्या राजकीय कैद्यांना दिली जाणारी वाईट वागणूक हा एक अशाच प्रकारचा विषय होता. दीर्घ काळपर्यंत राजकीय कैद्यांसाठी विशेष वर्गाचे आयोजन केलेच गेले नव्हते. त्यांना गुन्हेगारांप्रमाणेच वागणूक मिळे. त्या दिवसांत पत्रव्यवहार किंवा भेटी यांच्याबाबत कोणतेच हक्क राजकीय कैद्यांना नव्हते. इतकेच नव्हे तर त्यांना दिले जाणारे अन्नही अतिशय निकृष्ट प्रतीचे व घाणेरडे असे. 1930 मध्ये सरदार पटेल जेव्हा साबरमती तुरुंगात होते, तेव्हा त्यांना दिल्या जाणाऱ्या भाकरीत वाळूचे कण असत. त्यामुळे भाकरी चावता येत नसे. या अडचणीला तोंड देण्यासाठी सरदार पटेलांनी स्वतःच उपाय शोधून काढला. भाकरीचा बारीक चुरा करून ते पाण्यात टाकत; त्यामुळे वाळूचे कण पाण्याच्या तळाशी बसत आणि भाकरीचा खाण्याजोगा भाग पाण्यातून वेगळा काढता येई. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात देशाच्या बहुतेक सर्व भागांतील तुरुंगात राजबंद्यांची अशीच हालअपेष्टाजनक परिस्थिती होती.

जतीन दास या प्रसिद्ध क्रांतिकारकांनी तुरुंगातील राजबंद्यांच्या हक्कांसाठी लढायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी आपल्या सहकारी कैद्यांबरोबर लाहोर तुरुंगात आमरण उपोषण करण्यास प्रारंभ केला. राजबंद्यांच्या मागण्या मान्य करण्यास सरकार अर्थातच तयार नव्हते पण जतीन दासही त्यांच्या सनदशीर मागण्यांच्या पूर्तीसाठी प्राण धोक्यात घालण्यास तयार होते. शेवटी 14 सप्टेंबर 1928 या दिवशी 63 दिवसांच्या वेदनादायी उपोषणानंतर त्यांचे निधन झाले. पण त्यांच्या उपोषण काळात त्यांनी भोगलेल्या वेदना त्यांच्या हौतात्म्यानंतर फळाला आल्या. थोड्या उशीराने का होईना, या घटनेनंतर सरकारने राजकीय कैद्यांचा विशेष वर्ग, आणि त्यांचे विशेष हक्क आणि अधिकार यांना मान्यता दिली.

जतीन दासांच्या मृत्यूनंतर पंडित मोतीलाल नेहरू यांनी केंद्रीय विधिमंडळात एक तहकूबी सूचना मांडली, ज्यामध्ये जतीन दासांच्या उपोषणासंबंधी सरकारने दाखविलेल्या उपेक्षेचा तीव्र निषेध केला होता.

जतीन दासांच्या हौतात्म्याबद्दल बोलताना जवाहरलाल नेहरू म्हणाले, "हिंदुस्थानच्या हुतात्म्यांच्या लांबलचक आणि तेजस्वी यादीत आणखी एका नावाची भर पडली आहे."

"आमरण उपोषण करणाऱ्या व्यक्तींना केवळ आपल्या आत्म्याची हाक ऐकू येत असते," असे उद्‌गार बॅ.जीनांनी काढले. ते केंद्रीय विधिमंडळात बोलत होते.

जतीन दासांच्या या हृदयविदारक हौतात्म्याचा युसुफ मेहरअलींच्या अंतःकरणावर खोल परिणाम झाला. मुंबईच्या फोर्ट विभागातील कॉलेज युवकांना एकत्रित करून त्यांनी हुतात्मा जतीन दास यांना आदरभाव दाखवून श्रद्धांजली वाहण्यासाठी एक मोर्चा आयोजित केला.

संध्याकाळी, यूथ लीगने काढलेला प्रचंड मोर्चा ऐतिहासिक चौपाटीच्या वाळूत टिळकांच्या पुतळ्याच्या पायथ्याशी येऊन थांबला. "इन्किलाब झिंदाबाद," "ब्रिटिश राज्य मुर्दाबाद," अशा प्रकारच्या घोषणा मोर्च्यात दिल्या जात होत्या. चौपाटीवर पोलीस हजर होतेच. त्यांनी मोर्चामधील युवकांवर लाठीमार केला. त्यात जखमी झालेल्या तरुणांत युसुफ मेहरअली, जोकिम अल्वा, कोप्पीकर आणि इतर सहकारी होते.

लाठीमार आणि अटक यांच्यामुळे विचलित होणारे युसुफ मेहरअली हे व्यक्तिमत्त्व नव्हते. एकदा सहज एका सभेत विनोदाने ते म्हणाले होते, की कोणीतरी एकदा 'लंडन टाइम्स'बद्दल असे म्हटले होते– "टाइम्सने, मी चूक होतो असे लिहिले म्हणजेच मी किती बरोबर होतो हे मला कळते." युसुफ मेहरअली पुढे म्हणाले की, जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला अटक होत नाही तोपर्यंत ती किती

तुमच्याबरोबर होती हे तुम्हांला कळणार नाही. युसुफ मेहरअलींचा यूथ लीगमधील एक सहकारी हचिन्सन याला पोलिसांनी अटक केली, त्याच्या निषेधार्थ 16 जून 1929 रोजी झालेल्या सभेत युसुफ मेहरअली बोलत होते.

तुरुंगवास वगैरे गोष्टी सहजपणे घेणाऱ्या युसुफ मेहरअलींसाठी सरकारच्या शस्त्रागारातील अटक इत्यादी अस्त्रे अगदीच बोथट आणि परिणामशून्य ठरली होती. त्यांच्या लढाऊ राष्ट्रीय युवक आंदोलनांमुळे ते ब्रिटिश सरकारच्या डोळ्यांत कायम सलतच होते.

पोलिसांच्या गुप्तहेर शाखेच्या उप महानिदेशकांचा एक हा खास गुप्त पत्रव्यवहार याविषयी भरपूर पुरावा देतो.

गोपनीय

डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफिस
सी.आय.डी.ब्रँच,
पोस्ट बॉक्स क्र. 46, पुणे
26 डिसेंबर 1931.

प्रिय मॅक्सवेल,

पुणे येथे 22-23 डिसेंबर या दिवशी सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्र युवक परिषदेच्या वृत्तांताच्या गुप्त अहवालाच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. याचबरोबर "क्रांतिकारक कामगार पक्षाचे" संघटन करणाऱ्या समितीची हस्तचक्रमुद्रित (सायक्लोस्टाईल्ड) पत्रके मुंबईमध्ये कम्युनिस्ट कार्यकर्ते चार्ल्स मस्करेन्हास आणि युसुफ कलकत्तावाला यांच्याद्वारे प्रसारित होत आहेत, त्यांवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे...

'युसुफ कलकत्तावाला' हे अर्थातच युसुफ मेहरअलींचे गुप्त नाव होते. कोणत्या क्रांतिकारक कामगार पक्षाचा त्यांच्या नावाशी या 'गोपनीय' अहवालात संबंध जोडला गेला होता, ते सांगणे कठीण आहे. पण पुढे काही वर्षांनी युसुफ मेहरअली कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीचे एक संस्थापक बनले. ते वर्ष 1934 होते. त्यांच्याबरोबर जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव, अशोक मेहता, एन.जी.गोरे, एस.एम.जोशी, मिनू मसानी हेही नेते होते.

त्यांच्या वादळी राजकीय आयुष्यात युसुफ मेहरअली धैर्य, गतिशीलता, साहस यांच्याबरोबरच स्वभावजन्य विनोद आणि चलाखपणा यांचा वरचेवर प्रत्यय देत. 1932 सालच्या कायदेभंग चळवळीच्या तापलेल्या वातावरणात प्रांतन्यायाधीश (प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट) तिसरे न्यायालय, मुंबई या ठिकाणी श्री.एन.डी.खंडाळावाला यांच्यासमोर युसुफ मेहरअलींना बुधवार दि. 2 मार्च 1932 या दिवशी उभे

करण्यात आले आणि सेक्शन 21, वटहुकूम 2 अन्वये पोलीस कमिशनरच्या हुकूमाचा भंग केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवला गेला. कायदेभंगाच्या चळवळीत भाग न घेण्याचा हुकूम त्यांच्यावर बजावण्यात आला होता.

न्यायमूर्तींनी युसुफ मेहरअली इन्स्पेक्टर फॉस्टर यांना काही प्रश्न विचारू इच्छितात का, असे विचारले. कारण त्यांनीच युसुफ मेहरअलींविरुद्ध कोर्टात साक्ष दिली होती. तेव्हा थोड्याशा मजेनेच युसुफ मेहरअलींनी उत्तर दिले...

"या चाललेल्या नाटकाचा मी भरपूर आस्वाद घेत आहे."

त्यानंतर न्यायमूर्ती आणि युसुफ मेहरअली यांच्यामध्ये खाली दिल्याप्रमाणे मनोरंजक संवाद झाला.

न्यायमूर्ती : असे आक्रमक होऊ नका.

मेहरअली : आक्रमक होण्याची माझी जराही इच्छा नाही. पोलिसांच्या निवेदनात म्हटले आहे; "इन्स्पेक्टर फॉस्टर यांनी सांगितले, की आरोपीला पोलीस कमिशनरच्या ऑफिसमध्ये मंगळवारी दुपारी 3-45 वाजता आणण्यात आले. आरोपीवर त्यानंतर जो हुकूमनामा बजावण्यात आला होता, त्यावर त्याने सही केली. सुपरिटेंडेंट गॉडविनच्या ऑफिसात त्या आरोपीने चार वाजण्यापूर्वी हजर राहावे असा तो आदेश होता. आरोपीने त्यानंतर लगेच कार्यालय सोडले आणि तो टॅक्सीत बसला. साक्षीदाराने त्याचा पाठलाग केला, तेव्हा शेख मेमन स्ट्रीटवरील व्यापाऱ्यांच्या सभेत तो भाषण देत होता. तेव्हा त्याला अटक करण्यात आली. सुपरिंटेंडेंट गॉडविन यांनी सांगितले की आरोपी स्वतःहून पोलीस मुख्यालयात दाखल झालेला नाही."

पोलीस कमिशनरच्या ऑफिसमध्ये मला 3-50 ला आणण्यात आले तेव्हा लगेचच असहकाराच्या चळवळीत मी भाग घेता कामा नये आणि ठीक चार वाजता सुपरिंटेंडेंट गॉडविन यांच्यासमोर दाखल व्हावे, असा हुकूमनामा माझ्यावर बजावण्यात आला. मी त्याचवेळी पोलीस कमिशनरला सांगितले की मी असा हुकूम पाळण्याची मला जराही शक्यता दिसत नाही. माझ्या हातात आता जी क्रांतिकारक दहा मिनिटे शिल्लक होती त्याचा सदुपयोग करण्याच्या हेतूने मी बाहेर पडलो; टॅक्सी पकडून थेट शेख मेमन स्ट्रीटवरील कापूस बाजारात गेलो. इन्स्पेक्टर फॉस्टर व डेप्युटी इन्स्पेक्टर कर्णिक हे दोघेही माझा पाठलाग करीतच होते. माझे पोहोचण्याचे ठिकाण आल्यावर मी गाडीतून उतरलो आणि मुंबईच्या नागरिकांना माझा मार्ग अवलंबिण्याचे आवाहन केले.

न्यायमूर्ती : कृपया लांबण लावू नका.

मेहरअली : 4 वाजण्यापूर्वी दोन मिनिटे आधी मला अटक करण्यात आली.
न्यायमूर्ती : तुमच्या हातात घड्याळ होते काय?
मेहरअली : मी इन्स्पेक्टर फॉस्टर यांच्या घड्याळात पाहात होतो.
न्यायमूर्ती : त्यामुळे काही फरक पडत नाही. कारण तुम्ही चळवळीत भाग घेता कामा नये याबद्दल तुमच्यावर बंदीहुकूम बजावण्यात आला होता.
मेहरअली : पण महाशय, जो कायदा आम्ही मानतच नाही, तो दाखवून तुम्ही त्यानुसार आमच्याशी हे मनमानी वर्तन कसे काय करू शकता?
न्यायमूर्ती : मी तुम्हांला एक वर्षाची सक्त मजुरीची शिक्षा ठोठावीत आहे. त्याचबरोबर 100 रुपये दंडसुद्धा. तो न भरल्यास आणखी तीन महिने कैद.
मेहरअली : ही तर फारच सौम्य सजा झाली!

वरील सर्व सवाल-जबाब देशासाठी कर्तव्य निभावताना घडणाऱ्या सर्व परिणामांना मेहरअली अत्यंत धैर्याने तोंड देण्यास सज्ज होते, हेच दर्शवितात.

मुंबईतील वडाळा येथील मिठाचा सत्याग्रह ही घटनाही मेहरअलींच्या धाडसाचा पुरावा देणारी आहे.

हजारो सत्याग्रही वडाळ्याला जमा झाले होते. ब्रिटिश सार्जंटस् व पोलीस यांनी त्यांना हटविण्यासाठी जमावावर क्रूरपणे हल्ला चढविला. युसुफ मेहरअली त्या ठिकाणी उपस्थित होते. पोलिसांचे पाशवी अत्याचार पाहून ते संतप्त झाले. त्यांनी चटकन पोलिसांच्या एका घोड्यावर उडी टाकून त्याची आयाळ घट्ट धरली. तो घोडा उधळला आहे, याची पर्वाही त्यांनी केली नाही. दिङ्मूढ झालेल्या पोलिसांनी लगेचच त्यांच्याभोवती कडे केले आणि ताबडतोब त्यांना अटक केली. जमलेल्या सर्व सत्याग्रहींनी या निर्धास्त तरुणाने दाखविलेल्या निर्भयतेची प्रशंसा केली.

मेहरअलींच्या नेतृत्वाखाली आणि त्यांच्या प्रेरणेमुळे सुरू झालेली ही सर्व आंदोलने, लढे, निदर्शने आणि सार्वजनिक मोहिमा यांच्यामुळे युसुफ मेहरअलींना युवकांचे नेते म्हणून अमाप प्रसिद्धी आणि विश्वासार्हताही लाभली. यामुळे त्यांच्या भावी जीवनातील राजकीय प्रवासासाठी लोकप्रियतेचे भक्कम पाठबळ मिळाले. याचमुळे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांकडे असलेली प्रबळ दमन यंत्रणाही त्यांच्यापुढे निष्फळ ठरली.

चार

समाजवादी हत्यार पाजळले

"समाजवादी नीतीची बांधिलकी कोणत्याही एका विशिष्ट तत्त्वज्ञानाला नव्हे तर निष्ठेला असते असे मी मानतो. समाजवादी तत्त्वज्ञान 'वैज्ञानिकतेचा' दावा करीत असले तरी ते क्षणभंगुरच असते, परंतु समाजवादी मूल्ये मात्र शाश्वत असतात."

– इग्नॅझिओ सिलोने

1934

आज समाजवाद हा शब्द भारतीय राज्यघटनेच्या प्रास्ताविकाला शोभा आणणारा ठरला आहे. तथापि त्या शब्दाला मान्यता दीर्घकालीन लढ्यानंतरच मिळाली. या लढ्याला आपल्या तरुण वयातच युसुफ मेहरअलींनी पायाभूत सामग्री पुरवली. स्वातंत्र्यपूर्व काळात 1932 मध्ये असहकाराची चळवळ ओसरत चालली होती आणि स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीक असलेल्या काँग्रेसमध्ये घटनात्मक कार्यवाहीचा आग्रह धरणाऱ्यांचे– संविधानवाद्यांचे– वर्चस्व वाढू लागले होते. अशा वातावरणात लढाऊ राजकारणाला गती मिळावी आणि देशामध्ये समाजवादी विचारांचा प्रसार व्हावा, या उद्देशाने काँग्रेस सोशलिस्ट पार्टीची स्थापना करण्यात आली.

स्वातंत्र्यलढ्याचा मुख्य स्रोत जी काँग्रेस तिला समाजवादी अधिष्टान देण्याचा प्रयत्न काँग्रेस सोशलिस्ट पार्टीने केला. नाशिकच्या तुरुंगात 1932-33 सालांत काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या स्थापनेची कल्पना काही तरुणांना स्फुरली. 1934 साली पक्षाची अधिकृत स्थापना मुंबईमध्ये खास अधिवेशन घेऊन करण्यात आली. आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया, कमलादेवी चट्टोपाध्याय, अच्युत पटवर्धन, एस.एम.जोशी, एन.जी.गोरे, एम.एल.दांतवाला इत्यादी नेते या स्थापना अधिवेशनाला उपस्थित होते. पक्षाच्या जडण-घडणीच्या

काळात युसुफ मेहरअलींचे योगदान विशेषच होते. पक्षाच्या मागे युवकांची मोठी शक्ती त्यांनी उभी केली.

1934 साली काँग्रेस सोशलिस्ट पक्षाच्या स्थापना अधिवेशनात खालील उद्दिष्ट जाहीर करण्यात आले.

> "हिंदुस्थानचे संपूर्ण स्वातंत्र्य हे आमचे ध्येय आहे. संपूर्ण स्वातंत्र्य याचा अर्थ ब्रिटिश साम्राज्यशाहीपासून मुक्तता एवढाच नाही; तर त्याचबरोबर देशात समाजवादी समाजव्यवस्थेची प्रतिष्ठापना हाही आहे."

आर्थिक पुनर्रचनेचा आराखडा जो अधिवेशनात संमत झाला, तो असा होता : "श्रमिकांच्या हाती सत्ता, आर्थिक नियोजन, अवजड उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण, परदेशी व्यापारावर शासनाचे नियंत्रण, सरंजामशाहीचे निर्मूलन, जमीनदारीचे विनामोबदला उच्चाटन आणि जमिनीचे फेरवाटप, सामाईक व सहकारी शेती असा कार्यक्रम राबविण्यात यावा."

वरील आराखड्यावर नजर टाकली तरी हे लक्षात येईल की त्यात आर्थिक उद्दिष्टे नोंदविण्यात आली तरी त्यांच्या परिणामांचा विचार केलेला नव्हता. आर्थिक नियोजनाचा उल्लेख आराखड्यात असला तरी केंद्रीकरणामुळे देशात एकाधिकारशाहीचा धोकाही उद्‌भवतो, तो टाळण्याचे उपाय लक्षात घेतले गेले नाहीत. विकसनशील अर्थव्यवस्थेत नियोजन व लोकशाही यांच्यामध्ये कशा प्रकारचे परस्परसंबंध प्रस्थापित होतील, याचेही दिशादर्शन नाही. भांडवलनिर्मितीची समस्या कशी हाताळणार? अर्थव्यवस्थेचे राष्ट्रीयीकरण झालेले क्षेत्र आहे, त्यावर नोकरशाहीची गुंतागुंत टाळून नियंत्रण आणि शासन स्थिर कसे ठेवणार? या सर्व प्रश्नांची उत्तरे काँग्रेस सोशलिस्ट पक्षाच्या या कार्यक्रमपत्रिकेत कोठेच सापडत नाहीत. पण काही काळानंतर युसुफ मेहरअलींसहीत काहींनी हे सर्व प्रश्न समाजवादी चळवळीतील अंतर्गत वाद-विवादात उपस्थित केले. हळूहळू या धोरणविषयक निवेदनातील संदिग्धता त्यामुळे कमी कमी होत गेली आणि पुनर्रचनेचे चित्र अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले.

काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे सहचिटणीस मिनू मसानी यांनी लिहिलेल्या एका टिपणावरून या पक्षाच्या स्थापनेचे वैशिष्ट्य काय होते, ते लक्षात येते. 1934 साली पक्षाची स्थापना झाल्यानंतर हे टिपण लिहिले गेले व मिनू मसानी इंग्लंडहून भारतामध्ये आल्यानंतर 31 नोव्हेंबर 1935 या दिवशी पोलिसांनी ते जप्त केले. ते टिपण पुढीलप्रमाणे होते.

> "समाजवादी चळवळीचा जन्म तुरुंगात झाला. तुरुंगात जिथे जिथे तरुणांचे गट होते, तिथे त्या राष्ट्रीय विद्यालयात ते देशासमोरील प्रश्नांची चर्चा व विचारविनिमय करीत, आणि कार्यक्रमाची आखणी करीत. तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर या तरुणांच्या असे लक्षात आले की वेगवेगळ्या ठिकाणी असले तरी त्या सर्वांची विचारधारा एकच आहे. या टिपणाचा लेखकही त्यांच्यापैकीच एक आहे; आणि डिसेंबर 1933 मध्ये सोशलिस्ट ग्रुपची कल्पना त्यानेच पंडित जवाहरलाल नेहरूंच्या समोर ठेवली होती. नेहरू त्यावेळी तुरुंगाबाहेर होते आणि मिळालेल्या थोड्याशा स्वातंत्र्याचा वापर समाजवादी कार्यक्रमाच्या परिणामकारक प्रचारासाठी करीत होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व उत्साही आणि प्रेरक होते. पण पुढे काही घडण्याआधीच त्यांना अटक झाली व दोन वर्षांच्या तुरुंगवासाची सजा त्यांना झाली. त्यांच्याकडून लेखकाला आलेल्या एका पत्रात काँग्रेसांतर्गत समाजवादी गटाच्या स्थापनेच्या कल्पनेचे स्वागत केलेले होते. त्यामुळे तर या प्रक्रियेला जोराची चालना मिळाली..."

1935

ब्रिटिशांनी देऊ केलेली राज्यघटना आपण स्वीकारू नये, ती टाकून द्यावी; कारण फक्त स्वतंत्र भारताच्या प्रातिनिधिक घटना समितीलाच ती बनविण्याचा अधिकार आहे अशी समाजवादी पक्षाची ठाम भूमिका होती आणि या भूमिकेचे स्पष्ट आणि जोरदार प्रवक्ते होते युसुफ मेहरअली. ब्रिटिशांनी पुढे केलेल्या नकली राज्यघटनेच्या आधारे सत्ताग्रहण करू पाहणाऱ्या काँग्रेसनेत्यांना समाजवाद्यांचा प्रखर विरोध होता.

या तडजोडीला विरोध करणारा दृष्टिकोन जनतेला समजावा म्हणून काँग्रेस सोशलिस्ट पार्टीने 14 जानेवारी या दिवशी मुंबईच्या चौपाटीवर एका सार्वजनिक सभेचे आयोजन केले होते. या सभेत युसुफ मेहरअलींनी खालील ठराव मांडला...

> "काँग्रेस सोशलिस्ट पार्टीची ही सभा असे मत व्यक्त करीत आहे की संयुक्त संसदीय समिती (जॉईंट पार्लमेंटरी कमिटी)ने आपल्या अहवालात सादर केलेली घटना भारतीय जनतेला मान्य नाही. देशातील प्रतिगामी प्रवृत्तींना हाताशी धरून या घटनेआड लपण्याचा ब्रिटिश साम्राज्यवादाचा प्रयत्न यामागे आहे.
>
> भारतीय जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, घटनासमितीने तयार केलेल्या राज्यघटनेखेरीज कोणतीही अन्य घटना जनतेला मंजूर नाही, असे ही सभा

ठामपणे जाहीर करीत आहे. म्हणून काँग्रेस कार्यकारिणीला (वर्किंग कमिटी) आम्ही असे सुचवीत आहोत की संयुक्त संसदीय समितीने सादर केलेल्या अहवालातील राज्यघटना नामंजूर करावी; तिच्या आधारे सत्तेवर येण्याचा प्रयत्न करणाऱ्या काँग्रेसजनांना अटकाव करावा; आणि ती घटना राबविण्याचा जो प्रयत्न होईल त्यात असहकार करून व त्यात अडथळे निर्माण करून ती राबविण्यास प्रखर विरोध करावा. ही सभा असेही पुढे सुचविते की सध्या विधिमंडळात काँग्रेसचे जे आमदार आहेत, त्यांना सातत्याने, कोणतीही तडजोड न करता सरकारला विरोध करीत राहण्याचा आदेश काँग्रेस कार्यकारिणीने द्यावा."

वरील ठरावाचे समर्थन करताना युसुफ मेहरअलींनी सभेला सांगितले की काँग्रेस कार्यकारिणीची बैठक तीन दिवसांनंतर दिल्लीला भरत आहे. त्यात संयुक्त संसदीय समितीच्या अहवालावर विचार होईल, तेव्हा विधिमंडळातील नेत्यांनी कोणती भूमिका घ्यावी, याबद्दल मार्गदर्शन होईल.

या अहवालाला आपण कोणत्या प्रकारे प्रतिसाद द्यावा, याबद्दल सूज्ञपणे विचार करणाऱ्या कोणाही नागरिकाला संदेह नव्हता. स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे आणि हिंदुस्थानची राज्यघटना बनविण्याचा हक्क कोणाही परकीयाला नाही हे असंख्य वेळा जाहीर झाले होते; म्हणून संयुक्त समितीने सादर केलेली राज्यघटना काँग्रेस नेत्यांनी फाडून फेकून देणेच योग्य होते.

आपल्या भाषणात युसुफ मेहरअली पुढे म्हणाले, की या देशात अनेक राजकीय नेते असे आहेत की संयुक्त संसदीय समितीच्या अहवालातील आराखड्यात काही दुरुस्त्या स्वीकारल्या गेल्या, तर तो अहवाल मान्य करायला ते तयार आहेत. दुसरे काही असे आहेत जे सरकारच्या हृदय परिवर्तनाची वाट पाहत आहेत.

डॉ. अन्सारींनी तर अलीकडच्या एका निवेदनात जाहीर करून टाकले आहे की सरकारचे हृदयपरिवर्तन झाले तर ते निश्चित सहकार्य करतील. आम्ही असे परखडपणे सांगू इच्छितो, की सरकारबरोबर सहकार्याचा प्रश्नच उद्भवत नाही. योग्य रीतीने विचार करणाऱ्या प्रत्येकाने डॉ. अन्सारी व अन्य काँग्रेस नेते यांना स्पष्ट बजावणे जरूरीचे आहे, की काँग्रेसने सरकारशी सहकार्य करता कामा नये. या भाषणाच्या अखेरीस मेहरअली यांनी अशी कळकळीची विनंती केली, की संयुक्त समितीच्या या अहवालाच्या विरोधात ठराव करून गप्प न बसता काँग्रेसने देशव्यापी आंदोलन उभारावे. टाळ्यांच्या गजरात युसुफ मेहरअली म्हणाले, की या अहवालाला विरोध करण्यासाठी सायमन कमिशन विरोधी जो संघर्ष काँग्रेसने केला, त्या

पद्धतीचा लढा या अहवालाविरुद्ध देशभर उभा राहायला हवा. काँग्रेस समाजवादी पक्षाच्या जहाल राजकीय दृष्टिकोनाचे समर्थन करणारे मेहरअलींचे हे भाषण खरोखरीच अविस्मरणीय होते.

युसुफ मेहरअलींच्या दृष्टीने भारताचा स्वातंत्र्यसंग्राम हा सर्वसामान्यांच्या आर्थिक धडपडीशी संबंधित होता. काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या या विचारधारेचे स्पष्टीकरण मेहरअलींनी 23 मार्च 1935 या तारखेच्या 'बाँबे क्रॉनिकल' या वृत्तपत्रातील एका सुंदर लेखामध्ये केले आहे. त्यावेळी ते काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या मुंबई विभागाच्या कामगारशाखेचे सचिव होते. त्या लेखामध्ये मेहरअली लिहितात :

"वेतन कपात, कामगार कपात, आणि श्रमनिरपेक्ष उत्पादनाच्या पद्धती यांच्यामुळे कामगारांची दुर्दशा वाढतच चालली आहे. बेरोजगारीत झालेल्या वाढीमुळे कामगारांच्या कुटुंबांची उपासमार होत आहे. अशा परिस्थितीत कामगारांनी काय केले पाहिजे? त्यांनी संघटित होऊन आपल्या हक्कांसाठी लढा दिला पाहिजे. या लढाईकरिता कामगारांच्या बळकट संघटना बांधल्या गेल्या पाहिजेत. कामगारांची आर्थिक गाऱ्हाणी दूर करण्यासाठी आणि प्रश्न सोडविण्यासाठी दर दिवशी संघर्ष करणाऱ्या संघटनेला कामगारसंघटना असे म्हणतात. कामगारसंघटना हे वर्गलढ्याचे हत्यार आहे. कर्मचाऱ्यांच्या समान हितसंबंधांच्या जोपासनेसाठी ती संघर्ष करीत असते. पण फक्त एकटी कामगार संघटना कामगारांच्या सर्व तक्रारींचे निराकरण करू शकणार नाही. कामगारांनी हे जाणून घेतले पाहिजे की राजकीय स्वातंत्र्य हस्तगत केल्याशिवाय त्यांच्या आर्थिक मागण्यांची पूर्तता होणार नाही. म्हणून आपली परिस्थिती सुधारण्यासाठी आणि चांगले जीवन जगण्यासाठी कामगारांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी झगडले पाहिजे."

समाजवादी पक्षाचे व्यासपीठ : "स्वातंत्र्याच्या लढाईत कामगार एकटा सहभागी नाही, तर शेतकरी आणि मध्यमवर्ग, ज्यांची कामगारांइतकीच पिळवणूक चाललेली आहे, तेसुद्धा स्वातंत्र्याच्या लढाईत सहभागी झाले पाहिजेत. या स्वातंत्र्यलढ्यात कामगारवर्ग तेव्हाच यशस्वी होईल, जेव्हा तो शेतकरी आणि मध्यमवर्ग यांच्या खांद्याला खांदा लावून लढेल. म्हणून स्वातंत्र्यलढा तीव्र करण्यासाठी समाजातील सर्व शोषित गट राजकीय व्यासपीठावर एकत्र आले पाहिजेत. या तीनही वर्गांना ते व्यासपीठ काँग्रेस सोशलिस्ट पार्टी पुरवीत आहे. स्वातंत्र्यासाठी लढत असताना काँग्रेस सोशलिस्ट पार्टी स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय, हे जनतेला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. पार्टीला असेही वाटते की आर्थिक स्वातंत्र्य नसेल तर राजकीय

स्वातंत्र्यालाही अर्थ नाही. कष्टकरी समाजाच्या भौतिक जीवनपद्धतीत होणाऱ्या सुधारणांवरूनच स्वातंत्र्य जोखले जाणार आहे. स्वातंत्र्यलढ्यात सर्वसामान्य जनतेने सामील झाले पाहिजे अशी काँग्रेस सोशलिस्ट पार्टीची भावना आहे; कारण स्वातंत्र्य ही त्यांची ताबडतोबीची गरज आहे."

"स्वातंत्र्यलढ्यात जनसामान्यांनी भाग घेतला तर नंतर राजकीय सत्ताही त्यांना हस्तगत करणे शक्य होईल. स्वातंत्र्यानंतर उत्पादन काढणाऱ्या सर्वसामान्यांच्या हाती सत्ता सोपविण्याचा कार्यक्रम सोशलिस्ट पार्टीपुढे आहे. स्वातंत्र्यलढ्याचे तंत्र विकसित करण्यासाठी सोशलिस्ट पार्टी जनतेला त्यांच्या तात्कालिक आर्थिक मागण्यांच्या पायावर संघटित करण्याचा प्रयत्न करीत आहे. श्रमिकांनी आपल्या गाऱ्हाण्यांची सोडवणूक करून घेण्यासाठी कामगारसंघटना काढाव्यात यासाठी पार्टी साहाय्य करीत आहे. किसानांनी किसानसंघ निर्माण करून आपल्या हक्कांसाठी झगडावे यासाठीही सोशॅलिस्ट पार्टी मदत करू इच्छिते. विद्यार्थी व इतर कारागीर यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी पार्टी त्यांच्याही संघटना बांधण्याचा प्रयत्न करीत आहे."

अशा रीतीने 1935 सालीच युसुफ मेहरअलींनी कामगारवर्गाला त्यांनी निव्वळ 'अर्थवादा'चे (इकॉनॉमीझम्) बळी होऊ नये, असा इशारा देऊन ठेवला होता. कामगार वर्गात तातडीचे राजकारणीकरण व पुरोगामित्व निर्माण झाले पाहिजे, यावर त्यांचा भर होता. आजही या संदेशाचा विचार करण्याची तेवढीच गरज आहे.

युसुफ मेहरअली कृतिशील आणि जागरूक समाजवादी होते. त्यामुळे देशातील कोणताही ज्वलंत प्रश्न ते नजरेआड होऊ देत नसत. त्या काळात म्हणजे 1930 च्या दशकात देशातील वेगवेगळ्या तुरुंगात सरकारने राजकीय कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करून ठेवले होते. मुंबई काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीने चौपाटीवर 7 एप्रिल 1935 रोजी सार्वजनिक सभेचे आयोजन करून 'अखिल भारतीय राजबंदी दिन' पाळला. युसुफ मेहरअली त्या सभेचे अध्यक्ष होते. राजकीय कार्यकर्त्यांना तुरुंगात जखडून ठेवण्याच्या सरकारच्या जुलमी कृतीवर त्यांनी सडकून टीका केली आणि राजबंद्यांच्या कुटुंबांना साह्य करणाऱ्या मदतनिधीला लोकांनी उदारहस्ते देणगी द्यावी, अशी कळकळीची विनंती त्यांनी त्या सभेत केली.

समाजवादी चळवळीत युवकांना मोठ्या प्रमाणात सामील करून घेणे आणि त्यांना कृतिशील बनवणे यांमध्ये युसुफ मेहरअलींना विशेष स्वारस्य होते. म्हणून देशभर फिरून युवकांच्या सभा-परिषदा आयोजित करून त्यांनी काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची उभारणी करण्यासाठी युवकांनी कसे सहकार्य द्यावे याविषयी मार्गदर्शन केले. 28 एप्रिल 1935 या दिवशी जबलपूर येथे भरलेल्या 'महाकोशल युवक

परिषदे'त भाषण करताना युसुफ मेहरअलींनी काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची स्थापना ही देशातील एक महत्त्वाची घटना असल्याचे सांगितले. एका बाजूला आत्यंतिक दारिद्र्याने पिडलेला समाज आणि दुसरीकडे मूठभर लोकांची समृद्धी यांमधील विषमता नष्ट करण्याच्या दृष्टीने युवकांनी योजनापूर्वक प्रयत्न केले पाहिजेत, असे त्यांनी निक्षून सांगितले. साम्राज्यशाही हे जगभरच्या शोषणशक्तींचे आगर असलेल्या भांडवलशाहीचेच एक रूप असून ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध लढा देण्यासाठी समाजवादी शक्ती बळकट होणे जरूरीचे आहे असाही संदेश त्यांनी युवकांना दिला.

साम्राज्यशाहीविरोधी लढा पेटविण्यासाठी जगजागृती व्हावी म्हणून मेहरअलींचे दौरे सतत चालू होते. त्याचबरोबर समाजवादाचा संदेशही ते पसरवीत होते. त्यांचे भ्रमण फक्त त्यावेळच्या 'ब्रिटिश इंडिया' पुरतेच नव्हते; तर काही संस्थानांतही ते फिरले. भावनगर संस्थानात आचार्य नरेंद्र देवांबरोबर त्यांनी दौरा केला. नरेंद्र देव हे भारतीय समाजवादी चळवळीचे अध्वर्यु होते. 7 जुलै 1935 या दिवशी भावनगरमध्ये जाहीर सभेत बोलताना मेहरअलींनी संस्थानातल्या जनतेला साम्राज्यविरोधी लढ्याच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आवाहन केले. त्यांनी हे निर्भयपणे जाहीर केले की स्वतंत्र भारतात संस्थानांसारख्या कालबाह्य गोष्टींना व त्यांच्या प्रमुखांना स्थान राहणार नाही. त्यांच्याच जमिनीवर उभे राहून त्या काळात युसुफ मेहरअलींनी परखडपणाने ही घोषणा केली; त्यामुळे त्यांच्या निर्भयपणाचा पुरावा मिळतो.

युसुफ मेहरअली नेहमीच असे मानीत की समाजवादी विचारप्रणालीचा प्रसार होण्यासाठी राजकीय शिक्षणाची आत्यंतिक गरज आहे. त्यामुळेच त्यांचा भर सदैव तत्कालीन महत्त्वाच्या विषयांवर व्याख्याने, राजकीय प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन, राजकीय शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची आखणी आणि संघटित राजकीय मोहिमा यांच्यावर असे. अशा प्रकारच्या शिक्षणाची त्यांना असाधारण आवड होती.

31 ऑगस्ट आणि 21 सप्टेंबर 1935 या दोन दिवशी काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीने कार्यकर्त्यांसाठी युसुफ मेहरअलींची दोन व्याख्याने आयोजित केली होती. व्याख्यानांचे विषय होते, 'चीन : कालचा आणि आजचा' आणि 'समाजवादाचा मूलाधार'. चीनवरील भाषणात त्यांनी जागतिक राजकारणाचा गुरुत्वाकर्षण बिंदू अटलांटिकपासून पॅसिफिक महासागराकडे हळूहळू कसा सरकला आहे, याचे अतिशय मनोज्ञ विवेचन केले. युसुफ मेहरअलींच्या प्रतिपादनाप्रमाणे जपानचा उदय, चीनमधील क्रांती, सोव्हिएत रशियाचा जन्म, आणि तीन चतुर्थांश ब्रिटिश साम्राज्याची राखण करणाऱ्या सिंगापूर तळाची निर्मिती, या घटनांमुळे पॅसिफिकच्या

भोवतालचा प्रदेश आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. त्यांच्या त्या भाषणात 1911 मधील चीनमधील अपूर्ण क्रांती, डॉ. सन्-यत्-सेन यांचे चिनी प्रजासत्ताकाचे अध्यक्ष म्हणून चीनमध्ये पुनरागमन आणि राष्ट्रवाद, लोकशाही व समाजवाद यांच्या पायावर चिनी प्रजासत्ताकाची उभारणी करण्याचे त्यांचे अथक प्रयत्न या सर्व घटनांचा तपशीलवार संदर्भ होता.

एखादा दिनविशेष साजरा करताना मेहरअली प्रचंड कल्पकता दाखवून जनतेचे लक्ष जाज्वल्य प्रश्नांकडे वेधत असत. 1935 मधील 11 नोव्हेंबर या तारखेला जाहीर झालेला युद्ध तहकुबी दिवस मुंबई काँग्रेस सोशलिस्ट पार्टीने 'युद्धविरोधी दिन' म्हणून पाळला. सोशलिस्ट आणि कम्युनिस्ट या दोघांनी मिळून त्या दिवसाचे कार्यक्रम संयुक्तपणे पार पाडले. या दिनानिमित्त मुंबईमध्ये तीन जाहीर सभांचे आयोजन केले होते. त्यापैकी एका सभेचे अध्यक्ष डॉ. राममनोहर लोहिया होते. या जाहीर सभांत बोलताना युसुफ मेहरअलींनी साम्राज्यवादी युद्धावर कडाडून हल्ला चढविला. त्यांच्या भाषणात या मुद्यावर विशेष भर होता की अशा युद्धातून कष्टकरी जनतेची मुक्ती होण्याऐवजी तिला भीषण परिणामांना सामोरे जावे लागते. ते पुढे असेही म्हणाले की उद्या इंग्लंड लढाईत ओढले गेले तर भारताने त्या देशाला मदत करू नये; तर ही संधी साधून संपूर्ण स्वातंत्र्यासाठीचा आपला लढा भारताने प्रखर करावा. अशाप्रकारे युसुफ मेहरअलींनी 1935 सालीच, पुढे येणाऱ्या 1939 सालच्या दुसऱ्या महायुद्धामध्ये देशातील समाजवाद्यांचा रोख काय राहील, याचे द्रष्टेपणाने भविष्य सांगितले होते. या भूमिकेचीच परिणती शेवटी 1942 साली 'करू किंवा मरू' या अखेरच्या स्वातंत्र्यलढ्यात झाली, ज्यामध्ये समाजवादी कार्यकर्त्यांचा लक्षणीय सहभाग होता.

भारतातील समाजवादी देशभक्तीच्या बाबतीत कुठेही मागे नव्हते; त्याचप्रमाणे जगातील कोणत्याही देशाच्या स्वातंत्र्य व प्रगतीच्या चळवळींमध्ये त्यांची विशेष सहानुभूती प्रत्ययास येत असे. या अभिमानास्पद परंपरेला जागूनच मुंबई काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीने इजिप्तमधील राष्ट्रीय चळवळींना सहानुभूती दाखविण्यासाठी चौपाटीवर 29 नोव्हेंबर 1935 या दिवशी एक सभा आयोजित केली होती. युसुफ मेहरअली त्या सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी सदर सभेत मांडलेला खालील ठराव स्वीकृत करण्यात आला :

> "बॉम्बे काँग्रेस सोशलिस्ट पार्टीने भरवलेली ही मुंबईच्या नागरिकांची सभा हार्दिक भावनेने इजिप्तमधील शूर नागरिक बांधवांना त्यांनी चालविलेल्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल अभिवादन करीत आहे. इजिप्तमधील विद्यार्थी, जे सदैव स्वातंत्र्यलढ्याच्या आघाडीवर राहिले, त्यांनी दाखविलेले धैर्य व लोकांमध्ये

निर्माण झालेले चैतन्य यांचा ही सभा विशेष उल्लेख करीत आहे. अलीकडेच झालेल्या निदर्शनात जे नागरिक मारले गेले, त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन ही सभा सहानुभूतीपूर्वक करीत आहे."

1936

1936 या वर्षी मीरत येथे भरलेले कॉंग्रेस सोशलिस्ट पार्टीचे अधिवेशन सर्वार्थाने भव्य होते. 28 जानेवारी 1936 ला पार्टीने जीना हॉलमध्ये या अधिवेशनाचा वृत्तांत सांगण्यासाठी एक सार्वजनिक सभा बोलावली होती. मीरत अधिवेशनात झालेल्या निर्णयाबद्दल मेहरअली त्या सभेत बोलले. अधिवेशनातील मुख्य ठरावाबद्दल बोलताना मेहरअली म्हणाले, की आमच्यापुढील मुद्दा समाजवादी दृष्टिकोनातून दिसणारे आजच्या कॉंग्रेसचे चित्र हा होता. समाजवाद्यांनी या परिषदेत कॉंग्रेसचे जे मूल्यमापन केले त्याबद्दल बोलताना मेहरअली म्हणाले, "कॉंग्रेस ही या देशातील एक बलाढ्य राजकीय संघटना आहे हे खरे; पण कष्टकरी जनतेची फार मोठी संख्या कॉंग्रेसपासून दूर आहे. कॉंग्रेसने आपली धोरणे व कार्यक्रम यांच्यामध्ये दूरदृष्टी दाखवून आवश्यक सुधारणा केल्या नाहीत, तर शोषित वर्गाचे लक्ष ती वेधून घेऊ शकणार नाही. आणि समाजाचा एक मोठा भाग कॉंग्रेसपासून दूर राहील. यासाठी कॉंग्रेसच्या घटनेत बदल करून किसान, कामगार आणि अन्य शोषित वर्गाचे प्रतिनिधी यांना त्यांच्या संघटनांमार्फत पुरेसे प्रतिनिधित्व द्यावे लागेल. कॉंग्रेस संघटनेचे ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य हेच असले पाहिजे; आणि त्या स्वातंत्र्यात सर्व सत्ता उत्पादक श्रमिकांच्या हाती सोपविली गेली पाहिजे. खाणी व बँका यांच्यासारखे महत्त्वाचे व कळीचे उद्योग ताब्यात घेऊन सरकारने त्यांचे राष्ट्रीयीकरण केले पाहिजे. प्रत्यक्ष कसणाऱ्याची जमीन झाली पाहिजे आणि सर्व प्रकारच्या जमीनदारीला मूठमाती मिळाली पाहिजे. कॉंग्रेसने एकमुखाने आणि न कचरता संस्थाने नष्ट करण्याची घोषणा करायला हवी. आणखी एक महत्त्वाचा कार्यक्रम कॉंग्रेसने अंगीकारायला हवा तो म्हणजे भारत स्वतंत्र होताच कामगार व शेतकरी यांची कर्जे माफ झाली पाहिजेत; आणि कोऱ्या पाटीवर आयुष्याचे नवे चित्र चितारण्याची त्यांना संधी मिळाली पाहिजे. हा कार्यक्रम स्वीकारला तर कॉंग्रेसभोवती लढ्याचे सुप्त सामर्थ्य असलेल्या शक्ती जमा होतील. कराची अधिवेशनातला मूलभूत अधिकारांचा जो ठराव आहे त्याची पूर्ती आपोआपच या कार्यक्रमाद्वारे होईल."

जरी युसुफ मेहरअलींच्या राजकीय जीवनाचा विकास मुंबईसारख्या शहरात झालेला असला तरी भारताच्या लोकसंख्येचा बराच मोठा हिस्सा असलेल्या ग्रामीण

शेतकऱ्यांच्या प्रश्नांबद्दल त्यांना विलक्षण सहानुभूती होती. 26 सप्टेंबर 1936 या दिवशी आंध्र सोशॅलिस्ट पार्टीच्या परिषदेत युसुफ मेहरअलींनी अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात किसानांच्या प्रश्नाची जी सखोल चर्चा केली, त्यावरूनच त्यांना किसानांसंबंधी वाटणाऱ्या आस्थेचे दर्शन होते. त्या भाषणात त्यांनी काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचा ग्रामीण भागाविषयीचा खास कार्यक्रम विशद केला. शेतजमिनीवरील वाढत्या बोजाचा उल्लेख करून त्यांनी परिस्थितीचे नेमके चित्र श्रोत्यांसमोर उभे केले. 1881 साली जमिनीवर अवलंबून असणाऱ्या माणसांची टक्केवारी 58 होती. त्यानुसार 1901 साली 61.06 टक्के, 1911 साली 66.6 टक्के, 1921 मध्ये 71.6 टक्के आणि 1931 मध्ये 73.9 टक्के असे हे प्रमाण वाढत गेले. ही परिस्थिती उद्‌भवण्याचे मुख्य कारण युसुफ मेहरअलींच्या मते मागील 150 वर्षांत ब्रिटिशांनी या देशातील उद्योग व व्यापार यांची केलेली प्रचंड हेळसांड. पाश्चात्य औद्योगिक दृष्टिकोन बाळगणाऱ्या ब्रिटिशांनी केलेले हे दुर्लक्ष शेतजमिनीवरील भार वाढण्यास कारणीभूत ठरले.

भारतात ब्रिटिश राजवटीतील भूमिहीन शेतमजुरांच्या वाढत्या संख्येकडे लक्ष वेधून युसुफ मेहरअलींनी त्यांच्या समस्यांची विविध प्रकारे चर्चा केली. 1842 च्या 'मन्रो रिपोर्ट'चा उल्लेख करून ते म्हणाले, की त्यावेळी हिंदुस्थानात क्वचितच एखादा शेतकरी जमिनीशिवाय होता. तीस वर्षांनतर 1872 मध्ये असे आढळले, की जवळजवळ 75,00,000 शेतकरी भूमिहीन आहेत. त्यानंतर पन्नास वर्षांनी झालेल्या जनगणनेत हजारातील 291 शेतकरी, बहुतेकांकडे त्यांची स्वतःची जमीन नसल्यामुळे, शेतमजूर म्हणून काम करीत होते. त्यानंतर 1931 च्या जनगणनेतील शेतमजुरांचे चित्र दर हजारी 407 असे होते. याचाच अर्थ दशकात झालेली वाढ 40 टक्के होती. या वास्तव आकडेवारीचा आधार घेऊन युसुफ मेहरअलींनी पक्ष कार्यकर्त्यांना असे आवाहन केले की त्यांनी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन व जमीनदारी पद्धतीविरुद्ध आंदोलने उभारून ती नाहीशी करण्यासाठी पार्श्वभूमी तयार करावी. ग्रामीण भागात राहणाऱ्या श्रमिकांची कर्जमुक्ती आणि जमीन करपद्धतीची पुनर्रचना यांसंबंधात त्यांनी कळकळीचे आवाहन केले. पुढील वर्षीच 28 एप्रिलला युसुफ मेहरअलींनी गुजरातमध्ये गोध्रा येथे शेतकऱ्यांच्या परिषदेत बोलताना शेतकरी संघटनांची आवश्यकता आणि गतिमान शेतजमीनविषयक धोरणाचा स्वीकार आणि कार्यक्रमाची रचना यांवर आग्रहपूर्वक काही विचार मांडले. आज मागे वळून पाहिले तर युसुफ मेहरअलींनी भारताच्या भविष्याबद्दल दाखविलेल्या द्रष्टेपणाबद्दल आणि उत्कटतेने प्रसारित केलेल्या यथार्थ दृष्टिकोनाबद्दल खरोखरच नवल वाटते.

4 ऑक्टोबर 1936 ला बंगाल काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या अधिवेशनात मेहरअलींनी जातीयतेच्या समस्येचे एक नवीन पृथक्करण केले; आणि त्यांच्या समाजवादी दृष्टिकोनातून या जातीयतेच्या प्रश्नांच्या मागे दडलेल्या आर्थिक प्रश्नांचे विश्लेषण करून या गुंतागुंतीच्या जातीय प्रश्नावर समाजवादी विचारमंथनातून काही उपायही सुचविले. या परिषदेत युसुफ मेहरअली 'क्रांतीचे नवे डावपेच' या विषयावर भर देत होते. बंगालमधील जातीयतेच्या प्रश्नाचा उल्लेख करून मेहरअली बंगालच्या प्रतिनिधींना उद्देशून म्हणाले, 'सिंध आणि इतर प्रांतांतल्याप्रमाणेच तुमच्या प्रदेशातील जातीय प्रश्न हे अधिक करून सामाजिक-आर्थिक आहेत. तुमच्या प्रांतांतील अधिकांश नागरिक हे शेतकरी आहेत, त्यांच्यापैकी बहुतेक सर्व मुस्लिम आहेत. हिंदू मध्यम वर्गातले आणि बहुतेक सर्व जमिनींचे मालक आहेत. अशा तऱ्हेने वर्ग आणि जाती यांच्या विभाजन रेषा बऱ्याचशा एकच असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जमीनदारांविरुद्ध होणाऱ्या उठावाला दुर्दैवाने जातीय रंग येतो. या दरिद्री मुस्लिम शेतकऱ्यांना मुस्लिम जमीनदार आणि अमीर, त्यांचे हिंदू जमीनदारांकडून व सावकारांकडून कसे शोषण होत आहे, याचे धडे देतात. या परिस्थितीला समाजवादी उत्तर असे आहे की हिंदू शेतकरी व मुस्लिम शेतकरी, त्याचप्रमाणे हिंदू कामगार व मुस्लिम कामगार आणि हिंदू व मुस्लिम मध्यमवर्गीय यांना आपण असे समजावले पाहिजे की त्यांचे खरे हितसंबंध एकमेकांना छेद देणारे नाहीत. त्या सर्वांचे प्रश्न सारखेच आहेत आणि हे समान हितसंबंध समान प्रतिनिधित्व आणि समान राजकीय संघटनांच्या द्वारेच राखले जातील. हिंदू आणि मुसलमान यांच्या आर्थिक हितसंबंधांची काँग्रेसने खबर घेतली नाही; म्हणूनच तुमच्या प्रांतांमधील मुस्लिम शेतकऱ्यांचा पाठिंबा काँग्रेसला मिळाला नाही.''

धार्मिक भूमिकेवरून दोन्ही बाजूंनी त्यानंतर जातीय हलकल्लोळ माजवला आणि त्याची परिणती अखेर हिंदुस्थानच्या फाळणीत झाली. हे सर्व आठवताना मन विषण्ण होते आणि आर्थिक हितसंबंधांच्या पायावर या दोनही धर्मांतील लोकांना एकत्र आणण्याऐवजी त्यांचे अहंकार चुचकारणारे आणि हेवेदावे भडकवणारे राजकारण काँग्रेसने केले, हे त्या वेळच्या नेतृत्वाचे घोर अपयशच म्हणावे लागेल. केवढी मोठी ऐतिहासिक चूक होती ती!

1937

एक समर्पित समाजवादी म्हणून युसुफ मेहरअलींची अशी धारणा होती की समाजपरिवर्तनासाठी लढणारा राजकीय कार्यकर्ता समाजवादी सिद्धांत आणि कार्यक्रम यांच्याशी चांगल्या रीतीने परिचित असला पाहिजे. सामाजिक-आर्थिक

प्रश्नांची त्याला चांगली समज असायला हवी; त्याचप्रमाणे राजकीय चळवळींचेही ज्ञान त्याला असले पाहिजे. जगाच्या वेगवेगळ्या भागांत चाललेल्या सुधारणाविषयक, पुनरुत्थानविषयक चळवळी आणि राज्यक्रांती यांची त्याला माहिती असणे आवश्यक आहे. त्याकरता कार्यकर्त्यांच्या राजकीय शिक्षणावर युसुफ मेहरअलींचा भर होता. त्यातून पहिला उठणारा प्रश्न 'काय वाचावे' हा होता. युसुफ मेहरअलींनी परिश्रमपूर्वक "काय वाचाल?" या आकर्षक मथळ्याखाली एका अभ्यासक्रमाची रचना केली होती. या अभ्यासक्रम पत्रिकेला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना हा राजकीय शिक्षणावरचा एक उत्कृष्ट निबंध आहे. या मनोवेधक प्रस्तावनेत मेहरअली लिहितात :

> "जीवनाची गतिशीलता वेगवेगळे प्रसंग निर्माण करते आणि माणसे त्यांत चाचपडत राहतात. आज प्रश्नचिन्हे मोठी व ठळक होत चालली आहेत. अस्तित्वाच्या धाग्याधाग्याला ती स्पर्श करीत आहेत. आपल्यासमोर उभी असलेली आव्हाने, त्यांना पुरेशा तयारीनिशी भिडलो नाही, तर आपल्याला गिळून टाकतील. आजच्याइतकी ही प्रश्नचिन्हे कधीच उपद्रवकारक झाली नव्हती. या प्रश्नचिन्हांच्या ताणाखाली सुसंस्कृत जीवन कोसळताना दिसत आहे. अक्षरशः संपूर्ण विनाशाच्या छायेत आपण जगत आहोत. शस्त्रास्त्रांचे साठे एकावर एक रचले जात आहेत; आणि या रानटी स्पर्धेची अखेरची मात ही माणसांच्या रक्ताच्या थारोळ्यात होणार आहे व तो दिवस फार दूर नाही. युद्धाच्या या सावल्यांमध्ये आर्थिक असुरक्षिततेचे रसायनही मिसळले आहे. या मिश्रणाची दुर्गंधी दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे; आमच्या कृतिशीलतेची नस त्यामुळे लुळी पडत चाललेली आहे. हे असुरक्षिततेचे वातावरण आपल्याला एच.जी.वेल्सच्या भाषेत 'वैफल्याच्या जगात' घेऊन जात आहे. पण जीवनाची गतिशीलता अशी सहजासहजी चिरडली जात नाही. अत्यंत निराशेच्या, उद्विग्नतेच्या काळातही नव्या इच्छा-आकांक्षांचे कोंब फुटतात. माणसांच्या अतिशय दलित अवस्थेत असलेल्या जाति-प्रजातींनाही स्वतंत्र जीवनाच्या लहरी स्फुरत असतात. जर सामाजिक-आर्थिक प्रेरणा योग्य रीतीने नियंत्रित केल्या, तर इतिहासात पहिल्या प्रथमच प्रत्येक माणसाला आपल्या व्यक्तित्व विकासाला योग्य ती संधी मिळेल; कारण या जीवनलहरी प्रखर आणि सुदृढ आहेत. पण अशा प्रकारच्या विकसनाला सध्याचा सावळा गोंधळ अडथळे आणीत आहे. दलित समाजातील अस्वस्थताही या अडचणींच्या संदर्भात गोंधळाचे आणखी एक कारण बनत आहे. लाखोंना ही जाणीव आहे, की त्यांना भुकेले किंवा

कुडकुडत जीवन जगण्याची गरज नाही. संपूर्ण आणि समृद्ध आयुष्याचा वारसा त्यांना लाभू शकतो. पण सामाजिक जीवनाच्या पटामध्ये अश्रद्धा विणण्याचे त्यांचे प्रयत्न सध्याची कटकट वाढवणारेच आहेत. आमच्या काळाची शोकांतिका अधिक गडद आहे; कारण आमच्या युगाचे श्रेय मोठे आहे, आणि अचानक उद्भवणारे महासंकट भीषण संभाव्यतेने भारलेले आहे. या सर्व शक्तींचे क्रूर संतुलन एकीकडे आमचे जीवन दुःखी बनवीत असले, तरी दुसरीकडे ते धीरगंभीर बनवते. या गोंधळवून टाकणाऱ्या घटनांमध्ये कोणाला काही सुसंगत पद्धती दिसते काय? आपण या जगात केवळ निःशब्द बघे राहणार आहोत, की एका सुरक्षित आणि विवेकी जगाचे रचनाकार बनणार आहोत? या सर्व विध्वंसात समाजवाद ही एकच खरी आशा आहे. आयुष्याचे पूर्णतया समाधानकारक तत्त्वज्ञान याच विचारसरणीत आहे. भांडवलशाही चौकटीत ज्या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत, किंवा ज्या समस्या सोडविल्या जात नाहीत असा अनुभव आहे, त्या अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांना समाजवादाकडे चोख उत्तरे आहेत. बेरोजगारी आणि दारिद्य नाहीसे करण्याचे आश्वासन फक्त समाजवादी व्यवस्था देऊ शकते आणि सर्वसाधारण जनतेला नवीन आणि परिपूर्ण जीवन– विशेषतः आनंदोल्हासाचे अनुभव प्रदान करू शकते.

या अभ्यासक्रमात काही वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकांचा परिचय करून दिला आहे, ज्यांच्यामुळे सध्याच्या एकूण परिस्थितीचे सम्यक् आकलन होण्यास मदत होणार आहे. या पुस्तकांची निवड काळजीपूर्वक आणि विशिष्ट उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून करण्यात आली आहे. त्यांच्या अभ्यासाने विविध विचारधारांतून एक संपूर्ण एकजीव चित्र डोळ्यांसमोर निर्माण होईल. हा छोटासा अभ्यासक्रम तयार करण्याच्या कल्पनेचा उगम देशातील विविध भागांतून भेटणाऱ्या कॉँग्रेस सोशलिस्ट पक्षाच्या कार्यकर्त्यांनी विविध विषयांवरील माहितीसाठी काय काय वाचावे, यांबद्दल मागवलेल्या सूचनांमधून झाला. ह्याबाबत आलेल्या प्रश्नांची संख्या आणि पुनरावृत्ती इतकी होती की प्रत्येकाला वेगवेगळी उत्तरे देणे शक्य नव्हते, म्हणून मग रीतसर बांधीव अभ्यासक्रमाची रूपरेषा तयार करण्याची आवश्यकता जाणवली. त्या कामात अनेक प्रकारच्या अडचणी आल्या आणि अनेक मित्रांनी उदार मदतीचा हात पुढे केला नसता तर हे काम अंशतःही पुरे होणे दुरापास्त होते. 'कॉँग्रेस सोशलिस्ट' पत्राचे संपादक अशोक मेहता यांनी हे लिखाण तपासून अनेक मौलिक सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानणे आवश्यक

आहे. कमलादेवी चट्टोपाध्याय, जयप्रकाश नारायण, एम.आर.मसानी, डॉ. राममनोहर लोहिया, श्री. व सौ.बी.पी.एल. बेदी आणि एम.ए.गांधी यांनी हे हस्तलिखित तयार करण्यासाठी अतिशय प्रेमळ साहाय्य केले. आर.एस.नायडू यांनी या पुस्तिकेचे मुखपृष्ठ तयार केले. त्यांनी काढलेली रेखाचित्रे आणि व्यंगचित्रे काँग्रेस सोशलिस्ट साप्ताहिकाच्या वाचकांना फार आवडली. या अभ्यासक्रमाच्या रूपरेषेत असलेल्या त्रुटींचे लेखकाला भान आहे. छपाईच्या निकडीमुळे जर्मन विभागाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. मित्रांकडून येणाऱ्या सूचना आणि टीका लेखक कृतज्ञतापूर्वक स्वीकारील; कारण त्यांच्यामुळे या पुस्तकाची पुढील आवृत्ती अधिक निर्दोष बनेल, अशी लेखकाला खात्री वाटते.

1 मार्च 1937 युसुफ मेहरअली
मुंबई

सदर अभ्यासक्रमाच्या आधारे युसुफ मेहरअली यांनी काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी 11 ते 18 ऑक्टोबर 1937 या काळात जुहूच्या रम्य सागरतीरावर एक अभ्यासशिबीर आयोजित केले. अभ्यास शिबिरातील विषयांच्या खालील आयोजनाकडे नजर टाकली तरी किती काटेकोरपणे विचार करून युसुफ मेहरअलींनी या शिबिराचे संयोजन केले होते, हे लक्षात येते.

1.	समाजवादी पक्षाचा इतिहास	4 व्याख्याने
2.	आधुनिक भांडवलशाहीचा विकास	2 व्याख्याने
3.	समाजवादाची मूलतत्त्वे	3 व्याख्याने
4.	साम्राज्यवाद	2 व्याख्याने
5.	नाझीवाद (फॅसीझम)	1 व्याख्यान
6.	भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाचा इतिहास	3 व्याख्याने
7.	भारतीय शेतीचे प्रश्न	2 व्याख्याने
8.	भारतीय श्रमिक आणि कामगार आंदोलन	3 व्याख्याने
9.	भारतातील समाजवादी ऐक्याच्या समस्या	1 व्याख्यान
10.	भारतातील दडपशाहीचे कायदे	1 व्याख्यान
11.	सोव्हिएत संघराज्य	1 व्याख्यान
12.	अमेरिकेतील नवी योजना	4 व्याख्याने

13. निकटपूर्वेमधील उसळती लाट 1 व्याख्यान
14. स्पेन आणि त्याचे भवितव्य 1 व्याख्यान

यांशिवाय मार्क्स, एन्जेल्स, लासेल, लेनिन, स्टालिन व ट्रॉट्स्की यांच्यावर प्रत्येकी एक व्याख्यानाची योजना होती.

कार्यकर्त्यांच्या राजकीय शिक्षणावर जरी युसुफ मेहरअलींचा भर होता तरी कष्टकरी जनतेच्या योग्य आणि कायदेशीर मागण्यांच्या पाठीमागे भक्कम पाठिंबा उभा करणे हेही त्यांचे एक उद्दिष्ट होते. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी जनतेमध्ये जागृती व्हावी म्हणून त्यांनी देशाच्या विविध भागांत तुफानी दौरे काढले; आणि अनेक वेळा तेथील सरकारांचा रोष ओढवून घेतला. जून 1937 मध्ये ते मलबारला गेले तेव्हा जिल्हा न्यायाधीशांनी त्यांना जाहीर सभेतून वक्तव्ये करण्यास बंदी करण्याचा हुकूम काढला होता. त्यांच्या भाषणांमुळे सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे कारण त्यांना देण्यात आले. पण या आदेशाला न जुमानता कालिकतच्या टाऊन हॉलमध्ये युसुफ मेहरअलींनी एका सभेत भाषण केले. त्याचा परिणाम म्हणून त्यांना अटक होऊन सहा महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली गेली. पण त्यांच्या अटकेविरुद्ध झालेली आरडाओरड आणि लोकांमधील असंतोष लक्षात घेऊन मद्रासमधील काँग्रेस शासनाने त्यांची मुक्तता केली. सुटका झाल्यानंतरही युसुफ मेहरअलींनी आपले दौरे आणि मोहिमा तितक्याच निर्धाराने चालू ठेवल्या.

1938

काँग्रेस सोशलिस्ट पार्टीमधील अत्यंत जागरूक नेत्यांपैकी युसुफ मेहरअली हे एक होते. कोणताही राष्ट्रीय अगर आंतरराष्ट्रीय विषय त्यांच्या नजरेतून निसटत नसे. त्यांच्याच अध्यक्षतेखाली मुंबई काँग्रेस सोशलिस्ट पार्टीने 22 मार्च 1938 या दिवशी चौपाटीवर एक जाहीर सभा भरविली. त्यावेळी मुंबई राज्यातील काँग्रेस मंत्रिमंडळाने मुंबई म्युनिसिपल कार्पोरेशनचे लोकशाहीकरण करण्याचे ठरवून प्रौढ मतदानपद्धतीने सभासदांची निवडणूक व्हावी, असे विधेयक मंजूर करून घेण्याचे ठरवले होते. त्या निमित्त सरकारचे अभिनंदन करण्यासाठी ही सभा होती. पुन्हा 28 मार्चला मुंबईत माटुंग्याला नप्पू गार्डन्समध्ये काँग्रेस सोशलिस्ट पार्टीने युसुफ मेहरअलींच्याच अध्यक्षतेखाली सभा घेतली. या सभेमध्ये युरोपातील नाझी राजवटीने ऑस्ट्रियाचा पाडाव केल्यानंतरच्या परिस्थितीचा विचार करण्यात आला. आणखी एक सभा लाहोरला

13 एप्रिल 1938 रोजी झाली. त्यात मनसा संस्थानात शेतकऱ्यांवर होणाऱ्या दडपशाहीचा प्रतिकार करण्यासाठी शेतकऱ्यांना पार्टीने संपूर्ण पाठिंबा जाहीर केला. हा ठराव युसुफ मेहरअलींनीच मांडला होता.

त्याचवेळी लाहोरला भरलेल्या काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या अधिवेशनात सोशॅलिस्ट आणि कम्युनिस्ट यांचा उघड उघड संघर्ष झाला. काँग्रेस सोशलिस्ट पार्टीपुढे फारच मोठा संघटनात्मक पेच त्यावेळी खडा होता.

त्यावेळी काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टीमध्ये घुसखोरी करून पार्टीची संयत्रणा पूर्णपणे काबीज करण्याचे मनसुबे कम्युनिस्ट रचीत होते, त्यासाठी त्यांनी समाजवादी एकजुटीचे पांघरूण घेतले होते. त्यांच्या या सर्व हालचाली व डावपेच उघडकीस आणणारा एक दस्तऐवज प्रकाशात आला होता.

लाहोर अधिवेशनात जेव्हा मिनू मसानी भाषण करीत होते, तेव्हा अधिवेशनाच्या मंडपात एका कोपऱ्यात थोडी गडबड चालली असल्याचे आढळून आले. कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी तो कोपरा व्यापला होता आणि अधिवेशनाचे संघटक जर जागरूक नसते तर त्यावेळी बरेच नुकसान होण्याचा संभव होता. एकतर काँग्रेस सोशलिस्ट पार्टीत फुटीची उघड शक्यता होती किंवा कम्युनिस्टांचा काँग्रेस सोशलिस्ट पार्टीवर पूर्ण कब्जा मिळवण्याचा डाव सफल झाला असता. युसुफ मेहरअलींना स्वयंसेवक संघटनांचे नियंत्रण करण्याचा अनुभव होता. त्यांनी कठोर निर्णय घेतले आणि स्वयंसेवकांच्या साहाय्याने त्यांनी ते संकट टाळले. युसुफ मेहरअली अशा रीतीने काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे प्राणदाते ठरले.

मेहरअलींचे राजकीय कार्य फक्त भारतापुरतेच मर्यादित नव्हते. त्यांनी युरोप-अमेरिकेचा दौरा 1938 साली जुलै-ऑगस्ट महिन्यांत केला. तेथे ते भारताचे अनधिकृत वकील– स्वातंत्र्य व समाजवाद यांच्यासाठी लढणाऱ्या भारताचे वकील, म्हणून सर्वत्र फिरले.

लंडनच्या कॅक्स्टन हॉलमध्ये इंडिया लीगने त्यांचा भव्य स्वागत समारंभ आयोजित केला होता. ट्रिब्यूनचे संपादक विल्यम मिलर समारंभाचे अध्यक्ष होते; आणि पार्लमेंट सदस्य रेजिनाल्ड सोरेन्सन आणि मिस् मॅनिका व्हॅटले हे उपस्थितांमध्ये होते. आपल्या वक्तव्यामध्ये– रूटरने त्याचे वर्णन भावनांनी ओथंबलेले असे केले आहे– मेहरअलींनी भारताची बाजू उपस्थितांसमोर मांडली. फेडरेशन विरुद्धच्या लढाईबाबत त्यांनी विशेष विवेचन केले आणि भारताच्या राष्ट्रीय चळवळीतील काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या भूमिकेचे ठामपणे महत्त्व विशद केले. वीरास्वामींच्या 'इंडिया रेस्टॉरंट'मध्ये दुसऱ्या एका स्वागत समारंभात मेहरअलींनी केलेले भाषण अतिशय सरळ आणि स्पष्ट होते, असे 'टाइम्स'ने म्हटले

आहे. भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या विकासाबद्दल त्यांनी तपशीलवार विवेचन केले. नंतर युरोप सोडून मेहरअली 4 ऑगस्टला अमेरिकेत जागतिक युवक परिषदेमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी रवाना झाले. ही परिषद आटोपून 24 डिसेंबर 1938 रोजी ते भारतात परतले, तेव्हा समाजवादी कार्यकर्ते आणि अनेक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांचे भव्य स्वागत केले.

1939

1939 सालाने दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटलेले पाहिले. भारताला त्याच्या संमतीशिवाय युद्धात खेचू पाहणाऱ्या या साम्राज्यशाही युद्धाच्या विरोधी एक मोठा लढा देशामध्ये सुरू केला पाहिजे, असे काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या इतर नेत्यांप्रमाणे युसुफ मेहरअली यांनाही वाटत होते. काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे प्रवक्ते या साम्राज्यवादी युद्धाचे कडवे विरोधक तर होतेच; पण सोव्हिएट रशिया ब्रिटिशांच्या बाजूला येऊन मिळेपर्यंत कम्युनिस्टही साम्राज्यवाद विरोधी संघर्षाच्या बाजूने होते. 1939 च्या उन्हाळ्यात काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. त्यानंतर युसुफ मेहरअली, डॉ. राममनोहर लोहिया, अच्युत पटवर्धन, आचार्य नरेंद्र देव आणि एस.एम.जोशी महात्माजींना भेटायला गेले. जागतिक युद्धाच्या परिणामांच्या संदर्भात त्यांनी गांधीजींशी चर्चा केली आणि या युद्धपरिस्थितीचा फायदा घेऊन साम्राज्यवादविरोधी लढा भारतात अधिक तीव्र करण्याविषयी सुचविले. 'इंग्लंडवरची आपत्ती ही भारतासमोरची संधी' हे समाजवाद्यांनी स्वीकारलेले विचारसूत्र होते. युद्धग्रस्त ब्रिटिश सत्ताधाऱ्यांवर जरासे दडपण आणणारा प्रतिकात्मक प्रतिकार त्यांना मान्य नव्हता. अँग्लो अमेरिकन आणि सोव्हिएट राष्ट्रगट या दोनही पासून तटस्थ राहण्याचे धोरण समाजवादी पक्षामध्ये हळूहळू आकार घेत होते. या तटस्थतेच्या धोरणाचे श्रेय जरी पंडित नेहरूंना दिले जात असले तरी युसुफ मेहरअलींनी हे अनेक वेळा दाखवून दिले की डॉ. राममनोहर लोहिया हे या अलिप्ततेच्या धोरणाचे खरे जनक होते; आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा अलिप्त राष्ट्रांतील जनता व सरकारे यांच्या तिसऱ्या आघाडीचा आग्रह त्यांनी कोणत्याही तडजोडवादाला न जुमानता धरला होता. समाजवादी नेत्यांच्या गांधीजींच्याबरोबर झालेल्या भेटीत या नेत्यांना असे स्वच्छपणे कळून चुकले की युद्ध प्रयत्नांत भारतीय जनतेचे सहकार्य ब्रिटिशांना मिळवून देण्यासाठी कोणतीही तडजोड करण्याच्या मनःस्थितीत गांधीजी नव्हते. गांधीजींच्या वैयक्तिक सत्याग्रहाच्या संकल्पात समाजवाद्यांना फारसे स्वारस्य नव्हते. एका वर्षानंतर

गांधीजींची ती योजना प्रत्यक्षात आली. ब्रिटिशांच्या विरुद्ध अधिक सर्वंकष आणि तीव्र लढा लढण्यासाठी जनजागृती झाली पाहिजे, असे युसुफ मेहरअलींना ठामपणे वाटत होते. तथापि गांधीजींच्या नेतृत्वाखाली सुरू होणाऱ्या वैयक्तिक सत्याग्रहाला समाजवाद्यांनी सक्रिय विरोध करावा असे मात्र त्यांना वाटत नव्हते. युसुफ मेहरअली आणि काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे इतर नेते यांनी गांधीजींना या वेळी असे वचन दिले की ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध गांधीजी जेव्हा लोकलढ्याचा आदेश देतील, तेव्हा काँग्रेस सोशलिस्ट पार्टी आपले सर्व वजन त्यांच्या बाजूने टाकील. इतिहासाने हे सिद्धच केले आहे की जेव्हा 'छोडो भारत'चा ठराव 8 ऑगस्ट 1942 रोजी काँग्रेसने संमत केल्यावर मोठे जनआंदोलन उभे राहिले, तेव्हा त्या लढ्यात समाजवादी कार्यकर्त्यांनी स्वतःला सर्वस्वी झोकून दिले होते.

बिहारमध्ये डेहरी-ऑन-सोन या ठिकाणी 7 जुलै 1940 मध्ये तेथील समाजवाद्यांच्या अधिवेशनात युसुफ मेहरअली अध्यक्ष होते. त्या परिषदेत भाषण करताना ते म्हणाले, "जास्तीत जास्त काँग्रेसजनांना अत्यंत पुरोगामी आणि मूलभूत धोरणे आणि कार्यक्रम यांच्याजवळ नेण्याचे समाजवाद्यांनी सातत्याने प्रयत्न चालविले पाहिजेत. रामगड ठरावाच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपली वाटचाल झाली पाहिजे आणि स्वातंत्र्यप्राप्तीसाठी सतत प्रयत्नशील असलेल्या संस्थेशी (काँग्रेस) आपण एकनिष्ठ असू, तर त्या स्वातंत्र्याच्या वाटचालीत देशासाठी बलिदान करण्यासही आपण डगमगता कामा नये."

या वेळपर्यंत देशातील युद्धविरोधी वातावरण तापू लागले होते. महात्मा गांधींना पायरी पायरीने पुढची वाटचाल करावयाची होती. म्हणून त्यांनी साम्राज्यवादी युद्धाविरुद्ध प्रतिकात्मक विरोधाचे पाऊल उचलायचे ठरवून वैयक्तिक सत्याग्रहाची हाक दिली. या सत्याग्रहातील नियमांप्रमाणे प्रत्येक सत्याग्रह्याने जाहीरपणे लोकांना युद्ध प्रयत्नांना हातभार न लावण्याचे आवाहन करायचे होते, कारण भारताच्या इच्छेविरुद्ध त्याला युद्धात ओढले गेले होते.

युसुफ मेहरअली या मर्यादित वैयक्तिक सत्याग्रहाच्या कार्यक्रमावर संतुष्ट नव्हते. लढाऊ चळवळीला वैयक्तिक सत्याग्रह हा त्यांच्या मते पर्याय नव्हता. पण या वैयक्तिक सत्याग्रहामध्ये व्यक्तिगत कृतीतून मोठ्या लढ्याला तोंड फोडण्याचे सुप्त सामर्थ्य त्यांना दिसत होते. त्यामुळे तडजोडवादाला कायमची मूठमाती मिळणार होती. म्हणून वैयक्तिक सत्याग्रहापासून युसुफ मेहरअली दूर राहू शकले नाहीत.

स्पेशल ब्रँच (आय) सी.आय.डी. कमिशनर ऑफ पोलीस, मुंबई यांच्या गुप्त कागदपत्रांत 17 डिसेंबर 1940 या तारखेस खालील उल्लेख आढळतो.

भारत संरक्षण कायदा (डिफेन्स ऑफ इंडिया) नियम 129 नुसार केलेली कारवाई.

1. अ) दि. 16 डिसेंबर 1940 या तारखेला वाय.जे.मेहरअली यांच्याकडून चम्पागल्ली येथे सत्याग्रह करण्याबद्दल सूचनापत्र मिळाले.
   ब) 17 डिसेंबर 1940 या दिवशी पहाटे 5 वाजता भारत संरक्षण कायदा नियम 129(2) याच्या अंतर्गत त्यांना अटक करण्यात आली.
   क) वाय. जे. मेहरअली यांना भायखळा रेल्वे स्टेशनवरून रेल्वेने थेट नाशिक रोड, सेंट्रल जेलमध्ये नेण्यात आले.
2. वर्गीकरणासाठी सामाजिक दर्जा वगैरे...
   अ) श्री. वाय. जे. मेहरअली हे बी.ए., एलएल.बी. आहेत आणि अखिल भारतीय काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे सरचिटणीस आहेत. ते काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे सदस्य आहेत, त्याबरोबरच अखिल भारतीय काँग्रेस समिती, मुंबई प्रांत काँग्रेस समितीचे सदस्य आहेत. गुमास्ता महामंडळ, बॉम्बे स्टुडंट्स् युनियन यांसारख्या अनेक संस्थांशी ते संबंधित आहेत. त्यांच्यासाठी 'ब' वर्ग योग्य होईल, हे मी माझ्या आदेशात नमूद केले होते.
   ब) सरकारने भारत संरक्षण कायदा नियम 26(1)(ब) या अंतर्गत स्थानबद्धतेसाठी आवश्यक ते आदेश द्यावेत.
3. अटक वगैरे गोष्टींना झालेल्या प्रतिकाराबाबत– मुळजी जेठा क्लॉथ मार्केट, लक्ष्मीदास मार्केट, स्वदेशी मार्केट आणि खादी भांडार आज (17/12/1940) बंद आहेत. युसुफ मेहरअलींना झालेली अटक हे त्याचे कारण आहे. कॉटन मार्केट, बुलियन एक्स्चेंज आणि शेअर बाजार उघडे असले तरी त्यांमध्ये काही व्यवहार चालू नाही. मंगळदास कापड बाजार आणि नळबाजार उघडे आहेत. मुंबई प्रांत काँग्रेस कमिटीने एक जाहीर सभा आज संध्याकाळी (17/12/1940) काँग्रेस हाऊसमध्ये भरविण्याचे ठरवले आहे. एस.एल.सिलम आणि पुरुषोत्तम त्रिकमदास हे सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाषण करणार आहेत.

युसुफ मेहरअली हे एक तुफान बंडखोर होते. सातत्याने आणि अथकपणे साम्राज्यवादाविरुद्धचा लढा जहाल करण्याच्या सोशलिस्ट दृष्टिकोनाचे ते प्रवर्तन करीत होते.

त्रिपुरी काँग्रेसच्या कामकाजात दाखल करून घेण्यासाठी काँग्रेस सोशलिस्ट पार्टीचे विचारदर्शन घडविणारा खालील ठराव त्यांनी पाठविला :

"दहा वर्षांपूर्वीच लाहोर येथे काँग्रेसने भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा मार्ग स्वीकारला. तेव्हापासून देशातील जनता त्या मार्गाने कधी अडखळत, तर कधी संघर्ष करीत, कधी जरा मागे येत अगर पुढे जात अशी वाटचाल करीत आहे. आता त्या पूर्ण स्वराज्यासाठी सरळ संघर्ष करण्याची वेळ आली आहे.

"काँग्रेसने गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचा कायदा 1935, प्रांतिक आणि संघराज्यात्मक पातळीवर झिडकारलेला असून तो संपूर्ण नष्ट करण्यासाठी जनतेची एकजूट आणि ताकद वाढवून लढा उभारण्यासाठी ती संघटना कटिबद्ध आहे. आता अशी वेळ आली आहे की केवळ संघराज्यविषयक योजना लागू करण्याच्या प्रयत्नांना खीळ घालण्याऐवजी ब्रिटिशांचे वर्चस्व समाप्त करण्यासाठी त्याचप्रमाणे राष्ट्राच्या स्वयंनिर्णयाला कधीही बाधा न आणणारी अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी आक्रमक पावले उचलण्याची गरज आहे.

"काँग्रेसचा सर्वदूर पसरलेला आणि व्यापक प्रभाव लक्षात घेतला; शेतकरी वर्गातील, त्याचप्रमाणे कामगार आणि इतर सर्वसामान्य जनता यांच्यामधील जागृती आणि संघटनात्मक ताकद लक्षात घेतली; त्याचबरोबर संस्थानी जनतेने चालविलेले लढे लक्षात घेतले, तर असंतोषाची ही उफाळलेली लाट ब्रिटिश साम्राज्याच्या अस्तित्वासमोर आव्हान खडे करील याबद्दल काँग्रेसला खात्री वाटते. सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वैधानिक स्तरावरील कार्यक्रम आणि जनतेच्या चळवळी यांच्यामध्ये सहकार्य असणे जरूरीचे आहे. त्याचप्रमाणे संस्थानांमध्ये होणारे उठाव आणि देशाच्या उर्वरित भागांतील विविध चळवळी यांचाही समन्वय साधणे जरूरीचे आहे.

"काँग्रेस मंत्रिमंडळांच्या कामाला गती मिळाली पाहिजे आणि त्यांना मिळालेल्या संधी त्यांनी जागरूकपणे जनतेची प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी वापरल्या पाहिजेत.

"लढ्यात उडी घ्यायला तयार असलेल्या स्वयंसेवकांचे केंद्रीय नियंत्रणाखाली स्वयंसेवक पथक तयार करून काँग्रेसचे ते लढाऊ पथक मानण्यात यावे.

"भारतातील संस्थानांमध्ये झालेली जनजागृती ही गेल्या अधिवेशनापासूनच्या काळात नव्याने घडलेली महत्त्वाची घटना असून अनेक संस्थानांमधून चाललेल्या

लोकलढ्यांबद्दल काँग्रेस तेथील जनतेला अभिवादन करीत आहे; आणि अनेक प्रकारच्या अडचणी आणि दुर्धर अडथळ्यांवर मात करून चालविलेल्या चळवळींबद्दल आस्था व्यक्त करीत आहे.

"मागील वर्षातील घटना ठळकपणे हेच दाखवीत आहेत की देशातल्या इतर भागातील जनतेप्रमाणेच संस्थानांतील जनतेचासुद्धा खरा शत्रू ब्रिटिश साम्राज्यशाही हाच आहे.

"काँग्रेस हे निश्चितपणे मानते की संस्थानांत चाललेल्या जनतेच्या चळवळी या स्वातंत्र्यलढ्यातील केंद्रस्थानी आहेत; आणि म्हणून त्यांच्या लढ्यांना काँग्रेस पाठिंबा जाहीर करीत आहे. महात्मा गांधींनी या चळवळींत स्वतःला अंतःकरणपूर्वक झोकून दिल्याबद्दल काँग्रेस त्यांची कृतज्ञ आहे. त्यांच्या साहाय्याने संस्थानांमधील जनचळवळींना राष्ट्रीय महत्त्व मिळवून देण्यात काँग्रेस यशस्वी झाली आहे.

"तथापि, अलीकडील काही घटनांचा काँग्रेसच्या अंतर्गत एकजुटीवर परिणाम होत आहे, हे चिंताजनक आहे; कारण आजच्या काळात काँग्रेसइतकी अत्यावश्यक ठरलेली दुसरी कोणतीही संघटना अस्तित्वात नसल्यामुळे सर्व संबंधितांना काँग्रेसचे हे आवाहन आहे की तात्त्विक मतभेद असले तरीही संघटनांतर्गत ऐक्य ही काँग्रेसची शक्ती आहे हे ओळखून ती टिकविण्याचा व वाढविण्याचा प्रयत्न सर्वांनी करावयास हवा. भारतीय स्वातंत्र्याची प्राप्ती शांततामय आणि कायदेशीर मार्गांनी करण्याच्या उद्दिष्टाशी ज्यांची असाधारण निष्ठा आहे, त्यांच्यामध्ये ही भावना खोलवर रुजलेली दिसली पाहिजे. या ठरावामध्ये अधोरेखित केलेले धोरण जर जिद्दीने आणि संघटितपणे राबविले गेले, तर अशी एक परिस्थिती निर्माण होईल की जिच्यामुळे स्वतंत्र भारताची राज्यघटना बनविण्यासाठी एका घटनासमितीची निर्मिती अत्यावश्यक ठरेल."

1941

27 व 28 डिसेंबर 1941 या दिवसांत पाटणा येथे 'ऑल इंडिया स्टुडंटस् फेडरेशन'चे सातवे अधिवेशन युसुफ मेहरअलींच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आले होते. या अधिवेशनात युसुफ मेहरअलींनी गांधीजींच्या वैयक्तिक सत्याग्रहासंबंधीची समाजवाद्यांची भूमिका विद्यार्थ्यांसमोर ठेवण्याची संधी घेतली. ही सत्याग्रहाची ठिणगी फुलून तिचे रूपांतर उद्याच्या अटळ अशा राष्ट्रव्यापी लढ्यात कसे होणार आहे, याचे तर्कशुद्ध विवेचन त्यांनी या विद्यार्थ्यांसमोर केले. हा देशव्यापी संघर्ष ज्या ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या विरोधात करायचा होता, ते ब्रिटिश साम्राज्यवादी जागतिक महायुद्धात अतिशय अडचणीच्या परिस्थितीत होते. काँग्रेस संघटनेत असे

बरेचसे जहाल होते, ज्यांना ब्रिटिशांच्या युद्धप्रयत्नांत अडथळे निर्माण करणे अधिक महत्त्वाचे वाटत होते. मेहरअलींनी विद्यार्थ्यांना सांगितले की ते स्वतःही त्याच मताचे होते. पण ते तरीही वैयक्तिक सत्याग्रहात सामील झाले; आणि वैयक्तिक सत्याग्रह निष्फळ ठरला हे मानायला त्यांची तयारी नाही. लोकलढा उभारला गेला असता तर यापेक्षा अधिक यश मिळाले असते, हे त्यांनी मान्य केले; तरीही गांधीजींच्या मार्गदर्शनाखाली सुरू केलेला वैयक्तिक सत्याग्रह हाही कमी परिणामकारक नव्हता, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तीस हजार सत्याग्रहींनी वैयक्तिक सत्याग्रह करून तुरुंगवास पत्करला आणि राजकीय कोंडी फोडली; इतकेच नव्हे तर युद्धात गुंतलेल्या ब्रिटिशांशी बोलणी सुरू करावीत की नाही, हा काही काळ चाललेला वांझोटा वादविवाद त्यामुळे संपुष्टात आला आणि काँग्रेस संघटना थेट प्रतिकाराच्या मार्गावर आली. राष्ट्राची मानसिकता तडजोडवादापासून दूर होऊन प्रत्यक्ष क्रियेकडे वळली, या मुद्यावर युसुफ मेहरअलींनी भर दिला.

युसुफ मेहरअलींनी त्या विद्यार्थ्यांना असेही सांगितले की 30,000 पेक्षा अधिक सत्याग्रहींनी तुरुंगवास पत्करणे, अनेक प्रांतातील काँग्रेस मंत्रिमंडळांनी सत्याग्रह करणे, आणि शेकडो विधायकांनी आणि मंत्र्यांनीही युद्धकालात तुरुंगभरती करणे या घटनांनी जगभर एक सुस्पष्ट चित्र निर्माण केले आहे. ते असे आहे की काँग्रेसने साम्राज्यवादी युद्धसाहाय्यापासून पूर्णतया फारकत घेतली आहे; आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा प्रखर करण्याच्या उद्दिष्टापासून ही संघटना स्वतःला आता दूर ठेवू शकत नाही.

विद्यार्थ्यांनी राजकारणात भाग घ्यावा किंवा नाही, याबद्दलच्या देशभरात चाललेल्या चर्चेविषयी बोलताना मेहरअली म्हणाले, की देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवनमरणाचा लढा चालू असताना राजकारणात भाग घेणे हा विद्यार्थ्यांचा हक्क आहे. त्यांनी विद्यार्थ्यांसमोर दोन गोष्टी स्पष्टपणे ठेवल्या. पहिली म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सामील होणे; आणि दुसरी म्हणजे भारतातल्या दीर्घकाळ टिकून राहिलेल्या कालबाह्य रूढी-परंपरांचे ओझे झुगारून देणे. विद्यार्थ्यांनी जातीय प्रश्न सोडवावेत, जातिसंस्थेसारख्या दुष्ट प्रथांचे उच्चाटण करावे, अस्पृश्यांना सेवा उपलब्ध करून द्याव्यात, आणि स्त्रियांना दास्यात ठेवणारी 'पडदा' पद्धत बंद करण्यासाठी लोकजागरण करावे. हे सर्व कार्यक्रम वरवर जरी सुधारणावादी दिसत असले तरी परंपरांनी ग्रस्त अशा भारतीय समाजाचा पोत बदलण्याच्या दृष्टीने त्यांचा खोलवर परिणाम होऊ शकेल असे ते म्हणाले.

जातीय प्रश्नाचे विश्लेषण करताना मेहरअली म्हणाले की भूतकालीन राग-द्वेषाचे ओझे ज्यांच्या मानेवर नाही, असे तरुण हिंदू-मुस्लिम ऐक्याच्या संदेशाचे दूत

होऊ शकतील. समान आर्थिक प्रश्नांवर भर आणि ते सोडविण्यासाठी केलेले संघर्ष याच गोष्टी हिंदू आणि मुस्लिम यांना जवळ आणतील. तरीही हिंदू-मुस्लिम प्रश्नाचे हे अर्थशास्त्रीय पृथक्करण सोपे असल्याचा दावा मेहरअलींनी कधी केला नाही; आणि म्हणूनच हिंदू व मुस्लिम ऐक्याचा पाया वाढत्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीमुळेच पक्का होत जाईल असे युसुफ मेहरअलींनी ठाम प्रतिपादन केले.

या परिषदेत आंतरराष्ट्रीय प्रश्नांची चर्चा करताना युसुफ मेहरअलींनी ब्रिटिश पंतप्रधानांनी केलेल्या एका विधानाकडे विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. ब्रिटनचे पंतप्रधान मि.चर्चिल यांनी असे रोखठोक विधान केले होते की जरी दोस्त राष्ट्रांनी युद्ध जिंकले तरी अटलांटिक कराराच्या तरतुदी भारताला लागू होणार नाहीत. ब्रिटिश पंतप्रधानांचे हे विधान वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत, हे स्पष्टपणे दर्शविणारे ठरले.

युसुफ मेहरअलींनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय प्रश्नांमध्ये जागरूकपणे लक्ष घालण्याचे आवाहन केले आणि युवकांच्या संघटना बांधणीसाठी किमान एखादा तास द्यावा, असे सुचविले. युवक परिषदेत युसुफ मेहरअलींनी केलेल्या आवाहनामुळे सर्व वातावरणच भारल्यासारखे झाले आणि आगामी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची स्फूर्ती विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषणाने दिली.

1942

फिरोजशहा मेहता यांच्यासारख्या राष्ट्रीय पातळीच्या नेत्याचे मार्गदर्शन सुदैवाने मुंबई नगरपालिकेला सुरुवातीसच लाभले होते. त्यामुळे युसुफ मेहरअलींसारख्या लढवय्या स्वातंत्र्यसैनिकाची आणि सच्चा समाजवाद्याची निवड या संस्थेच्या प्रतिष्ठित अशा महापौरपदी झाली, याचा अनेक स्वातंत्र्यसैनिक आणि समाजवादी कार्यकर्ते यांना आनंद झाला. या तरुण समाजवादी महापौरांच्या निवडणुकीच्या वेळी एक नाट्यप्रसंग घडला. गुरुवार 2 एप्रिल 1942 या दिवशी युसुफ मेहरअलींची महापौर म्हणून निवड झाली तेव्हा सभागृह सर्व नगरसेवक आणि इतर प्रेक्षक यांनी गच्च भरले होते. तेव्हा प्रो. एस.आर.दावर यांनी महापौरांच्या निवडणुकीसंबंधात हरकतीचा मुद्दा उपस्थित करून नियमाप्रमाणे आधी तीन दिवसांची सूचना दिली नसल्याचा आक्षेप घेतला. या हरकतीला निवडणूक अधिकाऱ्यांनी असे उत्तर दिले की निवडणुकीच्या आधीचे दोन दिवस रविवार व सोमवार सुटीचे दिवस असल्याने गुरुवारी होणाऱ्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मंगळवारीच भरावे लागले; कारण सुटीच्या दिवशी अर्ज स्वीकारले जात नाहीत. निवडणूक अधिकाऱ्यांचे हे स्पष्टीकरण ऐकल्यावर वातावरणातील तणाव संपला आणि निवडणुकीचे काम संथपणे सुरू झाले. मतमोजणीनंतर मेहरअलींना 65 मते पडून ते महापौर म्हणून



युसुफ : आत्मिक आविष्काराचे वैभव




युसुफ, जयप्रकाश आणि सुभाष– उमदेपणा, चैतन्यशीलता आणि धैर्य यांचे प्रतीक.



तरुण साथी बंडू गोरे व इतर यांच्याबरोबर युसुफ.



(समाजवादी चळवळीतील) दोन वादळे– युसुफ मेहरअली आणि राममनोहर लोहिया.



सोली बाटलीवाला, युसुफ मेहरअली, मिनू मसानी आणि उपेंद्र देसाई – एकमेकांना साथ देणारे युवकांचे पथक.



युसुफच्या आयुष्यातील रंग आणि नाट्य.



कच्छमधील जनआंदोलनाच्या अग्रभागी असलेले युसुफ मेहरअली.

BRITISH "LION" TURNS A RAT

SIMON COMMISSION FLIES FROM

Bombay's Backdoor

Where is Britain's Steel frame?

Where is her proverbial courage ?

She dares not a clean fight.

Who receives the Simon Commission ?

SYCOPHANTS ! BLACKLEGS ! NONENTITIES.

BY POONA D. S. P's ORDER

Britain's Prestige is Lost

Indians, Do Your Duty

LET THE BOYCOTT BE MOST SEVERE

BOYCOTT THE COMMISSION

युसुफच्या कल्पकतेचे उदाहरण—असलेले पोस्टर



मुंबईचे महापौर युसुफ मेहरअली 1942 साली अ.भा.कॉंग्रेस अधिवेशनासाठी आलेल्या गांधींचे स्वागत करताना.



जयप्रकाश, अशोक मेहता, मेहरअली – स्वतंत्र आणि लोकशाहीवादी कामगार चळवळीचे उद्घाटन करताना.



आर. ए. खेडगीकर, मो. वा. दोंदे, युसुफ मेहरअली, ना. म. जोशी, आर. एस. रूईकर आणि मणिबेन कारा – कामगार चळवळीतील दिग्गजांची भेट.



लंडनमध्ये अरुणा असफअली आणि इतरांबरोबर.



मुंबईत 'चेतना'मध्ये 'नॅशनल एक्झिबिशन'च्या उद्घाटनाच्या वेळी प्रख्यात वादक अल्लादियाँ खान यांच्याबरोबर प्रदर्शक युसुफ.



लंडनहून बोटीने परत आलेल्या युसुफच्या स्वागतासाठी बॅलार्ड पिअरवर जमलेलं कमलादेवी चट्टोपाध्याय, अच्युत पटवर्धन, मिनू मसानी, मोइउद्दीन हॅरिस, आणि इतर.

पडून ते महापौर म्हणून निवडून आल्याचे जाहीर झाले. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवारांना अनुक्रमे 26 व 9 मते मिळाली.

महापौर म्हणून निवडून आल्यावर युसुफ मेहरअलींनी महापालिका सदस्यांना उद्देशून एक भाषण केले. त्याची पार्श्वभूमी भारताच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेल्या जागतिक महायुद्धाच्या संकटाची होती. भाषणात युसुफ मेहरअली म्हणाले :

"आमच्या देशाच्या आणि जगाच्या इतिहासातील या आपत्तीच्या काळात आपण माझी निवड या उच्च पदासाठी केली, याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. तुम्ही माझा केवढा सन्मान केला आहे याची मला जाणीव आहे. म्हणून त्याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. पण आजचा प्रसंग हा केवळ आनंद साजरा करण्याचा नाही; कारण इतिहास आपल्या दारावर धडका देत आहे. आपले शहर हे आताच्या क्षणी ताबडतोबीच्या धोक्यात नसले तरी ते तसे कधीही येऊ शकते. अनुभव असे सांगतो की खऱ्या किंवा संभाव्य धोक्याच्या प्रत्यक्ष घटनेपेक्षा त्या धोक्याच्या केवळ कल्पनेने होणारी घबराट ही जास्त हानिकारक आणि जखमा करणारी असते. मुंबईचे नागरिक नेहमीच आमच्याकडे मोठ्या आशेने मार्गदर्शनाकरता पाहतात. पण जेव्हा जगाच्या एका फार मोठ्या भागात तणाव, समस्या आणि अस्थिरता ही अपवादात्मक अवस्था नसून नेहमीची स्थिती बनली आहे; व त्या अस्थिरतेची कालमर्यादा त्यांना समजू शकत नाही, अशा परिस्थितीत आमच्या तुलनात्मक सुरक्षेलाही त्या कठीण आणि गुंतागुंतीच्या प्रश्नांकडून आव्हानच मिळत जाणार. म्हणून जे खरोखरच खूप संकटात आहेत, अशा नागरिकांकडे आपले विचार, लक्ष आणि सेवा प्रसारित करणेच उचित आहे.

"मित्रांनो, मी काँग्रेसचा एक सेवक आहे आणि त्याचबरोबर एक समाजवादी आहे, याची पूर्ण जाणीव असताना तुम्ही मला या पदावर निवडून दिले आहे. माझ्या वर्षभराच्या कारकिर्दीत ज्या गोष्टींशी मी इथे संबंधित आहे, त्या सर्व जबाबदाऱ्या मी नीट पार पाडीनच. पण मी तुम्हांला हेही अभिवचन देतो की जोपर्यंत तुमच्या सहकार्याने मी या पदावर आहे तोपर्यंत या सदनाचे हक्क आणि विशेषाधिकार यांच्यावर बाहेरून होणाऱ्या कोणत्याही शक्तींच्या आक्रमणाला मी निकराचा विरोध करीत राहीन. या सभागृहाच्या सदस्यांनी माझ्यावर भरंवसा टाकण्यास हरकत नाही की येथील कामकाज चालवताना निर्णयासाठी समोर येणाऱ्या घटनांचा या आसनाच्या दीर्घकालीन आणि संस्मरणीय परंपरांना जागून निःपक्षपाती न्यायनिवाडा केला जाईल. त्या परंपरा व काँग्रेस म्युनिसिपल पार्टीबरोबरचा माझा अविस्मरणीय कालखंड यांचा मला अभिमान वाटतो.

"सहकार्यासाठी माझी केवळ या सभागृहातील सहकाऱ्यांच्याकडेच दृष्टी आहे असे नाही; महापालिकेच्या अनेक खात्यांच्या प्रमुखांकडून माझी सहकार्याची अपेक्षा आहे. त्यांच्या कष्टजनक आणि कंटाळवाण्या कर्तव्याच्या न्याय्य परिपूर्तीसाठी त्यांनी माझ्यावर विसंबून राहण्यास हरकत नाही. मी लाल फितीच्या– दिरंगाईच्या– कारभाराचा आणि अकार्यक्षमतेचा सक्त विरोधक आहे. जिथे या गोष्टी आढळतील तिथे या पदाचे अधिकार वापरून भीती किंवा मर्जी आड येऊ न देता जी कारवाई योग्य असेल ती मी करीन. अर्थातच या सर्व गोष्टींमध्ये मी लोकांचे सहकार्य अपेक्षित धरतो. त्यांनी माझ्या दृष्टीला अशा प्रकारच्या बेकायदेशीर घटना आणाव्यात. तुम्ही माझा जो काही सन्मान केला आहे त्याबद्दल तुमचे पुन्हा एकदा आभार."

महापौरपदासाठी मेहरअलींनी दिलेल्या लढतीला त्यांच्या बाजूनेही नाट्यपूर्ण पार्श्वभूमी होती. महापौर म्हणून त्यांच्या नावाची नियुक्ती झाली, तेव्हा ते लाहोर तुरुंगात स्थानबद्ध होते. काँग्रेसचे काही जुने नेते त्यांच्या ठाम विरोधात होते. त्यांना महापौरपदासाठी मेहरअलींचे नाव पसंत नव्हते; पण सरदार पटेल यांनी आपले सर्व वजन युसुफ मेहरअलींच्या पारड्यात टाकले. महापौरपदाच्या लढतीत त्यांना भाग घेता यावा म्हणून ब्रिटिश सरकारनेही त्यांना मुक्त केले. अशा तऱ्हेने युसुफ मेहरअलींचा तुरुंगापासून महापौरपदापर्यंत झालेला प्रवास एकप्रकारे अपूर्वच म्हटला पाहिजे.

युसुफ मेहरअली हे पहिले समाजवादी महापौर होते. त्यांची कारकीर्द पाहिली म्हणजे जाणवते ते हे, की महापौर झाल्यानंतर त्यांनी सभागृहासमोर जे भाषण केले त्यातील शब्दन्‌शब्द त्यांनी पाळला. महानगरपालिकेचे कामकाज त्यांनी अतिशय प्रतिष्ठापूर्वक आणि सदभिरुचीपूर्ण पद्धतीने न्याय्य कसोट्यांवर चालविले.

मुंबईचे महापौर म्हणून मुंबईच्या नागरिकांचे संरक्षण त्यांनी केवळ ब्रिटिश सरकारच्या दयेवर न सोडता नागरी संघटनेतर्फे त्यांनी एक स्वयंसेवकांचे पथक (पीपल्स व्हॉलंटरी ब्रिगेड) मुंबईच्या नागरिकांच्या संरक्षणासाठी उभारले.

महापौरपदासारखे सन्माननीय पद प्राप्त झालेले असूनही त्याचा डामडौल आणि प्रतिष्ठा समाजवादी युसुफ मेहरअलींनी आपल्या समानतेच्या तत्त्वाआड येऊ दिली नाही.

एकदा युसुफ मेहरअलींना मुंबईच्या गव्हर्नरांकडून रात्री भोजनासाठी राजभवनावर आमंत्रित केलेले होते; तेव्हा त्यांनी ते आमंत्रण स्वीकारले. पण त्याबरोबर ही अटसुद्धा मान्य करून घेतली की त्यांच्या गाडीचा शोफरसुद्धा त्यांच्याबरोबर जेवणासाठी हजर राहील.

लोकशाही समाजवादी या भूमिकेतून मेहरअलींना राजकीय शिक्षणाचे महत्त्व फारच वाटत होते; त्याचप्रमाणे लोकमत जागृत करण्यावरही त्यांचा भर होता. यासाठी 1942 साली त्यांनी 'पद्मा पब्लिकेशन्स'ची सुरुवात केली होती. घडामोडींनी भरलेल्या या महत्त्वपूर्ण वर्षात 'पद्मा पब्लिकेशन्स'चे संपादकपद पत्करून पहिली दोन प्रकाशने– कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे 'युद्धग्रस्त चीनमध्ये' हे व 'भारताचे नेते' या मेहरअली लिखित ग्रंथाचा पहिला खंड– बाहेर पडली. त्यांचे वृत्तपत्रे आणि जनता या दोघांनीही औत्सुक्याने स्वागत केले.

गांधीजींच्या आशीर्वादाने 1942 च्या ऑगस्ट क्रांतीच्या संध्येला युसुफ मेहरअलींच्या 'पद्मा पब्लिकेशन्स' या प्रकाशन संस्थेने 'क्विट इंडिया' (भारतातून चालते व्हा) या मथळ्याचे एक छोटे पुस्तक प्रकाशित केले. चार आठवड्यांच्या अल्पावधीतच या पुस्तकाच्या सहा आवृत्त्या काढाव्या लागल्या; आणि एवढी तुफान विक्री होऊनही भारताच्या इतर सर्व भागांतून या पुस्तकासाठी येणारी मागणी वाढतच राहिली. या पुस्तकाला लाभलेले अद्वितीय यश पाहून सर्वाधिकारी नोकरशाहीची चलबिचल झाली, यात नवल नाही. त्यांनी त्या पुस्तकावर बंदी आणली. पण या सर्व घटनांमुळे 'पद्मा पब्लिकेशन्स'ची प्रसिद्धी वाढण्यास मोठीच मदत झाली.

ऑगस्ट 1942 मध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अधिवेशन मुंबईत भरले. 8 ऑगस्टला 'चले जाव' हा ठराव या अधिवेशनाने मंजूर केला आणि सर्व समाजवाद्यांनी या ठरावाला जोरदार पाठिंबा दिला. त्याआधी युसुफ मेहरअलींनी देशभर दौरा करून ब्रिटिश साम्राज्यावरील हा शेवटचा प्रहार करण्यासाठी जनतेने– विशेषतः तरुणांनी सज्ज राहावे यासाठी आकाश पाताळ एक केले. या ऐतिहासिक अधिवेशनासाठी गांधीजी जेव्हा मुंबईत आले तेव्हा मुंबईचे महापौर म्हणून त्यांचे स्वागत करण्याचा मान युसुफ मेहरअलींना मिळाला.

चौपाटीवर टिळकांच्या स्मृतिदिनानिमित्त 1 ऑगस्ट 1942 रोजी जाहीर सभेत बोलताना शेवटच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी तयार रहा, असे जाहीर आवाहन युसुफ मेहरअलींनी केले. लढ्याचा तपशील सांगताना युसुफ मेहरअली म्हणाले, की हा लढा म्हणजे फक्त जेल भरतीच्या स्वरूपात राहणार नाही; हिंदुस्थानातील ब्रिटिश राजवट संपुष्टात आणणारे ते अखेरचे बंड असेल. काँग्रेसच्या 1942 च्या ऐतिहासिक अधिवेशनापूर्वी युसुफ मेहरअलींनी समाजवादी कार्यकर्त्यांच्या असंख्य सभा घेतल्या. महात्मा गांधी आणि इतर मोठ्या काँग्रेसनेत्यांना अटक झाली तर ती चळवळ चालविण्यासाठी भूमिगत हालचाली कशाप्रकारे चालविता येतील. याविषयीचे तंत्र या सभांमध्ये प्रसारित करण्यात आले. गांधीजींना व इतर नेत्यांना 1942 च्या

अधिवेशनानंतर लगेच अटक झाली. त्यानंतरही ब्रिटिश राजवटीविरुद्ध प्रतिकाराची जी चळवळ चालू राहिली त्याचे श्रेय युसुफ मेहरअलींकडेच जाते; कारण त्यांनी कितीतरी आधी प्रतिकारासाठी भूमिगत चळवळ संघटित करण्याचे समाजवादी कार्यकर्त्यांना आदेश दिले होते. 9 ऑगस्टच्या पहाटे हे समाजवादी तरुण बेसावध अवस्थेत पोलिसांना न सापडण्याचे कारण केवळ युसुफ मेहरअली होते. भूमिगत समाजवादी नेत्यांनी चळवळ पुढे चालवली. पण युसुफ मेहरअली मात्र अटक टाळू शकले नाहीत; त्यातून त्यांचा हृदयविकार बळावतच गेला. तरीही त्यांच्यामधली इर्ष्या आणि चैतन्य हे अदम्यच राहिले.

1947

1942 च्या चळवळीत अनेक समाजवादी भूमिगत आंदोलनातून राष्ट्रीय नेते म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांनी सोशलिस्ट पार्टी संघटित करण्याचा निर्णय घेतला. पण साधनसामग्रीविना कोणतेही आंदोलन उभे राहू शकत नाही. समाजवादी चळवळीसाठी ही साधनसामग्री– म्हणजेच पैसा– गोळा करण्यासाठी 'समाजवादी भारताच्या उभारणीला साहाय्य करा' असे आवाहन प्रमुख समाजवादी नेत्यांच्या सह्यांनी प्रसृत करण्यात आले.

युसुफ मेहरअलींनी आपल्या समाजवादी मित्रांसह आवाहन करून सही केलेले बहुतेक हे शेवटचे पत्रक असावे. हे आवाहन खालीलप्रमाणे होते :

मित्रांनो,

आपण स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर उभे आहोत. 15 ऑगस्टला आपला देश प्रथम वासहातिक स्वराज्य मिळवून, नंतर एक स्वतंत्र प्रजासत्ताक बनणार आहे. अनेक पिढ्यांचे कष्ट व त्याग आता फळाला आले आहेत. अर्थात हे फळ दुःख आणि वेदना यांनी कडू झालेले आहे. भारताच्या भूमीचा काही भाग मातृभूमीपासून अलग केला गेला आहे. ब्रिटिश सरकारचे दीडशे वर्षांचे 'फोडा आणि राज्य करा' हे धोरण आणि आमच्या राष्ट्रीय जीवनातील काही दोष या दुर्दैवी घटनेला जबाबदार आहेत. संताप आणि विद्वेष यांच्यामुळे एकमेकांपासून अलग झालेले हे दोन प्रदेश जोपर्यंत स्नेह आणि ऐक्याच्या भावनेतून परत जोडले जात नाहीत तोपर्यंत भारताचे स्वातंत्र्य अपुरे आहे आणि भवितव्य धूसर आहे.

आमचा विश्वास आहे की समाजवाद हीच अशी एक ताकद आहे की जी देशाच्या या दोन खंडांना कायम एकत्रित ठेवू शकेल.

आम्ही मिळविलेले स्वातंत्र्य जोपर्यंत जनतेला भूक, सामाजिक दबाव आणि आर्थिक शोषण यांच्यापासून मुक्ती देऊ शकत नाही, तोपर्यंत ते सर्वांना निरर्थकच

वाटत राहणार. हे स्वातंत्र्य चिरकाल टिकण्यासाठी लवकरात लवकर समाजपरिवर्तन होणे जरूरीचे आहे. अशा प्रकारच्या नव्या समाजव्यवस्थेत कोणी भिकारी नसेल किंवा राजाही नसेल; उच्च-नीच जाती नसतील; आणि व्यक्तीचे शोषणही नसेल. या समाजात सर्वांना सेवा, स्वयं अभिव्यक्ती, आणि विकास यांच्यासाठी संधी उपलब्ध असतील.

केवळ समाजवादच या सामाजिक न्यायाच्या आणि स्वातंत्र्याच्या उद्दिष्टांकडे आपल्याला पोहोचवू शकेल यांची आम्हांला खात्री वाटते.

आपला देश जगातील अतिगरीब देशांपैकी आहे. आणि बहुतेक लोक अभावग्रस्त आणि दरिद्री आहेत. या दारिद्याचे आणि अभावग्रस्ततेचे निर्मूलन हे जलद आर्थिक विकास, औद्योगिकीकरण, आणि शेतीव्यवसायाचे पुनरुज्जीवन यांवर अवलंबून आहे.

आमचा असा विश्वास आहे की अर्थव्यवस्थेचे नियोजन करणारी समाजवादी व्यवस्थाच या देशाचा आर्थिक विकास जलद घडवून आणू शकेल.

शेवटी या गोष्टीचा उल्लेख केलाच पाहिजे की सांस्कृतिकदृष्ट्या आपण फारच मागासलेले लोक आहोत. आमचा असा विश्वास आहे की समाजवादच फक्त लोकसंस्कृती निर्माण करील आणि जनावराच्या पातळीवर जगणाऱ्या सर्वसामान्य माणसाला मानवी दर्जा मिळवून देईल.

अशाप्रकारे भारताचे भवितव्य हे समाजवादाशी निगडीत आहे, अशी श्रद्धा बाळगून आम्ही समाजवादी पक्षाच्या वतीने आमच्या सर्व देशबांधवांना, जे देशाच्या भवितव्याबाबत आमच्याशी सहमत आहेत त्यांना, असे कळकळीचे आवाहन करीत आहोत की स्वतंत्र, समृद्ध आणि संघटित भारत उभारण्यासाठी त्यांनी आम्हांला साहाय्य करावे.

समाजवादी भारताची उभारणी एका दिवसात होणार नाही. त्यासाठी अनेक प्रकारची कामे कष्टपूर्वक, सातत्याने आणि विधायक दृष्टीतून पार पाडावी लागतील. समाजवादी पक्ष हे काम करू इच्छितो. पण तुम्ही पक्षाला ही साधने पुरविली पाहिजेत. आतापर्यंत झालेले काम क्षुल्लक नाही; पण जलद बदल आणि परिवर्तन आता अपेक्षित असल्यामुळे हे काम लवकर व सर्व दिशांनी वाढले पाहिजे. सोशलिस्ट पार्टी या कामासाठी निष्ठावान पूर्णवेळ कार्यकर्त्यांना पक्षात दाखल करून घेऊन प्रशिक्षित करू इच्छिते. पक्षाला एका भक्कम आणि ताकदवान कामगार चळवळीची बांधणी करावयाची आहे. आणि खरोखरीचा समाजवाद आणण्यासाठी म्हणजेच कामगारांची लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी सोशलिस्ट पार्टीने कामगारांसाठी शैक्षणिक कार्यक्रमही हाती घेतला पाहिजे; कारण सांस्कृतिक दर्जा

वाढविल्याशिवाय आणि राजकीय परिपक्वतेशिवाय कामगारांची लोकशाही हे मृगजळच ठरेल. याशिवाय शेतकरी व भूमिहीन शेतमजूर यांच्या संघटनाही सोशलिस्ट पार्टी बांधू इच्छिते. सर्वार्थाने सहकार्यावर आधारलेली सहकारी चळवळ पक्षाला उभारायची आहे. शेवटी पक्षाला अभ्यासकेंद्रे, संशोधनकेंद्रे निर्माण करून आपला वैचारिक पाया निर्माण करायचा आहे. स्वतंत्र साहित्य, समाजवादी समाजरचनेचा आराखडा यांची निर्मिती करून समाजवादाचा प्रचार व प्रसिद्धी करण्याचे पक्षाचे उद्दिष्ट आहे.

या भव्य कार्यासाठी, त्याच्या पूर्ततेसाठी विश्वास आणि निष्ठा यांची आवश्यकता तर आहेच; शिवाय त्यासाठी अर्थसाहाय्यही लागणार आहे. अगदीच किमान गणना केली तरी या प्रकल्पासाठी सुरुवातीला दहा लाख रुपयांची गरज आहे. पक्षाचे केंद्रात आणि विविध प्रांतांत जे सर्वसाधारण काम चालू आहे त्याशिवाय आमच्यासमोर तीन विशेष योजना आहेत. पहिली योजना कामगार चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी (लेबर कॉलेजेस) श्रमिक महाविद्यालयांची स्थापना; दुसरी कार्यकर्त्यांच्या शिक्षणाची चळवळ चालवून श्रमिकांना आवश्यक असलेले प्रशिक्षण– दृक्‌माध्यम व व्याख्याने यांच्याद्वारे देणे, व प्रौढ शिक्षणासाठी त्यांना तयार करणे; आणि तिसरी व महत्त्वाची योजना म्हणजे सामाजिक आणि आर्थिक घटकांचे संशोधन करणारी संस्था निर्माण करून त्यामध्ये तज्ज्ञ आणि संशोधक यांची नेमणूक आणि समृद्ध ग्रंथालयाची निर्मिती करणे.

हे सर्व काम हाती घेण्यासाठी वास्तविक दहा लाख रुपये ही रक्कम अपुरी आहे पण सुरुवातीसाठी आम्ही हे पैसे आपल्याकडे एवढ्याच आशेने मागत आहोत, की आपण दिलेल्या आधाराने सोशलिस्ट पार्टीने कामे सुरू केली, म्हणजे पुढच्या कामासाठी आपले आणखी साहाय्य मागण्यास आम्ही पात्र ठरू.

आपल्यापैकी प्रत्येकजणाकडून आपल्या कुवतीनुसार आपल्यासमोर ठेवलेल्या या उदात्त कार्यासाठी साहाय्य मिळेल, अशी आशा आहे. आपली मदत आणि सहकार्य यांच्यामुळे सोशलिस्ट पार्टी स्वातंत्र्य, समृद्धी, सुखी आणि चांगले जीवन या देशाला देऊन नवनिर्माण करील ही आम्हांला आशा वाटते.

नरेंद्र देव	पुरुषोत्तम त्रिकमदास
कमलादेवी चट्टोपाध्याय	अहमद दिन
युसुफ मेहरअली	अशोक मेहता
अरुणा असफअली	अच्युत पटवर्धन
राममनोहर लोहिया	जयप्रकाश नारायण
	7 ऑगस्ट 1947

युसुफ मेहरअलींनी आपले जीवन समाजवादी तत्त्वज्ञानाला समर्पित केले होते. त्यांच्या समाजवादाला मानवी चेहरा होता. मेहरअलींच्या स्मृती जागत्या ठेवण्यासाठी मुंबईत युसुफ मेहरअली सेंटर सुरू करण्यात आले. त्यावेळी भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. झाकिर हुसेन यांनी मेहरअलींच्या समाजवादातील मानवी आणि नैतिक मूल्यांचा शोध घेतला, जी मेहरअलींकडून आचरणात येत होती आणि इतरांना सांगितली जात होती. डॉ. झाकिर हुसेन म्हणाले :

> "युसुफ एकदा आपल्या मित्रांना म्हणाले होते, 'मी कुरूपता आणि क्रूरता यांचा द्वेष्टा आहे आणि म्हणून मी समाजवादी आहे. माझा समाजवाद हा सौंदर्यवादी आणि नैतिक मूल्यांवर आधारलेला आहे, फक्त अर्थशास्त्रावर नाही.' मेहरअलींचे हे उद्‌गार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या दुसऱ्या एका आणि अत्यंत सुंदर बाजूवर प्रकाश टाकतात. माणसामाणसांत जाणता अजाणता होणारे कलह आणि त्यामुळे त्यांना होणारे दुःख, ही माणसाची सनातन वेदना त्यांना अस्वस्थ करीत असे; औद्योगिक आणि आर्थिक व्यवस्थेची कार्यक्षम व उपयुक्त पुनर्रचना ही कल्पना त्यांच्या अस्वस्थतेमागे नव्हती. या दुःखाने त्यांना तत्त्वज्ञानी अगर धार्मिक किंवा कवी बनवले असते. पण युसुफ मेहरअली अधिक सुदैवी होते. त्या अस्वस्थतेने त्यांना एक उत्तम मित्र बनवले."

डॉ. झाकिर हुसेन यांनी मेहरअलींबद्दल सत्य आणि सौंदर्य या संदर्भात जे उद्‌गार काढले आहेत, त्यापेक्षा अधिक उचित शब्दांत मेहरअलींच्या समाजवादी निष्ठा आणि विश्वास यांच्याबद्दल काय सांगता येईल?

पाच

राजेशाही संस्थानामधील उठाव

"ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिलेल्या संस्थानिकांना ब्रिटिशांनी त्यांची संस्थाने कायम ठेवण्याची मुभा दिली ती बंड करून उठलेल्या राष्ट्राशी त्यांनी द्रोह केला याची बिदागी म्हणूनच."

– आचार्य जे. बी. कृपलानी

कच्छ हे भारताच्या पश्चिम भागातील एक एतद्देशीय संस्थान. आता ते गुजरातचा एक भाग झाले आहे. त्याचे क्षेत्रफळ 6500 चौरस मैल असून किनारपट्टी 150 मैल लांबीची आहे. युसुफ मेहरअलींचे आजोबा हे कच्छमधील एक प्रसिद्ध व्यापारी होते. अनेक व्यक्ती आणि संस्था यांना जातीपातीचा विचार न करता ते दानशूरपणे मदत करीत. युसुफ मेहरअलींनी कच्छसंबंधीच्या आपल्या एका टिपणात म्हटले आहे :

1. सोळाव्या किंवा सतराव्या शतकात हिंदुस्थानातील परिस्थिती काय होती, याची कल्पना कच्छमधील परिस्थितीवरून येऊ शकते.
2. या विमानयुगात या प्रदेशात रेल्वे किंवा मोटारींचे रस्ते तर राहू द्यातच, पण चांगले बैलगाडीचे रस्तेही नाहीत.
3. कच्छमध्ये फक्त तीन माध्यमिक शाळा आहेत. एकही कॉलेज नाही.

बरीच वर्षे कच्छमध्ये कायद्याचे राज्य नव्हते. राजा आणि त्याचे जुलमी सरदार यांची जनतेवर दहशत होती. 1926 मध्ये 'कच्छी प्रजाकीय परिषद' स्थापन झाल्यानंतर जनतेमध्ये जागृती घडवून आणण्याचे प्रयत्न चालू झाले. 1936 मध्ये परिषदेच्या झालेल्या अधिवेशनाला युसुफ मेहरअली हजर राहिले. त्यांच्या स्फूर्तिदायक वक्तव्याची तरुणांवर मोठी छाप पडली. 1938 साली 'कच्छी प्रजाकीय परिषदे'च्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली.

26 ते 28 डिसेंबर 1938 या तारखांना मुंदडा येथे संस्थेचे वार्षिक अधिवेशन भरवण्यात आले. असंख्य किसान, स्त्रिया व तरुण बहुसंख्येने या

अधिवेशनाला उपस्थित राहिल्यामुळे अधिवेशन उत्साहाच्या वातावरणात यशस्वी रीतीने पार पडले.

समाजातील सर्व थरांतील लोकांना हालवून सोडण्याचे कौशल्य मेहरअलींकडे होते. अधिवेशनाच्या वेळी त्यांनी देशातील राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला आणि असे जाहीर केले की जनता आता जागृत झालेली आहे. सायमन कमिशनवर घातलेला बहिष्कार, संपूर्ण स्वातंत्र्याचा काँग्रेसने केलेला ठराव आणि सार्वत्रिक असहकाराची चळवळ या घटनांमुळे देशातील जनतेची उदासीनता नाहीशी झाली आहे. मनःस्थिती बदलली आहे. लोकांमध्ये आत्मविश्वासाची भावना वाढीला लागली आहे. जरी ब्रिटिश सरकारने काँग्रेस संघटनेवर बंदी आणली असली, तरी मोठ्या संख्येने स्त्री-पुरुष आणि मुलेसुद्धा बंदीहुकूम तोडून तुरुंगवास पत्करत आहेत. जनतेला फार काळपर्यंत दडपून टाकता येणार नाही, हेच त्यातून सिद्ध झाले आहे. देशातील अनेक संस्थानांमधून 'जबाबदार सरकारांसाठी' लढे सुरू झाले आहेत आणि काहींमध्ये लढे सुरू होण्याच्या मार्गावर आहेत; कोणत्याही दिवशी तिथे ते सुरू होतील. मेहरअलींनी असे आवाहन केले, की या परिषदेने डझनभर ठराव अधिवेशनासमोर आणण्याऐवजी एकच ठराव संमत करावा. या ठरावान्वये कच्छच्या राजासमोर 'जबाबदार सरकार'च्या प्रस्थापनेचा प्रस्ताव मांडावा आणि तीन महिन्यांच्या आत राजाने अशा जबाबदार सरकारच्या स्थापनेचे जाहीर आश्वासन द्यावे; नाहीतर कच्छच्या जनतेला सत्याग्रहाचे अस्त्र उगारावे लागेल, असाही इशारा द्यावा. परिषदेला बळकटी आणण्यासाठी निधी जमवण्याचे आवाहनही मेहरअलींनी केले. तेव्हा संमेलनात तात्काळ 1,00,000 'कौडीं'पेक्षा अधिक रक्कम जमा झाली.

जन्मतःच नेतृत्वाचे गुण लाभलेल्या मेहरअलींनी किसान, युवक आणि महिला यांच्या स्वतंत्र सभा आयोजित केल्या. या सभांमध्ये सत्याग्रहासाठी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले. त्यांच्या भाषणांमुळे वातावरणच जणू विजेने भारल्यासारखे झाले. आणि सर्वत्र उत्साहाचा पूर लोटला.

युसुफ मेहरअली आणि कच्छचे राजे यांची भेट झाली व त्यात त्यांनी परिषदेने केलेल्या मागण्यांवर चर्चा केली. मेहरअलींनी 'जबाबदार सरकार'चा अर्थ राजाला समजावून सांगितला.

1. अ) भाषणस्वातंत्र्य, ब) वृत्तपत्र स्वातंत्र्य, क) संघटनेचे स्वातंत्र्य.
2. राज्यकारभार चालविण्यासाठी विधिमंडळाची निवड.
3. विधिमंडळ सदस्यांकडून जबाबदार कार्यकारी मंडळाची निवड.
4. राजघराण्याचा तनखा राज्याच्या एकूण वसुलीच्या 10% पेक्षा अधिक नसावा.

वरील मागण्यांखेरीज आणखी काही सूचना अगर दुरुस्त्या असतील तर राजाने त्या अवश्य सुचवाव्यात, परिषद त्यांचा जरूर विचार करील असेही मेहरअलींनी सांगितले.

कच्छ संस्थानाच्या राजाने या मागण्यांना काहीच प्रतिसाद दिला नाही. म्हणून मेहरअलींनी राजाला इशारा दिला की 31 मार्च 1939 पर्यंत राज्यात 'जबाबदार सरकार' जाहीर झाले नाही, तर संपूर्ण कच्छमध्ये असहकाराची चळवळ सुरू करण्यासाठी ते स्वतः शांततामय सत्याग्रह चालू करतील. मेहरअली व त्यांचे सहकारी यांनी लोकांना संघटित करण्यास सुरुवात केली होतीच. त्यांना सक्रिय बनविण्यासाठी शेतकऱ्यांचे संघटन, हिंदू-मुस्लिम ऐक्य, खादी प्रसार, दारू दुकानांसमोर निदर्शने यांसारखे विधायक उपक्रम सुरू करण्यात आले. मेहरअली जिथे जिथे गेले, तिथे तिथे त्यांनी युवकांच्या जातीय संघटनांना विरोध केला. जातीय ऐक्यावर सातत्याने भर देणे जरूर आहे; कारण लढ्याच्या यशासाठी ते अत्यावश्यक आहे, असे मेहरअलींचे प्रतिपादन होते. प्रत्येक गावातील सामाजिक-आर्थिक परिस्थितीची संपूर्ण माहिती गोळा करण्याचा आदेश त्यांनी युवकांना दिला. या माहितीमुळे त्यांच्या मागासलेपणाची जाणीव त्यांना होईल आणि जबाबदार सरकारची प्रस्थापना लोकांना नव्या युगाची प्रभात दाखवून देईल, असे मेहरअलींनी कार्यकर्त्यांना सांगितले. समाजवादाच्या धड्यांना मेहरअलींनी अशी मुळापासून सुरुवात केली.

मुंबईत मोठ्या संख्येने कच्छी लोकांची वस्ती होती आणि त्यांच्याकडे मेहरअलींचे लक्ष होतेच. अनेक सभांमध्ये भाषणे करून त्यांनी लोकांना कृतीसाठी प्रोत्साहित केले. कच्छमध्ये सत्याग्रहाला जाणाऱ्या स्वयंसेवक तुकड्या त्यांतून तयार झाल्या. निधी जमा करणाऱ्या समित्याही संघटित करण्यात आल्या. कच्छ संस्थानातील लढ्याला पाठिंबा देण्यासाठी मेहरअलींनी काँग्रेस अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांची मुंबईत एक जाहीर सभाही आयोजित केली.

लढ्यामध्ये आणखी चैतन्य आणण्यासाठी मेहरअलींनी कच्छमधील महिलांची एक सभा प्रेमला ठाकरसी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली. युवकांच्या परिषदेत नरभेराम पोपट अध्यक्ष होते. या दोनही व्यक्ती कच्छी समाजातीलच होत्या.

जागृत झालेल्या जनतेवर कच्छ नरेशांनी दडपशाहीचे प्रयोग करून लोकांना नमविण्याचा प्रयत्न केला. पण जनतेचे नीतिधैर्य उंचावले होते. जुलूम-जबरदस्तीचा निषेध करण्यासाठी लोक रस्त्यावर आले; सत्याग्रह करून तुरुंगात जाऊ लागले. 'कच्छ प्रजाकीय परिषदे'चे कार्यकारी मंडळाचे सदस्य वेलजी ठाकरसी यांना अटक झाल्यानंतर काढलेल्या पत्रकात मेहरअली म्हणतात :

"कच्छच्या इतिहासात प्रथमच तेथील जुन्या पुराण्या दंडसंहितेला नव्यानेच जोडलेल्या राजद्रोहाच्या कलमाचा उपयोग व्यवहारात करण्यात आला. त्याचा उपयोग अशासाठी करण्यात आला, की लोकांच्यामधील उत्साहाला भरते आलेले पाहून अधिकारी आधीच बेचैन झाले. मी या अटकेचे (वेलजी ठाकरसी यांच्या) स्वागत करतो. आता त्यांच्यामागून असंख्य लोक जातील, अशी मला आशा आहे. लोक सत्याग्रहासाठी सज्ज आहेत. सत्याग्रही म्हणून शेकडोंची नोंदणी झालेली आहे. दिवसातून दोनदा तुरुंगभरती होईल, एवढी ही संख्या आहे.

दडपशाही हीच क्रांतीची सुरुवात असते. अलीकडच्या काही वर्षांतील भारताचा रोकडा अनुभव असा आहे की जनतेच्या निश्चयापुढे सर्व दमनयंत्रणा लुळी पडते. तिचा उपयोग होत नाही. कालचे पिंजऱ्यातले पक्षी आजचे मंत्री-राज्यकर्ते बनले आहेत. राजकोटची कथा आज सर्वांच्या मनात ताजी आहे आणि राजकोटने दाखविलेल्या मार्गाने आता कच्छ चाललेले आहे; म्हणून कच्छच्या लोकांना माझी विनंती आहे की त्यांनी शांतता राखून पुढील भव्य संग्रामासाठी तयार व्हावे."

22 मार्च 1929 ला गांधीजींनी सर्व देशी संस्थानांतील सत्याग्रह तहकूब केल्याचे जाहीर केले. त्यांचा आदेश कच्छ प्रजाकीय परिषदेने पाळला आणि चळवळ मागे घेतली.

तीन-चार महिन्यांच्या छोट्याशा रजेनंतर मेहरअलींनी आपल्या सघटनात्मक कौशल्याने पुन्हा कच्छमधील दडपल्या गेलेल्या जनतेमध्ये चैतन्य निर्माण केले. आणि त्यांना लोकशाही हक्कांच्या लढ्यासाठी सिद्ध केले. कच्छ लढ्याने मेहरअलींमधल्या ज्वलंत नेतृत्वगुणांची साक्ष दिली.

संस्थानातील सत्याग्रह लढ्यांना गांधीजींनी जी स्थगिती दिली त्यामुळे सुरक्षा लाभलेल्या संस्थानिकांना ती 'माघार' म्हणजे जनतेच्या दौर्बल्याची खूण वाटू लागली. कच्छही या नियमाला अपवाद नव्हते. मेहरअलींच्या गैरहजेरीत परिषद कार्यकर्त्यांवर अमानुष हल्ले करण्यात आले. कच्छमधील सरंजामी जमीनदारीचे भूतकालीन अवशेष गिरासियांच्या रूपाने अस्तित्वात होते. हे गिरासिया स्वतः कफल्लक बनलेले असले तरी पण त्यांना त्यांची प्राचीन प्रतिष्ठा आणि वारसा यांच्यामुळे येणारी खुमखुमी होतीच. पिसाळलेल्या गिरासियांना पुढे करून परिषदेच्या शांततापूर्ण चळवळीवर आघात करण्यात आले. प्रत्यक्षात सरकार स्वस्थ बसलेले नव्हतेच. जनतेचे संरक्षण, भाषणस्वातंत्र्याचे रक्षण करण्यातील त्याचे

अपयश आणि संघटनेच्या स्वातंत्र्यावर आलेली गदा यांमुळे या अप्रतिष्ठित आणि निर्लज्ज परिस्थितीला संस्थानचे सरकारच जबाबदार आहे, हा संशय दृढ झाला.

मेहरअली कच्छमध्ये परत गेले तेव्हा वातावरण विषण्ण होते. लोकांमध्ये मोठी चलबिचल होती. युगायुगांच्या दडपणाखालून मुक्त होण्यासाठी लवकरच मुक्तिलढा सुरू करण्याविषयीच्या त्यांच्या ज्या आकांक्षा होत्या त्यांना बाधा आली होती; त्यामुळे उदासीनता वाढली होती. 'राजकोट-प्रयोग' हळूहळू पुढे सरकत होता. पण लोकांच्या नीतिधैर्यावरील त्याचा परिणाम त्यांना संवेदनाहीन बनवीत होता. जेव्हा लोक त्या मार्गावरून जोषाने पुढे जाण्यास उत्सुक होते तेव्हा त्यांना थांबविण्यात आले. त्यांच्या उत्साहाला तेव्हा जे वळण मिळाले- कदाचित् काही काळानंतर अधिक वेगाने ती चळवळ पुढे जावी म्हणून तो आदेश असेल– त्यामुळे बऱ्याचशा संस्थानांतील लोकांच्या उत्साहावर गदा आली. मध्ययुगीन कच्छपेक्षा कितीतरी प्रगत असलेल्या त्रावणकोर संस्थानातील काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी राजीनामे दिले. तर मग कच्छमधील नवजागृत जनतेवर माघारीचा किती विध्वंसक परिणाम झाला असेल!

अशा परिस्थितीत मेहरअलींनी आपल्या नियोजित कार्यक्षेत्रात पुन्हा पाऊल टाकले. लोकांच्या सुप्त सामर्थ्यावर आणि त्यांच्या प्रतिकार शक्तीवर, त्यांनी केलेल्या त्यागावर ज्यांचा विश्वास राहत नाही अशा माणसांना त्या वातावरणातील उदासीनतेने घेरून टाकले असते. पण त्या लोकनेत्याची घडण पोलादी होती. 'पराजय' हा शब्द युसुफ मेहरअलींच्या कोशात नव्हता. त्यांनी परिस्थितीचा पूर्ण विचार केला; त्यातील फायदे तोटे तपासले आणि धोक्याच्या जागाही शोधून काढल्या. जलद आणि निर्णायक पावले उचलली तरच परिस्थितीला शह देता येईल असा त्यांना विश्वास वाटला. एकदा हा निर्णय झाल्यावर दिरंगाईचा प्रश्नच नव्हता. लढ्याची तहकुबी म्हणजे प्रत्येक आघाडीवर शरणागती नव्हे, हे त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले.

'इच्छा आहे तेथे मार्गही आहे', या जुन्या म्हणीचे प्रत्यंतर मेहरअलींच्या हालचालीतून आले. कच्छ संस्थानातील मानकुवा या खेड्यात एक जाहीर सभा बोलावण्यात आली. कच्छ प्रजाकीय परिषदेच्या ताकदीच्या मोजमापाची, ही सभा म्हणजे एक कसोटी होती. "या ठिकाणी स्वयंसेवकांवर हल्ले झाले; राष्ट्रध्वज आणि गांधीटोप्या जाळण्यात आल्या. सभाबंदी करण्यात आली," असे लोक सांगत होते. सभेला सुरुवात होण्याच्या कितीतरी आधीपासून कच्छमधील विविध जिल्ह्यांतून शेतकऱ्यांचे जथ्थे येऊन दाखल होऊ लागले. ठरावीक वेळी मेहरअलींचे आगमन झाले. वातावरण तंग होते. पण मेहरअलींच्या आगमनाच्या जरा आधी पोलिसांची

मोठी तुकडी सभास्थानी दाखल झाली. गिरासियांचा एक पुढारी लाठ्या व तलवारी घेतलेल्या आणखी काही गुंडांबरोबर त्याचवेळी सभास्थानावर आला, त्यांनी सभेच्या जागेला गराडा घातला आणि व्यासपीठ ताब्यात घेतले. आता परिस्थिती हाताबाहेर गेलेली दिसत होती.

गिरासिया लोक सभा उधळायलाच आले होते हे उघड होते. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन लोकांचे रक्षण करावे आणि सशस्त्र हल्लेखोरांपासून त्यांना वाचवावे ही साहजिकच अपेक्षा होती. पण पोलिसांनी काय करावे? पोलीस प्रमुखाने मेहरअलींना दुसऱ्या जागी सभा भरविण्यास सांगितले. युसुफ मेहरअलींनी हा अनाहूत सल्ला नाकारला, त्या भयानक प्रसंगात न डगमगता ते व्यासपीठावर चढून गेले. गिरासियांनी आधीच ते ताब्यात घेतले होते. त्यांनी गिरासियांच्या म्होरक्याला समज दिली आणि त्यानेही उलट शिवीगाळ करून 'आपण उठत नाही; ही सभा इथे भरायला देणार नाही...' वगैरे दम द्यायला सुरुवात केली. युसुफ मेहरअलींनी धमक्यांना दाद दिली नाही. काहीही झाले तरी सभा इथेच होणार, असे त्यांनी गिरासियांना बजावले. त्यांचा प्रखर निश्चय पाहून गिरासियांचा नेता डळमळला. आपला खेळ संपला हे त्याच्या लक्षात आल्यामुळे तो तडजोडीची भाषा बोलू लागला. "दुसरीकडे तुम्ही सभा भरवा; आम्ही आड येणार नाही..." असे जवळजवळ गयावया करून तो युसुफ मेहरअलींना सांगू लागला. युसुफ मेहरअलींनी त्याला ठाम नकार दिला. "सभा इथे भरणार हे जाहीर झाले होते; आणि ती इथेच भरणार," हे त्यांनी त्याला स्पष्टपणे सांगितले.

जनतेच्या नेत्याने घेतलेल्या या निर्भय निर्णयामुळे लोकांनाही बळ चढले-आपला हक्क बजावण्याचा पवित्रा त्यांनी घेतला. आधीची उदासीनता, भीती, तणाव एकदम नाहीसा झाला. वातावरणात एक नवीनच चैतन्य निर्माण झाले.

आता मागे वळायचेच नव्हते. गिरासियांना वातावरणातील फरकाची जाणीव झाली. त्यांनी माघार घेतली. लोकेच्छेचा विजय झाला. अत्याचाऱ्यांच्या ताकदी-विरुद्ध परिषदेच्या इच्छाशक्तीची कसोटी होती, त्यात ती जिंकली. भारतातील इतर संस्थानांना कच्छने लढ्याचा धडा घालून दिला. जनतेची संघटित सुनिश्चित ताकद तोडणारी एक तरी शक्ती या पृथ्वीवर अस्तित्वात आहे काय?

सहा

कारागृहातील रोजनिशी

"दगडी भिंती नाही कारागृह बनवीत
लोखंडी गजांनीही पिंजरा नाही बनत
पण निरागस आणि शांत व्यक्ती तिथे
ऋषींचा आश्रम समजून निवास करतात."

– रीचर्ड लव्हलेस

1942 च्या सुरुवातीला युसुफ मेहरअली लाहोर तुरुंगात स्थानबद्ध होते. तिथे असताना त्यांनी 'पाकिस्तानची सफर' नावाचे एक मनोरंजक राजकीय उपहासिकेचे लिखाण केले. पाकिस्तान जन्माला येण्याच्या बऱ्याच आधी युसुफ मेहरअलींच्या कल्पनाशक्तीची ही सफर होती. या लिखाणातील काही भाग त्यांची तुरुंग रोजनिशी (प्रीझन डायरी) होती. या डायरीतील मजकूर त्यांच्या मानव आणि इतिहास यांचा थेट वेध घेणाऱ्या प्रतिभेची साक्ष देतो; आणि माणसाच्या मनाचा गाभारा धुंडाळणाऱ्या तीक्ष्ण दृष्टीचीही जाणीव करून देतो.

लाहोर तुरुंगाच्या शांत वातावरणात बसून युसुफ मेहरअलींनी लिहिलेल्या डायरीची ही काही पाने.

एक

लाहोर सेंट्रल जेलच्या बाहेरच्या दारातून मी आत प्रवेश केला, तेव्हा माझ्या उजव्या बाजूला जेलमधील कैद्यांची माहिती लिहिलेला एक फलक माझ्या दृष्टीला पडला. त्यावरचा आकडा 2,565 होता. त्याचा अर्थ असा होता, की मुंबई प्रांतातल्या कोणत्याही तुरुंगातील कैद्यांच्या संख्येपेक्षा हा आकडा मोठा होता. येरवडा तुरुंगात साधारणपणे 1500 बंदी असतात; तर इतर तुरुंगात 1200 च्या दरम्यान असतात. दुसऱ्या एका तपशीलाने माझे लक्ष वेधले ते म्हणजे फाशीची शिक्षा झालेल्या कैद्यांची

संख्या. तो आकडा 83 होता. त्या आकड्याने मी चकित झालो; कारण आमच्या देशात तो कुठेतरी तीन किंवा चार एवढाच असतो. या फलकाने किती सामाजिक महत्त्वाची माहिती उघड केली आहे! आणि बरीचशी लपवलीही आहे!!

या तुलनेने मी अगदी हैराण झालो. याचा अर्थ असा आहे का, की पाकिस्तानात अधिक गुन्हे घडतात; आणि मुंबई प्रांतापेक्षा अधिक गुन्हेगार तेथे आहेत? पण ही कल्पनाच मला वेडेपणाची वाटली. अशा आदर्श राज्यामध्ये अशी गुन्हेगारी कशी आढळेल? आता केवळ एकच निष्कर्ष उरला होता; तो म्हणजे पाकिस्तानी न्यायसंस्थेची निर्मिती गुन्ह्यांच्या संख्येला अनुसरून केली जात आहे; किंवा पाकिस्तानी न्यायशास्त्र गिल्बर्ट आणि सुलीवानच्या नाटकात दाखवलेल्या प्रख्यात सल्ल्याचे अनुकरण करते आहे : अपराधाला अनुरूप शिक्षेची योजना करण्याचे?

कदाचित मुंबई प्रांतातल्या गुन्हेगारांचा लहान आकडा हा बहुतेक त्या म्हाताऱ्या गांधींच्या सान्निध्याचा आणि त्याच्या हृदयपरिवर्तनाच्या सिद्धांताचा परिणाम असावा; आणि तुरुंगातील कैद्यांच्या संख्येवर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला असावा!

आतल्या फाटकातून पुढे जात असताना मोठ्या पिवळ्या पगड्या घातलेले कैदी मला दिसले. हे सरावाचे कैदी असे सांगण्यात आले. म्हणजे ज्या कैद्यांनी एकापेक्षा अधिक वेळा जेलला भेट दिली आहे, त्यांना 'सरावाचे कैदी' म्हटले जाते. मुंबईत अशा सरावाच्या कैद्यांना काळ्या टोप्या दिल्या जातात आणि दीर्घकाळ शिक्षा झालेल्यांना पिवळ्या पगड्या देतात.

माझे नाव, पत्ता, हुद्दा इत्यादी गोष्टींची काळजीपूर्वक नोंद झाल्यावर आणि सामानाची तपासणी झाल्यावर आतल्या फाटकातून घंटाघराच्या मनोऱ्याच्या दिशेने मला नेण्यात आले. समोरचा भक्कम दरवाजा उघडल्यावर दिसणारे दृश्य मनोहारी होते. झाडे-झुडपे आणि व्यवस्थित राखलेली हिरवळ तुरुंगाच्या भिंतींचा कडक एकसुरीपणा कमी करीत होती.

घंटाघराजवळ एका कैदी कारकुनाने माझ्याविषयीच्या सर्व तपशीलांची दुसऱ्या एका रजिस्टारमध्ये परत एकदा नोंद केली. त्यानंतर मला एका दूरवरच्या विभागाकडे नेण्यात आले. त्याचे नाव 'बॉम्ब घर.'

दोन

'बॉम्ब घर' हे नाव मी स्वतःशीच मोठ्याने उच्चारले आणि एका गुदगुल्या करणाऱ्या सुखाचा प्रादुर्भाव माझ्या मनात झाला. प्रथम मला वाटले की मला ज्या

इमारतीत ठेवण्यात येत आहे ती विटांऐवजी बॉम्बनीच बांधलेली असावी. कारण विटांसाठी पैसे खर्च करावे लागतात. बॉम्बसाठी काहीच लागत नाही. कार्यतत्पर पाकिस्तानी पोलीस न चुकता हे बॉम्ब शोधून काढतात, इतक्या वरचेवर आणि इतक्या मोठ्या संख्येत, की त्यांचा नियमित आणि अखंड पुरवठा होत राहावा. माझ्याबरोबर आलेल्या त्या भीतीदायक कैद्याला मी विचारले, की या जागेला बॉम्बघर का म्हणतात?

"कारण काही भयंकर दहशतवादी कैदी त्या ठिकाणी बरीच वर्षे ठेवले जात होते." या उत्तराने मला नैराश्य आले; आणि ते लगेच दुसऱ्या एका विचाराने गडद झाले. अशा अनेक दहशतवादी भयंकर कैद्यांना संध्याकाळच्या वेळी, तेही एकट्याने भेटणे, ही घटना माझ्या दृष्टीने तरी मनाची उमेद वाढविणारी नव्हतीच. पण त्याला काही इलाजच नव्हता. प्रसंगावधान हा अशा परिस्थितीत मोठाच अद्‌भुत परिणामकारक गुण आहे असे मी ऐकले होते. त्यामुळे उद्‌भवणाऱ्या परिस्थितीत जसे जमेल तसे स्वतःला शांत आणि संयत ठेवण्याचे मी ठरवले.

पण माझे स्वागत त्या बॉंबघर चौकात ज्या मित्रत्वाने झाले, त्यामुळे माझ्या विचारांना जणू एक सोनेरी डूबच मिळाली. प्रत्येकजण अतिशय प्रेमाने आणि मित्रत्वाच्या भावनेने वागत होता आणि मदतही करीत होता. लगेच मला एक खोली देण्यात आली आणि तिच्यामध्ये माझे सामान लावण्यात सर्वांनी बरीच मदत केली. लवकरच त्या नवीन जगाबद्दल माझ्या मनात आपलेपणाची भावना निर्माण झाली व मी त्यात रूळून गेलो.

आमच्या विभागात एका ओळीत बांधलेल्या वीस बराकी होत्या. सलग दहा खोल्यांनंतर स्वयंपाकघर होते; आणि त्यापलीकडे आणखी दहा खोल्या होत्या. त्याच प्रांगणात एक छोटा कारखाना किंवा वर्कशॉप होते. राजकीय बंद्यांनी त्यांचे दररोजचे तुरुंगातील काम तेथे करायचे असा नियम होता. त्या वर्कशॉपच्या समोर तुरुंगातील कैद्यांनीच तयार केलेली हिरवळ अतिशय आकर्षक वाटत होती. शिवाय त्या प्रांगणात एक छोटीशी भाजीपाल्याची बाग आणि खेळण्यासाठी कोर्ट, इत्यादी सुविधा होत्या.

माझी त्या प्रांगणातील सहा क्रमांकाची खोली बारा फूट लांब आणि साडेसात फूट रूंद अशा मापाची होती. बळकट लोखंडी गजांचे भक्कम दार या कोठडीला होते. त्या पलीकडे त्या कोठडीला लागूनच थोडी बंद जागा होती, जिची पुढची बाजू लोखंडी गजांनी बंद होती. बाहेरच्या उघड्या अंगणात जाण्यासाठी एक दार होते. आपण प्राणीसंग्रहालयात पाहतो तसा तो एक पिंजरा होता. अशाच वातावरणात एखाद्या कवीला...



आचार्य भागवत, मेहरअली आणि अण्णा रणदिवे – राष्ट्र सेवादलाला संदेश.



युसुफ आणि त्यांचे बंधू अहमद– स्नेहाचा दुवा.



युसुफ – रुग्णशय्येवरही वाचनात मग्न.



युसुफ मेहरअली आणि अच्युत पटवर्धन –
1942 मधील भूमिगत कार्याची प्रेरणा आणि कृती.

Praja Parishad
BHUJ (Cutch State)
26.5.39

My dear Jawaharlal,

Herewith a letter from the Editor of the Virginia Quarterly Review, sent to me to be forwarded to you.

The situation has been tense here for some time — Volunteers beaten, meeting broken, national flags and gandhi caps burnt by Grasias, who inhabit this part of the world and are so useful to the State. After this our meeting was banned on the familiar ground of likelihood of breach of peace. The State was banking upon submission a bit too much. We decided to hold the meeting and the whole atmosphere became electrical. Both sides made preparations at Mankua Village. The Grasia chief, Thakore of Mankua brought his rangers armed with lathis, knives, swords and threatened everything on earth if the meeting were not abandoned. I was not less defiant and it seemed a question of touch and go. He came down and suggested that he would permit the meeting provided the venue was changed. This we also rejected. When everything seemed unsettled, they sprang a surprise by withdrawing the opposition and "permitting" the meeting. It [illegible] victory, [illegible] very necessary to [illegible]. This has had an excellent effect here.

[illegible] wrote a letter to the Maharao of Cutch in his usual manner appealing for [illegible].

Hoping this finds you in good health

Yours sincerely,
[illegible]

युसुफच्या सुंदर हस्ताक्षराचा नमुना.



वाचनामध्ये व्यग्र असलेल्या युसुफचे छायाचित्र.

"दगडी भिंती नाही कारागृह बनवीत,
लोखंडी गजांनीही पिंजरा नाही बनत..."

इत्यादी ओळी सुचल्या असाव्यात.

नाहीतरी तुरुंग आणि प्राणीसंग्रहालय यांच्यामध्ये कितीतरी गोष्टी सारख्या असतात. दोघांच्याही व्यवस्थापनातील अद्‌भुतता समान आहे. प्राणीसंग्रहालयाचा रखवालदार फक्त जंगलाचा कायदा जाणत असतो तर तुरुंगाचा पर्यवेक्षक त्याहीपेक्षा आधीचे प्राचीन कायदेकानू- ज्याला सभ्य भाषेत जेल मॅन्युअल म्हणतात- ते राबवत असतो.

सर्वसाधारण तुरुंगातील खोली असते तशीच माझी खोली होती. सफेद चुन्याचा हात मारलेल्या, खिडक्या नसलेल्या भिंती, हवा येण्या-जाण्यासाठी खूप उंचावर छताजवळ उघडे लहान झरोके, हवामानानुसार हवेचे अभिसरण कसे व्हावे याचा विचार करण्याची गरज नाही; कारण तुरुंग हे कैद्यांना सुधारण्यासाठी नसतात तर प्रतिबंध करण्यासाठी असतात, याबद्दल तुरुंगाधिकाऱ्यांची असलेली खात्री. या त्यांच्या तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब कारागृहाच्या भिंती व कोठड्या यांच्यामध्ये उमटायलाच हवे. हवेचा या इमारतींच्या रचनेवर आणि बांधणीवर होणारा परिणाम हा एक मनोरंजनांचा स्वतंत्र विषय आहे. गुन्हेगारी न्यायशास्त्रात शिक्षादानाची कृती ही सर्वोच्च महत्त्वाची मानली जात असल्यामुळे तुरुंगाचे शिल्पकार, त्यातील मानवी प्राण्यांच्या सुखसोयींबद्दल मूर्खपणाचा व अप्रासंगिक विचार करून व आपल्या डोक्याला ताप करून घेऊन नोकरी गमावण्याचा धोका का पत्करतील?

तीन

लवकरच पाकिस्तानातील तुरुंगाच्या जीवनातील खाचा-खोचांशी माझा परिचय झाला. मी जेव्हा येथे दाखल झालो तेव्हा आम्ही फक्त चौदाजण होतो. आमच्या या छोट्याशा गटातील अर्धे कैदी 'दहशतवादी' होते; पण माझ्या आयुष्यात आलेल्या काही अतिशांत आणि सभ्य व्यक्तींपैकी ते होते असे म्हटल्याखेरीज राहवत नाही. त्यांच्यापैकी जन्मठेप भोगत असलेला एक कैदी सरदार गुलाबसिंग आमच्या प्रांगणाचा व्यवस्थापक होता. तो अतिशय नम्र आणि चांगल्या स्वभावाचा होता. मलिक कुंदनलाल, किशोरीलाल, रूपचंद आणि हंसराज हे आणखी काही जन्मठेपेचे कैदी होते. माझ्या अगदी जवळच्या कोठडीत एका बाजूला मौलाना सय्यद हबीब हे दैनिक 'सियासत' या वृत्तपत्राचे मान्यवर संपादक होते; आणि दुसऱ्या बाजूला रूपचंद हा एक लाजरा-बुजरा 'दहशतवादी' होता, जो त्याच्याशी कोणी बोलायला लागल्याशिवाय स्वतःहून तोंडही उघडत नसे!

मौलाना सय्यद हबीब हे आमच्या बराकीमधील सर्वांत ज्येष्ठ राजकारणी मुत्सद्दी होते. अत्यंत तीव्र आणि आक्रमक व्यक्तिमत्त्व असलेल्या मौलानांमध्ये जबरदस्त क्षमतेबरोबरच जिद्दी स्वभावही होता. इस्लामी धर्म आणि इतिहास यांच्यामध्ये पारंगत आणि अनेक ग्रंथांचे लेखक असलेले मौलाना सय्यद हबीब हे अत्यंत प्रभावशाली वक्ते होते, आणि उर्दूमधले प्रख्यात वृत्तपत्रकार होते. शहीदगंज मशिदीच्या आंदोलनातले ते एक प्रमुख पुढारी होते. अनेक वर्षे अफगाणिस्तानमधील राजकारणाच्या संदर्भात तेथील राजकारण्यांशी त्यांचे उच्च स्तरावर संबंध होते. त्यांची राजकारणाची समज इतकी गाढ आहे की कोणत्याही विधिमंडळात विरोधी पक्षाच्या पहिल्याच बाकावर त्यांचे स्थान निश्चित असेल! तथापि अत्यंत अनित्य आणि अडथळ्यांच्या राजकीय प्रवासात भरपूर वळणे आणि वाटा पायतळी घालताना त्यांना शत्रू मात्र बरेच आणि बलदंड लाभले, ज्यांच्यामध्ये पाकिस्तानच्या प्रधानमंत्र्यांचाही समावेश आहे. तुरुंगात वर्षानुवर्षे घालविल्यामुळे त्यांची प्रकृती ढासळली आहे. तुरुंगात त्यांचा सदाप्रसन्न आणि ताजातवाना विनोद यांच्यामुळे एक अतिशय सुंदर सोबत मला लाभली. चालीप्रमाणे दिवसातून पाचऐवजी सात वेळा ते नमाज पढत असत, इतके ते प्रार्थनाशीलही होते.

हळूहळू आमची संख्या वाढू लागली. ज्या दिवशी चौधरी कृष्ण गोपाल दत्त, ब्रिजकृष्ण चांदीवाला आणि ओंकारनाथ यांची बदली आमच्या तुरुंगात झाली, तो दिवस मला अद्याप आठवतो. दिल्लीचे ब्रिज कृष्णाजी हे एक दुर्मिळ व्यक्तिमत्त्व होते. ते निष्ठावंत गांधीप्रेमी होते. अत्यंत शांत, साधे, व्यक्तिगत आयुष्यात संतांसारखी वर्तणूक असणाऱ्या ब्रिजकृष्णाजींबद्दल सर्वांना नितांत प्रेमादर वाटे. मी त्यांना अनेक वर्षे जाणत होतो. आपल्याला आवडणाऱ्या व्यक्तीला भेटणे हे कुठेही सुखदायक असते; पण नवीन आणि चमत्कारिक वातावरणात तर अशी भेट हर्षदायकच असते.

त्यांच्या संगतीचा लोभ आणखीही एका कारणासाठी इतरांना होता. ते मीठ किंवा साखर आणि ते घातलेले पदार्थ अजिबात खात नसत. अशा पदार्थांचा पुरवठा पाकिस्तानच्या तुरुंगातही मर्यादित असल्यामुळे त्यांच्या नजिक राहण्यासाठी आणि स्वतःबद्दल त्यांचे चांगले मत राहावे, यासाठी सर्वांच्यामध्ये स्पर्धा असे. पण ते मला जे झुकते माप देत, त्याबद्दल इतर बंदींना आश्चर्य वाटे. त्यामागचे रहस्य होते ते असे. मी त्यांच्याशी अहिंसा या विषयावर अति उच्च नैतिक पातळीवर चर्चा सुरू करत असे; कठीण परिस्थितीत महात्मा गांधींना धन्यवाद देणारी एक-दोन वाक्ये मध्येच पेरत असे आणि त्यांनी न वापरलेले मीठ व साखर या विषयावर चर्चेची बहुधा समाप्ती होई.

चौधरी कृष्ण गोपाल दत्त हे पाकिस्तानातील संसदेचे विरोधी पक्षनेते होते व त्यामुळे त्यांचा पाकिस्तानमध्ये प्रभाव मोठा होता. पण नेतेगिरीचा आव ते कधीच आणत नसत. एखाद्या मुक्त पाखरासारखे त्यांचे वागणे असे. मजेत, आनंदात ते राहात. भरपूर हसत; विनोद करीत. त्यांची जीवनदृष्टी अशी होती...

'जगण्यात मौज आहे
जोपर्यंत आमच्यापाशी देण्यासारखे काही आहे
मग मी का नाही देऊ ते तुम्हाला?'

ते जवळपास असताना वेळ नुसता जात नसे तर पंखांवर स्वार होई.

राजकारणाखेरीज (काही वेळा व्यवसाय) त्यांचे दोन आणखी शौक होते. त्यापैकी एक इक्बालची कविता हा होता; आणि दुसरा होमिओपॅथी. त्यावर टीकाटिप्पणी करणे किंवा त्याचा प्रतिवाद करणे धोक्याचे आहे, कारण मग आमचा हा सुकुमार राजपुत्र एकदम भडकून उठतो. निमित्त असो वा नसो, इक्बालच्या काव्यपंक्तींचा प्रवाह त्यांच्या मुखातून सतत ओघळत असतो. आणि होमिओपॅथीचे वेड तर एवढे, की युरोप व अमेरिकेच्या दौऱ्यात इतर जगभरचे प्रवासी जेव्हा प्रेक्षणीय स्थळे आणि इतिहास व कला यांची साक्ष देणाऱ्या वास्तू पाहण्यासाठी धावपळ करीत असत, तेव्हा चौधरीजी त्यांचा सर्व वेळ त्या त्या ठिकाणच्या प्रसिद्ध होमिओपॅथना भेटण्यात, किंवा त्यांची चित्रे जमविण्यात व्यतीत करत असत. इंग्लंडमधील किंवा लुव्रमधील वस्तुसंग्रहालयातील वस्तू ज्या तन्मयतेने लोक पाहत असतात त्याच तन्मयतेने ते ही कामे करीत असत. सुदैवाने त्यांच्या होमिओपॅथी चिकित्सेमधील कुशलता त्यांच्या उत्साहाइतकीच अपरिमित होती. तसेच त्यांचे औदार्यही होते. व्यावसायिक चिकित्सक नसल्यामुळे ते वैद्यकीय सल्ल्याबद्दल किंवा दिलेल्या औषधांबद्दलही पैसे स्वीकारत नसत, परंतु रोगचिकित्सा करताना मात्र रोग्याची तपासणी ते संपूर्ण वैद्यकीय दृष्टिकोनातून व रसिकतेने करत. त्याचवेळी एका बाजूला रोग्याला चौधरींनी किमान अर्धा डझन ऐकविलेल्या कवितांना दाद देण्याची सक्ती होती!

कृष्ण गोपालदत्त यांच्याबरोबर दिल्ली काँग्रेसचे पुढारी ओंकारनाथ हेही लाहोर तुरुंगात आले. त्यांना येथे येऊन एखादा दिवस होतो न होतो, तोपर्यंत त्यांच्या सर्वांशी ओळखी झाल्या; आणि मैत्रीही झाली. नसानसांतून भरलेला माणसांचा लोभ, दोषांकडे झुकणारे औदार्य, जग सुधारण्याच्या असंख्य योजना, या त्यांच्या सर्व व्यक्तिविशेषांमुळे ते जेलमध्ये फारच लोकप्रिय झाले. त्यांचे सौहार्द मिळवण्याचा एक मार्ग म्हणजे औद्योगिक वस्तुसंग्रहालयाचे (इंडस्ट्रियल म्युझियम्स) कौतुक करणे. विशेषतः दिल्लीमधील, ज्याचे ते एक संस्थापक होते. ही युक्ती माणसाला त्यांच्या हृदयापर्यंत पोहोचवीत असे.

गोविंद सहाय ही आणखी स्वागतार्ह जोड होती. संयुक्त प्रांतात काँग्रेसची राजवट होती तेव्हा महसूलमंत्री रफी अहमद किडवाई यांचे ते स्वीय सचिव होते. यावेळी ते सुटीचे दिवस घालविण्यासाठी म्हणून काश्मीरला चालले होते. मध्ये लाहोरला एका मित्राला भेटण्यासाठी ते एक दिवस थांबले. त्याच दिवशी एका जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते आणि सहायजींना तेथे बोलण्याचा आग्रह झाला. सरकारच्या एकूण चालचलवणुकीची त्यांनी अशी काही 'स्तुती' आपल्या भाषणात केली की घरी परतताच त्यांना अटक करण्यात आली. आणि पाकिस्तानात आणून त्यांना सहा महिने कैदेत टाकण्यात आले. त्यांनी केलेल्या 'स्तुती'ला परिपक्व होण्यास थोडी सवड मिळावी असा उदात्त हेतू या अटकेमागे असावा.

त्यानंतर काही दिवसांनी मेयो हॉस्पिटलमधून कुलबीरसिंग आले. पाकिस्तानमधील एका रोमांचकारी नावाशी त्यांचा संबंध होता. अकरा वर्षांपूर्वी त्यांचे मोठे बंधू भगतसिंग यांना फाशी देण्यात आले, ते ठिकाण आमच्या बराकींपासून फक्त तीन फर्लांगांवर होते. आज इथून ऐंशी मैलांवर त्यांचा धाकटा भाऊ कुलतारसिंग, पिंजऱ्यात अडकलेला आणखी एक पक्षी, अटकेत आहे. वयाच्या पंचविशीत असलेला हा कुलबीरसिंग तुरुंगात जडलेल्या आणि अद्यापही निदान न झालेल्या एका रोगाच्या तावडीत सापडला आहे आणि एकेकाळचे त्याचे बलदंड शरीर आता जीर्ण व करुणाजनक दिसू लागले आहे. लायलपूर, माँटेगोमेरी, मुलतान, रावळपिंडी, देवळी आणि लाहोर येथील तुरुंगाच्या मूक भिंतींना जर वाचा फुटली, तर त्यांच्या कथनातून उमद्या आणि बळकट अशा कुलबीरसिंगांची अशी अवस्था कशामुळे झाली ते जगासमोर येईल. परंतु आत्मबल घटविण्यात ते शरीर अयशस्वी ठरले आहे. अतिशय वेदना होत असतानाही त्यांना पोट धरून हसताना अगर गोष्ट सांगायला बसलेले कोणी सहजच पाहू शकतात. पुन्हा पुन्हा त्यांचे लोभावणारे हास्य त्यांच्या आत्म्याच्या अदम्य सामर्थ्याचा प्रत्यय देते. त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व मोठे की त्यांचा अलिप्तपणा अधिक, हे ठरवणे अवघड आहे आणि किती विविध प्रकारची माहिती त्यांच्या बोलण्यात असते!

चार

पाकिस्तानात अनेक ऐतिहासिक स्मारके आहेत आणि त्यांपैकी अधिक महत्त्वाची व मौल्यवान या कारागृहाच्या परिसरातच आहेत. काळाने त्यांच्यावर आपल्या खुणा अद्याप उठवलेल्या नाहीत, कारण इतिहास फार उशीरा त्यांच्या भेटीला आला आहे.

लाला लजपत रायना जेथे अटकेत ठेवले होते, ती कोठडी येथे आहे. भगतसिंग आणि त्यांचे दोन साथी सुखदेव व राजगुरू यांना जेथे फाशी दिले गेले, तो फाशीचा खांब भविष्याच्या ऋणात असणाऱ्या भूतकाळाची आठवण करून देत आहे, जे ऋण त्यांनी आपल्या बलिदानाने फेडले आहे. मौलाना जफरअली खान यांच्याकडून जप्त केलेले छपाईयंत्र येथे आहे, ज्यावर एके काळी ते 'जमींनदार' नावाचे पत्र छापून त्यातून विद्रोही आणि ज्वलंत लेख आणि जाहीरनामे प्रसृत करीत असत. त्यातून आता निर्जीव सरकारी कागदपत्र छापले जात आहेत. शिवाय इथे एक विहीरही आहे जिचे पाणी महाराजा रणजितसिंगांना फार आवडे; आता ती सर्व बंदीजनांच्या गरजा भागवते आहे.

पाच

मला भेटलेला आणखी एक 'दहशतवादी' मलिक कुंदनलाल जन्मठेपेची शिक्षा भोगणारा बंदी होता. आम्हा दोघांत वरचेवर संभाषण चाले. त्यात एक दिवस त्याने आपले अंतःकरण माझ्यासमोर उघड केले.

"खूप वर्षं झाली," स्वतःशी भूतकाळ आठवीत तो म्हणाला, "मी आणि माझे मित्र तुरुंगात येऊन. मी त्यावेळी फक्त 19 वर्षांचा होतो. आज माझं वय 31 आहे. आणि अजून खूप काळ इथे राहायचं आहे. तारुण्य तर संपलंच. पूर्वी जशी प्रकृती होती तशी राहिलेली नाही. 'क' वर्गात काढलेली काही वर्षं आणि अनेक प्रतिकारात्मक उपास यांची गडद छाया प्रकृतीवर पडलेली आहे. जे जग आम्हांला माहीत होतं, ते मरण पावलेलं आहे. जरी आम्ही बाहेर आलो तरी आता ते बाहेरचं जग आम्ही ओळखू शकू काय? त्यात स्वतःची जागा शोधू शकू काय? दरम्यान आम्ही इथेच आहोत वाट पाहत, निर्विकार; तरीही मनाने कणखर. कधीकधी त्या कवीचे शब्द माझ्या मनावर जोराने येऊन आदळतात :

'सर्वांच्या स्मृतिकोषातून दूर झालेले आम्ही
येथेच कुजत पडलो आहोत.'

अशा काही प्रसंगांत अधिक प्रयत्नांनिशी आम्ही चेहऱ्यावर हसू आणतो."

या मित्रांना कोणत्या आरोपांवरून तुरुंगात टाकण्यात आले, याबद्दलची आठवण अस्पष्ट झाली आहे. त्यांच्या स्वतःच्या कल्पना फुलल्या आहेत; पक्व झाल्या आहेत. स्वातंत्र्यलढ्याची वाटचाल चालू आहे, आणि मार्गात येणारे अनेक बुरूज त्यानी काबीज केले आहेत. राजकीय कार्याच्या पद्धती बदलल्या आहेत. नवीन विचार व्यासपीठ व्यापू लागले आहेत. बदलले नाही ते फक्त एकच, "ठोशाला ठोसा" हा सनातन न्याय.

सहा

आम्ही तुरुंगात असे मजेत दिवस घालवत असताना कल्याणकारी पाकिस्तान सरकारविरोधी विध्वंसक शक्ती त्या सरकारला पेचात आणण्याचे डाव रचीत होत्या. विक्रीकराच्या प्रश्नावरून मोठमोठ्या व्यापाऱ्यांनी सार्वत्रिक संप पुकारून सर्व दुकाने बंद केली होती आणि सर्व व्यवसाय त्यामुळे थंडावले होते. पण तेवढ्यावर न थांबता आता व्यापारी मंडळींनी सत्याग्रहाचे शस्त्र उपसले होते. कायद्याने प्रस्थापित सरकारला उखडून तर टाकायचे नाही, पण शक्य तेवढे हैराण करायचे असा डाव टाकण्यात आला होता. माननीय श्री. छोटूराम यांचा मृदूपणा आणि देवदुर्लभ सहनशीलता यांमुळे त्या बंडखोरांना अधिक चेव चढला, हे स्पष्टच होते.

हरताळ महिनाभर चालला होता. अनेक देशांच्या वृत्तपत्रांचे रकाने त्या हरताळाच्या हकीगतींनी भरले होते; आणि आता धाडकन् सत्याग्रहाला सुरुवात झाली होती.

सत्याग्रहाच्या पहिल्याच दिवशी लाला बिहारीलाल छन्ना, जे पाकिस्तानी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष होते, त्यांनी 100 सत्याग्रहींच्या मोर्चाचे नेतृत्व केले. त्यांच्यामागे एक लाखाचा जमाव मिरवणुकीने चालत होता. सत्याग्रहींपैकी 95 जणांना अटक झाल्यावर जमावाच्या उत्साहाला उधाण आले.

दुसऱ्या दिवशी मौलाना झफरअली खान यांचा मुलगा मौलाना अख्तर अली खान हा दाढी काढून सत्याग्रहात सामील झाला. त्याने 118 सत्याग्रह्यांची दुसरी तुकडी आधीच्या दिवसाप्रमाणेच टाळ्यांच्या आणि घोषणांच्या गजरात अर्थातच तुरुंगाच्या दिशेने नेली.

बराच काळपर्यंत संयम धरलेल्या अधिकाऱ्यांनी, साहजिकच स्वतःच्या संरक्षणासाठी कठोर कारवाई करून सत्याग्रह्यांना वस्तुस्थितीची कडवट चव देण्याचे ठरवले. रात्री ब्लॅक आऊट म्हणजे पूर्ण अंधार आणि दिवसा 'थ्रो आउट' म्हणजे सत्याग्रह्यांवर लाठीमार करून त्यांना पांगवणे, अशी कारवाई सुरू झाली. इस्पितळात भरती केलेल्यांची संख्या वाढू लागली आणि डॉक्टर व हॉस्पिटलचा इतर सेवक वर्ग यांच्या कामाचा वेळही बराच वाढला. पण सरकारी अधिकाऱ्यांनी योजलेले हे विचित्र उपाय प्रतिबंधक ठरण्याऐवजी आंदोलन भडकवणारेच ठरले. पाकिस्तानच्या सर्व प्रांतांत ह्या सत्याग्रहाचा वणवा पेटला. काही दिवसांतच लाहोरला अटक केलेल्यांची संख्या 2000 वर गेली.

व्यापारी मंडळाने आधीच असे जाहीर केले होते की 20,000 सत्याग्रहींची नोंद त्यांनी केलेली आहे. अमृतसरच्या बाबा गुरुमुखसिंग या लखपती व्यापाऱ्याने असे जाहीर आवाहन केले की या हरताळात धंदा बंद राहिल्यामुळे ज्यांचे नुकसान

झाले, त्यांनी आपल्याकडून सेवकांचा पगार आणि झालेला वरखर्च यांची रक्कम घेऊन जावी. हरताळात सामील झालेल्या दुकानांची भाडी कमी करण्याबद्दल मालकांमध्ये चढाओढ सुरू झाली. अनेक शहरांत मोफत भोजनगृहे- पाकिस्तानात त्यांना लंगर म्हणतात – उघडली गेली. सर छोटूराम यांनी दाखवलेला चमत्कार हे भयानक दुःस्वप्न ठरलेले दिसू लागले.

सात

तुरुंगातील आमच्या जीवनावर 'लालांच्या अभद्र कटकारस्थानां'चा परिणाम होत होताच. (एका अधिकाऱ्याने दुकानदारांच्या उठावाचे वर्णन वरील शब्दांत केले होते.) या सत्याग्रह्यांनी तुरुंग खच्चून भरले होते. जागेच्या अभावामुळे मोकळ्या जागेत तंबू उभारण्यात आले होते. या मोठमोठ्या धनाढ्य व्यापाऱ्यांना आणि त्यांच्या साथीदारांना 'क' वर्गात बंदिस्त करून ठेवण्याचे सरकारने धैर्य दाखवले, हे मला येथे नमूद केलेच पाहिजे. त्यांच्यापैकी अनेकजण हजारो रुपये प्राप्तीकर भरणारे होते, याची दखल घेणे जरूरीचे आहे. त्यांच्यापैकी एकजण वर्षाचे 80,000/– रुपये कर भरत होता; आणि आमच्याबरोबर असलेल्या एकाने तर 1,20,000/- प्राप्तीकर आणि अतिरिक्त कर (सुपर टॅक्स) म्हणून भरले होते. युद्ध निधीसाठीही अनेकांनी पैसे दिले होते. पण पाकिस्तान सरकारला माणसांची क्षिती नाही. तुरुंगातील बंदींची संख्या झपाट्याने वाढत चालली होती आणि कठोर परिश्रम घेणाऱ्या तुरुंगाधिकाऱ्यांचे कष्ट आणखीच वाढत चालले होते.

त्या बंडखोरांच्या पुढाऱ्यांना भारत संरक्षण कायदा अधिनियमाखाली अटक केल्यामुळे त्यांचा मुक्काम आमच्याच प्रांगणात म्हणजे 'बॉब घर'मध्ये होता. या सर्वांची स्थानबद्धता बेमुदत होती. 'क' वर्गातील बंदींवर खटले चालणार होते. त्या सर्वांना कारखान्यात एकत्र ठेवण्यात आले होते. तिथे एक बाबा गुरुमुखसिंग होते. त्यांनी जितके दिवस हरताळ चालू राहील तितके दिवस भरपूर मदत देण्याची तयारी दाखविल्यामुळे त्या गोटात आणि आजूबाजूलाही थोडी खळबळ उडाली होती. लाला धनीराम भल्ला ('भल्ला शूज वेलकम यू'चे मालक), वृद्ध धनिक जगतसिंग क्वात्रा, ज्यांना या तुरुंगात हातकड्या घालून आणण्यात आले होते, ज्यांची शुभ्र दाढी त्यांच्या छातीवर रूळत असल्यामुळे सुंदर चित्रासारखे आम्हांला ते दिसले, हे या अटक केलेल्या मंडळींपैकी होते. त्यांच्याशिवाय जनाब मोहम्मद दिन, अर्शद हुसेन, बेली शहा आणि कैलासचंद्र भार्गव, ज्यांची सुमधुर गीते आम्हांला प्रिय होती असा कवी अनंतराम वहाशेय, जपानहून परतलेले करोडोपती लाला रामचंद्र, ज्यांना पुढे एकट्यालाच लाहोर किल्ल्यामध्ये हलविण्यात आले– ही सर्व मंडळी आमच्याच

गोटात–प्रांगणात होती. आमच्या गोटाबाहेर त्या चळवळीतले आणखी काही नेते होते. लाला द्वारकादास, लाला कृपाराम, लाला कुंदनलाल लांबा, गुलाम हैदर बट्ट इत्यादी. ही नावे म्हणजे पाकिस्तानचे औद्योगिक लोहचुंबक होते.

त्यांच्याबरोबर बाबा गनीही तुरुंगात आले. पाकिस्तानमधील जेल रेकॉर्ड त्यांनी मोडले आहे. ही त्यांच्या तुरुंगवासाची पंचवीसावी खेप आहे, त्यांना आत का आणण्यात आले हे कोणीही सांगू शकणार नाहीत. कितीही कल्पनाशक्ती ताणली तरी त्यांना व्यापारी– आणि विक्रीकर ही ज्यांच्या दिलाची 'धडकन्' बनली आहे असा व्यापारी– मुळीच म्हणता येण्यासारखे नाही. पण "जिथे भांडण झगडा आहे..." अशा तऱ्हेचा माणूस आहे. विश्वास फक्त झगड्यांवर, संघर्षावर... बक्षीसावर नाही.

बाबा गनींच्या तुरुंगवारीचा रौप्य महोत्सव आम्ही साजरा केला. कोणीतरी शेरा मारला, "बाबा गनी, तुम्ही आता पुढारी झालात."

"मी? पुढारी? किती हा खुळचटपणा!" बाबा एकदम उद्‌गारले.

"अरे बाबा, पुढारी होण्यासाठी तीन गोष्टी असाव्याच लागतात आणि माझ्याजवळ तर एकही नाही."

"तीन गोष्टी? कोणत्या त्या?" कोणीतरी विचारले.

" 'ब'च्या बाराखडीतील तीन शब्द."

"कोणते ते? तुम्ही फारच गूढ बोलायला लागलात."

"अगदी स्पष्ट आहे. बंगला, बेगम आणि बँक (पैसा). नेता बनण्यासाठी ह्या तीन गोष्टी हव्यातच हव्या."

मजेत सर्वांनीच टाळ्या वाजवल्या. एकजण म्हणाला, "खरं आहे बाबा! तुम्हांला आम्ही भरपूर शुभेच्छा त्या तीन 'ब'कारांसाठी देत आहोत."

आठ

एक दिवस अशोक मेहतांचे एक लहानसे पुस्तक 'इंडिया कम्स ऑफ एज' मी वाचत होतो. पीएच्.डी.साठी लिहिलेल्या प्रबंधाच्या तोलामोलाचे आर्थिक संशोधन त्या पुस्तिकेत आहे. त्याचवेळी, व्यापारी सत्याग्रहींपैकी मला विशेष कुतूहलजनक वाटलेले लाला धनिराम भल्ला खोलीत भेटले. मला ते आवडत. स्वतःला मुळापासून घडवणाऱ्या व्यक्तींमध्ये जे विशेष असतात, ते सर्व मला त्यांच्यामध्ये दिसत होते. आत्यंतिक श्रीमंती उपभोगत असतानाही पैशाची सत्ता आणि जादू यांच्याद्वारे होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या आहारी न गेलेले असे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा स्वतःचा मुळापासूनचा साधेपणा आणि स्नेहशीलता कोणाच्याही लक्षात येण्यासारखी होती.

त्यांनी अशोक मेहतांची ती पुस्तिका माझ्या हातून घेतली. ती पुस्तिका म्हणजे 'भारतीय उद्योगांमधील भांडवलाचे झालेले केंद्रीकरण' या विषयावरील थोडक्यात आणि साधे-सोपे विवेचन व पृथक्करण आहे, असे मी त्यांना सांगितले. पाकिस्तानातील यासंबंधीची परिस्थिती काय आहे हे जाणून घेण्यास मी उत्सुक असल्यामुळे त्याविषयी मी भल्लाजींना अनेक उभे-आडवे प्रश्न विचारले. मला असे आढळले की त्यांचे सर्व कुटुंबच मला हवी ती माहिती अतिरिक्त प्रमाणात पुरवू शकेल. या माहितीने मी आश्चर्यचकित झालो. भल्लांच्या पाकिस्तानातील आर्थिक साहसांचा थोडक्यात सारांश पुढीलप्रमाणे–

धनीराम भल्ला	भल्ला शू कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक. (900 एजन्सीज, 10,000 जोड्यांचे दर दिवशी उत्पादन, सर्व युद्धकार्यासाठी सरकारकडून खरेदी.) संस्थापक-संचालक – ट्रेडर्स बँक संचालक – बाजवारा बँक.
योधराज भल्ला	सचिव, पंजाब नॅशनल बँक.
बलराज भल्ला	व्यवस्थापकीय संचालक, सिटी बँक.
शिवराज भल्ला	व्यवस्थापकीय संचालक, ट्रेडर्स बँक.
जगराज भल्ला	व्यवस्थापकीय संचालक, पंजाब को-ऑपरेटिव्ह बँक.
जसराज भल्ला	व्यवस्थापकीय संचालक, बारी दोआब बँक.
हरकिशनलाल भल्ला	संचालक, ट्रेडर्स बँक.

ही यादी फक्त नमुन्याखातर; तपशीलवार नव्हे. यांशिवाय असलेल्या अनेक किरकोळ संचालक पदांचा उल्लेख इथे केलेला नाही. अशोक मेहतांना आपल्या पुस्तिकेच्या पुढील प्रतीसाठी यातील काही साहित्य घेण्यासारखे आहे.

नऊ

एका संध्याकाळी आम्ही ऐकले की मॉंटेगोमेरी तुरुंगातून शोरिश काश्मिरी यांना लाहोर येथे हालविण्यात आले आहे. ती बातमी ऐकून माझ्या सहकाऱ्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड उत्सुकता दाटून आलेली मी पाहिली. कारण शोरिश ही खूप प्रसिद्ध व्यक्ती होती. तो ऑल इंडिया मजलिस-इ-अहरारचा सरचिटणीस होता. शिवाय मौलाना अताउल्ला शाह बुखारी आणि मुन्शी अहमद दिन यांच्याप्रमाणेच पाकिस्तानातील एक प्रख्यात वक्ता होता. शिवाय उदयोन्मुख कवी आणि लेखकही होता. पाकिस्तान सरकारला त्याच्या वक्तृत्वाबद्दल फारसे कौतुक नव्हते हे

उघडच आहे. कारण तो वरचेवर तुरुंगाची हवा खात असे आणि आता तर त्याची सजा पुऱ्या पाच वर्षांची सक्तमजुरीची होती. त्याने जेमतेम तीन वर्षे पूर्ण करीत आणली होती, आणि त्याच्या प्रकृतीवर या तुरुंगवासाचे उमटलेले व्रण स्पष्ट दिसण्यासारखे होते.

साधारणपणे, रात्री नऊ वाजता आमच्या तुरुंगाच्या आवारात एक उंच आणि लांबलचक हातापायांचा, गुळगुळीत दाढी केलेला, पोरगेलासा तरुण शिरला. तो पंचविशीच्या सुमाराचा असावा.

शोरिश हा अशा प्रकारचा माणूस आहे की ज्याचा, समृद्ध आणि सक्रिय जीवनाचा एक तास हा निष्क्रिय आणि अनामिक युगापेक्षा मोठा आहे, यावर ठाम विश्वास आहे. त्याची हालचाल, क्रियाशीलता उत्स्फूर्त असते, त्यावर दुसऱ्यांदा विचार करण्याची गरज त्याला वाटत नाही. उत्साह, कळकळ, अतिव संवेदनशीलता आणि बडबड एखाद्या खास कविवर्यांसारखी. अशा विविध मानसलहरींनी युक्त असा तो प्राणी आहे. त्याच्या आवडीनिवडी फार तीव्र आहेत. स्मरणशक्ती अद्‌भुत आहे. कोणीतरी मला असेही सांगितले की जे उर्दू काव्य त्याचे पाठ नाही ते फारसे लक्षात घेण्यासारखे नसते. त्याच्या आगमनाने सारे वातावरण उत्साहित झाले होते.

शोरिश त्याच्या इतर अहरार मित्रांबद्दलही बोलत असे. सत्तरीत असलेले मौलाना हबीबुर रहमान, त्यांची प्रकृती सततच्या तुरुंगवासामुळे आणि 'क' वर्गामुळे ढासळली असली तरी हृदय सिंहाचे कसे होते याबद्दल. दुसरे मौलाना अताउल्ला शाह बुखारी आणि त्यांच्या वक्तृत्वाचे असंख्य दाखले. रात्री 10 वाजता मौलानांनी जाहीर सभेला सुरुवात करून ती रात्री दोन किंवा तीनला जरी संपवली तरी संपूर्ण वेळ श्रोते मंत्रमुग्ध होऊन कसे बसून राहत त्याची कथा; तिसरे मौलाना मझर अली अझर, हजारो अडचणींचे अडथळे पार करीत अनेक आघाड्यांवर लढे देत संघटना सक्रिय ठेवण्यासाठी करीत असलेले लेखन, भाषण, टीका आणि हवी तेव्हा एखाद्याची खरडपट्टीसुद्धा काढण्याची त्यांची असलेली तयारी, इत्यादी. पण चौधरी अफझल हक, ज्यांच्या मृत्यूमुळे अहरार चळवळीचे अभूतपूर्व नुकसान झाले, त्यांच्याबद्दल बोलताना मात्र तो आतून हाललेला असे. नंतर काही काळ आमच्या गोटात दुसऱ्या एका आनंदी व्यक्तीचे आगमन झाले, त्यांचे नाव मौलाना मोहमद हुसेन. ह्यांचा त्याग आणि धैर्य विस्मयजनकच होते. विविध देशांतील– विशेषतः जवळच्या आणि मध्यपूर्वेच्या इस्लामी देशांतील– राजकीय आणि सामाजिक घडामोडींची त्यांना पूर्ण माहिती असल्यामुळे त्यांच्याकडे या विषयांवरील गोष्टींचा खजिनाच होता. त्यांच्याजवळ असलेल्या असंख्य पुस्तकांपैकी बरीचशी पुस्तके त्यांचे मित्र सैद अबुल अल् मौदूदी यांची होती. मौदूदी हे नव्या, आकर्षक आणि

इंद्रधनुष्याप्रमाणे बहुरंगी धर्मशास्त्राचे चित्रण करणारे एक ज्येष्ठ धर्मोपदेशक होते. निष्ठावंतांनी या पुनरुज्जीवित इस्लामकडे परतावे अशी त्यांची हाक असे. मोहमद हुसेन हा एक त्या तत्त्वज्ञानाने भारलेला असा इसम होता. मात्र त्याचा राजकीय दृष्टिकोन अगदी वेगळा होता.

मौलाना मोहमद हुसेन यांनी सार्वजनिक कार्यासाठी भरपूर पैसा खर्च केला होता– अगदी कुटुंबाचा विचारही न करता. पुन्हा अटक होऊन ते लाहोर जेलमध्ये आले आणि त्यांना कळले की त्यांची मुलगी अतिशय आजारी असून तिच्यावर शस्त्रक्रिया आवश्यक आहे. पण शस्त्रक्रियेचा निर्णय काय लागेल ते सांगता येणे कठीण होते. पित्याचे प्रेम, दडवलेली चिंता आणि परिस्थितीजन्य असहायता त्यांचे काळीज कुरतडत होती. पण त्यांचे धैर्य अतुलनीय आणि सर्वांच्या आदरास पात्र होते.

त्यानंतर सहार गुल खान हे भीतीदायक मिशा असलेले जहाल पठाणी व्यक्तिमत्त्व. एखाद्या लहान मुलाप्रमाणे निर्मळ अंतःकरण, तीव्र विनोदबुद्धी आणि शहरी सुसंस्कृत चलाखीला आव्हान देणारा ग्रामीण धूर्तपणा हे त्यांचे गुणविशेष. जरी निखळ समाजवादी असले तरी आपल्या सहकाऱ्यांना पुस्तकांवर तुटून पडताना पाहून त्यांच्या कपाळावर आठी चढत असे. "पुस्तकांतल्या किड्यांविरुद्ध" प्रत्यक्ष कृतीच्या धमक्या ते देत. जेलमध्ये असलेल्या बंद्यांच्या प्रकृतीवर तेथील जीवन किती प्रकारचे परिणाम करू शकते याचे ते एक बोलके उदाहरणच होते. जयप्रकाशजींनी देवळी येथे स्थानबद्ध असताना सुरू केलेल्या अन्न सत्याग्रहात ते सामील झाले होते; आणि त्या सत्याग्रहाच्या विजयाची किंमत आजपर्यंत देत होते. त्यांना अपस्माराचे एवढे जबरदस्त झटके येत की पंधरा-पंधरा जण त्यांना धरून ठेवण्यास असमर्थ ठरत. ही राजनीती! संत महंतांनी तिच्यामध्ये जी आकर्षकता पाहिली, ती आहे तरी कुठे?

दहा

दरम्यान, व्यापाऱ्यांचा सत्याग्रह अतिशय दृढपणे चालूच होता. पंतप्रधानांची सर्व माणसे किंवा हत्ती-घोडे त्या सत्याग्रह्यांना आळा घालू शकत नव्हते; आणि जेव्हा शेकडो स्त्रिया निदर्शने करत सत्याग्रहात उतरल्या, तेव्हा वातावरण फारच तापले आणि सत्याग्रहाने अत्युच्च बिंदू गाठला. सत्याग्रह्यांवर लाठ्या तर पडल्याच; पण असंख्यांच्या अटकेचे दैनंदिन सत्र सुरू झाले.

एकीकडे पत्रकारही अस्वस्थ झाले आणि त्यांच्यापैकी तिघांना– दैनिक प्रतापचे वीरेंद्र, पाकिस्तान ट्रिब्युनचे ए.सी.बाली आणि असोसिएटेड प्रेसचे

हुकूमचंद यांना– अटक करण्यात आली. अधिकाऱ्यांना एका आणीबाणीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत होते. ते असहाय होते. कारण एरवी गुणी असलेल्या या पत्रकारांनी सदभिरुचीला सोडून अक्षम्य वर्तन केले होते. त्यांच्यासारख्या मान्यवर पत्रकारांना लाठीहल्ल्याचा वास घेत जाण्याचे कारणच काय होते? त्याऐवजी एखाद्या मंत्र्याच्या पत्रकार परिषदेला ते उपस्थित राहू शकले असते. त्याचे काही बक्षीसही त्यांना मिळाले असते. किंवा कोणा अधिकाऱ्याच्या चहापानाला उपस्थित राहून तेथील बातम्या त्यांनी गोळा करायच्या! (उपहाराबद्दल तर बोलायलाच नको!) या तीन प्रसिद्ध पत्रकारांची वरील वर्तणूक ही सर्व प्रकारच्या वृत्तपत्रीय सभ्यतेचा भंग करणारी होती.

तरीही जेव्हा त्यांच्या अटकेची वार्ता फैलावली तेव्हा पाकिस्तानी पत्रकारांनी इतका आरडा-ओरडा केला की आभाळ कोसळले की काय, असे वाटावे. लगेचच एक सभा, त्या कमी सभ्य, अधिक लढाऊ अशा प्रसिद्ध वृत्तपत्राच्या कार्यालयात भरविण्यात आली. वृत्तपत्र क्रांतिकारी विचार मांडणारे असले, तरी त्याचे संपादन चांगले आहे. पण शेवटी या सर्वांतून काय निघाले? जनमताच्या साध्या लहरीवर हालणाऱ्या या संवेदनशील लोकशाही सरकारने या अनाठायी सत्याग्रहासमोर नमते घेतले की हो! केवळ त्या तीन दोषी पत्रकारांची मुक्तता झाली– एवढेच नव्हे, तर संबंधित मंत्र्याने चक्क संसदेच्या सभागृहात या प्रकाराबाबत खेद व्यक्त केला. खरोखर, असे प्रसंग वृत्तपत्रसृष्टीच्या शहाणपणावरील आणि वृत्तपत्र संपादक परिषदेच्या अचूकपणावरील विश्वास उडवतात, हिला म्हणे राज्याचा चौथा खांब मानतात!

अकरा

लाहोर जेलमध्ये मला हे समजले होते की खाकसारांचे एक पुढारी माझ्या जेल सहकाऱ्यांमध्ये आहेत. त्यांचा परिचय करून घेण्यासाठी अर्थातच मी उत्सुक होतो. माझ्या मनाने खाकसार ही व्यक्ती कशी दिसत असेल याचे एक चित्र डोळ्यांसमोर उभे केले होते. सहा फूट उंच, जळजळीत नजर, आव्हान देणारी दाढी, आणि आवाजाचा गडगडाट. पण प्रत्यक्षात माझ्यासमोर येऊन उभा राहिला तो एक लहानखुरा, लाजाळू, दाढीविरहित आणि विनम्रतेचा गोड भाव चेहऱ्यावर असणारा एक युवक. माझ्या आश्चर्याला पारावारच राहिला नाही, पण माझे आश्चर्य अर्थातच मी अशा पद्धतीने आवरले, की माझ्याकडून कसलीच चूक झाली नाही, अशी स्वतःची खात्री व्हावी.

त्या व्यक्तीचे नाव होते बशीर अहमद सिद्दिकी. तो सरहद्द प्रांतातून (वायव्य सरहद्द) आला होता आणि खाकसार कार्यकर्त्यांच्या श्रेणीमध्ये त्याचे नाव

बरेच वर होते. अतिशय धार्मिक आणि शांत स्वभावाचा बशीर अत्यंत धैर्यशील होता. आम्हांला सर्वांना तो लांडग्याचे कातडे पांघरलेले मेंढरू वाटे. खाकसार चळवळीने अल्पावधीत जी प्रगती केली ती बढाईखोर, अविचारी लोकांच्या निंदाव्यंजक आरडाओरडीने नव्हे; तर बशीरसारख्या स्वेच्छेने स्वतःजवळचे सर्वस्व आंदोलनाला देणाऱ्या आणि अतिशय तणावाच्या परिस्थितीतही माणुसकीचा धागा न तोडणाऱ्या व्यक्तींमुळेच.

काही आठवड्यांनंतर आणखी एक खाकसार पुढारी, खान खुशाल खान आमच्यामध्ये येऊन दाखल झाले. अत्यंत व्यवहारी, हुशार आणि धूर्त असे ते व्यक्तिमत्त्व होते. आणि परिस्थितीची गरज असेल त्याप्रमाणे, हसणे किंवा ठोसे लगावणे यांपैकी काहीही करायला ते तयार असत. आपल्या मतांबद्दल अतिशय आग्रही आणि चित्तवेधक असे ते व्यक्तिमत्त्व होते.

आमच्याबरोबर आणखी काही उंचेपुरे शीख सैनिकही होते. त्यांना हाँगकाँगमध्ये अटक करून लाहोर येथे स्थानबद्धतेसाठी आणण्यात आले होते. हाँगकाँग आणि सिंगापूर पडल्याची बातमी जेव्हा आली, तेव्हा ते अतिशय आश्चर्यचकित झाले आणि ते आश्चर्य त्यांच्या चेहऱ्यावरही उमटले. "अशक्य," ते श्वास रोखून उत्तरले, "असे अभेद्य किल्ले इतक्या लवकर आणि सहजपणे कसे जमीनदोस्त होतील? सत्य हे अनेक वेळा ललित साहित्यापेक्षाही किती विचित्र असते!"

आणखी दोन 'दहशतवादी' आमच्याबरोबर होते, त्यांना चार वर्षांची शिक्षा झालेली होती. त्यांच्यापैकी एक कामगार चळवळीतील कार्यकर्ता होता. त्याच्यावर युद्धप्रयत्नांत अडथळे आणल्याचा आरोप होता पण तो स्वतः युद्धप्रयत्नांत साहाय्य करीत असल्याचा दावा करीत होता. ओमप्रकाश हे गुजराणवाला जिल्हा काँग्रेस कमिटीचे उत्साही सचिव होते. दुसरे सरदार सज्जनसिंग हे एक कार्यकर्ते नागरिक स्वातंत्र्याचे कडवे पुरस्कर्ते लढवय्ये होते. म्हणून अर्थातच कोणत्याही देशातील पोलिसांचा अनुग्रह त्यांच्यावर होण्यासारखा नव्हता.

जेलमध्ये किती विविध प्रकारच्या जीवनाचे समृद्ध दर्शन होत असते! माझे जवळचे सोबती अहरार आणि खाकसार होते, जे राजकीयदृष्ट्या दोन गट एकमेकांपासून जितके दूर असू शकतात, तितके होते. याशिवाय काँग्रेसचे नेते, किसान कार्यकर्ते, लक्षाधीश व्यापारी, दरिद्री कामगार संघटक, धाडसी 'दहशतवादी,' विद्वान मौलाना, सुप्रसिद्ध पत्रकार, कवी, लेखक, संसद सदस्य... परस्परविरोधी मताच्या मंडळींचा हा किती मजेदार मेळावा होता! पाकिस्तान जेलखेरीज जगात इतरत्र कुठे अशा विशेष व्यक्तिमत्त्वांच्या मंडळींचा मेळावा पहायला मिळणार? या मंडळींच्या स्वतःच्या ढासळलेल्या प्रकृतीखेरीज आणखी

एकच गोष्ट सगळ्यांमध्ये समान होती. ती म्हणजे त्यांना त्या एकाच सावध सरकारने तुरुंगात टाकले होते; आणि जनतेचे हितसंबंध जागरूकपणे सांभाळणाऱ्या शासनयंत्रणेने या उच्छाद मांडणाऱ्या मंडळींवर आणि त्यांच्या कारवायांवर नजर ठेवून, संधी साधून पहिल्याप्रथम त्यांना त्यांच्या लायकीप्रमाणे उपाहार दिला– अटक, खटला, कारावास, पुन्हा अटक आणि पुन्हा कारावास!

बारा

पाकिस्तानी तुरुंगात एक अद्‌भुत अशा प्रकारची नोंदवही (रजिस्टर) ठेवली जाते. तिला 'ब्लॅक लिस्ट' असे नाव आहे. तिचा अप्रत्यक्ष उल्लेख कुजबुजत होतो. जरी सगळ्यांना त्या 'ब्लॅक लिस्ट'चे अस्तित्व माहीत असले तरी तुरुंग अधिकारी मात्र तिचा उल्लेख स्वप्नातही करत नाहीत. त्या अत्यंत गोपनीय वहीत सर्व धोकादायक आणि भयंकर व्यक्तींची नावे लिहिलेली असतात, ज्यांना कोणत्याही राजकीय व्यक्तीला भेटण्याची परवानगी कोणत्याही जेलमध्ये मिळत नाही. या यादीचे स्वरूप सर्वसमावेशक आणि सर्वंकष असे आहे. त्यामध्ये सर्व छटांच्या पुरोगामी मतांच्या महत्त्वाच्या राजकीय व्यक्तींचा समावेश आहे. अगदी मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांचासुद्धा. त्यांच्यामधील मलिक बरकत अलींनाही वगळण्यात आलेले नाही. प्रत्येक जात आणि पंथ यांची निःपक्षपाती नोंद तिथे आहे; त्याचप्रमाणे व्यापाराची प्रत्येक शाखा आणि व्यवसायही. जीवनलाल कपूर हे वकील व्यवसायातील अग्रणी अनेक राजकीय बंद्यांचे आदरणीय निःशुल्क मित्र. त्यांचे नावसुद्धा या यादीत आहे. खरे तर पाकिस्तानमध्ये या 'काळ्या यादी'त आपले नाव घालण्यात जणू काही स्पर्धाच लागली आहे. कारण या यादीतील नाव म्हणजे आपल्या परिणामकारकतेचे सरकारने दिलेले शिफारसपत्रच आहे, असे मानले जाते. याशिवाय या लोकशाही युगात काँग्रेससारख्या बंडखोर संघटनांच्या हालचालींमुळे सरकारने दिलेली बक्षीसपत्रे किंवा मानसन्मान स्वीकारणे शिष्टसंमत नाही. पण काळ्या यादीमध्ये माझ्या नावाची नोंद आहे, असे हात उंचावून सांगता आले, तरी काय कमी समाधान लाभते काय?

ही यादी कशी तयार केली जाते? विश्वासार्ह सूत्रांकडून असे समजले की ती खालील पद्धतीने बनविली जाते. एक उच्चपदस्थ सी.आय.डी. अधिकारी वेळोवेळी (टेलिफोन डिरेक्टरी अगर अन्य पुस्तकांतून) त्याला उपद्रवी वाटतील अशा व्यक्तींची नावे कापून पट्ट्या काढून घेतो नंतर एका मोठ्या टोपलीत ही सर्व नावे घालून ती चांगली हालवून, खालीवर करून हायकोर्टाच्या एका निवृत्त न्यायाधीशासमोर ठेवली जाते. या न्यायाधीशाच्या डोळ्यांवर पट्टी बांधलेली असते,

कारण न्यायदेवता आंधळी असते! त्यांतून न्यायमूर्तींनी किती नावे काढायची, हे त्याच कामासाठी बोलावलेल्या मंत्रिमंडळांच्या खास बैठकीत ठरविण्यात आलेले असते. आणि त्यांचा निर्णय हा सर्वप्रसिद्ध असलेल्या राजकीय मागणी-पुरवठा तत्त्वावर आधारलेल्या कायद्यानुसार होतो.

आता आपले नाव त्या यादीत आहे की नाही, हे एखाद्याला कसे कळणार? त्याने मग जवळच्या एखाद्या जेलच्या प्रमुखाकडे अर्ज करून एखाद्या राजकीय पुढाऱ्याची भेट मागावी. त्याची ती विनंती नाकारण्यात आली की त्याने समजावे की नशिबाने साथ दिली आहे– म्हणजेच त्याचे नाव त्या काळ्या यादीत आहे!

तेरा

जेलमध्ये देण्यात आलेली एक अमूल्य सुखसोय म्हणजे एक रेडिओ सेट आमच्या गोटात आणून ठेवण्यात आला. पाकिस्तान ट्रिब्यूनच्या विश्वस्तांकडून आलेली ही भेट होती. आतापर्यंत कधीच कोणती भेट इतक्या विचारपूर्वक देण्यात आली नव्हती; किंवा हर्षभरित अंतःकरणाने स्वीकारलीही गेली नव्हती. आम्हांला त्यावर फक्त पाकिस्तान, हिंदुस्थानमधील प्रसारण केंद्रे लावण्याची परवानगी होती. बरोबरच बी.बी.सीचे कार्यक्रम लावता येत. आम्ही त्याबद्दल अधिकाऱ्यांचे फार आभारी होतो. दर दिवशी 'ऑल इंडिया रेडिओवरून आम्ही बोलत आहोत' हे परिचित जादूभरले शब्द किंवा 'लंडन कॉलिंग', या शब्दांमुळे आमच्या अंगावर रोमांच उभे राहात. पाकिस्तान सरकार आणि विशेषतः तुरुंगखात्याचे मंत्री सर मनोहरलाल यांचे या उपक्रमाबद्दल हार्दिक अभिनंदन करणे जरूरीचे आहे.

चौदा

अचानक पाकिस्तानच्या कायदेविश्वात एक नवीन हलचल माजली. न्यायालयातील शांतताप्रेमी कबुतरांची एकच फडफड उडाली. या सर्व धांदलीचे कारण होते के. एल. गौबा नावाचा एक अस्वस्थ आत्मा.

गौबा हा अमेरिकनांच्या शब्दांत सांगायचे तर एक (मक्-रेकर) डोमकावळा होता. काही वर्षांपूर्वी त्याने एक पुस्तक लिहून असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता की अंकल सॅम हा खरा अंकल शाम-शामकाकाच आहे. हे सर्व कशासाठी? तर कॅथरीन मेयो नावाच्या एका सभ्य आणि श्रीमंत अमेरिकन बाईने 'मदर इंडिया' नावाचे पुस्तक लिहिले होते म्हणून. नंतर त्याने आणखी एक पुस्तक लिहिले, 'हिंदुस्थानच्या महाराण्या' (हायनेसेस ऑफ हिंदुस्थान). त्यात त्याने हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला, की या महाराण्या लोक समजतात तितक्या 'महा' नाहीत.

कशासाठी हा सारा उपद्व्याप? या मूर्तिभंजनाच्या जमान्यात महाराजांच्या प्रभावळीवर का प्रहार करायचा? कोणाला त्याचा फायदा होणार? पण त्या चक्रम शीघ्रकोपी गौबाला याबाबत सांगणार तरी कोण?

गौबाचा उत्साह अमर्याद होता. त्याने आणखी एक पुस्तक लिहिले. त्याचे शीर्षकच गोंधळवून टाकणारे होते. 'दी न्यू मॅग्नाचार्टा'– लोकशाहीची नवी सनद. त्या पुस्तकात पाकिस्तानच्या उच्च न्यायालयावर, विशेषतः मुख्य न्यायाधीश सर डग्लस यंग यांच्यावर मोठ्या कौशल्याने हल्ले चढविले होते.

यावेळी त्याचा पाय ह्या प्रकरणात घट्ट रुतला होता. अंकल सॅम किंवा हायनेसेस प्रकरणी त्याला दुर्लक्षित करण्यात आले. पण यावेळी न्यायमूर्ती स्वस्थ बसून राहिले नाहीत. त्यांनी 'न्यायालयाचा अवमान' या आरोपाखाली गौबाला कोर्टात खेचले. गौबा स्वतःच बॅरिस्टर असल्यामुळे त्याने स्वतःच स्वतःचा बचाव करायचा प्रयत्न केला. ते पुस्तक खाजगी वितरणासाठी आहे; विक्रीसाठी नाही, या त्याच्या युक्तिवादाला न्यायालयाने दाद दिली नाही. आपल्यावरील खटला पुस्तकातील आक्षेपार्ह विधानांवर अगर त्या पुस्तकातील मजकुरावर चालवावा; 'न्यायालयाचा अवमान' हा आरोप असू नये, ही त्याने केलेली विनंतीही मान्य झाली नाही. त्याची आणखी एक याचना अशी होती, की ज्या न्यायमूर्तींवर त्याने काही आक्षेप घेतले होते, त्यांच्यासमोर तरी हा खटला चालवू नये. पण तीही नाकारण्यात आली. प्रचलित व्यवहारानुसार त्याला सहा महिन्यांच्या कैदेची शिक्षा झाली. त्याला लाहोर जेलमध्ये आणून आमच्यापासून दूर एका कोठडीत ठेवण्यात आले. ही सावधगिरी सर्वथैव योग्य होती. कारण पूर्वी तो म्हणे 'पाकिस्तान फ्लाइंग क्लब'चा अध्यक्ष होता!

पंधरा

एका सुप्रभाती आम्हांला समजले की काही वाटाघाटी होऊन व्यापारी मंडळींनी संप मागे घेतला आहे. लगेचच शेकडो बंदींच्या मुक्ततेचा हुकूम निघाला. नक्की काय घडले ते मात्र कोणालाच ठाऊक नव्हते. गेले काही दिवस राजा नरेंद्रनाथ, पंडित नेकीराम शर्मा आणि अन्य प्रतिष्ठित पुढारी सरकार आणि व्यापारी मंडळ यांच्यामधील वाद मिटविण्यासाठी प्रयत्नशील होते. पण अनेक वेळा पेचप्रसंग निर्माण होऊन बोलणी थांबली होती. त्यामुळे ही घटना अनपेक्षितपणे समोर आली. नंतर हे कळले की सरकारने काही सवलती दिल्या होत्या; पण व्यापारमंडळाने केलेल्या मागण्यांबद्दल निश्चित असे आश्वासन दिलेच नव्हते! याचा परिणाम असा झाला की वरपासून खालपर्यंत सर्वांमध्ये आपल्या नेत्यांबद्दल घृणा निर्माण झाली. आपला विश्वासघात

करून जेव्हा कमाल परिणामकारक होता, तेव्हा संप मागे घेतला; अशी त्या सर्वांची भावना झाली. अनेकांनी पुन्हा धंदा सुरू करण्याचे नाकारले आणि उलट सुलट आरोपांनी वातावरण बिघडून गेले. पण चळवळीचे ऐक्य एकदा त्याला छेद गेल्यानंतर पुन्हा पहिल्यासारखे अभंग होत नाही. पुढे काही उपाय नसतो. अटक होऊन तुरुंगात आलेल्या त्यांच्या अनेक पुढाऱ्यांना या प्रकरणाची त्यांच्या अनुयायांइतकीच माहिती होती, असे दिसले. समजा, त्यांच्यापैकी कोणी संप मागे घेण्याच्या निर्णयात सहभागी असतीलच, तर त्यांनी या संबंधात गुप्तता राखली असावी. काहीही असो, आमच्या काळातल्या सामाजिक अनुभवांपैकी हा एक अत्यंत असाधारण सामाजिक अनुभव व्यापाऱ्यांच्या अधःपतनाने संपुष्टात आला.

सोळा

माझ्या बंदिवासाची मुदत मी आतापर्यंत भोगलेल्या शिक्षेइतकी कमी झाल्याची बातमी आल्यामुळे माझ्या सुटकेसाठी मी अर्धा-एक तासात तयार राहावे, असे मला सांगण्यात आले. त्या छोट्याशा आवारातले माझे सोबती मला निरोप द्यायला माझ्याभोवती जमा झाले, तेव्हा त्यांच्यापासून बाजूला होताना माझ्या अंतःकरणात एक कळ उमटली. त्यांच्याबरोबर आनंदात घालवलेल्या दिवसांची आठवण होऊन माझे मन विविध भावनांनी उचंबळून आले. काही दिवसांपूर्वी सुरू झालेला, नवीन, अपरिचित वाटणारा सहवास आता केवळ परिचितच नव्हे तर दीर्घकालीन, प्राचीन वाटत होता. काही मिनिटांतच मी तुरुंगाच्या बाहेर, दुसऱ्या बाजूला... माझ्या बाहेरच्या मित्रांमध्ये येऊन दाखल झालो.

सात

जागरूक विधायक

"जेव्हा कायदेकानू बनविण्याच्या अधिकारावर कार्यपालिकेचे आक्रमण होते तेव्हा मुक्त राज्यघटनेचे तत्त्व अनिवार्यपणे संपुष्टात येते."

– एडवर्ड गिबन

31 मार्च 1949 या दिवशी युसुफ मेहरअलींनी मुंबई विधानसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. ते दक्षिण मुंबई मतदारसघांतून निवडून आले होते. 2 जुलै 1950 या त्यांच्या मृत्युदिनापर्यंत ते विधानसभेचे सदस्य होते. या लहानशा कालखंडात त्यांनी आपल्या संसदीय कर्तृत्वाचा ठसा राज्य विधानसभेच्या कामकाजावर उमटवला. त्यांचे असाधारण बुद्धिकौशल्य व विनोदबुद्धी, उपहासपूर्ण वक्तव्य, दीर्घाभ्यासामागून डोकावणारी विद्वत्ता आणि गरीब आणि पददलित यांच्याबद्दल त्यांना वाटणारी कळकळ या त्यांच्या गुणांचेही विधिमंडळाच्या कामकाजात मोठेच योगदान होते. त्यांनी विधानसभेचे व्यासपीठ वापरले ते आपल्या सांसदीय जीवनाच्या तात्त्विक पाठपुराव्यासाठी नाही; तर सर्व आपत्ती सहन करत मूकपणे जगणाऱ्या आणि अनामिक म्हणून मरणाऱ्या सर्वांचा आवाज उठविण्यासाठी त्यांनी या व्यासपीठाचा वापर केला. संसदीय संकेतांचा भंग न करता किंवा त्या व्यासपीठाची प्रतिष्ठा आणि सभ्यता यांना बाधा येऊ न देता त्यांनी सामान्य माणसाची भूक आणि संताप यांचे प्रतिध्वनी विधिमंडळात उमटवले. युसुफ मेहरअली निधन पावले ते मुंबई विधिमंडळाच्या कामकाजावर हा कधी न पुसता येणारा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शिक्का मारूनच.

विधानसभेत युसुफ मेहरअलींनी जो प्रश्न हाती घेतला, त्याला त्यांनी नवीन झळाळी दिली नाही, असे झाले नाही. त्यांचा प्रतिवाद नेहमीच सयुक्तिक असे आणि त्यांचे जोरदार तडाखे विधानसभेतील चर्चा जिवंत राखण्यास मदत करीत.

4 एप्रिल 1949 या दिवशी चर्चेला आलेल्या 'कर्नाटक विद्यापीठ विधेयकाला' (कर्नाटक युनिव्हर्सिटी बिल) आपला संपूर्ण पाठिंबा देत असताना मेहरअलींनी आपल्या भाषणात कर्नाटकाच्या भूतकालीन वैभवाचा उल्लेख केला. 'कर्नाटक' आमच्या मनात कितीतरी रोमांचक स्मृतींना उजाळा देतो. हळेबिड आणि बेलूर येथील वास्तुशिल्पांची भव्यता तसेच विजयनगर आणि विजापूरचे वैभव या गोष्टी कर्नाटकाच्या प्राचीन सामर्थ्याची आणि मावळत्या वैभवाची आठवण करून देणारी प्रतीके आहेत असे ते म्हणाले. त्यानंतर मुख्यमंत्री श्री. बाळासाहेब खेर यांनी विधानसभेला आश्वासन दिले, की 1950 साली कर्नाटक विद्यापीठाची स्थापना केली जाईल. या आश्वासनाची नोंद घेताना मेहरअली जेव्हा विधानसभेत म्हणाले, की हे विद्यापीठ 1950 मध्ये प्रत्यक्षात आले नाही तर माझ्या आणि या सदनातील अनेक माझ्या सहकाऱ्यांची निषेध करणारी भाषणे ऐकण्याची तयारी ठेवा, तेव्हा मेहरअलींच्या या उद्‌गारांनंतर हास्याचा गडगडाट झाला. शिक्षणासंबंधी बोलताना मेहरअलींना कर्नाटकातील शास्त्रीय संगीताच्या परंपरेचा विसर पडला नाही. त्या विषयावर सभागृहात बोलताना ते म्हणाले, "मला अशी आशा आहे की कर्नाटक विद्यापीठ 'संगीत' या विषयाचीही दखल घेईल. कारण कर्नाटक संगीताने भारतीय संगीतात आघाडीचे स्थान मिळविले आहे... ज्यांना संगीताची मूलतत्त्वे माहीत आहेत, त्यांना त्या संगीतातील अद्‌भुतता मान्यच करावी लागेल."

सप्टेंबर 1949 मध्ये मुंबई विधानसभेत 'मेहवास्सी जमीन भाडेपट्टा निराकरण विधेयक' (मेहवास्सी टेन्युअर ॲबॉलिशन बिल) चर्चेसाठी आले. त्यावर मानसिंहजी भासाहेब, युसुफ मेहरअली आणि महसूलमंत्री मोरारजी देसाई यांच्यामध्ये मार्मिक शाब्दिक फटकेबाजी झाली. याचा थोडासा नमुना संसदीय कामकाजाच्या अहवालामधून खाली उद्‌धृत केला आहे :

सरदार मानसिंहजी भासाहेब : 1955 मध्ये ज्यांची मुदत संपते अशा जमिनींचे भाडेकरार सरकारने आजच समाप्त करणे कायदेशीरदृष्ट्या किती योग्य आहे? संशयास्पद परिस्थिती आहे... त्यासाठी जी नुकसान भरपाई सुचविली आहे, कर आकारणीच्या तिप्पट रक्कम – ही व्यवहाराला आणि विवेकाला धरून होईल असे वाटत नाही.

` युसुफ मेहरअली : आताच माझ्या आधी बोललेल्या माझ्या आदरणीय स्नेह्यांनी जी विधाने केली, त्याबद्दल मला त्यांना सांगावेसे वाटते की, त्यांनी 1955 सालचा विचार करू नये; तर त्याआधी पाच वर्षे सरकार जो मोबदला उदारपणे देऊ करत आहे तो स्वीकारावा... 1955 साली सध्याचे सरकार सत्तेवर असणार

नाही आणि जर समाजवादी सत्तेत आले तर जमिनीवरील हक्क सोडण्याबाबत नुकसान भरपाई देण्याचा कलेक्टरला अधिकार राहणार नाही... सर्वांना हे ठाऊकच आहे की सध्याचे महसूलमंत्री हे एखाद्या कोकरासारखे निष्पाप आहेत (हशा) ते अत्यंत मवाळ आणि गोडबोलेही आहेत. तेव्हा माझ्या सन्माननीय मित्रांनी त्यांच्याकडून मिळेल ते घ्यावे हे बरे; नाही तर दुसरे लोक येथे येऊन शेतकऱ्यांना त्यांचे योग्य व न्याय्य अधिकार देतील.

मोरारजी देसाई : मुंबईचे माझे सन्माननीय मित्र श्री. युसुफ मेहरअली यांनी भविष्यकाळात जर या प्रांतात सोशलिस्ट पार्टीचे सरकार सत्तेवर आले तर काय होऊ शकेल, याचा एक पुरावा त्यांच्या भाषणातून दिला आहे. त्यांना अशी आशा वाटते आहे की हे शक्य होईल. पण ही शक्यता 25% इतकीही नाही, असे मला वाटते. (ऐका, ऐका, असा आरडाओरडा) अर्थातच ते तशी आशा करू शकतात. जर जनतेला ते हवे असतील तर ते सत्तेत येतील, पण आमचे मित्र युसुफ मेहरअली यांचा महसूल विषयक लवाद मंडळ (रेव्हेन्यू ट्रायब्यूनल) आणि ज्युडिशिअल कोर्टस् (न्यायालये) यांच्याविषयीचा दृष्टिकोन चुकीचा आहे, हे लोकांनी लक्षात घ्यावे.

दुसऱ्या एका प्रसंगात जेव्हा युसुफ मेहरअली कापड गिरण्यांतील बेकारीबद्दलच्या तहकुबी सूचनेवर बोलत होते, तेव्हा म्हणजे 13 सप्टेंबर 1949 या दिवशी श्री. रामनाथ पोतदार यांच्या वक्तव्यानंतर मेहरअलींनी त्यांना चपखल उत्तर दिले. त्यांच्या वक्तव्याला वस्तऱ्याची धार होती.

रामनाथ ए. पोतदार : महाराज, माहितीचा मुद्दा उपस्थित करून मी जाणून घेऊ इच्छितो की माननीय सदस्य श्री. युसुफ मेहरअलींना, कापड उद्योगावरील नियंत्रण दूर करण्यास त्या व्यवसायातील उद्योगपतींचा सक्त विरोध होता, हे माहीत आहे का?

युसुफ मेहरअली : महाशय, माझ्या भांडवलदार सहकाऱ्याच्या निरागसतेने आणि त्याला मिळालेल्या गैरमाहितीमुळे मी चकित झालो आहे!

आणि त्यानंतर मेहरअलींनी कापडउद्योग चालवत असताना भांडवलदार उद्योगपतींचा त्या उद्योगासंबंधित दृष्टिकोनात जो विसंवाद होता तो उघड करीत आपले भाषण चालू ठेवले.

म्युनिसिपल कार्पोरेशन बिलाच्या संदर्भात बोलताना त्यांनी त्या चर्चेला भरीवपणा आणि प्रतिष्ठा आणली, त्याचे कारण, 1942 मध्ये ते मुंबईचे महापौर म्हणून निवडून आलेले असताना त्यांना जो प्रत्यक्ष अनुभव मिळाला आणि त्यातून विविध समस्यांविषयी जे ज्ञान झाले, ते होते. मुंबई महानगरपालिकेला महापालिका आयुक्त (म्युनिसिपल कमिशनर) नेमण्याचा अधिकार असला पाहिजे, या मुद्यावर भर देऊन बोलताना मेहरअली म्हणाले :

"इथे मुंबई प्रांतात महापालिका आयुक्तांच्या नेमणुकीचा अधिकार सरकारने आपल्या हातांत ठेवला आहे. पण कलकत्ता आणि कराची या दोनही शहरांत हा अधिकार महापालिकाच बजावतात. जेव्हा सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी, स्थानिक स्वराज्य संस्था या खात्याचे मंत्री, या अधिकारात कलकत्ता महापालिका विधेयक मांडले, तेव्हा त्यांनी महापालिकेचे आयुक्त नेमण्याचा अधिकार त्या संस्थेलाच दिला होता. पंचवीस वर्षांपूर्वी तो अधिकार प्रदान करणे हे स्थानिक स्वराज्य संस्थांत एक क्रांतिकारक पाऊल टाकले असे समजले गेले."

म्युनिसिपल कार्पोरेशन बिलावरील चर्चेत मेहरअलींनी जगातील विविध देशांत विविध शहरांतील महापालिकांचे कामकाज या विषयाचा जो विस्तृत अभ्यास केला होता, त्याच्या आधारे सभागृहासमोर मौलिक माहिती सादर केली.

युसुफ मेहरअलींनी या चर्चेत 'महापालिका समाजवाद' लागू करण्यासाठी युक्तिवाद केला. व्हिएन्ना महापालिकेने दूध पुरवठा, म्युनिसिपल बँकांची स्थापना, सिनेमागृहे, बेकऱ्या, गृहनिर्माण इत्यादी नागरी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सुखसोयींकरिता भरीव कामगिरी केल्याचे सांगितले. अशी पावले टाकली तर महापालिकेचा महसूल तर वाढेलच; शिवाय राज्य सरकारवरील महापालिकेचे अतिरिक्त अवलंबित्वही कमी होईल, असे मेहरअली आपल्या भाषणात म्हणाले. याच चर्चेत मतदारांच्या 'लोकप्रतिनिधीला परत बोलावण्या'च्या हक्काबाबत युसुफ मेहरअलींनी जोरदार युक्तिवाद केला. ज्या नगरसेवकाने आपल्या मतदारसंघातील जनतेच्या आवश्यक सुखसोयी पाहिलेल्या नाहीत, त्याच्या मतदारसंघातील नागरिकांच्या मागणीवरून त्याचे नगरसेवकत्व रद्द झाले पाहिजे, असे ते म्हणाले.

औद्योगिक संबंध कायद्यानुसार कापड गिरण्यांमधील अनेक कामगार संघटनांपैकी प्रातिनिधिक म्हणून मान्यता कोणत्या संघटनेला देण्यात यावी, या विषयावरील तरतुदींबाबत कामगारांमध्ये बराच असंतोष होता. 1983 साली मुंबईमध्ये एक वर्षापेक्षा अधिक काळ चाललेल्या गिरणी कामगारांच्या संपाच्या मुळाशीही हाच असंतोष होता. कापडगिरण्यांत प्रातिनिधिक म्हणून मान्यता देण्यात आलेली कामगार संघटना राज्यातील सत्ताधारी पक्षाकडून लादण्यात आली होती. या संघटनेला खास अधिकार, सोयी सवलतीही प्रदान करण्यात आल्या होत्या. 1949 सालीच युसुफ मेहरअलींनी अशा प्रकारच्या असंतोषाची नोंद घेऊन त्याची चर्चा विधानसभेत केली होती.

"जेव्हा प्रत्यक्षात एखाद्या कामगारसंघटनेला सरकार आणि उद्योगपतींचा पाठिंबा आहे असे म्हटले जाते, तेव्हा त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांना कामगारांमध्ये

फिरून असा विश्वास निर्माण करता येतो, की त्यांच्या आकांक्षा लवकरच पुऱ्या होतील. हे सर्व ती कामगार संघटना सरकारी आश्रयावर आणि मालकांच्या मर्जीवर चालते म्हणून होऊ शकते. उत्कृष्ट कामगार संघटनेच्या निकषावर ती कामगारसंघटना कार्यक्षम ठरेलच असे नाही."

मुंबई महापालिका (सीमा-विस्तार) विधेयकावर बरेच मतभेद होते. 14 मार्च 1950 रोजी या विधेयकावर बोलताना युसुफ मेहरअलींनी महापालिका निवडणुकांच्या बाबतीत सरकारने चालविलेली डोळेझाक सदस्यांच्या लक्षात आणून देताना सरकारवर टीकेची झोड उठविली. सरकारचा भर महापालिकेत नियुक्त सदस्य पाठविण्यावर आहे हे नमूद करून कार्यपालिकेकडून (एक्झिक्युटिव्ह) प्रत्यक्ष कायदे बनवणाऱ्या संस्थेवर (विधिमंडळावर) यामुळे आक्रमण होत आहे, याची नोंद घेऊन युसुफ मेहरअलींनी सभागृहाला एक विनोदी किस्सा सांगितला :

"ऑस्कर वाइल्ड या प्रसिद्ध लेखकाने एक नवीन नाटक लिहिले, आणि लेखक म्हणून त्याची कीर्ती पसरलेली असली, तरी त्याच्या या नाटकाला मात्र प्रतिसाद मिळाला नव्हता. त्यामुळे तो खट्टू झालेला होता. एके दिवशी क्लबमध्ये त्याला कोणीतरी ते नाटक कसे काय चालले आहे, याबद्दल विचारणा केली. तेव्हा त्याने चटकन् उत्तर दिले की नाटक यशस्वी झाले आहे; पण प्रेक्षक मात्र (उपस्थित राहण्यात) अपयशी ठरले आहेत."(हशा.)

"याच मुद्यावर मला भर द्यावयाचा आहे. सरकार जणू असे म्हणते आहे– आम्हांला लोकशाही हवी आहे पण निवडणुका मात्र पुढे ढकलल्या पाहिजेत आणि अप्रत्यक्ष निवडणुकींतून नियुक्ती करून प्रतिनिधी पाठवले पाहिजेत. नागरी स्वातंत्र्याबद्दल आम्हांला आस्था आहे पण सार्वजनिक सुरक्षा कायद्याच्या तरतुदींचीही आवश्यकता आहे. न्यायालयाच्या संपूर्ण स्वातंत्र्याचे आम्ही चाहते आहोत, पण त्यांच्या चौकशीवर नियंत्रण ठेवण्याकरिता स्थानबद्धतेच्या अधिकारांचीही आवश्यकता आहे."

या विषयावरील चर्चेत युसुफ मेहरअलींनी आपल्या अमोघ वक्तृत्वाने बाजी मारली आणि सरकारची बाजू त्यामुळे अक्षरशः लुळी पडली.

युसुफ मेहरअली एक आधाशी वाचक होते. त्यामुळे इतिहासातील अनेक प्रसंगांची माहिती त्यांच्या हातांच्या बोटांवर होती. त्यामुळे त्यांची जमेची बाजू भक्कम असे आणि त्याच वेळी सरकार पक्षाला मात्र फजितीला तोंड द्यावे लागे.

राज्यपालांच्या अभिभाषणानंतर आभाराचा ठराव विधानसभेपुढे आला, तेव्हा कमालीच्या उपहासगर्भ शब्दांत युसुफ मेहरअलींनी आपले मनोगत व्यक्त

केले. ते म्हणाले, "राज्यपाल हे संवैधानिक शासक आहेत आणि त्यांनी व्यक्त केलेले विचार हा सरकारचा दृष्टिकोन आहे, असे मानणे हेच जमिनीवर पाय घट्ट ठेवण्यासारखे आहे. म्हणून राज्यपाल 'जॉली गुड फेलो' आहेत असे म्हणायला हरकत नाही. त्याचबरोबर या नाटकात सरकार 'खलनायक' आहे असेही म्हणावे लागते."

मेहरअलींच्या या शेऱ्यानंतर विधानभवनात जो वाद झडला तो मनोरंजक होता.

बाबूभाई जे. पटेल : 'सभापती महाशय, 'जॉली गुड फेलो' ही उक्ती संसदीय आहे का?

माननीय सभापती : ही शब्दसंहिता संसदीय आहे की नाही, मी सांगू शकत नाही; पण मी एवढे मात्र सांगेन, की शासनयंत्रणेच्या प्रमुखाला 'जॉली गुड फेलो' म्हणणे हे मला योग्य वाटत नाही. ही योग्य अभिव्यक्ती नाही.

बी. जी. खेर : ही अभिव्यक्ती संसदीय आहे अथवा नाही ते आपण ठरवायचे आहे. अध्यक्ष महाशय, माननीय सदस्य हे संसदीय आचारांचे एक उत्कृष्ट विद्यार्थी आहेत, असा माझा समज होता. त्यामुळे राजाच्या वक्तव्याइतकाच राज्यप्रमुखाच्या भाषणालाही योग्य मान दिला पाहिजे, हे त्यांना माहीत असेल असे वाटले; पण अशा प्रकारचे अयोग्य आणि अभिरुचीहीन शेरे हे मारू शकतात हे मला नव्यानेच उमगले. ते राज्यपालांबद्दल असे कसे बोलू शकतात ते मला कळत नाही...

युसुफ मेहरअली : एक धडा यांनी गिरवलेला नाही तो असा, की (दुसऱ्याच्या) बोलण्यात मधूनमधून खंड पाडू नये. मिनिटामिनिटाला ते उडी मारून उभे राहतात. अध्यक्ष महाशय, आमचे माननीय मुख्यमंत्री इतिहासाचे अधिकारी पुरुष आहेत. त्यांना हे माहीत असले पाहिजे की महत्त्वाच्या प्रसंगी ब्रिटिश पंतप्रधानांचे अगर दुसऱ्या महत्त्वाच्या सन्माननीय व्यक्तींचे पार्लमेंटमधील भाषण संपले, की सभागृहातील सर्व उभे राहून 'फॉर ही इज् दी जॉली गुड फेलो' हे सांघिक रीतीने म्हणतात. माननीय मुख्यमंत्र्यांना ही गोष्ट माहीत नसेल, तर त्यात माझा काय दोष?

युसुफ मेहरअलींच्या या चपखल उदाहरणाने मुख्यमंत्री आणि सभापती हैराण झाले, हे सांगण्याची आवश्यकता नाही. "इंग्लंडमध्ये काहीही परंपरा असतील पण इथे त्या पाळण्याची गरज नाही," एवढीच सारवासारव सभापती करू शकले. सभापतींचा निर्णय अखेरचा असला तरी दिवस मात्र युसुफ मेहरअलींचाच होता!

युसुफ मेहरअलींना हे माहीत होते की जेव्हा पोलीस गोळीबार करतात आणि त्यात मृत्यू घडतात, तेव्हा वृत्तपत्रांतून येणाऱ्या वृत्तांतातून पूर्ण माहिती मिळत

नाही. कारण सरकार तपशील पुरवण्याबाबत वृत्तसंस्थांशी सहकार्य करीत नाही. मेहरअलींनी त्यासाठी तारांकित व अतारांकित प्रश्नांचा वापर करून संबंधित मंत्र्यांकडून हवी ती माहिती मिळविण्याचे सत्र चालू केले. 13 ऑगस्ट 1949 या दिवशी साबरमती तुरुंगात कम्युनिस्ट राजबंद्यांवर झालेल्या गोळीबाराचा तपशील युसुफ मेहरअलींनी अशाच पद्धतीने मिळवला. ते दिवस कम्युनिस्टांच्या साहसवादी धोरणाचे होते. 1948 च्या रणदिवे नीतीप्रमाणे जेलमध्ये स्थानबद्ध असलेल्या कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी जेलमध्येसुद्धा पोलिसांबरोबर हिंसक संघर्ष करावा, असे त्यांना आदेश होते. मेहरअलींनी आपल्या तंत्राचा वापर करून साबरमती जेलमध्ये झालेल्या कम्युनिस्ट राजबंदी व पोलीस यांच्यामधील सशस्त्र संघर्षाची माहिती पक्की केली. या संघर्षात जयंतीलाल पारेख व जमनादास मोदी हे दोघे कम्युनिस्ट कार्यकर्ते ठार झाले होते.

अन्न उत्पादनासाठी भूमिसेनेची उभारणी करणे मेहरअलींना अत्यावश्यक वाटत होते. त्यांनी त्या आशयाचा ठराव मुंबई विधानसभेत मांडलाही होता. 26 सप्टेंबर 1950 या दिवशी मेहरअलींना श्रद्धांजली वाहणारा ठराव जेव्हा मुंबई विधानसभेसमोर आला, तेव्हा त्या ठरावावर बोलताना मुख्यमंत्री बी.जी. तथा बाळासाहेब खेर आणि समाजवादी विधायक पीटर अल्वारिस या दोघांनी युसुफ मेहरअलींच्या भूमिसेनेवरील या ठरावाचा आवर्जून उल्लेख केला. या ठरावामागील शोकांतिकेचा उल्लेख पीटर अल्वारिस यांनी आपल्या भाषणात केला. ते म्हणाले :

"भूमिसेनेवरील मेहरअलींचा ठराव या अधिवेशनाच्या पटलावर आहे आणि त्याचा उल्लेख मुख्यमंत्र्यांनीही केलेला आहे. मी असे सांगू इच्छितो की त्यामागे एक शोकान्तकथा आहे. संबंधित मंत्र्यांशी सल्लामसलत करून मागील अधिवेशनात हा ठराव मांडण्यासाठी मेहरअली अतिशय उत्सुक होते. इतर अनेक ठरावांच्या आधी तो ठराव आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. माझ्या नाराजीला डावलून स्वतः आजारी असताना आपला ठराव मांडण्यासाठी ते या सभागृहात आले. आणि इथेच त्यांना हृदयविकाराचा झटका आल्यावर मी त्यांना उचलून नेले. त्यातून ते कधीच उठू शकले नाहीत. हा इतिहास आहे भूमिसेनेच्या या ठरावामागचा."

युसुफ मेहरअलींच्या निधनानंतर मुंबई विधानसभेत त्यांना भरभरून आदरांजली वाहण्यात आली. विकसित होणारे युसुफ मेहरअलींचे जीवनपुष्प पूर्ण प्रफुल्लित होण्याआधीच अकाली गळून गेले याबद्दल सर्वांनाच अतिशय हळहळ वाटली.

युसुफ मेहरअलींचे स्वातंत्र्य लढ्याला, समाजवादी चळवळीला झालेले योगदान, युवकांच्या जागृतीसाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न, कामगार चळवळ, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रातला त्यांचा सहभाग, आणि सामाजिक जीवनात सामाजिक सुरक्षा योजनेसकट त्यांनी राबविलेल्या योजना या साऱ्यांची नोंद 26 सप्टेंबर 1950 या दिवशीच्या विधानसभेच्या कामकाजाच्या वृत्तांतात झाली. विधानसभेचे सभापती, मुख्यमंत्री बी. जी. खेर, पीटर अल्वारिस, ए. ए. खान, आणि तुळसीदास जाधव यांनी उत्कट शब्दांत मेहरअलींना श्रद्धांजली वाहिली. विधानसभेच्या कामकाजाचा वृत्तांत मेहरअलींच्या तेजस्वी नावाने त्या दिवशी अखेरचाच विभूषित झाला.

आठ

न विरणारे स्मृतिगंध

"कदाचित शक्य आहे की कोमेजून जाणाऱ्या फुलांच्या आणि जीर्ण होऊन गळणाऱ्या पर्णांच्या ऋतूत काही एकाकी विश्रांतीचे क्षण येतील, जेव्हा तुझ्या विरणाऱ्या स्मृतींच्या कोपऱ्यात माझ्या तुरळक अस्तित्वाचे क्षण तुला गवसतील."

– **रवींद्रनाथ टागोर**

थोर व्यक्तींच्या आयुष्यात वरवर साधे दिसणारे तरीही महत्त्वाचे प्रसंग आणि उत्कट क्षण येतात. त्यांच्या आठवणी त्या व्यक्तींच्या स्मृती तेजस्वी आणि लखलखीत बनवितात. युसुफ मेहरअलींचे आयुष्य असेच भव्य व उज्ज्वल होते.

7 ऑगस्ट 1942 या दिवशी काही तरुण युसुफ मेहरअलींना भेटले, त्यावेळी ते मुंबईचे महापौर होते. त्यांना त्या युवकांनी टायपिनचा एक नमुना दाखवला, त्यामध्ये भारताचा नकाशा चांदीत कोरलेला होता आणि त्यावर ठळक अक्षरांत, लाल रंगात रोमन अक्षर 'क्यू' हे कोरले होते. ऐतिहासिक घोषणा 'क्विट इंडिया'चे ते प्रतीक होते. त्या मुलांची ती कारागिरी पाहून मेहरअली आनंदित झाले आणि मुंबईत बिर्ला हाऊसमध्ये उतरलेल्या महात्मा गांधींना दाखविण्यासाठी ती टायपीन घेऊन गेले. गांधीजीही ती कलाकुसर पाहून प्रसन्न झाले; पण ते म्हणाले, "या गरीब देशाला चांदीची वस्तू कशी परवडेल? माझा असा सल्ला आहे की या पिना तांबे वापरून बनवून घ्याव्यात आणि काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनात विकण्यासाठी ठेवाव्यात. एका रात्रीत त्या तरुणांनी मेहरअलींच्या सूचनेनुसार असे हजारो बिल्ले बनवून घेतले; आणि 1942 ऑगस्टमध्ये भरलेल्या काँग्रेसच्या महासमितीच्या अधिवेशनात विकले. जमलेली रक्कम काँग्रेस महासमितीकडे सोपविण्यात आली. काँग्रेससाठी निधी जमा करण्याचे मेहरअलींचे मार्ग असे कल्पक होते. 1942 साली मेहरअली मुंबईचे महापौर होते, तेव्हा त्यांची महापौर म्हणून कार्य करण्याची पद्धत

काही आगळीच होती. महापौर पदावर केवळ ते स्थान सुशोभित करणारी व्यक्ती म्हणून राहण्याचे त्यांनी नाकारले आणि अमेरिकन पद्धतीप्रमाणे प्रत्यक्ष कार्यवाहीत लक्ष घालण्याचे ठरविले. महत्त्वाच्या फायली व कागदपत्र डोळ्यांखालून घालण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यामुळे हाताखालील अधिकाऱ्यांचा रोष त्यांना सहन करावा लागला पण ते आपल्या कार्यक्रमापासून ढळले नाहीत.

* * *

9 ऑगस्ट 1942 या दिवशी युसुफ मेहरअलींना महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, सरदार पटेल आदी नेत्यांबरोबरच अटक करण्यात आली. एका खास गाडीने त्यांना मुंबईहून पुण्याला नेण्यात येत होते. गाडीमध्ये युसुफ मेहरअली या नेत्यांना भेटण्यासाठी गाडीच्या वेगवेगळ्या डब्यांमध्ये फिरून येण्यास निघाले. पण पोलीस अधिकाऱ्यांनी त्यांना अडवले. तेव्हा युसुफ मेहरअलींनी त्यांना फैलावर घेतले. ते म्हणाले, "मी मुंबईचा महापौर आहे हे तुम्हांला माहीत नाही काय?" पोलीस अधिकारी एकदम चमकून मागे सरले आणि युसुफ मेहरअलींचा मार्ग मोकळा झाला.

* * *

8 ऑगस्ट 1942 ला 'चले जाव' (क्विट इंडिया) ठराव संमत झाल्यावर काँग्रेस नेत्यांना अटक करून ब्रिटिश सरकारने येरवडा मध्यवर्ती कारागृहात ठेवले. मेहरअली आणि इतर महत्त्वाच्या नेत्यांना 'अ' वर्ग मिळाला; तर अनेक छोटे-मोठे बहुसंख्य कार्यकर्ते 'ब' वर्गात होते. 'अ' वर्गातील राजबंद्यांकडे फळे व अन्य गरजेच्या वस्तूंची पार्सले येत असत. त्या गोष्टी मेहरअली आणि त्यांचे सहकारी बेकायदेशीरपणे लपवून 'ब' वर्गाच्या बराकीत हस्तांतरित करीत असत. एक दिवस ते त्या कामात पुराव्यासकट पकडले गेले. पण युसुफ मेहरअलींनी या घटनेचा सर्व दोष स्वतःवर घेतला आणि जेलमधील अधिकाऱ्यांना, त्यांनी दुसऱ्या कोणालाही त्रास देऊ नये, असे बजावले. युसुफ मेहरअलींचे व्यक्तिमत्त्व आणि नैतिकता यांच्या प्रभावामुळे अधिकाऱ्यांनी माघार घेऊन या घटनेकडे कानाडोळा केला.

* * *

युसुफ मेहरअली जेव्हा जेलमधील आपल्या सहकाऱ्यांशी किंवा इतर राजबंद्यांशी बातचीत करीत असत, तेव्हा त्यांना समजून येई की युसुफ हा माणूस फक्त राजकारणी नाही. त्याला कला, वास्तुशिल्प, प्राच्यविद्या संशोधन, साहित्य इत्यादी क्षेत्रांतही बरीच समज आहे. एकदा त्यांनी बुद्धाच्या शिकवणीबद्दल विवेचन केले, ते

ऐकून त्यांच्याबरोबरचे राजबंदी चकित झाले. एका मुस्लिम व्यक्तीच्या तोंडून हे ऐकायला मिळणे हा अपूर्व योग होता.

संगीत, नृत्य, चित्रकला इत्यादी ललित कलांमध्ये युसुफ मेहरअलींना फारच स्वारस्य होते. त्या क्षेत्रांतील कलाकारांचे कौतुक करण्यासाठी ते वेळोवेळी त्यांना सुंदर सुंदर कलाकृती भेट म्हणून देत. या भेटी स्नेहभावनेने ओथंबलेल्या मनाने दिल्या जात. युसुफ मेहरअली हे आयुष्यातील विविध गोष्टींमध्ये रस घेणारे बुद्धिवादी होते; पण त्यांच्या बुद्धिवादाला अहंकाराचा जराही वास नव्हता.

* * *

युसुफ मेहरअली विद्यार्थीदशेत असताना ते आणि त्यांचे मित्र यांना जीना आणि जयकर यांच्यासारख्या कायदेपंडितांचे आणि विद्वानांचे फार आकर्षण वाटे. जनतेच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या काही गोष्टींसंबंधात मधूनमधून या प्रसिद्ध व्यक्तींच्याबरोबर त्यांच्या भेटी होत. युसुफ मेहरअलींच्या पुढाकाराने 15-20 तरुणांचा 'यंग इंडिया सोसायटी' नावाचा एक गट तयार झाला होता. सदस्यत्वाची अट अशी होती की दरवर्षी प्रत्येक सभासदाने देशासमोरील एका तरी मोठ्या प्रश्नावर एक प्रबंध सादर करावयाचा. युसुफ मेहरअली आणि सोली बाटलीवाला यांनी 'भारताचे संरक्षण' हा विषय त्यांच्या प्रबंधासाठी निवडला; आणि बॅ. जीनांना मार्गदर्शनाची विनंती त्यांनी केली. जीना कायदेमंडळाचे (लेजिस्लेटिव्ह ॲसेम्ब्ली) सदस्य होते. त्यामुळे 'संरक्षण' या विषयावरील सर्व साहित्य त्यांना उपलब्ध होते. ते युसुफ मेहरअलींना व त्यांच्या मित्रांना ते सहज देऊ शकत. त्या दिवसांत जीना प्रकांड पंडित आणि कडवे देशभक्त म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी मेहरअली आणि त्यांच्या मित्रांशी आठवड्यातून एक दिवस मुंबई हायकोर्टमधील त्यांच्या खास खोलीत बसून प्रचलित प्रश्नांची चर्चा करण्यास मान्यता दिली. त्या दिवशी मेहरअली आणि त्यांचे मित्र यांना जीनांच्या दैनंदिन कार्यक्रमांत अग्रक्रम असे. एकदा असेच ते मेहरअली आणि त्यांच्या मित्रांबरोबर चर्चा करण्यात मग्न असताना एक सॉलिसिटर घाईघाईने जीनांच्या खोलीत घुसले व त्यांच्यासमोर काही कागद ठेवून म्हणाले, "महाशय, माझ्याकडे एका मोठ्या खटल्याचे..." त्यांचे वाक्य पूर्ण होऊ न देताच जीना त्यांच्यावर खेकसले. माझ्याबरोबर हे 'यंग इंडिया सोसायटी'चे विद्यार्थी बसले आहेत, हे दिसत नाही का? बाहेर चालू लाग.' असे म्हणत समोरचे कागदपत्र त्यांनी बाहेर फेकून दिले. याचा अर्थ त्यांनी हजारो रुपये बाहेर फेकले होते. युसुफ आणि त्यांचे मित्र यांच्याबद्दल जीनांना वाटणारे कौतुक व मित्रभावना अशा प्रकारची होती.

जगातील विविध देशांमध्ये मेहरअलींचे चाहते होते. लॉर्ड फेन्नर ब्रॉकवे हे ब्रिटिश नेते मेहरअलींची तारीफ करताना म्हणाले, "मेहरअली मला भारतात आणि लंडनमध्ये भेटले होते, तेव्हाच्या त्यांच्या उबदार आठवणी माझ्या मनात अद्यापही ताज्या आहेत. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला वाहून घेऊन त्या लढ्यात ते धैर्याने उतरले, एवढेच फक्त नाही; तर त्यांना हेही जाणवले की समाजवादातील समानताच या देशातील गरिबांचा उद्धार करील आणि राजकीय स्वातंत्र्याप्रमाणेच त्यांना आर्थिक मुक्तीचाही लाभ करून देईल. मी जेव्हा त्यांना भारतात भेटलो, तेव्हा त्यांचा ध्येयवाद आणि सौम्य स्वभाव यांचीच केवळ माझ्यावर छाप पडली असे नाही; तर समाजवादी चळवळ गतिमान व्हावी म्हणून त्यांनी जो प्रत्यक्ष कृतीचा मार्ग स्वीकारला, त्यानेही मी प्रभावित झालो. त्यांनी त्या उद्दिष्टांसाठी स्वतःला सर्वार्थाने वाहून घेतले, त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवरही झाला. मी जेव्हा त्यांना लंडन येथे पाहिले त्यावेळी ते रोगग्रस्त होते, अंथरुणावरच होते; पण त्यांच्या चेहऱ्यावरची खुषी आणि आशावाद नेहमीप्रमाणे होता. त्यांची स्मृती माझ्या मनाला सदैव स्फूर्ती देईल."

* * *

विद्यार्थी दशेतले युसुफ मेहरअलींचे जे मित्र होते, त्यांना ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी आकांक्षासंबंधी बोलताना मेहरअली कसे उत्स्फूर्त आणि तिखट शेरे मारीत याची वरचेवर आठवण होते. मुंबईत एलफिन्स्टन कॉलेजमागील ओव्हल मैदानात एका जाहीर सभेत बोलताना मेहरअली म्हणाले, की ब्रिटिशांच्या राजमुकुटातून भारताचे रत्न बाहेर काढून घेतले तर इंग्लंड हे हॉलंडसारखे एक चिमुकले राष्ट्र बनेल. दुसऱ्या एका वेळी ब्रिटिशांवर जहरी हल्ला चढवताना मेहरअली म्हणाले, 'ब्रिटिश शासक हे कुत्र्याप्रमाणे वागतात. तुम्ही त्यांना लाथ मारली तर ते तुमचे पाय चाटतात. पण जर तुम्ही त्यांना चाटू लागलात तर तुम्हांला लाथा बसतात.

* * *

बर्ट्राम वुल्फ हा सुप्रसिद्ध अमेरिकन लेखक. त्याचे 'थ्री हू मेड द रेव्होल्यूशन' नावाचे रशियन क्रांतीवरील पुस्तक प्रसिद्ध आहे. युसुफ मेहरअलींच्या आयुष्यातील काही मनोरंजक हकीगती त्यांच्याकडून ऐकायला मिळाल्या.

जेव्हा युसुफ मेहरअली अमेरिकेत बर्ट्राम वुल्फना भेटले तेव्हा त्यांनी वुल्फ यांचे 'पोर्टेट ऑफ मेक्सिको' हे पुस्तक आपण आणि आपल्या मित्रांनी तुरुंगात वाचून त्याचा आस्वाद घेतल्याचे त्यांना सांगितले. वुल्फनी त्यांना ते पुस्तक तुरुंगात कसे मिळवले, असे विचारल्यावर मेहरअलींनी त्यांना एक मजेदार गोष्ट सांगितली.

तुरुंगात असताना त्यांनी जेलरकडे बायबलची मागणी केली. युसुफ मेहरअली मुस्लिम असल्यामुळे त्यांनी कुराण वाचले पाहिजे, त्यांना बायबल मिळणार नाही असे जेलरने सांगितले. आपली बायबलची मागणी नाकारली म्हणून युसुफ मेहरअली आणि त्यांचे मित्र यांनी तुरुंगात अन्नसत्याग्रह सुरू केला. 'पवित्र बायबल' देण्याचे नाकारले म्हणून भारतातील तुरुंगात कैद्यांनी अन्नसत्याग्रह केला, ही गोष्ट जगभर कळली तर आपली नाचक्की होईल, या भीतीने वरिष्ठ जेल अधिकाऱ्यांनी राजबंद्यांना बायबल देण्यात यावे असे फर्मावले. पण आता सत्याग्रह्यांना जोर चढला होता. त्यांनी आपल्याला वाचायला हवीत ती सर्व पुस्तके बायबलबरोबर मिळाली पाहिजेत अशी मागणी पुढे करून पुस्तके मिळाली तरच भूक-हरताळ मागे घेऊ, असे अधिकाऱ्यांना सांगितले. शेवटी नाइलाज होऊन जेलच्या अधिकाऱ्यांनी ही मागणीसुद्धा मान्य केली. अशा रीतीने युसुफ मेहरअलींनी बर्ट्राम वुल्फचे 'पोर्ट्रेट ऑफ मेक्सिको' मिळविले. ही हकीगत ऐकून वुल्फ रोमांचित झाले.

अमेरिकेत असतानाच वुल्फ युसुफ मेहरअलींना स्टेशनवॅगनमधून फिरण्यासाठी केपच्या द्वीपकल्पावर घेऊन गेले. ग्रेट बेचा आतील किनारा आणि अटलांटिक महासागराचा बाहेरील किनारा या दोनही ठिकाणी ते हिंडले. त्या द्वीपकल्पाच्या टोकाशी जेव्हा ते पोहोचले, तेव्हा या टोकाला 'रेस पॉइंट' म्हणतात असे वुल्फनी त्यांना सांगितले. कारण जेव्हा अटलांटिक आणि मॅसॅच्युसेट्सचा उपसागर यांचे पाणी एकत्र येते तेव्हा एक मोठी लाट त्या द्वीपकल्पाच्या टोकाभोवती फिरते. मेहरअली अचानक तिथे थांबले. आणि त्यांनी ज्या टोकाशी त्या दोनही सागरांचे पाणी एकत्र येते, त्या दिशेने चालायला सुरुवात केली. अगदी टोकाशी आल्यावर त्यांनी पायातली पादत्राणे काढली आणि तेथील पाण्याच्या भोवऱ्यात उघड्या पायांनी ते चालू लागले. वुल्फना ते म्हणाले, 'आम्ही भारतीय असे मानतो की कोणत्याही दोन प्रवाहांचा संगम पवित्र असतो.' मेहरअलीचे हे वाक्य वुल्फना जाणीव देऊन गेले की समाजवादी तत्त्वज्ञान आणि भारतीयांच्या प्राचीन श्रद्धा यांचा युसुफ मेहरअलींच्या व्यक्तिमत्त्वात सुरेख मिलाफ झाला आहे.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर मेहरअलींच्या मनातला ब्रिटिशांबद्दलचा कडवटपणा कमी झाला होता. त्यांच्या न्यायप्रेमाबद्दल त्यांना आस्था वाटू लागली होती.

एकदा बोलता बोलता बर्ट्राम वुल्फ यांनी मेहरअलींना दीर्घ काळ तुरुंगात डांबणाऱ्या 'ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीचा' उल्लेख करून डिवचले. त्यावर कळकळीने बोलताना मेहरअली म्हणाले, "जरी ब्रिटिशांनी आमच्यावर जुलूम केला तरी त्याबद्दल ते अस्वस्थ होते. ब्रिटिश जेलमधील अन्नसत्याग्रहामुळे वाचण्यासाठी मला बायबल आणि तुमचे पुस्तक मिळाले. हिटलर किंवा स्टॅलिनच्या तुरुंगात असतो तर

मला तोफेच्या तोंडी जावे लागले असते. परकीय सत्तेला अहिंसक पद्धतीने विरोध करण्याचे गांधींचे सर्व तंत्रच अशा गृहितांवर आधारित होते, की इंग्रज स्वभावाने अधिक न्यायप्रिय असल्यामुळे त्यांच्याकडे अर्ज, विनंत्या करता येणे शक्य आहे.'' मेहरअलींचे उत्तर हे असे समर्पक होते.

* * *

सही मिळविण्याकरता मेहरअलींकडे जेव्हा कोणी जात असे, तेव्हा ते 'साहसाने जगा' (लिव्ह डेंजरसली) असा संदेश देत असत. मेहरअलींनी तो संदेश स्वतःच्या जीवनात उतरवला होता; आणि आपल्या जखमी हृदयाची वेदना दाबून धरत वादळी राजकीय जमान्यात ते साहसाने वावरले– त्याचाच परिणाम त्यांच्या अकाली मृत्यूत झाला.

* * *

आपले मित्र व सहकारी यांच्याबद्दल मेहरअलींच्या मनात एक उबदार स्नेह भावना असे. 'मेहरअलींच्या मनाच्या संवेदनशीलतेतच मानव प्राण्याबद्दल त्यांना वाटणारे प्रेम व सौंदर्य आणि सत्य यांना मिळणारा रसिक प्रतिसाद, यांचे मूळ दडलेले आहे,' असे कमलादेवी चट्टोपाध्याय म्हणाल्या होत्या.

एम. एल. दांतवालासुद्धा या भावनेशी सहमत झाले. ते म्हणाले, 'मला जे जे मौल्यवान आणि जतन करून ठेवण्यासारखे वाटते, ते सर्व युसुफमध्ये साकार झाले आहे– स्मितहास्य, निरागसता, अपेक्षारहित स्नेहशीलता, विचारांतील औदार्य आणि मानवता.''

* * *

शेवटच्या आजारपणात मेहरअली खूप दिवस अंथरुणाला खिळलेले होते. तरीही युसुफचे मित्र त्यांची भेट सहसा टाळीत. कारण स्वतःचे आजारपण विसरून भेटीला आलेल्या मित्रावर ते उत्साहाने प्रश्नांचा भडिमार करीत. 'कोणते पुस्तक अलीकडे वाचले? हे·(पुस्तक) पाहिले आहेस का? सध्या काय लिहिता आहात? मला एक प्रत पाठवून द्याल का?' अशी प्रश्नांची फैर चालूच असे. भेटीला येणाऱ्या मित्रांना ते स्वतःच्या प्रकृतीविषयी काही विचारायची संधीच देत नसत. एकदा एम.एल.दांतवाला त्यांना पहाण्यासाठी गेले तेव्हा मेहरअलींनी उलट त्यांची व त्यांच्या पत्नीची चौकशी केली. दांतवालांकडे बघून ते म्हणाले, 'तुमची प्रकृती मला ठीक दिसत नाही. माझे मित्र डॉ. तुळपुळे यांना चिठ्ठी लिहून तुमची पूर्ण तपासणी करण्याची विनंती मी त्यांना करतो.' दांतवालांना ते हे बोलले जेव्हा मेहरअली स्वतः

मृत्युशय्येवर होते. हा हृदयद्रावक प्रसंग आठवून दांतवाला म्हणतात, "मी दीर्घ आयुष्य जगलो. माझे अनेक मित्र काळाच्या पडद्याआड गेले पण एक जयप्रकाश सोडले तर इतका उबदार स्नेही, जो तुमचे अंतःकरण वितळवून टाकतो, आणि एका परीने स्वच्छही करतो, असा मी युसुफखेरीज दुसरा कोणी पाहिला नाही."

* * *

युसुफ मेहरअलींच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात असाच एक हृदयद्रावक प्रसंग घडला. करुणरसाने परिपूर्ण असा हा प्रसंग युसुफ मेहरअलींच्या स्वभावातील उदात्ततेचे तेजस्वी दर्शन घडविणारा आहे. शेवटी शेवटी मेहरअली डॉ.जसावाला यांच्या दवाखान्यात होते. युसुफचे मित्र आणि सहकारी यांना डॉक्टरांनी सांगितले की जरी आम्ही आमच्या परीने शर्थीचे उपचार चालू ठेवले असले, तरी मेहरअलींचे मौल्यवान प्राण आम्ही वाचवू शकत नाही. मृत्यूच्या छाया जवळ येताना युसुफ मेहरअलींना जेव्हा जाणवल्या तेव्हा जयप्रकाश नारायण आणि इतर मित्रांना स्वतःला रुग्णालयामधून घरी नेण्यास त्यांनी सांगितले. प्रकृतीची परिस्थिती अतिशय आणीबाणीची असताना युसुफ मेहरअलींनी घरी जाण्याचा आग्रह का धरावा, हे कोणाला समजेना. पण जयप्रकाशांनी गुप्ततेचा पडदा बाजूला सारून युसुफच्या मित्रांना सांगितले की युसुफच्या या आग्रहामागे त्याच्या विचारांतील उदात्तता आहे. मृत्यूची हाक कानावर येत असताना युसुफ मेहरअलींना, त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर आणि सेवा करणारे रुग्णालय यांचे नाव खराब होऊ नये आणि त्यांच्यावर दोषारोप होऊ नयेत, ही काळजी होती. त्या रुग्णालयात त्यांचे निधन झाले हे लोकांना कळू नये, असे त्यांना वाटत होते. म्हणून घरी जाण्याचा त्यांचा आग्रह होता. आयुष्याच्या अगदी शेवटच्या क्षणापर्यंत युसुफ मेहरअलींना दुसऱ्यांबद्दल चिंता होती. शेवटचा श्वास घेताना त्यांनी ते रुग्णालय आणि त्यांच्यावर उपचार करणारे, त्यांना वाचविण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करणारे डॉक्टर यांच्याकडे कृतज्ञतेचा कटाक्ष टाकला होता.

* * *

एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये विद्यार्थी म्हणून वावरताना युसुफ मेहरअली स्वातंत्र्यलढ्याच्या त्या खळबळीच्या दिवसांत अनेक राजकीय चळवळींशी संबंधित होते. अशा राजकीय चळवळीत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कॉलेजचे प्राचार्य फार त्रास देत. अशा प्रकारच्या छळाचा निषेध म्हणून युसुफ व त्यांचे मित्र यांनी कॉलेजबाहेर जोरदार निदर्शने केली. 'अशा अनेक प्राचार्यांपेक्षा तत्त्व श्रेष्ठ आहे'

(प्रिन्सिपल इज मोअर इम्पॉर्टंट दॅन सेव्हरल प्रिन्सिपॉलस्) अशी घोषणा अर्थातच मेहरअलींच्या सुपीक डोक्यातून निघाली होती. युसुफच्या राजकीय 'उपद्व्यापां'नी त्रासलेल्या प्रिन्सिपॉल हॅमिल यांनी– जे स्वतः ब्रिटिश होते– एकदा त्यांना विचारले, "स्वातंत्र्य मिळवल्यावर तुम्ही आमचे काय करणार?" खोडकरपणे मेहरअलींनी चटकन् उत्तर दिले. "आम्ही तुम्हांला रशियाला रवाना करणार." मेहरअलींचे उत्तर ऐकून एकच हशा उसळला आणि त्यात प्रिन्सिपॉल हॅमिल हेसुद्धा सामील झाले.

* * *

मुंबईचे एक प्रख्यात कायदेतज्ज्ञ के.एफ.नरीमन यांनी 'बॅक-बे रेक्लेमेशन'चा कुख्यात खटला लढवून त्यामागील प्रचंड भ्रष्टाचार उघडकीस आणला. नरीमन यांच्या निवडणुकीच्या वेळी मेहरअलींनी अतिशय प्रभावशाली घोषणा दिली. "बॅक-बे पहा, आणि नरिमनना मत द्या."

* * *

1929 साली मुंबईत दंगे झाले, तेव्हा युसुफ मेहरअलींनी 'नॅशनल मिलिशिया' नावाचे एक स्वयंसेवक पथक संघटित केले. दंगलग्रस्त भागात फिरून शांतता प्रस्थापित करून व्यवहार सुरळीतपणे चालू ठेवण्याचा ते प्रयत्न करीत. त्या संघटनेने परदेशी मालावर बहिष्कार घालण्याची आणि स्वदेशीची मोहीम सुरू केली. या मोहिमेत एक विनोदी प्रसंग उद्भवला. ज्येष्ठ संसदपटू विठ्ठलभाई पटेल हे खूप सिगरेट ओढत आणि 555 चा परदेशी ब्रॅन्ड वापरत. जेव्हा युसुफ आणि त्यांचे मित्र यांनी विठ्ठलभाईंना ब्रिटिश सिगरेटस् विकत घेऊ नका, अशी विनंती केली; तेव्हा ते म्हणाले, "माझ्या तरुण मित्रांनो, तुम्ही परदेशी कपडे जाळता; मी परदेशी (ब्रिटिश) सिगरेट जाळतो." संसदीय चर्चेत विठ्ठलभाई कसे फटके मारत असतील याची एक चुणूक या प्रसंगात दिसली.

* * *

सहजपणा आणि स्नेहाची ऊब हे मेहरअलींच्या व्यक्तिमत्त्वाचे दोन विशेष होते. ते त्यांच्या मित्रांच्या आणि सहकाऱ्यांच्या जन्मतारखा विसरत नसत, मग ते तुरुंगात असोत; अगर बाहेर. त्यांच्यासाठी मेहरअलींकडून सुंदर, मौल्यवान भेटी जात. मेहरअलींची भेट स्वीकारल्याशिवाय त्यांच्या कोणत्याही मित्रांच्या लग्नाला अधिकृतपणा येत नसे. पण युसुफ मेहरअलींची भेट देण्याची आगळीच पद्धत होती. एका जवळच्या मित्राच्या बायकोला त्यांच्या लग्नाच्या वेळी मेहरअलींनी एक पुस्तक

दिले. त्यावर मेहरअलींची विनोदी भेटपत्रिका अशी होती; "माझ्या मित्राशी लग्न करण्याचा प्रचंड धोका पत्करल्याबद्दल ही तुम्हांला हार्दिक भेट." हे सर्व युसुफ मेहरअलींच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसेच होते.

* * *

युसुफ मेहरअली हे अतिशय संघटन कुशल होते. युवकांना संघटित करताना त्यांनी एकीकडे गुमास्त्यांचीही संघटना बांधली. त्यांच्याच अथक प्रयत्नांनी पहिला गुमास्ता कायदा ('शॉप्स ॲण्ड एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट') अस्तित्वात आला. गुमास्त्यांसाठी (दुकान मालकांचे सहायक) आठ तासांचा दिवस, आठवड्यातून एक दिवस सुट्टी, रजेच्या सोयी, औषधोपचाराच्या सोयी, इत्यादी गोष्टी त्यांनी पदरात पाडून घेतल्या. त्यामुळे मेहरअली हे नाव मुंबईमधील प्रत्येक गुमास्त्याच्या घरात पोहोचले.

* * *

युसुफ मेहरअलींचा स्नेहभाव राजकीय मित्रता आणि पक्षनिष्ठा यांच्या पलीकडे कितीतरी दूरवर पोचला होता. अरुणा असफअलींच्या भगिनी पूर्णिमा बॅनर्जी यांच्यासंबंधीचा एक किस्सा बाबूलाल मखारिया यांनी ऐकवला तो असा : पूर्णिमा बॅनर्जी एकेकाळी काँग्रेस सोशलिस्ट पार्टीच्या प्रमुख कार्यकर्त्या होत्या. युसुफ मेहरअली आजारी असताना त्यांनी सोशलिस्ट पार्टी सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर युसुफ मेहरअलींना त्या भेटायला आल्या, त्या अपराधी भावनेनेच. त्यांनी युसुफच्या खोलीत प्रवेश केला आणि रडायला सुरुवात केली. त्या म्हणाल्या, "युसुफभाई, मी पक्ष सोडला, तुम्हांला माझे तोंडही पहावेसे वाटत नसेल. मेहरअली पटकन् म्हणाले, "खड्ड्यात गेली पार्टी आणि बाकी सगळेजण." तू मला पूर्वीचीच पूर्णिमा आहेस– मग तू कम्युनिस्ट पार्टीत जा, काँग्रेसमध्ये अगर इतर पार्टीत. माझे सर्वांशी नाते फक्त एका मनुष्याचे आहे." मेहरअलींचे हे उद्गार त्यांच्यामधील मूलभूत मानवतेचे दर्शन देणारे आहेत, जी कोणत्याही राजकीय विचारांनी झाकळलेली नाही. मृत्यूची चाहूल लागल्यानंतर त्यांच्यामधील सर्वांवर प्रेम करण्याची, आपुलकीची आस अधिकच तीव्र झाली. युसुफनी आपल्या सहकाऱ्यांना सांगितले होते, "मी पक्षाचा अतिशय निष्ठावंत सेवक होतो. पण माझा जेव्हा मृत्यू होईल तेव्हा माझी अंत्ययात्रा ही केवळ पक्षाशीच संबंधित असू नये. अनेक पक्षांमधल्या माझ्या मित्रांना या माझ्या शेवटच्या यात्रेत मला निरोप देण्यासाठी सामील होऊ दे."

* * *

जी. जी. मेहता हे मुंबईचे एक प्रसिद्ध कामगार कार्यकर्ते. त्यांना 9 ऑगस्ट 1942 या दिवशी अटक झाली आणि महात्माजी व इतर नेते यांना ज्या गाडीतून पुण्याला नेण्यात आले, त्याच गाडीतून त्यांना येरवडा जेलमध्ये नेण्यात आले. युसुफ मेहरअलीही त्याच गाडीत होते. पोलीस अधिकारी जी.जी.मेहतांना पकडण्यासाठी त्यांच्या घरी गेले, तेव्हा पोलिसांच्या हातातील वॉरंट घेऊन त्यांनी फाडून टाकले. म्हणून पोलिसांनी त्यांना अक्षरशः उचलून पोलीस व्हॅनमध्ये ठेवले व ते जी. जी. मेहतांना व्ही.टी. स्टेशनवर घेऊन आले. गाडीमध्ये जी. जी. मेहतांच्या वागणुकीवर एका गांधीवादी व्यक्तीने टीका केली व त्यांचे कृत्य हे गांधीजींच्या तत्त्वांत बसत नाही, याबद्दल त्यांची भरपूर हजेरी घेतली. मेहरअली त्यावेळी त्या ठिकाणीच होते. त्यांनी जी. जी. मेहतांची बाजू समर्थपणे सांभाळली. मेहरअलींनी हा वाद गांधीजींच्या पुढे ठेवण्याची सूचना केली. गांधीजींनी मेहरअलींप्रमाणे जी. जी. मेहतांच्या वर्तणुकीचे समर्थनच केले. गांधीजींचे म्हणणे असे होते, की त्यांनी 'चले जाव' चळवळीतील प्रत्येक सत्याग्रह्याला आपण स्वतःच पुढारी आहोत असे समजून आपल्या सदसद्‌विवेक बुद्धीचा कौल घेऊन कृतिशील होण्याचा आदेश दिला होता. आणि त्यांना अटक झालीच तर 'करा किंवा मरा' (डू ऑर डाय) हा प्रत्येक नागरिकासाठी त्यांनी दिलेला संदेश होता. मेहरअलींनी नंतर असा शेरा मारला की काही गांधीवादी गांधींपेक्षाही अधिक तत्त्वनिष्ठा दाखविण्याचा प्रयत्न करीत आहेत पण गांधीजींनी त्यांना चोख उत्तर दिले आहे;

* * *

युसुफ मेहरअलींनी जेलमध्ये असताना आपल्या सहकाऱ्यांवर केलेले प्रेम आणि आस्था दाखवून त्यांची घेतलेली काळजी, त्याला काही मर्यादाच नव्हती. 1942 च्या 'चले जाव'च्या चळवळीत अटक झालेले किसन मेहता हे कार्यकर्ते जवळजवळ 1500 कार्यकर्त्यांसह येरवडा जेलमध्ये 'ब' वर्गाचे कैदी होते. त्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीबद्दल निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांनी अन्नसत्याग्रह सुरू केला. त्या आधी 'अ' वर्गात स्थानबद्ध केलेल्या कैद्यांना किसन मेहतांनी पत्रे लिहून आपली गाऱ्हाणी त्यांच्यासमोर मांडली होती. 'अ' वर्गातील कैद्यांत, बी.जी.खेर, मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नगीनदास टी. मास्टर, सरचिटणीस एस.के.पाटील आणि युसुफ मेहरअली व अशोक मेहता हे समाजवादी पुढारी होते. किसन मेहतांच्या पत्राला आठ दिवस झाले तरी काही प्रतिसाद मिळाला नव्हता. नवव्या दिवशी, किसन मेहतांनी हॉस्पिटलमध्ये दाखल झालेल्या युसुफ मेहरअलींना तिथेच येऊन भेटावे, असा त्यांना निरोप मिळाला. किसन मेहतांसाठी वैद्यकीय दाखला

मिळविण्याची व्यवस्था मेहरअलींनी आधीच केली होती. जेव्हा किसन मेहता हॉस्पिटलमध्ये त्यांना भेटले तेव्हा मेहरअलींनी त्यांच्याजवळ साबणवड्या, टूथपेस्ट, टूथ पावडर आणि राजबंद्यांना हव्या असलेल्या इतर वस्तू वाटण्यासाठी दिल्या. त्याही अवस्थेत युसुफ मेहरअलींनी आपल्या साथींबद्दल दाखविलेल्या आस्थेमुळे किसन मेहता सद्‌गदित झाले.

कालांतराने किसन मेहता यांची मुक्तता होऊन ते मुंबईत आले. त्यानंतर येरवडा तुरुंगातून मेहरअलींकडून त्यांना आलेल्या एका पत्रात युसुफ मेहरअलींना पोलीस पहाऱ्यात वैद्यकीय तपासणीसाठी मुंबईला आणण्यात येणार असल्याची माहिती होती. युसुफ मेहरअलींनी त्या विशिष्ट ट्रेनची वेळही कळवून त्या गाडीवर किसन मेहतांनी भेटावे असा निरोप मेहरअलींनी त्यांना दिला होता. त्याप्रमाणे दादर स्टेशनवर किसन मेहता गाडीत चढून मेहरअलींना भेटले आणि भायखळ्यापर्यंत त्यांनी बरोबर प्रवास केला. भायखळ्याला मेहरअलींना उतरवून आर्थर रोड जेलकडे नेण्यात आले. किसन मेहता आणि मेहरअली यांच्यामध्ये या वेळी झालेल्या संभाषणात किसन मेहतांना जाणवली ती युसुफ मेहरअलींची दुसऱ्यांबद्दलची कळकळ, आणि आपल्या कुटुंबियांना व मित्रांना काळजी वाटू नये म्हणून स्वतःचे दुःख लपविण्याची धडपड. युसुफ मेहरअलींनी किसन मेहतांना पूर्वसूचना दिली, की भायखळा स्टेशनवर त्यांना भेटायला त्यांचा भाऊ अहमद मेहरअली आला तर त्याला युसुफच्या हृदयविकाराची जराही माहिती होता नये. त्याला सांगावेच लागले तर सायटिका किंवा तसलेच एखादे सांधेदुखीचे दुखणे आहे असे सांगण्यात यावे. मुंबईत मेहरअलींना बॉंबे हॉस्पिटलमध्ये नेऊन त्यांच्या पूर्ण तपासण्या करण्यात आल्यावर डॉक्टरांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगून ते जास्त काळ जगणार नाहीत असे मत व्यक्त केले, तेव्हा संभाव्य बदनामीला भिऊन सरकारने युसुफ मेहरअलींना मुक्त केले.

आजारपणामुळे बिछान्यावर असतानाही युसुफ मेहरअलींनी आपल्याभोवती कधी उदास, उद्विग्नतेचे वातावरण निर्माण होऊ दिले नाही. स्वतःच्या हृदयातली कळ दाबून कधी कधी तर अर्धवट बेशुद्धावस्थेतही– ते भेटीला येणाऱ्यांशी अजंठा आणि वेरूळ लेण्यांच्या सौंदर्याबद्दल चर्चा करीत. हिमालय आणि त्यातून निघणाऱ्या नद्या यांच्यावरही ते बोलत राहत. भेटीला येणारी मंडळी त्यांचे बोलणे ऐकून प्रसन्न चित्ताने बाहेर पडत. युसुफच्या वेदना मात्र वाढलेल्या असत.

* * *

1946 साली मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या निवडणुका होत्या. सी वॉर्डमधून मेहरअली आणि गणपती शंकर देसाई एकमेकांविरुद्ध उभे होते. त्या वॉर्डमधून मुंबई प्रांतिक

काँग्रेस कमिटीवर चार सदस्य निवडून द्यावयाचे होते. सोशलिस्ट गटाचे प्रतिनिधित्व करणारे मेहरअली प्रचंड बहुमताने निवडून आले हे सांगायला नकोच. गणपती शंकर देसाई तिसऱ्या किंवा चौथ्या स्थानावर निवडले गेले. पण त्यांनी खिलाडूपणे हे मान्य केले की मेहरअली सर्वांत लोकप्रिय उमेदवार आहेत. आणि असेही गुपित उघड केले की त्यांच्या स्वतःच्या पत्नीनेही मेहरअलींनाच मत टाकले असावे. मेहरअलींबद्दल लोकांना वाटणारी आपुलकी अशी प्रचंड होती.

* * *

मेहरअलींनी लोकांना दिलेल्या स्नेहाची परतफेड देशातून आणि देशाबाहेरून दोनही ठिकाणांहून होत होती. त्यांच्या निधनानंतर किसन मेहता काही कामानिमित्त अमेरिकेत गेले होते. तिथे ते चेस्टर बोल्स आणि त्यांच्या पत्नींना भेटले. त्यांनी किसन मेहतांना असे सांगितले, की न्यू जर्सीमध्ये स्प्रिंगफील्ड येथे युसुफ मेहरअलींचा अतिशय जवळचा मित्र राहतो. मिसेस बोल्सनी त्या मित्राला फोन केला. किसन मेहतांना घेऊन जाण्यासाठी तो लगेच आला. वाटेत घरी जाताना त्या अमेरिकन मित्राने किसन मेहतांना विनंती केली, की त्यांनी 'अंकल मेहरअलीं'च्या मृत्यूची बातमी मुलांना सांगू नये; कारण त्यामुळे त्यांना अतिशय दुःख होईल. तरीसुद्धा ते जेव्हा स्प्रिंगफील्डला पोचले तेव्हा त्या अमेरिकन मित्राच्या पत्नीच्या डोळ्यांत अश्रू होते, कारण मेहरअलींच्या दुःखद अंताची बातमी नुकतीच तेथे पोचली होती. मेहरअलींच्या स्नेहाच्या सीमा भारताला ओलांडून परदेशात पसरल्या होत्या. त्यांना मिळालेला प्रतिसाद पाहून किसन मेहतांचे हृदय भरून आले.

* * *

आपले मित्र आणि सहकारी यांच्यासाठी स्वतःचे अंतःकरण ओतून युसुफ मेहरअलींनी केलेल्या प्रेमाचा आणखी एक किस्सा. मेहरअली त्यावेळी अमेरिकेला निघाले होते. मुंबईतून मोल स्टेशन येथे बोटीत चढून त्यांचा पुढचा प्रवास होणार होता. त्या आधीच्या संध्याकाळी किसन मेहता त्यांना भेटले होते आणि दुसऱ्या दिवशीच फायनल बी.ए.च्या परीक्षेचा पेपर असल्यामुळे मोल स्टेशनवर निरोप देण्यास आपण येऊ शकणार नाही, असे सांगण्यास ते आले होते. दुसऱ्या दिवशी किसन पेपर लिहिण्यामध्ये मग्न असताना एलफिन्स्टन कॉलेजचे प्राचार्य मि.सील त्या हॉलमध्ये आले, आणि त्यांनी काही मिनिटे किसन मेहतांना बाहेर येण्यास सांगितले. मेहतांना भीती वाटली. क्षणभर त्यांना आपल्याला आता शिक्षा होणार, असेही वाटले. भीतभीतच ते बाहेर आले तर काय, मेहरअली त्यांचा निरोप घेण्यासाठी बाहेर उभे होते. युसुफ मेहरअलींसारख्या नेत्याने किसन मेहतांसारख्या एका तरुण कार्यकर्त्यांवर

केलेली ही माया, अशा अनेक कार्यकर्त्यांवर केली. कधीतरी तरुण कार्यकर्ते युसुफ मेहरअलींना विसरू शकले असतील का?

* * *

एक प्रसंग असा होता की मुंबईत भरलेल्या एका काँग्रेस अधिवेशनात मेहरअली काँग्रेस सेवादलाचे जी.ओ.सी. होते. या प्रसंगी त्यांनी झेंडावंदन कार्यक्रमाची रचना कल्पकतेने केली होती. एक उंच ध्वजदंड, लांब-रुंद रेशमी तिरंगा आणि स्वयंसेवकांची घोड्याच्या नालाच्या आकाराची रचना व बँडपथकाची खास धून. काँग्रेसचे अध्यक्ष राजेंद्रप्रसाद यांनी ध्वजाची दोरी ओढली. पण तो रेशमी ध्वज वर ध्वजदंडाच्या टोकाला अडकला होता. मेहरअलींनी ताबडतोब एका स्वयंसेवकाला त्या 100 फूट उंचीच्या ध्वजदंडावर चढून ध्वज सोडविण्यास सांगितले, जे त्याने तात्काळ केले. जेव्हा त्या स्वयंसेवकाने त्या ध्वजदंडावर चढण्याचा धोका राजेंद्रप्रसादांच्या लक्षात आला, तेव्हा त्यांनी मेहरअलींना अशा प्रकारच्या साहसात स्वयंसेवकांना गुंतवू नये, असे सांगून त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. 'त्याचे हे कर्तव्य आहे' मेहरअली दृढतेने पण नम्रपणे उद्‌गारले.

* * *

युसुफ मेहरअलींना देशातील वेगवेगळ्या तुरुंगातील राजकीय स्थानबद्ध व कैदी यांना वरचेवर निवडक पुस्तके खरेदी करून पाठविण्याची हौस होती. जेव्हा त्यांना 1942 साली अटक झाली, तेव्हा कांतिलाल मोदी नावाचे एक मित्र, मेहरअली ज्या दुकानातून पुस्तके खरेदी करीत होते व जिथे राजबंद्यांकडे पुस्तके पाठविण्यासाठी त्यांचे खाते होते, तिथे गेले; आणि मेहरअलींच्या नावावर काही उधार रक्कम आहे का, याची त्यांनी चौकशी केली. तेव्हा त्या दुकानदाराने त्यांना सांगितले की ते (कांतीलाल मोदी) मेहरअलींचे एकटेच मित्र नाहीत. ते बिल दुसरे कोणी येऊन भरून गेलेले आहेत, त्यामुळे मोदींनी काळजी करू नये. मेहरअलींना समाजाच्या सर्व थरांतून मिळालेले प्रेम व सहानुभूती यांची ही एक लहानशी झलक!

* * *

युसुफ मेहरअलींजवळ इतिहासाचे भान होते. ललितकलांचे प्रेम होते आणि मित्र व सहकारी यांच्याबद्दल– विशेषतः ते अडचणीत असतील तर– विशेषच अगत्य होते. व्ही.एन.ओके हे असेच रेखाचित्र माध्यमातले पारंगत कलाकार. त्यांच्या युसुफ मेहरअलींच्या सौहार्दासंबंधीच्या काही बोलक्या आठवणी आहेत. 1946 साली मुंबईला चेतना आर्ट गॅलरीमध्ये एक 'राष्ट्रीय प्रदर्शन' (नॅशनल एक्झिबिशन) भरले होते.

त्यात भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील 1857 ते 1946 या काळातल्या कितीतरी घटना ज्या युसुफ मेहरअलींना स्फुरल्या, त्यांचे चित्रण व्ही.एन.ओके यांनी आपल्या पेनचा वापर करून सुरेख रीतीने केले होते. आणि या अद्वितीय प्रदर्शनाचे आयोजन करण्यासाठी त्यांनी दिवसरात्र परिश्रम केले होते. जरी या प्रदर्शनाच्या मांडणीत ओके यांचा सिंहाचा वाटा होता तरी ते युसुफ मेहरअलींच्या बुद्धीचे-अपत्य (ब्रेन चाइल्ड) होते, असे ओके मानत; कारण कलाकार म्हणून, द्रष्ट्या (व्हिज्युअलायझर) व्यक्तीचे योगदान किती महत्त्वाचे असते, ते ओके जाणत होते. 1946 साली 'चेतना'मध्ये भरलेले प्रदर्शन हा केवळ राजकीय कार्यक्रम नव्हता तर त्याच्या उद्घाटनाचा समारंभ हा विविध कलांचाही संगम होता. सुप्रसिद्ध वादक अल्लादियाँ खान त्या समारंभाला हजर होते आणि वेगवेगळ्या प्रख्यात कवींनी या समारंभात काव्यदर्शनही (मुशायरा) घडविले. या समारंभानंतर ओकेंच्या पाठीवर मेहरअलींची पडलेली हलकीशी थाप आणि चित्रकार म्हणून उमलत्या अवस्थेत त्यांच्या तोंडचे ऐकलेले 'आम्हांला त्याचा अभिमान वाटतो' हे शब्द एखाद्या सन्मान चिन्हासारखे ओकेंनी हृदयाशी जपून ठेवले आहेत.

ओकेंच्या आठवणीप्रमाणे, मेहरअलींनी त्यांच्या संपूर्ण कार्यमग्न दिवसात वेळ काढून एकदा जे.जे.स्कूल ऑफ आर्टसला भेट दिली. सोबत ओके होतेच. ही भेट एवढ्यासाठीच होती की त्या परिसरात पूर्वी प्रसिद्ध कवी रूडयार्ड किपलिंग येऊन राहिले होते. ते कुठे उतरले होते त्याचा शोध मेहरअलींना घ्यावयाचा होता. शेवटी त्यांना ती भिंत सापडली, जिच्या कोपऱ्यावर रूडयार्ड किपलिंग यांच्या नावाचा फलक होता. त्यावर धूळ व कोळिष्टके जमा झाली होती. मेहरअलींनी ती स्वतःच्या हाताने पुसली. ओकेंनी सांगितलेला हा छोटासा प्रसंग मेहरअलींमधील इतिहास प्रेमाची आणि साहित्यसेवकांबद्दल त्यांच्या मनात असलेल्या सन्मानाची जाणीव करून देणारा आहे.

* * *

राजकारणात असतानाही मेहरअलींना रवींद्रनाथ टागोरांच्या 'शांतिनिकेतन'ची ओढ होती. त्याचप्रमाणे तिरुवन्नमलैय येथील रमण महर्षींच्या आश्रमाचेही त्यांना आकर्षण होते. बंगलोर येथील सोशलिस्ट पार्टीच्या जनरल कौन्सिलची बैठक आटोपून ओकेंसह युसुफ मेहरअली रमण महर्षींच्या आश्रमात गेले. तेथील प्रार्थनागृहात वेदपठण चालू होते. प्रार्थनेनंतर त्यांनी अरुणाचलाला प्रदक्षिणा घातली. त्या ठिकाणी 'पापनाशन गुहा' नावाची एक गुहा आहे. या गुहेतून जो जातो त्याच्या जन्मभरच्या पापांचा विनाश होतो अशी समजूत आहे. मेहरअली त्या गुहेतही शिरले. बाहेर आले तेव्हा अतिशय थकून गेले होते. ओकेंनी त्याही अवस्थेत त्यांचे छायाचित्र घेतले. गुहेत जाऊन धुवून टाकण्याइतके

पाप तरी मेहरअलींकडे कुठे होते? त्या गुहेने युसुफ मेहरअलींना दिले मानसिक समाधान आणि भरपूर शारीरिक कष्ट!

* * *

समाजवादी चळवळीत युसुफ मेहेरअलींची अच्युतराव पटवर्धनांशी विशेष दोस्ती होती. त्यांनी सांगितलेला आगाखान व मेहरअली यांच्या भेटीचा किस्सा मोठा मजेदार आहे. एकदा मेहरअली जाऊन आगाखानना भेटले. आगाखान ही त्या काळात भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती होती. युसुफ त्यांना म्हणाले, "महाराज, तुम्ही ईश्वरी अवतार आहात असे मी अजिबात मानत नाही." तेव्हा चटकन् आगाखान म्हणाले, "तुम्ही मानता की नाही, याला फारसे महत्त्व नाही. पण खोजा जमातीतील एक अत्युत्कृष्ट व्यक्तिमत्त्व म्हणून मी तुम्हांला ओळखतो. आणि तुम्ही आमच्यामधील आहात याचा आम्हांला अभिमान वाटतो. तुम्हांला जेव्हा काही गरज असेल तेव्हा तुम्ही माझ्या सचिवांना फोन करा." युसुफ मेहरअलींनी हे लक्षात ठेवले; पण आगाखानांच्या या आश्वासनाचा वैयक्तिक हितासाठी फायदा घेतला नाही. जे काही घेतले ते सार्वजनिक हितासाठी खर्च केले.

'चले जाव' चळवळीनंतर तुरुंगात टाकलेल्या युसुफ मेहरअलींना त्यांच्या गंभीर हृदयविकारामुळे लवकर सोडून देण्यात आले. त्यांनी नंतर आगाखान यांच्या सचिवांना फोन केला; आपण पुस्तकांच्या दुकानात काही पुस्तकांची ऑर्डर नोंदवल्याचे त्यांना सांगितले आणि त्यांचे बिल चुकविण्याबाबत आगाखानांकडून सूचना आल्या असतील अशी आशा व्यक्त केली. सचिवाने चौकशी करून तशा सूचना ठेवल्या असल्याची खात्री करून घेतली. त्यानंतर मेहरअलींनी 'तारापोरवाला बुक डेपो' आणि 'न्यू बुक कंपनी' या दोन पुस्तक दुकानांचे पत्ते देऊन 25,000/– रुपये किंमतीच्या पुस्तकांची यादी त्यांच्याजवळ दिली. त्याचप्रमाणे देशातील विविध तुरुंगांतील राजबंद्यांपैकी ज्यांना पुस्तके पाठवायची होती, त्यांची नावेही त्या यादीबरोबरच दिली. अशा रितीने ती पुस्तके तुरुंगात पोचली तेव्हा त्या कैद्यांना सुखद आश्चर्याचा धक्का देऊन गेली. जेलमधील एकसुरी कंटाळवाण्या वातावरणात ती पुस्तके त्यांना परमेश्वरासारखी वाटली. मात्र या 'परमेश्वरा'चे निर्माते होते युसुफ मेहरअली.

* * *

'परमेश्वर' या प्रकरणातील गुंतागुंतीचा मेहरअलींचा आणखी एक अनुभव. एकदा ते मित्रांना म्हणाले, माझा परमेश्वरावर विश्वास नाही, कारण मी संघटित धर्मावर– चर्च, मशीद, मुल्ला, मौलवी आणि त्यांच्यासारख्या इतर गोष्टी– विश्वास ठेवू शकत नाही. मात्र

ह्याच युसुफ मेहरअलींनी त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या काळात प्रसिद्ध 'रमण आश्रमा'ला भेट दिली.

अच्युत पटवर्धन यांना रमण आश्रमाच्या भेटीची कथा सांगताना मेहरअली म्हणाले, "मी रमण महर्षींना सांगितले की महाराज, परमेश्वरावर माझा अजिबात विश्वास नाही. पण आपण मात्र या देशाच्या संस्कृतीच्या एका सुंदरतम अभिव्यक्तीचे प्रतिनिधी आहात, असे मला वाटते. त्यामुळे माझी भारतयात्रा आपल्याला भेटलो नसतो तर अपूर्ण राहिली असती." त्यावर रमण महर्षी म्हणाले, "तू कशाला काळजी करतोस? तू परमेश्वर मानतोस की नाही, याचा परमेश्वराला काहीच फरक पडत नाही. परमेश्वर असलाच तर तुझा त्याच्यावर विश्वास आहे की नाही, याची फिकीर त्याला नाही. तू इथे आला आहेस तर मन द्विधा करणारे हे विचार विसरून जा; नव्हे मन द्विधा करणाऱ्या ज्या ज्या गोष्टी तुझ्या मनात आहेत त्या सोडून दे आणि सुखी हो."

त्यानंतर तीन दिवस मेहरअली त्या आश्रमात होते, ते एक प्रकारच्या अद्भुत प्रसन्नतेतच. स्वर्गीय आनंदाचा लाभ त्यांना झाला होता आणि जीवनाच्या पावित्र्याचाही अनुभव त्यांनी घेतला. धर्मप्रवण मन ही चीजही त्यांना तेथेच उमगली!

* * *

आपली भाषणे, संवाद आणि चर्चा यांमधून मेहरअली कधीही कडवटपणे बोलत नसत. अशा प्रसंगी त्यांची उपजत विनोदी बुद्धी आणि मार्मिक टोलेबाजी त्यांच्या भाषणांतून झरत असे. ते जाहीर सभेत बोलोत अगर विधानसभागृहात बोलत असोत किंवा अतिशय मतभेदपूर्ण चर्चेत बोलत असोत, त्यांच्या या गुणांमुळे नाराजी किंवा कडवटपणा त्यांच्या भाषणातून निर्माण होत नसे. म्हणूनच त्यांच्याशी सहमत असणे ही तर आनंदाची गोष्ट होतीच; पण त्यांच्याशी असहमत असणे ही गोष्टही चिडीला आणणारी नव्हती. या संदर्भात एका सभेची आठवण येते. युसुफ मेहरअली महापौर म्हणून प्रमुख पाहुणे असलेल्या त्या सभेत अच्युत पटवर्धन वक्ते होते. आपले भाषण संपल्यानंतर दुसऱ्या एका कार्यक्रमाला जाणे आवश्यक असल्यामुळे त्यांनी मेहरअलींची परवानगी मागितली. आपल्या नेहमीच्या विनोदी शैलीत मेहरअली म्हणाले, "हवाई आक्रमणाची पूर्वसूचना देणारी सायरन आपण ऐकली, पण अजून आमच्यावर बॉंब पडले नाहीत." त्यावर अच्युत पटवर्धननी चटकन् उत्तर दिले, "माननीय महोदय, सर्व संकट संपल्याचा (सुरक्षेचा) संदेश तर आधीच मिळाला आहे." त्या दिवसांतला साधेपणा आणि विनोदही अशा तऱ्हेचा होता.

* * *

ज्या युसुफ मेहरअलींचा स्नेहपूर्ण सहवास हा त्यांच्या मित्रांना आणि सहकाऱ्यांना आनंद आणि सुखसमाधानाचा स्रोत वाटे, त्याच मेहरअलींना अखेरच्या काही दिवसांत अंथरुणाला खिळलेले असताना आत्यंतिक वेदना सहन कराव्या लागल्या. जेव्हा आपला शेवट जवळ आला आहे याची त्यांना जाणीव झाली तेव्हा ते मित्रांना म्हणाले, "माझ्या जीर्ण शीर्ण शरीराला आता या वेदना सहन होत नाहीत. मला आता शांतपणे ह्या जगाचा निरोप घेऊ दे.' त्यांनी अशी तक्रार करण्याचे कारण, त्यांचा जीव वाचविण्यासाठी डॉक्टरांनी त्यांच्यावर चालविलेले जीवनरक्षक औषधांचे प्रयोग. त्याही परिस्थितीत मेहरअली त्यांना 'संघटित छळ' (ऑर्गनाइज्ड टॉर्चर) असे म्हणत. पण मेहरअलींवरील अतीव प्रेमामुळे त्यांच्या मौल्यवान जीवनाचे जास्तीत जास्त काळ रक्षण करण्याचा डॉक्टरांचा तो प्रयत्न होता. सरतेशेवटी, या दीर्घकालीन झगड्यानंतर 2 जुलै 1950 या दिवशी पहाटे युसुफ मेहरअलींची प्राणज्योत मालवली आणि त्यांच्या वेदना आणि छळवणूक यांना पूर्णविराम मिळाला.

नऊ

बोलकी पत्रे

"पत्रे माझी वाणी आहे; आणि मला जर लेखनाची बंदी केली, तर माझी वाचाच बंद होईल."

— ओव्हिड

युसुफ मेहरअलींनी आपल्या मित्रांना आणि गांधीजी व पंडित नेहरू यांच्यासारख्या राष्ट्रनेत्यांना लिहिलेली सुंदर पत्रे ही आत्यंतिक पारदर्शक आहेत. त्यांच्यामधून युसुफ मेहरअलींच्या अष्टपैलू बुद्धीचे आणि त्यातील अग्रक्रमाचे विचार व त्यांच्या संवेदनशील अंतःकरणातील भावभावना यांचा अंदाज येतो. युसुफ मेहरअलींचे मित्रत्व, हार्दिकता, विनोद बुद्धी, निरागस खोडकरपणा, साधेपणा, करुणा, निःस्वार्थीपणा, निष्ठा, स्वातंत्र्याकांक्षा, अन्यायाची चीड, निसर्गसौंदर्याचे वेड, कला आणि वाङ्मय यांची आवड आणि इतिहास धुंडाळणारी त्यांची तीक्ष्ण दृष्टी या सर्वांची बोलकी आणि कलापूर्ण अभिव्यक्ती त्यांच्या पत्रांत दिसते. ती वाचत असताना ऑस्कर वाइल्ड या प्रसिद्ध लेखकाचे वचन आठवते. तो म्हणाला होता, "कोणत्याही कलाकाराला अभिव्यक्ती हेच जीवनाचा अर्थ जाणून घेण्याचे साधन आहे. त्याच्या दृष्टीने जे मूक आहे आणि ज्याची अभिव्यक्ती होऊ शकत नाही ते मृत किंवा अस्तित्वहीन आहे."

युसुफच्या पुढील पत्रांत वरील सत्याचा आणि सौंदर्याचा आविष्कार आहे.

आंतरराष्ट्रीय संबंध

2 विलोबी रोड,
लंडन, एन. डब्ल्यू. 3,
17.6.38

प्रिय मि. अलेक्झांडर,

माझी इथे फार दमणूक चाललेली आहे. सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स, लास्की, जॉन स्ट्रॅची, जे.ए.हॉबसन, पामदत्त, आणि राजकीयदृष्ट्या जवळ असलेल्या इतर मित्रमंडळींबरोबर माझ्या प्रदीर्घ चर्चा झाल्या. हाऊस ऑफ कॉमन्समध्ये पार्लमेंटच्या सदस्यांची एक सभा मी संबोधित केली आणि अनेक संस्थांना भेटी दिल्या. ऑक्सफोर्ड येथे ज्या मंडळींना भेटलो, त्यांत मास्टर ऑफ बॅलिओल आणि बर्ट्रान्ड रसेल हेही होते. यांच्याशिवाय अनेक लेखक, कवी, कलाकार यांना, एवढेच नव्हे तर इंडियन कन्सिलिएशन ग्रुपच्या मंडळींनाही मी मिस् ॲगाथा हॅरिसनच्या निमंत्रणावरून भेटलो पण हा सततचा तणाव सहन करणे मला अशक्य आहे; कारण दिवसातले सरासरी 16 ते 18 तास मला काम करावे लागत आहे. आजचा दिवस मी बिछान्यात पडूनच घालविला आहे.

पार्लमेंट सदस्यांबरोबरची माझी बातचीत मला स्वतःला निराशाजनक वाटली; कारण त्यांच्यापैकी बहुतेकांना 'इंडिया' म्हणजे काय, ते माहीत नाही. तुम्ही जे भारतासंबंधी एक उत्कृष्ट पत्रक काढले आहे, त्याच्या प्रती त्यांच्या हातांत ठेवणे शक्य होईल का? मला वाटते, त्याचा फार उपयोग होईल; कारण त्यांच्यापैकी बरेचजण माझ्याकडे त्या विषयावरील काही साहित्याची मागणी करीत होते.

सादर स्नेहांकित,
आपला
युसुफ मेहरअली

होरेस ॲलेक्झांडर,
लंडन

संगीत, कला आणि साहित्य यांचे प्रेम

शांतिनिकेतन
11.1.45

प्रिय साद,

... माझ्या स्वतःबद्दल सांगायचे तर माझी प्रकृती हळूहळू सुधारत आहे. या ठिकाणचे वातावरण अतिसुंदर आहे. संगीत, कला, पुस्तके आणि अनेक चांगल्या मित्रांचा सहवास यांचा परिणाम होत आहे. शिवाय भेटींना परवानगी नाही. अर्थातच पूर्ण विश्रांती उपभोगतो आहे.

तिकडे सर्वांना माझ्या शुभेच्छा दे. ख्रिसमसनंतर हमीर परतला असेल. प्रबोधभाई, हमीदा आणि मुकुल-मंडळी यांना माझी याद दे.

तुझाच
युसुफ मेहरअली

सहकाऱ्यांबद्दल आस्था आणि चिंता

साद अली यांच्यासाठी,

मे व जून महिन्यातील हालचालींचे वेळापत्रक (प्रकृतीत सुधारणा दिसली तर जुलैमध्ये फेरविचार करण्यासाठी).

सकाळी :	9 जागे होऊन उठणे
	9 न्याहरी.
	9 ते 12 घरी थोडा वेळ काम, वाचन यांसह विश्रांती.
दुपारी :	12 भोजन.
	1-15 ते 3-30 ऑफिस (काळबादेवी) साद आणि कंपनी.
	4 ते 6 जीना हॉलमध्ये उपस्थिती, आठवड्यातून एकदा सिनेमा.
संध्या :	6 ते 7-30 42, केनेडी ब्रीज, किंवा कामगार सेना संघ.
	7-50 वान्द्रा गाडी पकडणे.
	8-45 घरी परतणे.
	रविवार पूर्ण रिकामा ठेवणे.

साद अली तुरुंगातून **बाहेर** आल्यानंतर त्यांच्या **स्वास्थ्यासाठी युसुफ मेहरअली यांनी सुचविलेला** दिनक्रम.

वर्षात एकच वाढदिवस का?

वाडिया लॉज,
इगतपुरी,
20.10.45

प्रिय साद,

...तू 'देवाचे सिंहासन' मागितले आहेस. अरे वेड्या, ते माझ्याजवळ असते तर मी इथे इगतपुरीमध्ये चूपचाप बसून राहिलो असतो का? मी कैलास आणि मानस सरोवरावर राज्य केले नसते? पेटिट आणि एशियाटिक ग्रंथालयांना पुन्हा एकदा भेट दे.

तिकडील सर्वांना शुभेच्छा.

तुझाच प्रिय
युसुफ

ताजा कलम : 'क्रॉनिकल'साठी सरदार पटेलांवर लेख लिहिण्याबाबत मला ब्रेलवींनी सांगितले आहे, असे अशोक (मेहता)ला सांगावे. मी थोडा पेचात आहे. पण मी कसेतरी दोन लेख तयार करीन. एक स्मरणिकेसाठी आणि दुसरा ब्रेलवींसाठी. पुरुषोत्तम आणि मेनन काल आले होते. परिणाम : अधिक चॉकलेटस्, आणि काय सुंदर भेट तू पाठविली आहेस! खरेच, वर्षात एकच वाढदिवस का येतो?

साद अली,
33 पाली हिल, वांद्रा.

युसुफ

आगाखानने दत्तक घेतले का?

वाडिया लॉज,
इगतपुरी,
28.10.45

प्रिय साद,

तुला डर्बी किंवा ग्रॅण्ड लॉटरी लागली काय? की मुळजीसाहेब किंवा आगाखान यांनी तुला दत्तक घेतले? इतकी खर्चिक भेट कशासाठी?

जाऊ दे, प्रथम ही चॉकलेटस् संपवतो आणि नंतर वाद सुरू करतो.

तुझाच प्रिय
युसुफ

नेहरू जयकर समितीकडे वाद सोपवणार

नाईक बंगला,
वरसोवा रोड, अंधेरी
3.5.1926

प्रिय मित्र भट,

माझी परीक्षा एकदाची संपली व आता श्वास घेण्यास अवसर मिळाला आहे.

सुरुवातीपासून सांगायचे झाले तर त्या दिवशी श्रीयुत जीनांच्या अंगात ताप असल्यामुळे त्या "बिचाऱ्या माणसा"ला कोर्ट सोडून आणि आपले सर्व वाद (केसेस) आपल्या कनिष्ठ वकिलांकडे सोपवून पायी घर गाठावे लागले. त्यांच्या आशीर्वादाने 'यंग इंडिया सोसायटी'च्या निराश सभासदांची संकल्पपूर्ती अपेक्षेपेक्षा अधिक झाली आहे, असे मला वाटते. प्रत्येक वाईट गोष्टीतून काहीतरी चांगले निघत असते. खरे की नाही?

मला त्यानंतर आणखी काही सभा आयोजित करायच्या होत्या, पण आमच्या काही मित्रांना ती कल्पना पसंत पडली नाही. (यासाठी परीक्षेची सबब सांगण्यात आली). म्हणून मला श्रीमती नायडूंची सभा रद्द करावी लागली आणि श्री. जयकर आणि 'देशभक्त' हॉर्निमन यांचीही नाराजी पत्कारावी लागली.

पण परीक्षेनंतर मात्र मी एक चांगल्यापैकी आणि यशस्वी सभा आयोजित केली केली होती, ज्यामध्ये 'ग्रामीण पुनर्रचना' या विषयावर डॉ. सुमन मेहता बोलले. तो एक छानसा उपाहार होता. त्यांचे आयुष्यभरचे ग्रामीण जीवनाचे अनुभव साध्यासुध्या भाषेमध्ये विनोदाची पेरणी करीत त्यांनी आमच्यासमोर साकार केले. आणि दोन तासभर आम्हांला त्यांत गुंगवून ठेवले. जेव्हा तुम्ही परत याल त्यावेळी तो वृत्तांत वाचालच.

एक दोन दिवसांत आम्ही आमच्या ग्रामयात्रेला निघणार आहोत. डॉ. चंदूलाल देसाई, ज्यांच्याकडे आम्ही जाणार होतो ते सध्या भडोचमध्ये नाहीत; आणि साबरमतीच्या काँग्रेस अधिवेशनामुळे त्यांना तेथून 5 तारखेपर्यंत हालता येणार नाही. तेव्हा येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याची तयारी ठेवूनच आम्हांला लवकरात लवकर निघाले पाहिजे.

...आणि आता असे पहा महाराज, माझ्याकडून तुम्ही लांबलचक पत्राची अपेक्षा करताना प्रत्युत्तर निव्वळ एक पोस्ट कार्डावर भागवू शकत नाही. जबाबदार सहकार्याची इथे गरज आहे. म्हणून जर तुम्ही टाळाटाळ केलीत तर मला हा वाद नेहरू जयकर समितीसमोर न्यावा लागेल. त्यामुळे मुकाट्याने तुमच्या सर्व कामांचा तपशील लिहून पाठवत जा.

आदरपूर्वक
तुमचा मित्र,
युसुफ मेहरअली

प्रत्येक 'अशुभ' 'शुभा'चा अंश घेऊन येते

नाईक कॉटेज, अंधेरी
24.5.1926

प्रिय मित्र भट,

हे पत्र मी लिहीत असताना माझे वडील अत्यंत गंभीररीत्या आजारी आहेत. त्यांची परिस्थिती अनिश्चित आहे आणि उद्या काय होणार, हे एका परमेश्वरालाच माहीत.

मी माझा बहुतेक वेळ त्यांच्या बिछान्याशेजारी घालवतो आहे. जणू माझ्यासाठी एक दुपदरी आयुष्य सुरू झाले आहे. बाहेरून शांत, आत्मविश्वासपूर्ण आणि वरवर आनंदाचे– आतून ऐरणीवरचे, दुःखी अंतःकरण आणि संत्रस्त मन.

पण लोकांना आशावादी जीवनाचे धडे देणारा मी आता संयमाने या वाईट परिस्थितीत आशेचा किरण शोधण्याचा प्रयत्न करीत आहे. वाईटातून चांगले निघेल या आशेने.

तुमचे काय? तुमच्याकडून बऱ्याच दिवसांत काही खबर मिळालेली नाही. गुजरातेतील आमचा वेळ चांगलाच कारणी लागला. पण त्याबद्दल लिहिण्याची मनःस्थिती आणि उमेद दोनही आज माझ्याकडे नाहीत. परत कधी तरी त्यांच्याबद्दल लिहिण्याची वेळ येईल अशी आशा वाटते.

मिरचंदानी तुमची चौकशी करीत होते. जूनच्या पहिल्या आठवड्यात ते मुंबईला येत आहेत. मनाला उमेद येईल अशा एखाद्या ओळीचे तरी पत्र टाकण्याची कृपा करावी.

श्री. वि. दा. सावरकरांना माझे आदरपूर्वक सलाम पोहोचवावेत.

युसुफ मेहरअली

गांधीजी आणि समाजवाद

नाडियाद
23.11.1928

प्रिय मित्र भट,

... मी महात्माजींनाही भेटलो. ते म्हणाले, समाजवाद मी मानतो पण समाजवाद्यांचा समाजवाद नाही. मी अराजकवादही मानतो पण तो अराजकवाद्यांचा अराजकवाद नाही.

"त्याचा अर्थ काय, महात्माजी?" मी विस्मयचकित होऊन विचारले.

"हे पहा, समाजवाद्यांना त्यांचे उद्दिष्ट बळजबरीने हस्तगत करायचे आहे. त्याला मी हातभार लावू शकत नाही." त्यांनी उत्तर दिले.

मी त्यांना पुढे जाळ्यात पकडत म्हटले, "तर मग तुम्ही बळजबरी विरहित समाजवादाला पाठिंबा द्याल तर!"

"ठीक... अं... अं... हो!"

"म्हणजे तुम्ही फेबियन आहात."

"अं... हो, तसेच काहीतरी."

"पण तुम्ही फेबियन (समाजवादी) खरेच आहात का? मी यासाठीच हा प्रश्न विचारतो आहे, की भांडवलदार आणि मजूर यांच्या हितसंबंधांमध्ये कोणतीही तडजोड होऊ शकत नाही. आपल्याला काय वाटते?"

"मला वाटते की या दोघांमध्ये सामंजस्य शक्य आहे."

मला आशा आहे की 29 तारखेला लजपतराय दिनानिमित्त तुम्ही एक भव्य सभा आयोजित कराल. किंवा "यूथ लीगला सामील होऊन लजपतराय दिन साजरा करा", असे आवाहन करणारी पत्रके छापून का वाटू नयेत? लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला आपण कसा घेणार आहोत? भित्र्या मंडळींनी नुसत्या निषेधसभांचे आयोजन करावे; पण तुमचे आणि माझे काय? प्रिय मित्रा, आपण लजपतरायांच्या 'सर्वस्वा'चे उत्तराधिकारी आहोत. माझे मन बंडखोरीने उफाळून आले आहे; निर्बंधांमुळे चडफडत आहे, (वकिलीच्या) व्यवसायाचीही मला घृणा वाटते. लालाजींच्या रक्ताची हाक मला ऐकू येते आहे.

सादर,
तुमचा स्नेही
युसुफ

जयप्रकाशांसाठी विधानसभेतील कामकाज – अंदाजपत्रक अहवाल

द्वारा निसर्गोपचार केंद्र,
6, टॉडीवाला रोड, पुणे 1.
10.9.1949

प्रिय जयप्रकाशजी,

(विधानसभेतील) आमच्या पहिल्या दिवसाच्या अनुभवांचा हा ताळेबंद तुम्हांला सादर करीत आहे. पहिली गोष्ट म्हणजे सभापतींनी मुंबई प्रांतात झालेल्या संस्थानांचे प्रतिनिधी म्हणून 65 सदस्य विधानसभेत नियुक्त केले; त्याचा निषेध म्हणून मी दिलेला स्थगिती ठराव सभापतींनी दाखल करून घेतलाच नाही. त्यांचे म्हणणे असे होते की ती कार्यवाही राज्य सरकारची नव्हती; तर भारत सरकारची होती. स्थगन प्रस्तावासाठी हा विषय योग्य नाही, असे ते म्हणाले. त्यावर त्यांच्या खोलीत आम्ही या विषयाची बरीच लांब-रुंद चर्चा केली, पण काही उपयोग झाला नाही.

आणखी दोन स्थगनप्रस्ताव मला मांडायचे होते, त्यांनाही सभापतींनी दाद दिली नाही. मुंबई राज्य सरकारने विशेष बोर्डाची नियुक्ती करून त्यातर्फे आयोजित केलेल्या शालांत (स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट) परीक्षांच्या संपूर्ण गैरव्यवस्थेच्या संदर्भात पहिला ठराव होता. परीक्षेचे पेपर कितीतरी दिवस आधी बाहेर फुटणे, आणि बऱ्याच विद्यार्थ्यांचे पेपर हरवणे यांमुळे विद्यार्थ्यांना जे प्रचंड मानसिक कष्ट सोसावे लागले, त्याचा तपशील या ठरावात होता.

साबरमती जेलमधील कम्युनिस्ट कार्यकर्त्यांवर जो गोळीबार झाला, त्यात दोन कार्यकर्ते ठार झाले आणि बरेचजण जखमी झाले. या घटनेसंबंधात तिसरा स्थगन प्रस्ताव होता.

हे प्रस्ताव नाकारण्यामागे असे कारण सांगण्यात आले, की जरी हे विषय सार्वजनिक हिताशी संबंधित असले तरी ते ताबडतोबीचे नाहीत. विधानसभेच्या कामकाजाच्या नियमांनुसार ते वृत्तपत्रांकडे पाठवता येणार नाहीत.

ज्या वेळी सभापतींनी शपथ विधीसाठी 'जिवराज मेहता' हे पहिले नाव उच्चारले, त्यावेळी ताबडतोब उठून मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला, की डॉ. जिवराज मेहता आणि अन्य हे विधानसभेवर निवडून आलेले नसल्यामुळे त्यांना शपथ घेता येणार नाही. हा हरकतीचा मुद्दा सभापतींनी फेटाळला.

पुरुषोत्तम (त्रिकमदास)ने प्रचलित 'अफू सेवन कायद्या'ला एक दुरुस्ती सुचवून चर्चेला वळण देण्याचा प्रयत्न केला. त्या कायद्यातील एक कलम गाळावे अशी त्यांची सूचना होती. हा प्रश्न केवळ कायदेशीर स्पष्टीकरणाचा होता. या दुरुस्तीला विरोधी पक्षनेते (फोर्थ पार्टीचे– पूर्वीची मुस्लिम लीग– ए.ए.खान यांनी) व बहुजन समाजवादी पक्षाचे तुलसीदास जाधव यांनी पाठिंबा दिला. पण महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गोविंद देशपांडे यांनी (समाजवादी) पक्षावर प्रक्षोभक हल्ला चढविला. संतापलेल्या पुरुषोत्तमने त्यांच्या भाषणात दोनदा अडथळे आणले आणि उत्तर देताना त्याने सांगितले की सन्माननीय सदस्यांचे शेरे हे सभागृहाची अवहेलना करणारे आहेत. दुरुस्ती अर्थातच बारगळली.

सभागृहात घडले ते असे. सभागृहाबाहेर एन.जी.गोरे यांच्यासह 71 जणांना अटक झाली. त्याचे कारण असे, की मोर्चा काढण्यासाठी त्यांनी मागितलेली परवानगी नाकारण्यात आली होती. विधानसभेवरील सदस्यांच्या नियुक्तीविरोधात हा मोर्चा काढण्यात आला. म्हणून त्यांनी विधानसभागृहावर 100 यार्ड अंतरावर मोर्चा नेला होता. नंतर त्यांना पकडून पोलीस बंदोबस्तात नेण्यात आले. या घटनेमुळे पुण्यात पक्षाला अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे.

पुण्याची हवा फार सुखदायी आणि आरोग्यदायक आहे. मला इथे बरे वाटत आहे. प्रभावती, बिजूबेन, कृष्णा, लीला आणि निमू यांना खास शुभेच्छा.

तुमचा प्रिय
युसुफ

ताजा कलम : मुंबईतील विद्यार्थ्यांची अशी इच्छा आहे, की तुम्ही त्यांच्या संघटनेच्या एका सभेत बोलावे. सध्या महत्त्वाचा विषय फीवाढीचा आहे. तुम्ही जर काही वेळ काढू शकलात, तर त्यांची निराशा होणार नाही. त्या संदर्भात रांदेरिया आणि इतर तुमच्याशी संपर्क साधतीलच.

प्रकृती स्वास्थ्याच्या संदर्भात नेहरूंशी बातचीत

निसर्गोपचार केंद्र,
6, टॉडीवाला रोड,
पुणे 1.
5.9.1933

प्रिय पंडितजी,

तुमच्या सुटकेची खबर मिळाल्यावर झालेला आनंद तुमच्या मातोश्रींच्या आणि पत्नीच्या गंभीर आजारपणाची वार्ता ऐकून मावळला.

याचा परिणाम तुमच्या प्रकृतीवरही झालेला असणार. पण ती फारशी वाईट नसेल, अशी मी आशा करतो.

जेलमधून माझी सुटका झाल्यापासून प्रकृतीच्या संदर्भात माझा वेळ अतिशय अस्वस्थतेत गेला आहे. मुंबईच्या डॉ. एरूलकरांच्या उपचाराखाली मी दोन महिने होतो. त्यानंतर एक्स-रे घेतल्यावर मला स्वित्झर्लंडला जाण्याचा सल्ला मिळाला आहे; जो या आंदोलनाच्या काळात मी मानणे कधीच शक्य नव्हते.

नंतर दिनशॉ मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली मी निसर्गोपचार घेत आहे आणि गेले चार महिने त्यांच्या देखरेखीखाली मी या रुग्णालयात आहे. पण खास सांगण्यासारखी प्रगती दुर्दैवाने माझ्या प्रकृतीत झालेली नाही. मागील काही दिवसांत काही गोष्टी माझ्या दृष्टीने असमाधानकारकच घडत गेल्या आहेत; आणि वरचेवर येणारे रोगाचे झटके मला खलास करतील की काय, अशी भीती वाटते. त्यानंतर मला उपास राखण्याबद्दल सांगण्यात आले आणि गेले 24 दिवस मी फक्त पाण्यावर आहे. मला आशा वाटते की उपास व त्यानंतरचे उपचार यामुळे मला बराच फरक पडेल.

तुम्हांला ऐकून नक्कीच आनंद वाटेल की आता माझी फुफ्फुसे सुधारली आहेत. पण जठराच्या आतल्या पदराची त्याचप्रमाणे आतड्यांची आग यांच्यामुळे मला वेदना आणि अस्वस्थता सहन करावी लागते. पण कितीही तक्रार असली तरी माझ्या प्रकृतीला सध्यातरी धोका नाही.

आपण खुशाल असाल आणि आपल्या मातोश्री आणि पत्नी यांची प्रकृती लवकरच सुधारेल अशी आशा करतो.

प्रेमपूर्वक,
तुमचा स्नेही
युसुफ

जवाहरलालजींकडे दडपशाहीचा वृत्तांत रवाना

प्रजापरिषद,
भुज (कच्छ संस्थान)
26.5.1939

प्रिय जवाहरलाल,

व्हर्जिनिया क्वार्टरली रिव्ह्यूच्या संपादकांनी आपल्यासाठी पाठविलेले पत्र सोबत रवाना करीत आहे.

गेले काही दिवस येथील परिस्थितीत बराच तणाव आहे. स्वयंसेवकांना मारहाण, सभांवर हल्ले, राष्ट्रध्वज आणि गांधीटोप्या जाळणे इत्यादी हिंसक प्रकार गिरासियांकडून चालू आहेत. हे गिरासिया स्थानिक लोक आहेत आणि शासनाला दडपशाहीसाठी उपयोगी पडतात. शांतताभंगाच्या सबबीखाली मग आमच्या सभांवर बंदी आणली गेली. आमच्या सभेच्या स्थगितीचा जास्तीत जास्त फायदा उठवण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. तरीही आम्ही सभा भरविण्याचे ठरवल्यावर लोकांमध्ये उत्साहाची एक लहर पसरली; आणि सारे वातावरण जणू विद्युत्‌भारित झाले. मानकुवा खेड्यात दोनही बाजू सज्ज झाल्या. गिरासियांचा सरदार, मानकुआचा ठाकूर, लाठी, सुरे आणि तलवारी घेतलेल्या आपल्या गुंडांसह उपस्थित झाला; आणि सभा बंद झाली नाही तर इथे काहीही भयानक घडेल अशी धमकी देऊ लागला. मीही जरासुद्धा मागे हटलो नाही; आणि कधीही चकमक उडेल अशी परिस्थिती निर्माण झाली. माझा ताठा पाहून नंतर तो नरमला आणि सभेची जागा बदलल्यास सभेला परवानगी आहे असे म्हणू लागला. आम्ही ही अटही ठोकरली. जेव्हा वातावरणात अनिश्चितता दाटून राहिली, तेव्हा अचानक त्याने सर्व अटी मागे घेऊन सभा भरवण्यास परवानगी देऊन आम्हांला आश्चर्यचकित केले. आपल्या भूमिकेवर ठाम राहणे धोक्याचे असले तरी फार जरूरीचे आहे. याचा येथील जनमानसावर चांगला परिणाम झाला आहे.

महात्माजींनी कच्छच्या महाराजांना पत्र लिहून वातावरणातील ताण कमी करण्याचे नेहमीप्रमाणे आवाहन केले आहे.

आपली प्रकृती ठीक असेल, अशी आशा करतो.

तुमचा शुभेच्छू
युसुफ मेहरअली

सौंदर्यासक्त मेहरअली

मुंबई
26.9.1945

प्रिय जवाहरलाल,

आपल्या 'स्वातंत्र्याच्या वाटेवर' या आत्मचरित्राच्या अमेरिकन आवृत्तीला शोभेल असे आवरण सोबत पाठवीत आहे. मी शांतिनिकेतनमध्ये होतो तेव्हा ते केलेले आहे. माझे प्रेम व शुभेच्छांसह आपल्याकडे ते पाठवत आहे.

आपल्यापर्यंत ते पोहोचेल तेव्हा मी हवा बदलासाठी मुंबईहून इगतपुरीला गेलेलो असेन.

घरी सर्वांना शुभेच्छा.

आपला स्नेहांकित
युसुफ

महात्माजींची प्रशंसा

मुंबई
9.3.1950

प्रिय दिनू,

तुझे पत्र पाहून खूप आनंद झाला. 'महात्मा'ची काही नमुना पाने वाचून माझ्या हृदयाला जणू ऊब मिळाली. त्याचे प्रारूप आणि टाइप चांगले वाटले. आता सुरुवात झालीच आहे; तर पुढील काम जलद होईलच.

तुलना करायची झाली तर दुसऱ्या देशांत असे किती भाग्यवान लेखक असतील! जेव्हा मी तुमचे हे लेखन पूर्ण करण्यासाठी तुम्ही घेतलेले परिश्रम आणि यातना यांचा विचार करतो. तेव्हा मला लेखन सोडून द्यावेसे वाटते. जनसामान्यांची समजूत काहीही असली तरी एकादे चांगले पुस्तक लेखकाला आपल्या रक्ताने पुरे करावे लागते; कारण त्या लिखाणाची पीडा शरीरातली नसन्‌नस उद्‌ध्वस्त करणारी असते आणि त्याचा सर्व आनंद व समाधान हे मरणोत्तर म्हणजे ती पीडा भोगून झाल्यावर असतात. महत्त्वाची गोष्ट अशी की उशीरा मिळत असला तरी हा आनंद अमीट असतो. आता तुम्ही ते पुस्तक लिहून पूर्ण केले आणि ते मुद्रणालयात गेले आहे; म्हणजे त्यातला अधिकाधिक वाईट आणि कंटाळवाणा वेळ आता संपला आहे. आता मी आकाशातील काळ्या ढगांच्या चंदेरी किनारी शोधण्यात मग्न आहे.

नवीन मशीन आणि पेपर आला आहे हे वाचून दिलासा वाटला. काम सुरू झाल्याचे कळल्यावर विठ्ठल सक्रिय होईल याची मला खात्री आहे. तुम्हांला हवा असेल तेव्हा मी त्याला फोन करू शकतो अथवा बोलवू शकतो. आणि ब्लॉक्सबद्दल विचारूही शकतो.

लुई फिशरने त्याचे गांधीजींवरचे पुस्तक पूर्ण केले की नाही हे जाणून घेण्याची तुम्हांला उत्सुकता असेलच. त्याचे हस्तलिखित आता प्रकाशकांकडे गेले आहे, ते जवळजवळ 500 पानांचे आहे. त्याची किंमत जवळजवळ 5 डॉलर्स एवढी होईल आणि येत्या उन्हाळ्याच्या दिवसात हार्पर्स ते प्रकाशित करतील. त्याची इंग्रजी आवृत्तीही त्याच सुमारास प्रकाशित करण्याची योजना आहे. त्याआधी तुमचा 'महात्मा'चा पहिला खंड बाजारात येऊ शकाल तर बरे होईल.

मी सध्यातरी लखनौला येईना असे वाटत नाही. मी मद्रासला सोशलिस्ट पार्टीच्या वार्षिक अधिवेशनासाठी एप्रिलअखेर अगर आसपास जाऊ शकेनसे वाटते.

चलपती राव आणि अन्य काही मित्रांना गाढ शुभेच्छांसह,

स्नेहांकित,
युसुफ

प्रति. डी. जी. तेंडुलकर

खेळ व सिनेमा यांविषयी

12/13 निशाणपाडा रोड,
मुंबई.
18.5.1926

प्रिय उपेंद्र

... सर नारायण चंदावरकर यांच्या बंगलोर येथे हृदयविकाराने झालेल्या मृत्यूबद्दल तू ऐकले असशीलच. खरोखरच भारत अडचणीच्या काळात एक मोठा माणूस गमावून बसला आहे.

... एक समाजवादी मालिका : 'गरिबांचा बादशहा' ('दि एम्परर ऑफ द पुअर') इम्पिरिअल सिनेमामध्ये चालू आहे, (जी, मी पाहत आहे) एक्सलसिएरला 'दी इल्यूसिव पिंपर्नेल. या शिवाय ब्रोटोक रॉयल इटालियन सर्कस, वॉलेट सर्कस, आणि देवलांची जपानी सर्कस. आगाखान हॉकी टूर्नमेंटस् तर मजेत चालल्या आहेत. तू काय वाचतो आहेस?

तुला मुंबईहून हवे असे काही पाठवू शकतो काय? जेव्हा तुम्ही सुरतला जाल तेव्हा मला कळवायला विसरून नका. माझी रमजान ईद उद्या किंवा परवा असणार आहे.

शुभेच्छांसह,
युसुफ

हातात लेखणी घेऊनच वाचायचे

12-13 निशाणपाडा रोड,
मुंबई.
18.5.1926

प्रिय उपेंद्र

काल इस्लाम जिमखाना 'हार्ड लाइन्स हॉकी कप' जिंकला. पण आगाखान हॉकी टूर्नमेंटस्च्या सेमी फायनल्समध्ये हरला.

मी सध्या व्हिसेंट स्मिथचे 'अकबर' – थोर मोगल सम्राट – याच्याबद्दलचे पुस्तक वाचत आहे.

लॉर्ड मोर्लेचा सल्ला "हातात पेन ठेवून वाचावे," हे आठवत जा; आणि ब्रिटिश लेखकांचे लिखाण वाचताना मनाला भिडणारे असे उतारे तुला आढळतीलच.

नुसता वाचूनच समाधानी होऊ नकोस. त्यांना कागदावर उतरवून काढ.

शुभेच्छांसह,

तुमचा
युसुफ

डोक्यापेक्षा पगडी मोठी

प्रायव्हेट वाय. जे. मेहरअली
पहिली मुंबई बटालियन युनिव्हर्सिटी
प्रादेशिक तुकडी,
बी- कंपनी, आठवी प्लॅटून क्र.1097
पाषाण कॅम्प, खडकी, पुणे
12.10.1933

प्रिय उपेंद्र,

... सुदैवाची गोष्ट अशी की माझे शिरस्त्राण (पगडी) ही माझ्या मानाने फार मोठी होती. म्हणून ती शिवून घेतली. एक मूर्ख आला आणि मला जोराचा टोला मारून गेला. त्यामुळे माझी पगडी माझ्या गळ्यात आली आणि तिने माझे डोळे, कान झाकून घेतले. जहांगीर मेहताने माझा अवतार बघून शांतपणे शेरा मारला की मी मुकुट चढविलेल्या कबुतरासारखा दिसतो आहे! ही उपमा सर्वांनाच भावल्यामुळे माझा अलीकडे कधीकधी 'कबुतर' असा सन्मानपूर्वक उल्लेख केला जातो.

बाटलीवालाचा चष्मा तुटल्यामुळे सध्या तो अर्धवट आंधळा आहे. निदान चष्मा दुरुस्त होऊन येईपर्यंत तरी.

जहांगीर मेहताच्या चष्म्याची काच फुटली आहे.

काय हे साहस! हे सर्व वाचून तुला मजा वाटते आहे की नाही? तरीसुद्धा आम्ही जगातली सर्वांत सुंदर माणसे आहोत – कारण तू कधी ऐकले आहेस का – यू.टी.सी.च्या मुलांशी तुलना करता त्यांच्यापेक्षा कोणी सुंदर असूच शकत नाही!

शुभेच्छांसह,
स्नेहांकित
युसुफ

देशभक्तांसाठी सुधारणागृह

सुधारणागृह, भायखळा
मुंबई.
22 फेब्रुवारी 1932

प्रिय उपेंद्र,

वकिलीच्या परीक्षेच्या पहिल्या भागात तू उत्तीर्ण झाल्याचे समजले. आता तू अधिक किरकोळ विषयांबद्दल– म्हणजे आमच्यासारख्या स्वयंसेवकांच्या मार्गाबद्दल विचार करू शकतोस. अर्थात् डॉ. जॉन्सन यांच्या विख्यात उद्गारांच्या– देशभक्ती हे बदमाषांचे अखेरचे आश्रयस्थान आहे– या निर्णयाला तू आला नसशील तरच खरे तर मीही त्यांच्या मताशी जरासा सहमत आहे.

इथल्या परिस्थितीबद्दल लिहायचे, तर ती फार वाईट नाही. भविष्यातील घटनांची चाहूल त्यातून लागत नाही. इथले आयुष्य थोडेफार निष्क्रिय आहे. माझ्यासारख्यांचे मात्र छान चालू आहे. या ठिकाणी कोणीही एक सोबतीचीच इच्छा करू शकतो; काही वेळा त्यापेक्षाही काही अधिक. वेळ घालविण्याची साधने वारशाने आलेली, आणि नवीन शोधून काढलेली, लवकर निरुपयोगी होत नसलेली. पण माझे सत्याग्रही अंतःकरण मला इथे त्या सर्वांची नोंद करू देत नाही. गरज ही शोधांची जननी आहे असे सतत म्हटले जाते. पण आमचे संशोधन तुझ्यासारख्या सदैव साशंक असणाऱ्या माणसाच्या मनातसुद्धा मत्सर निर्माण करील.

आता कोणत्याही दिवशी मला पॅरोलवर सोडण्यात येईल. त्या काळात म्हणजे फक्त 24 तासांत कोणत्याही 'राजकीय' माणसास भेटण्याची मला परवानगी नाही. आणि वेळ संपल्यावर एखाद्या शहाण्या मुलाप्रमाणे स्वतःला परत अटक करवून घ्यावी लागेल. तुला आणि बापूभाईंना भेटण्याची मला फार इच्छा आहे. पण कुठे आणि कसा भेटणार?

सध्या माझे बरेच वाचन चालू आहे; तरी आजूबाजूचे वातावरण वाचनातले सातत्य राखण्यासाठी अनुकूल नाही. माझ्या फेरअटकेनंतर मला दीर्घकाल तुरुंगवास पत्करावा लागेल असे दिसते. म्हणून काही पद्धतशीर वाचन करावे अशी योजना आहे. आता त्यासाठी पुस्तकांच्या संबंधाने तुम्ही मला मदत केली पाहिजे. हॅवेलची एक-दोन पुस्तके तुम्ही मला मिळवून देऊ शकाल का? (आयडियल्स ऑफ इंडियन आर्ट, हिमालयाज इन इंडियन आर्ट, हॅंडबुक ऑफ इंडियन आर्ट) गॅल्सवर्दीच्या

नाटकांबद्दलचे माझे पुस्तक तू शोधून काढले असशील अशी आशा आहे; नसल्यास हे पत्र मिळाल्यावर लगेच ते काम कर.

माझ्यासाठी फ्रँक हॅरिसचे बर्नार्ड शॉच्या जीवनावरचे पुस्तक जे अलीकडेच प्रकाशित झाले आहे ते, मिळवशील का? किंवा बॅरीवरचे पॅट्रिक ब्रेब्रुकचे पुस्तक आणि गॅल्सवर्दीवरची काही पुस्तकेही मिळाली तरी आवडतील.

तुझ्या घरातल्या वडील मंडळींना माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा दे. रत्नूलासुद्धा.

तुझ्या भेटीची वाट पाहणारा,

स्नेहांकित

युसुफ

दहा

उदात्तता आणि सौंदर्य यांचे मिलन

"खंगून जाऊन आम्ही पहुडलेले असू
तेव्हा तरुण आणि तजेलदार
व्यक्ती उभ्या ठाकतील
आम्ही खोदलेल्या पायऱ्यांवरून ते चढतील
आम्ही बांधलेल्या सोपानावरून ते वर जातील
ज्यांनी हे सोपान रचले त्यांची नावेही
त्यांना माहीत नसतील."

— *ऑलिव्ह श्रायनर*

राजकारण आणि तत्त्वज्ञान यांबद्दल मतभेद असूनही युसुफ मेहरअली त्यांचा उमदेपणा, दयाळू वृत्ती, हार्दिक मैत्री आणि सौंदर्याची उपजत समज किंवा सौंदर्यदृष्टी या गुणांमुळे सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला आकृष्ट करत. परदेशांतील कित्येक व्यक्तीही युसुफ मेहरअलींच्या सहवासात त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने भारून जात आणि भारतात फिरताना युसुफ मेहरअलींच्या नावाचा पासपोर्टसारखा वापर करता येईल असे त्यांना वाटे.

युसुफ मेहरअलींच्या निकट सहवासाचे भाग्य लाभलेले प्रतिभाशाली कलाकार आणि शिक्षणतज्ज्ञ असे मानत असत की मेहरअलींच्या मित्रभावनेचे परिवर्तन अशा एका विधायक शक्तीत झाले आहे की जिच्यामुळे समाजाच्या रोषाची परतफेड, सचोटी आणि सद्‌भावना परिवर्तित करणाऱ्या निर्व्याज, आनंदी हास्यातून ते करू शकतात. युसुफ अशा काही असाधारण व्यक्तींमधील एक होते, ज्यांना माणसामधील माणुसकी, न्यायप्रियता व सहकारिता वाढत जावी असे वाटे. त्यांचा भर विसंगतींवर नसून सामंजस्यावर होता.

प्रत्येक लढ्याची एक प्रेरक घोषणा असते. 1942 च्या ऑगस्ट क्रांतीत गांधीजींच्या 'चले जाव' या घोषणेने चैतन्य पसरले. सुभाषचंद्र बोसांची आझाद हिंद सेना 'चलो दिल्ली' या घोषणेने अभिमंत्रित होऊन वाटचाल करू लागली; तशीच मेहरअलींच्या 'सायमन, परत जा' या घोषणेने विसाव्या शतकातील तिसऱ्या दशकामध्ये खळबळ माजवली.

युसुफ मेहरअलींना मित्रांबद्दल वाटणारा व्यक्तिगत स्नेह आणि चिंता या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील उत्कृष्ट बाजू होत्या. स्वतः मृत्युशय्येवर पडलेल्या मेहरअलींनी लंडनला जाणारा त्यांचा मित्र निरोप घ्यायला आला असता त्याला 'स्वतःची काळजी घे' असा सल्ला दिला; त्याचबरोबर '**डेथ इन द आफ्टरनून**' हे अर्नेस्ट हेमिंग्वे यांचे पुस्तक त्याच्या हातांत ठेवले.

युसुफ मेहरअलींचा समतेबाबतचा आग्रह थंड डोक्याने विचारपूर्वक केलेला व आर्थिक सामाजिक आकडेवारीच्या विश्लेषणातून आला नव्हता. त्यांची सद्विवेक बुद्धी, जी या अन्याय्य समाजातील असमानता, गुन्हेगारी आणि दुष्टावा यांमुळे सतत व्यथित होत होती, तिची नैतिक हाकच त्यांना समानतेच्या मार्गाकडे आकर्षित करीत होती.

मेहरअलींसारखी चैतन्यशील आणि मोहक व्यक्ती दीर्घकाळ आजाराने अंथरुणाला खिळून राहिली, यासारखी दुसरी शोकांतिका नसेल. तथापि स्वतःच्या वेदना लपवून वातावरण उदास राहू नये म्हणून ते त्यांना भेटायला येणाऱ्या व्यक्तींबरोबर हसून आणि विनोदी टीकाटिपणी करून त्यांना चांगल्या मनःस्थितीत ठेवण्यासाठी व त्यांची उमेद वाढविण्यासाठी स्वतः सतत हसत राहत.

1942 च्या चळवळीत तुरुंगात स्थानबद्ध असलेल्या युसुफ मेहरअलींना ब्रिटिश शासनाने एवढ्यासाठीच सोडले की युसुफचे निधन तुरुंगात होईल ही त्यांना भीती वाटत होती. पण मृत्यूशी दोन हात करीत युसुफ आणखी आठ वर्षे जगले. केवळ वैद्यकीय उपचारांमुळे नाही; तर त्यांची प्रखर जीजिविषा आणि लढाऊ वृत्ती यांमुळे त्यांनी ही सर्व वर्षे निभावून नेली.

युसुफ मेहरअलींच्या स्वभावात अलिप्ततेला जागा नव्हती, ते सर्वसमावेशक होते. सर्वांमध्ये मिळून मिसळून राहणे त्यांना आवडे. म्हणून त्यांच्या मैत्रीचा जिला स्पर्श होई ती व्यक्ती सागराकडे धावत जाऊन त्यात लुप्त होणाऱ्या नदीसारखी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होऊन जाई.

युसुफ मेहरअलींच्या बुद्धीच्या तीक्ष्णपणाचा अनुभव त्यांची शेरेबाजी आणि त्यांनी बोलताना दिलेले शाब्दिक फटके यांतून येई. जेव्हा गांधीजींना 1942 साली अटक झाली तेव्हा लंडनला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बोलताना भारतमंत्री म्हणाले,

"गांधींना पकडले तेव्हा एक कुत्राही भुंकला नाही." त्यावर एक मर्मभेदी टोमणा युसुफ मेहरअलींनी मारला. ते म्हणाले, "हो! खरे आहे! कारण गांधींना पकडले नाही तर ते कुत्रे भुंकत राहतात."

निर्व्याज आणि अभिजात खट्याळपणा हा युसुफ मेहरअलींचा दुसरा स्वभाव होता. 3 फेब्रुवारी 1928 या दिवशी युसुफ आणि त्यांचे सहकारी यांनी मुंबई बंदरात पहाटेच बोटीतून भारताच्या भूमीवर पाय ठेवणाऱ्या सायमन कमिशनसमोर अचानक निदर्शने केली. जणू ते खरोखरीच 'चार्ज ऑफ द लाइट ब्रिगेड' होते. तेव्हा तेथील पोलिसांनी युसुफ आणि त्यांच्या सहकाऱ्यांना ठोकून काढले. ही हकीगत अतिशयोक्ती होऊन वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. खरचटलेले आणि बँडेजमध्ये गळ्यात हात बांधलेले युसुफ मेहरअली घरी परतत असताना शेजारून चाललेल्या एका माणसाने युसुफ मेहरअलींना पाहून त्यांच्याकडे चौकशी केली की 'सायमन कमिशन'समोर झालेल्या तरुण निदर्शकांवरील लाठीमारात ते जखमी झाले आहेत की काय? या प्रश्नाला युसुफ मेहरअलींनी होकारार्थी उत्तर दिले. तेव्हा तो पुढे म्हणाला, "आमचे नेते युसुफ मेहरअली हेही त्यात जखमी झाले आहेत आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आले आहे." त्यावर वरवर गंभीरपणे, स्वतःची ओळख न देता, मेहरअली म्हणाले, "तसे नाही, ही सर्व अतिशयोक्ती आहे." हे ऐकून तो रस्त्यावरून चाललेला माणूस त्यांच्याकडे तिरस्कारयुक्त कटाक्ष टाकून चालू लागला. संध्याकाळी चौपाटीवर भरलेल्या निषेधसभेत त्या माणसाला असे आढळून आले, की त्या सभेचे पुढारी मेहरअलीच होते, जे त्याला सकाळी रस्त्यावर भेटले होते. आपल्या गंभीर राजकीय लढ्याच्या आणि मोहिमांच्या कामांमधील रिकाम्या वेळात अशा प्रकारचा खट्याळपणा करण्यात मेहरअलींना फारच मजा वाटे.

परदेशात असलेले भारताचे राजदूत आणि मुत्सद्दी कमीत कमी बोलणे पसंत करतात. त्यांच्या कामगिरीत त्यांच्या मितभाषीपणाचा मोठा वाटा असतो. शब्दांची काटकसर हा अलीकडच्या मुत्सद्यांचा एक राजशिष्टाचार बनला आहे. पण युसुफ मेहरअली मात्र युरोप आणि अमेरिकेतील वेगवेगळ्या भागांत फिरताना भारताचे अनधिकृत सांस्कृतिक राजदूत होऊन हिंडत; आणि भारताचे मनोगत सर्वांसमोर अगदी स्वतःला थकवा येईपर्यंत मांडत. भारताच्या दैदिप्यमान सांस्कृतिक परंपरा, इतिहास, कला, शिल्प यांची ते भरभरून माहिती देत आणि त्या बदल्यात भेट दिलेल्या त्या देशांतील इतिहास आणि संस्कृती यांचीही माहिती जमवत जात. त्यांचे संवेदनशील आणि स्वागतशील मन त्यांच्या साहित्यविषयक अलौकिक सामर्थ्यातून प्रकट होई; आणि संस्कृती व इतिहास यांच्या सफरीमधले आपले सर्व सौंदर्यास्वाद युसुफ आपल्या लेखणीतून अभिजात लावण्य आणि सुंदरता व्यक्त करीत उतरवत असत.

फ्रेंच राज्यक्रांतीची सफर (ए टूर ऑफ दी फ्रेंच रेव्होल्युशन) या आपल्या एका अप्रकाशित लेखात, मेहरअली जेव्हा फ्रेंच राज्यक्रांतीच्या त्या ऐतिहासिक भूमीत गेले, तेव्हा त्यांच्या मनात अद्भुत आनंदाच्या ज्या लाटा उसळल्या त्यांचे वर्णन त्यांनी केले आहे. ऐतिहासिक स्थळांचे मर्म समजावून घेण्याची मेहरअली यांची विशिष्ट पद्धत होती. भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचा मिलाफ होऊन त्यातून भविष्याचा मार्ग उजळून निघेल अशा काल बिंदूंच्या शोधात ते असायचे. अशा प्रकारचा हादरून टाकणारा एक बिंदू 'फ्रेंच राज्यक्रांतीतील पॅरिस' हा होता. मेहरअलींनी फ्रेंच राज्यक्रांतीची सफर साहजिकच बॅस्टिलपासून सुरू केली. या ठिकाणीच तो कुविख्यात किल्ल्यातील तुरुंग होता, जो 14 जुलै 1789 या दिवशी जनतेने फोडून डांबून ठेवलेल्या बंदींना बाहेर काढले; आणि फ्रेंच राज्यक्रांतीला सुरुवात झाली. तो दिवस स्वातंत्र्याच्या इतिहासात चिरस्मरणीय झाला आहे.

युसुफ मेहरअलींचे मन 1789 सालच्या पॅरिसला पोहोचले, ज्यामध्ये एकीकडे अनिर्बंध भोगविलास आणि दुसरीकडे अपरिमित दुःख-दारिद्य असे दुहेरी दृश्य ते पाहत होते. जेव्हा तेथील जुने दप्तर मेहरअलींनी पाहिले तेव्हा त्यांना असे आढळले की त्या वेळी पॅरिस शहराच्या केवळ एका विभागात 31,000 जणांची नोंद बेरोजगार अशी होती. अन्नाचे गंभीर दुर्भिक्ष्य होते. आणि किंमती भरमसाठ वाढत चालल्या होत्या. फ्रान्सची राणी मारी आंतोनेतला या विदारक परिस्थितीची कल्पना देण्याचा प्रयत्न झाला, ती हकीगत युसुफ मेहरअलींनी आपल्या साहित्यकृतीत मजेदारपणाने नोंदवली आहे. त्यात राणीचे खानदानी अज्ञान आणि निरागसता दाखवणाऱ्या त्या प्रसिद्ध उद्‌गारांचाही उल्लेख आहे. "जर लोकांकडे खाण्यासाठी ब्रेड नाही तर मग ते केक का खात नाहीत?"

फ्रेंच राज्यक्रांतीच्या सफरीमध्ये युसुफ मेहरअलींनी अनेक दिवस आनंदोत्साहाचा अनुभव घेतला. ते रोमांचित करणारे क्षण आठवताना मेहरअलींनी लिहिले, "आज त्युलरिसच्या सुंदर बागांतून कोणीही फिरू शकतो. तिथे आता राजप्रासाद उरलेला नाही. किंवा सीन नदीवरील पूल ओलांडून कॉन्सर्जेरियोच्या भव्य तुरुंगात जाऊन येऊ शकतो. याच तुरुंगात राणी मारी आंतोनेत, गिरोंदवादी आणि इतर अनेकांना गिलोटीनकडे नेण्यात आले. पॅरिसमध्ये येणाऱ्या प्रत्येकाने ही जागा पाहणे आवश्यक आहे. त्या क्रांतीमध्ये सामील झालेल्या थोर व्यक्तींची नावे आणि त्यांच्याशी संबंधित अमौलिक स्मृतिचिन्हे मिरवणारी अनेक वस्तुसंग्रहालये येथे आहेत, विशेषतः कार्ना वाले इथले वस्तुसंग्रहालय, ज्यात फ्रेंच राज्यक्रांतीचा मूळ जाहीरनामा वाचायला मिळतो. त्याचबरोबर बॅस्टिलच्या तुरुंगाची प्रतिकृती आणि त्या तुरुंगाच्या विध्वंसाची ह्यूबर्ट रॉबर्ट यांनी केलेली रंगचित्रे (पेंटींग्ज),

अथवा फ्रान्सचा सम्राट सोळावा लुई याने काढलेला शेवटचा हुकूमनामा आणि त्याच्या वधासंबंधीची ढीगभर कागदपत्रे इथे पाहायला मिळतील. शिवाय इथे असलेल्या शेकडो इतर गोष्टी, कपडे, पदके, कागदपत्रे आपली स्मृती चाळवतात. 'फ्रेंच राज्यक्रांतीवेळच्या पॅरिस'ची सफर किती लाभदायक आहे!''

युसुफ मेहरअलींनी केलेले हे पॅरिसचे हुबेहूब वर्णन त्यांचे प्रतिभाशाली मन, इतिहासाची समज, कला आणि सौंदर्य यांची आसक्ती, निवडक गोष्टी टिपून ठेवण्याची सवय, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुनरुत्थानाच्या आणि क्रांतीच्या त्या जन्मभूमीविषयी त्यांनी व्यक्त केलेल्या मुलायम भावना, इत्यादींचे दर्शन घडवते.

युसुफ मेहरअलींच्या छोट्या पण लोभसवाण्या जीवनाचे हे विविध रंग. जीवन हे वर्षांतून न मोजता असामान्य कृतींतून मोजायचे असेल तर युसुफ मेहरअली अशा प्रकारच्या उद्दिष्टपूर्ण जीवनाचे एक ठळक प्रतीक होते. त्यांच्या लेखी माणूस हे मानवतेचे एक परिमाण होते. युसुफचे सर्व प्रयत्न माणसाचे व्यक्तिमत्त्व फुलवण्याचे होते; माणसाच्या दुःखांचे भांडवल करण्याचे नव्हते. भोवतालच्या माणसांच्या नाडीच्या ठोक्यांबरोबर त्यांच्या जीवनाच्या तारा झंकारत असत. मानवाबद्दलची गाढ आस्था त्यांच्या आयुष्याचा मूळ स्रोत होता. म्हणूनच भोवती समाधानाचे वातावरण असले तर युसुफचे हृदय आनंदाने प्रफुल्लित होई. पण दुसऱ्याच्या जीवनातले दुःख आणि असहायता त्यांना यातनेने घायाळ करीत असे. युसुफचे चुंबकीय व्यक्तिमत्त्व उदात्तता आणि सौंदर्य यांचे आत्यंतिक मुलायम असे रसायन होते. त्यांचे मानवनिष्ठ मन क्रौर्य आणि कुरूपता यांचा धिक्कार करत असे. म्हणूनच त्यांच्या समाजवादाला सौंदर्यवादाचा आणि नीतिमत्तेचा पाया होता.

कोणत्याही धार्मिक प्रणालींचा अंगीकार युसुफनी केला नाही, पण वैश्विक धर्माचे पावित्र्य त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधून परावर्तित होत होते. कवी नसतानाही कवीची तरल संवेदनशीलता त्यांच्यामध्ये होती. संगीतकार नसूनसुद्धा त्यांना सुरावट (सुसंगती) आणि लयबद्धता यांची दैवी देणगी लाभली होती. रंगकर्मी नसूनही त्यांच्या आयुष्याच्या सुंदर कॅन्व्हासवर त्यांनी मनोहर रंगांची उधळण केली. अशा युसुफ मेहरअलींची वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी मृत्यूने क्रूरपणे संपविलेली तरलतम जीवनकहाणी रवींद्रनाथ टागोरांच्या खालील अमर गीतपंक्तींतच व्यक्त होऊ शकेल.

माझी प्रभात सुमधुर गीतांनी झंकारली होती.
आता संध्येचा सूर्यास्तही रंगभरित असू दे.

परिशिष्ट

पॅरिसमधील साहित्यिक फेरफटका

(युसुफ मेहरअलींचा अप्रकाशित लेख)

माझ्या पॅरिसच्या मूल्यवान स्मृती या राजकीय अगर इतर थोरामोठ्यांच्या भेटींबद्दलच्या नाहीत; त्या आहेत, त्या महानगरात केलेल्या साहित्यिक भटकंतीच्या. पॅरिसचे अंतरंग उलगडून पाहण्याच्या चाव्या तुम्हांला हव्या असतील तर प्रवासाचे ठरावीक थांबे पाहून तुम्ही संतुष्ट होऊ नका. लुव्रचे वैभव, लक्झेंबर्गचा बहुरंगीपणा, नोत्रदामचे भव्य निमुळते मनोरे, सेंट चॅपेलची अतिसुंदर काव्यात्मकता, जिच्या नजाकतीत मला आग्रा किल्ल्यातील मोती मशिदीची प्रतिकृती सुस्पष्ट दिसते; या ठिकाणांना तर तुम्ही भेटी देतच असता. या सर्वांमुळे आपल्या ऐतिहासिक स्मृतींमध्ये खळबळ माजते, हे खरेच. पण याखेरीज दुसरे एक पॅरिस आहे– मोलिए आणि कॉर्नेय् यांचे पॅरिस, बाल्झाक आणि व्हिक्टर ह्यूगो, अलेक्झांडर ड्यूमा आणि एमिल झोला यांचे पॅरिस, अनातोल् फ्रान्स, रोमा रोलाँ आणि मार्सेल प्रुस्त यांचे पॅरिस हे त्या नगरीच्या इतिहासाच्या प्रकाशझोतात आलेल्या इतर गोष्टींइतकेच विलोभनीय आहे.

माझी पॅरिसला ही तिसरी भेट होती, पण त्या शहराविषयीची माझी उत्सुकता जराही कमी झाली नव्हती. मुक्कामाच्या पहिल्याच दिवशी मी माझ्या काही आवडत्या ठिकाणांची उडती झलक पाहण्याचे ठरविले. सुप्रसिद्ध लेखक राजा राव यांचे पॅरिस म्हणजे दुसरे घर. त्याने मला गाडीत घातले आणि आम्ही सावकाश मादलेन्वरून पुढे गेलो. तिथे आम्ही फक्त थांबलो ते त्या वास्तूचे भव्य अवशेष डोळ्यांखालून घालून तिचे सौंदर्य पिऊन घेण्यासाठीच. त्यानंतर आम्ही 'रू रॉयाल'मधून हिंडलो आणि तेथील सुखसोयींच्या साधनांनी आणि उपकरणांनी गच्च भरलेली मोठमोठी दुकाने पाहिली. पुढे 'प्लास द ला काँकॉर्द'च्या जवळून आम्ही अगदी सावकाश गेलो. क्रांतीच्या दिवसांत गिलोटीन इथेच उभे करण्यात आले होते. राजा-राणींची मस्तके त्या गिलोटीनखाली धडावेगळी झाली. काही दिवसांनी त्यांना मृत्युदंड ठोठावणाऱ्या दांताँ, देमुलिन आणि रोबेस्पीएर यांनाही त्याच

निष्ठुर नियतीला सामोरे जावे लागले, आणि कोणत्या तरी अनामिक थडग्यांत जाऊन पडावे लागले. त्यानंतर पर्यटकांचा स्वर्ग समजल्या जाणाऱ्या 'रू रिवोली' या दुसऱ्या एका रस्त्यावर आम्ही फिरलो. त्युलरिसच्या ऐतिहासिक बागांमधून आम्ही काही काळ रेंगाळलो व नंतर नेपोलियनने आपल्या विजयोत्सवाप्रीत्यर्थ बांधललेल्या सुरेख 'प्लास दु कारुझल' स्मारकाकडे हळूहळू आलो. आमच्या एका बाजूला लुव्र होते. हे वस्तुसंग्रहालय म्हणजे स्वप्नांचा खजिना असलेली अद्‌भुत वास्तू आहे. इथे 'व्हीनस द मिलो' आणि 'मोनालिसा', 'दि विंग्ड् व्हिक्टरी' व 'अपोलॉन गॅलरी' अशा विलक्षण कलाकृती समोर येतात, की ज्या पाहताना श्वास आपोआप रोखला जातो.

पुढे आम्ही नोत्रदामच्या प्रचंड प्रार्थनालयाकडे (कॅथेड्रल) आलो. फ्रान्समधील हे चर्च सर्वांत भव्य तर आहेच; त्याचबरोबर त्याचा इतिहास आणि त्याच्याभोवतीच्या दंतकथा यांमुळेही ते विख्यात झाले आहे. सौम्य संधिप्रकाशात त्याचा देखावा किती वैभवसंपन्न दिसतो! किती आदरणीय पुण्यात्म्यांचे पाय या वास्तूला गेल्या हजार वर्षांत लागले असतील! आणि आतील अलौकिक सौंदर्य उधळणाऱ्या त्या 'रोज' नावाच्या खिडकीवर किती अनिमिष नेत्र खिळले असतील?

आणि नंतर आम्ही त्या जादुभारित लक्झेंबर्ग उद्यानात पोहोचलो. थेट आमच्यासमोर मार्गारित द वाल्वाचा पुतळा होता, जो ड्यूमाने आपल्या कादंबरीत अमर केला आहे. बाजूला कातरिन द मेदिसीचा भव्य महाल होता. रस्त्याच्या पलीकडे सुप्रसिद्ध तीन शिलेदारांची (थ्री मस्केटियर्स) वस्ती होती. कितीतरी गोंडस, आनंदी आणि निर्व्याज बालके या बागेत खेळत होती! लष्कराचा बँड आणि कठपुतळीच्या खेळाच्या कार्यक्रमात आणखी शेकडो गुंतून पडले होते. त्या स्थळाचा निरोप मी घेतला तो अनिच्छेने आणि पुन्हापुन्हा तेथे येण्याचा संकल्प करूनच.

रात्रीच्या जेवणासाठी आम्ही कलाकारांच्या खास अड्ड्यावर म्हणजे बुलेवार्द मॉंपारनास येथे गेलो. वाटेत रोमारोलॉं यांचे घर लागले. त्यावेळी आम्ही आत गेलो नाही; पण सहा आठवड्यानंतर एक दिवस त्या थोर लेखकाची भगिनी आणि अभिन्न सहकारिणी हिच्याबरोबर चहा घेत काही तास घालवले. त्या मान्यवर लेखकाच्या पुस्तकांची हस्तलिखिते, चित्रसंग्रह, गांधीजींना त्यांनी लिहिलेली पत्रे आणि गांधीजींची त्यांना आलेली उत्तरे आणि त्या घटनापूर्ण आयुष्याची स्मृती जागवणारी काही स्मृतिचिन्हे हे सर्व पाहून माझे मन थरारून गेले. मानवतेला यांनी किती समृद्ध केले आहे!

पॅरिसचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेली असंख्य कॉफीची दुकाने, कॅफेज. त्यांच्यापैकी काही विश्वविख्यात आहेत. रात्रीच्या जेवणानंतर काही

कॅफेंमध्ये साहित्यिक, विचारवंत, कलाकार, लेखक, समालोचक, बुद्धिवादी इत्यादी मंडळी चर्चांसाठी जमतात आणि त्यांच्या चर्चा ऐकण्यासाठी सामान्य लोकही गर्दी करतात. या ठिकाणी होणाऱ्या चर्चांमधून, वार्तालापांतून जे चिंतन होते, त्यामधूनच नव्या विचारांची मुळे रुजतात आणि नवी रंगचित्रे, कादंबऱ्या, निबंध अथवा वादविवाद पूर्ण बहराला येतात.

काफे दु-दोम आणि काफे दु-रोताँ ही दोन कॅफे या बैठकींसाठी विशेष प्रसिद्ध आहेत. काफे दु-रोताँमधील एक घटना मनोरंजक आहे. एक दिवस या काफेमध्ये एक उपाशी दिसणारा गरीब माणूस शिरला आणि त्याने भरपूर पदार्थ मागवले. ते खाऊन झाल्यावर त्याने तेथील वेटरला भीतभीत म्हटले, की त्याच्याजवळ बिल चुकते करण्यासाठी पैसे नाहीत; कारण तो त्याच्या देशातील राजकीय कार्यकर्ता असून हद्दपारीची शिक्षा भोगत आहे. फ्रेंचांचा पाहुणा म्हणून त्याला काही पैसे तो वेटर बिल देण्यासाठी उसने देऊ शकेल काय, असे त्याने विचारले. ते आपण काही दिवसांनंतर न विसरता परत करू, असेही आश्वासन त्याने दिले. तो वेटर आश्चर्यचकित झाला. पण त्या माणसाच्या आवाजात असे काही आर्जव होते की त्याला 'नाही' म्हणणे त्याला शक्य झाले नाही. वेटरने ज्या माणसाला पैसे दिले होते त्याचे नाव होते लेनिन.

रशियन राज्यक्रांतीनंतर लेनिनला त्या कर्जाची आठवण झाली. त्याने ते पैसे एका दूताद्वारे त्या वेटरला पाठविले. एक भेट आणि आभाराचे हार्दिक पत्रही त्याबरोबर होते. पण त्या वेटरने ती भेट आणि पैसे लगेच परत केले. त्याचे प्रत्युत्तर होते, "मी ज्याला पैसे दिले तो द्रव्यहीन आणि उपाशी परागंदा इसम होता. एका मोठ्या आणि सामर्थ्यवान राष्ट्राचा प्रमुख नव्हता."

मला पॅरिसमध्ये जी सुटी घालवायची होती ती आगळ्या प्रकारची होती. त्यासाठी मी स्वतः महत्त्वाकांक्षी योजना आखली होती. त्याप्रमाणे मला आवडलेले लेखक आणि कलाकार यांच्याशी संबंधित असलेल्या ठिकाणांना मी पुन्हा पुन्हा भेट देण्याचे ठरवले होते.

सुरुवात करायची तर मोलिएखेरीज दुसरे कोणते नाव होते? इंग्लंडचे शेक्सपियरशी जे नाते आहे तेच मोलिएचे फ्रान्सशी आहे. दोनशे सत्तर वर्षांपूर्वी मेलेला मोलिए आजही अमरच आहे. किती? माझ्या वास्तव्यात मला आठवले की तेवढ्या काळातच तीन वेगवेगळ्या नाट्यगृहांतून त्याच्या सहा वेगवेगळ्या नाटकांचे प्रयोग होत होते.

ज्या घरी मोलिए जन्मला त्या घरात मी मोठ्या उमेदीने पाऊल टाकले खरे; पण ते त्याचे घर उरले नव्हते. तरीही ज्या ठिकाणी ते उभे होते त्याची रिकामी

जागा होती. नंतर मी प्रसिद्ध लिसे लाइस ल ग्रांला भेट दिली, जिथे तो शिकला. नंतर जिथे त्याचे लग्न झाले त्या सँ जर्मँ लोक्झेर्वा चर्चमध्ये गेलो. त्याने सुरू केलेले ते लिटिल् थिएटर– जे लवकरच बंद झाले आणि मेणबत्त्यांचे बिल देता आले नाही म्हणून शॅतले तुरुंगामध्ये त्याला कारावास घडला. फ्रेंच साहित्यात मोलिएच्या असंख्य साहसांमुळे रंगीबेरंगी घटनांची नोंद झाली आहे.

त्याच्या जीवनाच्या अखेरच्या काळात मोलिए 40 रू रिशल्यु या ठिकाणी राहत होता. त्या इमारतीवर त्याच्याबद्दल गौरवपूर्ण मजकूर लिहिलेला एक पाषाणफलक त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ लावण्यात आला आहे. त्या साध्या-सुध्या घरासमोर त्याच्या शेवटच्या दिवसांतील घटनांचा विचार करीत मी उभा राहिलो. तो खूप आजारी होता; तरी जवळच्या नाट्यगृहामध्ये जाऊन नाटकातील भूमिका करीत असे. शेवटी अशी एक अवस्था आली, की डॉक्टरांनी त्याला उभे राहून अभिनय करण्यास मनाई केली. मोलिएने ह्यावरही एक तोड काढली. त्याने एक नवीन नाटक लिहिले, ज्यात तो खुर्चीवर बसून अभिनय करू शकणार होता. त्याचे नाव त्याने 'काल्पनिक अपंग' (दी इमॅजिनरी इन्व्हॅलिड) असे ठेवले.

नाटकाच्या पाचव्या प्रयोगाच्या दिवशी म्हणजे 27 फेब्रुवारी 1673 या दिवशी तो इतका आजारी पडला की त्याच्यावर विश्रांतीची सक्ती करण्यात आली; पण त्याने ती नाकारली. तो म्हणाला, 'मी काय करू? माझ्यावर पन्नास गरीब कामगारांचे पोट अवलंबून आहे.'

नाटकाचा प्रयोग संध्याकाळी 4 वाजता सुरू होणार होता. त्याला नाट्यगृहात नेण्यात आले. सर्व शक्ती एकवटून त्याने तो प्रयोग पार पाडला. तो इतका आजारी आहे याची कल्पना प्रेक्षकांना नव्हती. नाटक संपल्यानंतर तासाभरातच मोलिएच्या आयुष्याचाही खेळ संपला. मोलिएने आपल्या आयुष्याची मेणबत्ती दोनही टोकांकडून पेटविली होती. गेला तेव्हा तो फक्त 51 वर्षांचा होता. पण साहित्यात अमरत्व मिळविण्यासाठी त्याला तेवढे आयुष्य पुरेसे होते.

साधारणतः मृत्यूनंतरच्या प्रसंगांत मृत व्यक्तीसंबंधीची सर्व प्रकारची वादग्रस्तता टाळली जाते; पण मोलिए त्याला अपवाद ठरला. चर्चने त्याचे अंत्यसंस्कार करण्याचे नाकारले आणि ख्रिश्चन पद्धतीच्या दफनास नकार दिला. कारण तो एक नट होता आणि त्या काळात तो व्यवसाय अनैतिक ठरवला गेला होता. ज्यांना बोलावले होते, त्या धर्मगुरूंनी त्याच्या अंत्यसमयी येण्याचे नाकारले. अनेक तऱ्हेने केलेल्या मनधरणीचा काहीही उपयोग झाला नाही. शेवटी राजदरबारात उच्च स्थानावर असलेल्या मोलिएच्या मित्रांनी हे प्रकरण राजाकडे नेऊन त्याला गळ घातली. त्याने पॅरिसच्या आर्चबिशपला राजाज्ञा फर्मावून मोलिएचे

अंत्यसंस्कार पार पाडण्यास भाग पाडले. धार्मिक श्रेष्ठींवर अशा प्रकारे सक्ती झाली, तेव्हा कुरकुरत त्यांनी ते काम कसेबसे पार पाडायचे ठरवले. मग त्या आर्चबिशपने असा फतवा काढला, की अंत्यसंस्कार कोणत्याही डामडौलाशिवाय, मान-सन्मानाशिवाय पार पाडावेत. त्यासाठी फक्त दोन धर्मोपदेशकांनी उपस्थित राहावे; आणि ते सर्व संस्कार रात्री पार पाडण्यात यावेत. दिवसाची सेवा अंत्ययात्रेला देण्यात येऊ नये. अशा प्रकारे मोलिएचे शव अंधारात आणि निःशब्द वातावरणात सेंट जोसेफसारख्या एका किरकोळ चर्चच्या कोपऱ्यात साध्यासुध्या थडग्यात ठेवण्यात आले; जे आज त्या जागेवर नाही. त्या ठिकाणी आता मोठ्या इमारती उभ्या आहेत. त्याचे अवशेष पुढे फ्रेंच स्मृतिचिन्हांच्या वस्तुसंग्रहालयात (म्युझियम ऑफ फ्रेंच मॉन्युमेंटस्) नेण्यात आले. जेव्हा ते वस्तुसंग्रहालयही लयाला गेले, तेव्हा ते अवशेष पेअर लाशेज् येथील दफनभूमीत नेण्यात आले. अशा प्रकारे मोलिएला अखेर जगातल्या सर्वांत प्रसिद्ध अशा दफनभूमीत विश्रांती मिळाली!

बाल्झाक, ला फोन्तें, देलाक्र्वा, बार्ये, मिशेले, गॉतिए, शॉपों, तामे आणि अनेक नामवंतांना या दफनभूमीत विश्रांती मिळाली आहे. त्याचप्रमाणे अबेलार आणि एल्वाज, ज्या दोन प्रेमींची शोकांत कहाणी फ्रेंच साहित्यातून शब्द आणि गीत या माध्यमांतून वेळोवेळी कथिली जाते, तेही एकमेकांच्या सोबतीत येथे विसावले आहेत.

पॅरिसमधील सर्वांत प्रसिद्ध घर कदाचित व्हिक्टर ह्यूगोचे असावे. प्रसिद्ध रस्त्यावरील या प्रसिद्ध घरात व्हिक्टर ह्यूगो राहिला. प्लास-द-वोयाज या ठिकाणी ते आहे. राजकीय आणि साहित्यिक जाणिवेचा अर्क असलेल्या मंडळींचे वास्तव्य असलेली दुसरी वस्ती पॅरिसमध्ये दाखवता येणार नाही. एक क्रमांकाच्या घरामध्ये मादाम दु साव्हिन या थोर लेखिकेचा जन्म झाला. थिओफिल् गॉतिए आणि त्याच्या नंतर अल्फोन्ज दादे ह्या दोन व्यक्ती – ज्यांना फ्रेंच ललित साहित्यात मानाचे स्थान आहे – एकानंतर एक असे 8 क्रमांकाच्या घरात राहिले. शोकांत लेखनासाठी प्रसिद्ध असलेले रॅचेल 9 क्रमांकाच्या; तर कार्दिनाल रिशल्यु 21 क्रमांकाच्या घरात राहात होते. आता पाले रॉयल म्हणून ज्याला ओळखतात त्या पाले कार्दिनालचे त्यावेळी बांधकाम चालू होते.

पण प्रत्येकाला जास्तीत जास्त औत्सुक्य असते ते 6 क्रमांकाच्या घराबद्दल, ज्यात व्हिक्टर ह्यूगो जवळ जवळ पन्नास वर्षे राहत होता. 1832 मध्ये 'नोत्र दाम द पॅरिस' ही प्रसिद्ध कादंबरी लिहून झाल्यावर तो इथे राहायला आला. त्या कादंबरीत पंधराव्या शतकातील पॅरिसमधील जनजीवनाचे चित्रण आहे. ह्यूगो या घरात राहण्यापूर्वीपासूनच हे घर तसे प्रख्यात होते. फ्रान्सचा लोकप्रिय राजा

चौदावा लुई याचा खून एका धर्मवेड्या माणसाकडून ज्या गाडीत झाला, त्या गाडीत त्याच्या शेजारीच बसलेला मार्शल लावार्दिन हा याच ठिकाणी राहत होता. त्यानंतर मारिआँ दलोर्म ही पॅरिसमधली एक नेत्रदीपक लावण्यलतिका जिच्यामध्ये स्वतः कार्दिनाल रिशेल्यु गुंतला होता, तिचा निवास येथेच होता. तिचा धाडसी आणि उमदा प्रियकर मार्किस द सँक मार्स याने त्या थोर कार्डिनलविरुद्ध कटकारस्थाने इथेच रचली आणि अखेर त्यांत स्वतःचा बळी दिला. याच मादाम दलोर्मवर ह्यूगोने त्या घरात राहायला येण्यापूर्वी एक नाटक लिहिले होते. या ऐतिहासिक ठिकाणी राहायला आल्यानंतर ह्यूगोने आपली प्रसिद्ध कादंबरी 'ल मिझराब्ल' हिचे लेखन केले.

त्याच्या खास दिवाणखान्यात जवळच्या, लांबच्या सर्व माणसांची ऊठबस असे. चार्ल्स डिकन्स त्याच्या सुप्रसिद्ध 'टेल ऑफ टू सिटीज' या कादंबरीसाठी माहिती जमवावी म्हणून पॅरिसमध्ये आला असता या ठिकाणी मेजवान्यांच्या निमित्ताने येत असे. त्याचप्रमाणे अलेक्झांडर ड्यूमा, प्रसिद्ध कवी म्युसे, इतिहासकार लामार्तिन, शिल्पकार बार्ये, देलाक्र्वा – ज्याची रंगकलेतील नवीन शैली सर्वांच्या टीकाटिप्पणीचे लक्ष्य बनली होती, 'कार्मेन' या नाटकाचा लेखक प्रॉस्पर मॅरिमी या सर्वांची ह्यूगोच्या दिवाणखान्यात हजेरी असे. मॅरिमीचे 'कार्मेन' तर इतके विख्यात झाले होते की पॅरिसमध्ये येणारा कोणीही प्रवासी ते नाटक रंगभूमीवर पाहिल्याशिवाय परत जात नव्हता.

एक दिवस ह्यूगोच्या दारावर थाप पडली. एक अतिशय सुंदर तरुणी त्या थोर लेखकाला भेटण्यासाठी आतुर झाली होती. त्या आधी वर्तमानपत्रात तिने वाचले होते की ह्यूगोचे नवीन नाटक 'ल्यूक्रेस बोर्जिआ' हे लवकरच रंगभूमीवर येणार होते; पण त्यातील नायिकेच्या कामासाठी अद्याप कोणाची निवड झालेली नव्हती. ह्यूगोला भेटायला आलेल्या त्या तरुणीने अनेक नाटकांतून लहानसहान भूमिका केलेल्या होत्या, म्हणून या नवीन नाटकात आपल्याला नायिकेच्या भूमिकेत संधी मिळावी अशी विनंती तिने ह्यूगोला केली; आणि ती त्याने मान्यही केली. त्या दिवसापासून ह्यूगोच्या आयुष्यात एक नवा अध्याय सुरू झाला. ज्यूलिए द्रु ही मदनिका त्याची आवडती सोबतीण बनली. त्यानंतर पुरती पन्नास वर्षे तो तिला दररोज एक पत्र लिहीत होता. शिवाय दरदिवशी एकदा किंवा अधिक वेळा त्यांची भेटही होत असे.

ह्यूगो परिपक्व वार्धक्यात म्हणजे वयाच्या त्र्याऐंशीव्या वर्षी मरण पावला. गरीब माणसाच्या शवपेटीत आपले दफन करण्यात यावे अशी इच्छा त्याने व्यक्त केली होती. त्याप्रमाणे त्याला कपडे चढवून लोकांनी दर्शन घ्यावे म्हणून शवपेटी

'आर्क द त्रँफ' (विजयाची कमान) खाली ठेवण्यात आली. दिवस-रात्र रांग लावून लोकांनी फ्रान्सच्या या थोर सुपुत्राचे अखेरचे दर्शन घेतले. दुसऱ्या दिवशी मोठ्या सन्मानाने त्याचे शव दफनासाठी पॅन्थिआँ येथे नेण्यात आले.

पॅरिसमधल्या माझ्या भटकंतीत माझ्या काही जिव्हाळ्याच्या मित्रांनी सोबत केली. मॉसीये वाइस, जे फ्रान्समधील एक प्रसिद्ध उत्खननतज्ज्ञ आहेत, ते मला माल्मेझाँ या ठिकाणी घेऊन गेले. हे ठिकाण नेपोलियनला फार प्रिय होते आणि तिथे त्याची पत्नी जोसेफाइन, तिचा घटस्फोट झाल्यानंतर घायाळ अंतःकरणाने उर्वरित आयुष्य घालविण्यासाठी परतली होती. नेपोलियनच्या आणि त्या काळात त्याच्याशी संबंधित असलेल्या सर्व गोष्टींचा येथील संग्रह जगात सर्वांत मोठा समजला जातो. पॅरिसपासून लांब अंतरावर असलेल्या या ठिकाणाहून आपण पॅरिसला परततो तेव्हा पॅरिस नेपोलियनने व्यापून टाकल्यासारखे वाटते, कारण त्याने बांधलेल्या इमारती आणि स्मृतिस्तंभ पॅरिसच्या आकाशरेषेत ठिकठिकाणी उद्दामपणे उभे राहिलेले दिसतात. आणखी एका दिवशी मादाम लिप्पन्स ही विदुषी माझ्याबरोबर सफरीवर होती. आणि मादाम रॅने आणि मादाम फोसे यांच्या औदार्याला तर मर्यादाच नव्हती.

हयात लेखकांचा निर्देश मी मुद्दाम टाळला आहे. त्यांमध्ये प्रामुख्याने आहेत 1947 साली नोबेल पारितोषिक मिळवलेले आन्द्रे जीद, दुहामल ज्यूल रोमँ, ऑरागाँ, मार्लो; शिवाय सार्त्र, कामू आणि सिमॉन द-बोव्हा हे निखळ अस्तित्ववादाचा पुरस्कार करणारे प्रतिभाशाली त्रिकूट; कारण एका लेखाच्या मर्यादेत किती जणांना स्थान देता येणार?

आता पॅरिसच्या नाट्यगृहांविषयी काही शब्द! किती भव्य आणि नेत्रदीपक त्यांची रचना असते! माझ्या सर्व कार्यक्रमांत हे खरोखरच कसे चपखल बसले– थोरामोठ्यांच्या स्मृती जपत असलेली ठिकाणे पहायची; आणि नंतर नाट्यगृहात जाऊन त्यांच्या असामान्य कलाकृतींचा आस्वाद घ्यायचा! ऑपेरामध्ये मी पुश्किनचे 'गोदुनॉव्ह' पाहिले. बोमार्शेचे 'दि मॅरेज ऑफ फिगॅरो' ऑपेरा कॉमिक्ला, व्हिक्टर ह्यूगोचे 'रू ब्लास' थिएटर फ्रॅन्सेजला, मोलिएचे 'तार्तुफ' ओदेन... अशा अनेक नाटकांचा भरभरून आस्वाद घेतला. त्यांच्या सादरीकरणामध्ये किती तांत्रिक निर्दोषता असते! आणि ही सर्व नाट्यगृहे सरकारने अनुदानित केलेली असल्यामुळे त्यांचे सर्वांत महाग तिकीट 3 किंवा 4 रुपयांपेक्षा जास्त असत नाही. आणि सर्वांत मागचे रुपयापेक्षा कमीच असते. नाटकासारख्या गोष्टीचे सुप्त शैक्षणिक आणि सांस्कृतिक सामर्थ्य लक्षात घेऊन व हा आदर्श समोर ठेवून आमच्याही सरकारला जी कायदामान्य नाट्यगृहे आहेत, त्यांना अनुदान देऊन आधार देणे शक्य होणार नाही काय?

माझ्या येथील वास्तव्यात हेन्री द मॉन्तेर्लां यांचे चालू नाटक लोकांची गर्दी आणि औत्सुक्य खेचत होते. ते एक प्रचंड दमदार कथानक पण शोकांतिका असून कमालीच्या तणावाने ग्रासलेले होते. जेव्हा मी ते पहायला निघालो तेव्हा माझ्यासोबत असलेल्या विलोभनीय व्यक्तित्वाच्या मादाम नान्ते द सेराँने टॅक्सी ड्रायव्हरला थिएटरचे नाव सांगितले. ते ऐकताच तो पाठीमागे वळून म्हणाला, 'ते नाटक तुम्हांला कशासाठी पाहायचे आहे? ती एक भीषण शोकांतिका आहे. जगात काय कमी दु:खे आहेत का, की त्यांत आणखी एक उदास संध्याकाळ घालविण्यासाठी तुम्हांला पैसे खर्च करायचे आहेत? या शहरात आणखी खूप आनंददायी नाटके चाललेली आहेत. त्यांतील एखादे तर पहा.'

त्याच्या लुडबुडीचा मला राग आला नाही, उलट बरे वाटले. मी त्याला पर्याय विचारला. दरम्यान आम्ही ठरवलेल्या नाट्यगृहाकडे आलो होतो. आमचा दृढ निश्चय पाहून तो म्हणाला, "कदाचित् तुम्हांला तिकिटे मिळणार नाहीत. मी इथेच थांबतो. नाही मिळाली तर दुसऱ्या एखाद्या नाट्यगृहात तुम्हांला नेईन. तुम्ही माझे आभार मानाल." पण तिकिटे आधीच काढली होती. म्हणून आम्ही आत गेलो.

पॅरिस हे असे आहे! उपहारगृहातील टेबलापासून ते टॅक्सी ड्रायव्हरपर्यंत सर्वत्र बौद्धिक चर्चा चालू असते आणि रस्त्यावरचा सर्वसामान्य माणूसही त्याला दाद देतो!

विषयसूची

Laser Typeset at Sadhna Press, Pune-411 030
and printed at Tarang Printers, Delhi-110 092